म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
REFBK-0002585
REFBK-0002585

महाराष्ट्रग्रंथमालेचें पुष्प सातवें

# काव्य-कौमुदी

व्य-कौमुदी-मंडळ

किंमत २-८-०.

महाराष्ट्रग्रंथमालेचें सातवें पुष्प

# काव्यकौमुदी

संपादक

**काव्यकौमुदी–मंडळ**

REFBK-0002585

१९२४

किंमत २॥ रुपये

प्रकाशकः—

**गोपाळ गंगाधर पोतदार,**

चिटणीस, काव्यकौमुदी–मंडळ, धुळें.

[ सर्व हक्क संपादकांच्या स्वाधीन आहेत. ]

मुद्रकः—

**अनंत सखाराम गोखले**

'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें

# आभारप्रदर्शन

काव्यकौमुदींत गेल्या शंभर वर्षांतील मराठी कवितेचें यथार्थ स्वरूप दृग्गोचर होऊन रसिकांना ज्ञानप्राप्तीबरोबर मनोरंजनही करितां यावें म्हणून संग्रहित केलेल्या या ग्रंथाला महाराष्ट्रांतील विद्यमान कवींनीं जी सक्रिय सहानुभूति दाखविली व मंडळाला उपकृत केलें त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

काव्यकौमुदीमंडळांतील सन्मान्य सभासदांचे आभार मानणें जरी केवळ औपचारिक भासलें तरी त्यांच्या बहुमोल मदतीशिवाय कार्य यशस्वी झालें नसतें.

कै० केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवि, दत्त, टिळक, विनायक या नामांकित दिवंगत कवींच्या निवडक कविता काव्यकौमुदींत संग्रहित करण्याची परवानगी मोठ्या उदारपणें दिल्याबद्दल, आम्ही, अनुक्रमें प्रोफेसर सी. के. दामले, बी. ए., एलएल. बी., रा०रा०शंकरराव गडकरी, रा०रा०बाबूराव ठोमरे, रा०रा० विठ्ठलराव घाटे, एम्. ए., रा० रा० उजागरे, बी. ए. व रा. रा. दत्तात्रेय अनंत आपटे ( कवि अनंततनय ) या सद्गृहस्थांचे अत्यंत ऋणी आहोंत.

उत्कृष्ट छपाई व बांधणीबद्दल विजय प्रेसचे मालक रा० आप्पासाहेब गोखले यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

ज्या होतकरू कवींच्या कविता मंडळाला पसंत पडल्या नाहींत त्या घेतल्या गेल्या नाहींत. त्यांनीं रोष करूं नये ही विनंती.

मंडळाची ही सेवा जनतास्वरूप जनार्दनाला पसंत पडो ही नम्र प्रार्थना आहे.

धुळें,
विजयादशमी.
७।१०।१९२४.

विनीत,
**गोपाळ गंगाधर पोतदार**
चिटणीस–काव्यकौमुदी–मंडळ

काव्य नं. ३०८

# अनुक्रमणिका

## भाग १—दिवंगत कवि


१ परशुरामतात्या गोडबोले ... ... १—२

(१) दंडकवन

२ कृष्णशास्त्री चिपळूणकर ... ... ३—५

(१) अन्योक्तिमाला

३ गणेशशास्त्री लेले ... ... ... ६—७

(१) शिवबोध

४ भास्कर दामोदर पाळंदे ... ... ८—९

(१) परमेश्वरप्रार्थना

५ महादेव मोरेश्वर कुंटे ... ... ... १०—११

(१) बहिर्जी नाईक (२) संभाजी

६ विनायक कोंडदेव ओक ... ... १२—१३

(१) इतिहासाचें म्हणणें

७ डॉ० का. र. कीर्तिकर ... ... १४—१५

(१) करुणापंचक (२) धैर्य व तरवार यांची गाळण

८ शिवराम रामकृष्ण नित्सुरे ... ... १६—१८

(१) पत्नीविलाप (२) पतिविलाप

९ विठ्ठल भगवंत लेंभे ... ... ... १९—२३

(१) अद्यापि (२) अयोध्या

१० पां. व्यं. चिंतामणिपेठकर ... ... २४—२५

(१) गंगा

११ विष्णु मोरेश्वर महाजनी ... ... २६—२७

(१) विश्वमंदिर (२) चंद्र (३) साध्वी नदी

१२ गणेश जनार्दन आगाशे ... ... २८–२९
(१) रूढिमहिमा
१३ गोविंद वासुदेव कानिटकर ... ... ३०–३२
(१) स्वातंत्र्याची योग्यता (२) चंद्रकलेचा ग्रास
(३) माझी विनंति
१४ मोरो गणेश लोंढे ... ... ... ३३–३४
(१) तारुण्यांतील उमेदी
१५ बलवंत जनार्दन करंदिकर ... ... ३५–३८
(१) हृदयसंगम हाच सुसंगम
(२) स्वामी कोण तुझा ?
१६ गंगाधर रामचंद्र मोगरे ... ... ३९–४१
(१) हिंदुस्थानावर शिकंदराची स्वारी
१७ वासुदेव बळवंत पटवर्धन ... ... ४२–४४
(१) शब्द (२) मन (३) ताजमहाल पाहिल्यावर
१८ एकनाथ गणेश भांडारे ... ... ४५–४७
(१) आर्यमातेचा शोक (२) स्मशानशांतता
(३) स्वप्न
१९ नारायण वामन टिळक ... ... ४८–५४
(१) जन्मभूमि (२) पुरें जाणतों मीच माझें बल
(३) कोण सांगेल नांव ? (४) एक सुंदर कवि
(५) सारीं फुलेंच फुलें (६) तें गृह (७)
सुशीला (८) ब्राह्मण किंवा महार ?
२० कृष्णाजी केशव दामले ... ... ५५–६७
(१) तुतारी (२) दिवस आणि रात्र (३) झपूर्झा
(४) स्फूर्ति (५) आम्ही कोण (६) म्हातारी
(७) दोन बाजी

२१ काशीनाथ हरि मोडक ... ... ६८–७२
(१) लाजरी (२) स्मशानगीत (३) प्रियेचे अश्रु
(४) सांत्वन (५) काळ, कीर्ति व विस्मृति
(६) संगम

२२ विनायक जनार्दन करंदीकर ... ... ७३–७९
(१) जोहार (२) महाराष्ट्रलक्ष्मी (३) हतभागिनी
(४) प्रीति निमाली तर (५) यापुढें (६)
देशभक्ताचा अपूर्व सोहळा

२३ दत्तात्रेय कोंडो घाटे ... ... ... ८०–८३
(१) विश्वामित्रीच्या कांठीं (२) निज नीज माझ्या
बाळा

२४ कृष्णाजी पांडुरंग लिमये ... ... ८४–८५
(१) पानपतचें युद्ध

२५ श्रीपाद नारायण मुजुमदार ... ... ८६–८९
(१) बालविधवा

२६ वि. बा. कुळकर्णी कल्लोळकर ... ... ९०–९१
(१) स्वर्गी भेट घडेल

२७ दिनकर नानाजी शिंदे .. ... ... ९२–९३
(१) प्रदोषतारा

२८ राम गणेश गडकरी ... ... ... ९४–१०५
(१) मुरली (२) प्रेम आणि मरण (३) महाराष्ट्रगीत

२९ एकनाथ पांडुरंग रेंदाळकर ... ... १०६–१०८
(१) काय बरें झालें ? (२) एकदां हांस

३० त्र्यंबक बापूजी ठोंबरे ... ... ... १०९–११२
(१) निर्झर (२) कवीची इच्छा

३१ सौ० लक्ष्मीबाई बेहेरे ... ... ... ११३–११४
(१) कोती दृष्टि

# भाग २ रा.

## विद्यमान कवि.

३२ कृष्णाजी नारायण आठल्ये ... ... ११७–१२०
(१) भीमकर्मा राघोबा
३३ पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी ... ... १२१–१२२
(१) स्वातंत्र्याची महती
३४ वासुदेव वामन खरे ... ... ... १२३–१२५
(१) समुद्र (२) जन्मभूमि
३५ विद्याधर वामन भिडे ... ... ... १२६–१२७
(१) भरतभेट
३६ नारायण नरसिंह फडणीस ... ... १२८–१३२
(१) महाराष्ट्रमुक्तामाला
३७ महादेव हरि मोडक ... ... ... १३३–१३४
(१) कमल (२) मृत्यूस (३) समाधान
३८ दामोदर गणेश पाध्ये ... ... ... १३५–१३७
(१) ईश्वरापाशीं फिर्याद
३९ श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ... ... १३८–१३९
(१) विलक्षण न्यायसभा
४० चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे ... ... १४०–१४२
(१) उत्कंठिता
४१ नरसिंह चिंतामण केळकर ... ... १४३–१४६
(१) वेषभूषा (२) कांटेरी गुलाब (३) माझा आवडता फकीर
४२ नारायण मुरलीधर गुप्ते ... ... १४७–१५२
(१) बकुल (२) तो दिवस (३) फुलांची ओंजळ

## अनुक्रमणिका


४३ लक्ष्मण गणेशशास्त्री लेले ... ... १५३–१५५
(१) आर्यमातृवंदन (२) अबलांचें बल
४४ बाळकृष्ण अनंत भिडे... ... ... १५६–१६४
(१) यशोमार्ग (२) दोन चित्रें
४५ भास्कर रामचंद्र तांबे ... ... ... १६५–१७४
(१) विधवेचें स्वप्न (२) बिजली जाशि चमके स्वारी
(३) राजकन्या व तिची दासी (४) मुषाफिर-आम्ही (५) आतां गडि फू दादाशीं (६) घट भरे.
४६ गणेश नारायण टिपणीस ... ... १७५–१८२
(१) हिरकणी (२) हक्काची फांक
(३) महाराष्ट्रधर्म
४७ श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर ... ... १८३–१८५
(१) मुरली (२) सुवर्णपिंपळपान
४८ कृ. बा. कुळकर्णी ... ... ... १८६–१८८
(१) भूस्वर्ग (२) रसालास
४९ अप्पाराव धुंडिराज मुरतुले ... ... १८९–१९३
(१) अलोकगानेच्छा (२) पांवा (३) निराशा
(४) पूर्व आणि पश्चिम (५) भिन्न मार्ग
५० दत्तात्रेय अनंत आपटे... ... ... १९४–१९९
(१) छत फोडतांना (२) गरीब गोवऱ्यावाली
(३) पुथून ताकला !
५१ नरहर शंकर रहाळकर ... ... २००–२०२
(१) भवितव्यता
५२ नारायण महादेव भिडे ... ... २०३–२०५
(१) फूलपांखरूं


*

५३ गोपाळ गोविंद पाटणकर ... ... २०६–२०७
(१) तें पाउल कोणाचें ? (२) संध्याकाळची सहल

५४ केशव महादेव सोनाळकर ... ... २०८–२१२
(१) ईशस्तवन (२) प्रेम (३) प्रेमरहस्य
(४) प्रेमसंशोधन (५) प्रेमयज्ञ

५५ एकनाथ यादव निफाडकर ... ... २१३–२१८
(१) हे दिन ! (२) पार्वतीची भीति व भाऊचें
धैर्य (३) सुगंध व स्फूर्ति

५६ दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी ... ... २१९–२२२
(१) वीरविधवा (२) कल्लोलिनी

५७ सौ० शारदाबाई परांजपे ... ... २२३–२२५
(१) कालियामर्दन

५८ नारायण गंगाधर लिमये ... ... २२६–२२७
(१) वहिनीला काय झालं ? (२) श्री (३) तो
प्रसंग ! (४) आणि तो प्रसंग !

५९ नागेश गणेश नवरे ... ... ... २२८–२३०
(१) अखेरचा फांसा

६० बलवंत गणेश खापर्डे ... ... ... २३१–२३४
(१) स्वराज्यश्रीरंग (२) रायगडावर वीज चमकली

६१ श्रीनिवास रामचंद्र बोबडे ... ... २३५–२३७
(१) अहं (२) ज्योति (३) स्वतःप्रामाण्य.

६२ नारायण केशव बेहरे ... ... ... २३८–२४३
(१) विषय जुनाच (२ ) हा का महार दूर
(३)शाहीर (४) परिवर्तन (५) माझाच हिंद देश

६३ आनंदराव कृष्णाजी टेकाडे ... ... २४४–२४६
(१) स्वैर विचार, (२) उषा (३) माझी कविता

६४ माधव केशव काटदरे... ... ... २४७–२४९
(१) शाहू महाराजांचें आगमन

६५ केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर ... ... २५०–२५१
(१) स्वातंत्र्यदेवीस (२) सावधान

६६ सौ० फुलमाळीण ... ... ... २५२–२५४
(१) बाळ शशीस (२) वैभवांतली शूर बाला

६७ वासुदेव गोविंद मायदेव ... ... २५५–२५७
(१) हंसरें मूल (२) बाळा अंगाई (३) माझें गाणें
(४) कमला (५) आहे मी बाळ हो उगी

६८ सखाराम गोविंद विरकूड ... ... २५८–२५९
(१) सुप्रभात (२) गौळण

६९ विठ्ठल कृष्ण नेरूरकर... ... ... २६०–२६१
(१) काव्योद्भव

७० भास्कर नानाजी शिंदे... ... ... २६२–२६६
(१) महाराष्ट्रास अभिवादन (२) भवानी समशेर

७१ धोंडो वासुदेव गद्रे ... ... ... २६७–२६८
(१) सौंदर्य म्हणजे (२) पूर्वस्मृति

७२ गोपाळ गंगाधर पोतदार ... ... २६९–२७५
(१) विनंती (२) दुर्दैव (३) इशारा (४) माता की कांता
(५) आम्ही कोण (६) वीरवंदन

७३ गुणवंत हनुमंत देशपांडे ... ... २७६–२७८
(१) कांहीं कळेना (२) विनवणी

७४ कृ. प. तासकर ... ... ... २७९–२८०
(१) चपला (२) किती आळवूं

७५ प्रल्हाद केशव अत्रे ... ... ... २८१–२८५
(१) फत्तर आणि फुलें (२) भावना आणि जीवन
(३) चिरविरह (४) अपुरी माळ

७६ विष्णु सखाराम खांडेकर ... ... २८६–२८९
(१) जन्मभूमि (२) सांवली (३) भग्नहृदय

७७ भास्कर काशिनाथ चंदूरकर ... ... २९०–२९१
(१) हांस गडे (२) सवाल

७८ सीताराम महादेव पत्की ... ... २९२–२९३
(१) पहिला प्रणाम (२) तो क्षण

७९ रघुनाथ मोरेश्वर प्रधान ... ... २९४–२९५
(१) अनुताप्याचे उद्गार (२) चित्रकारास

८० नूतन दत्त ... ... ... ... २९६–२९७
(१) पुनरुत्थापन (२) प्रार्थना.

८१ विनायक लक्ष्मण बर्वे ... ... ... २९८–३००
(१) आशागीत (२) बुडबुडा (३) सौंदर्य व हीनदृष्टी

८२ सरलाबाला शाहीर ... ... ... ३०१–३०३
(१) पहिला प्याला (२) शेवटची आशा (३) प्रेमगान

८३ भवानी श्री. पंडित ... ... ... ३०४–३०६
(१) येणार कोण (२ हिंदनंदना

## भाग ३—कवि-संमेलन


| | | |
|---|---|---|
| ८४ | बालकवि तळवलकर | ३०७ |
| ८५ | वसंतविहार | ३०८ |
| ८६ | बॅरि. विनायकराव सावरकर | ३१० |
| ८७ | गोविंद शाहीर | ३१२ |
| ८८ | पुष्पविहार | ३१४ |
| ८९ | मंजुमाधव | ३१६ |
| ९० | यादवसुत | ३१८ |
| ९१ | केशव लक्ष्मण ओगले | ३२० |
| ९२ | जयकृष्ण केशव उपाध्ये | ३२२ |
| ९३ | दत्तात्रय श्रीनिवास केळकर | ३२४ |
| ९४ | गोविंद रामचंद्र हिंगणेकर | ३२५ |
| ९५ | हरि महादेव समर्थ | ३२६ |
| ९६ | शरच्चंद्र | ३२८ |
| ९७ | बळवंत | ३२९ |
| ९८ | सीताराम बाळकृष्ण जोशी | ३३० |
| ९९ | पुरुषोत्तम वामन सुभेदार | ३३१ |
| १०० | शंकर श्रीधर धनेश्वर | ३३३ |
| १०१ | जयवंत | ३३४ |
| १०२ | जननीजनकज | ३३६ |
| १०३ | पांडुरंग गोपाळ लोहोकरे | ३३८ |
| १०४ | मकरंद | ३३९ |
| १०५ | मोहन | ३४० |
| १०६ | दत्तात्रय बापुराव पद्माकर | ३४२ |
| १०७ | वनराज | ३४३ |

१०८ वनराजमित्र ... ... ... ३४५
१०९ कवि विराग ... ... ... ३४६
११० विपिन-विहारी ... ... ... ३४७
१११ माधवसुत ... ... ... ... ३४८
११२ वासुदेवशास्त्री बागेवाडीकर ... ... ३४९
११३ कवि विनय ... ... ... ३५०
११४ कवि सुहृद ... ... ... ३५१
११५ एल्. बी. वैद्य ... ... ... ३५३
११६ बोधेश्वर ... ... ... ... ३५४
११७ गणेश प्रभु... ... ... ... ३५६
११८ रा. ना. फडणीस ... ... ... ३५७
११९ देवीदास लक्ष्मण महाजन ... ... ३५८
१२० भानुदास ... ... ... ... ३५९
१२१ कृष्णानुज ... ... ... ... ३६०
१२२ एन्. व्ही. फडके ... ... ... ३६१
१२३ शेषराव गणेश पांडे ... ... ... ३६२
१२४ सदाशिव विष्णु कल्लोळकर ... ... ३६४
१२५ संन्यासतीर्थ ... ... ... ३६५
१२६ वासुदेव नारायण फडणीस ... ... ३६६
१२७ गोप ... ... ३६८
१२८ विद्याधरानुज ... ... ३६९
१२९ आनंदीकांत ... ... ३७०
१३० आनंदतीर्थ ... ... ३७२
१३१ गणेशनंदन ... ... ३७३
१३२ लालजी पेंडसे ... ... ३७४

१३३ वामनसुत ... ... ३७६
१३४ सौ० उमाबाई सहस्रबुद्धे ... ... ३७८
१३५ वामन नारायण देशपांडे ... ... ३७९
१३६ कवितनय ... ... ... ३८०
१३७ गणेश ... ... ... ३८१
१३८ आ. रा. देशपांडे ... ... ... ३८२

# काव्यकौमुदी-मंडळ

नारायण नरसिंह फडणीस

( संपादक, काव्यरत्नावली, जळगांव)

दत्तात्रय अनंत आपटे

( कवि अनंततनय, नाशीक )

नारायण केशव बेहेरे

एम्. ए., बीएस्सी., एल्. टी., वर्धा

केशव महादेव सोनाळकर

( वकील, जळगांव )

एकनाथ यादव निफाडकर

( संपादक—लोकमान्य, धुळें )

गोपाळ गंगाधर पोतदार, (कवि मनोहर)

बी. ए., एल्. टी., धुळें

२५८५

# प्रस्तावना

"दुग्धा नवनीत, सुमा सौगंध्य, तशीच वाङ्मया कविता."

—प्रो० ल. ग. लेले.

अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या काळास इंग्रजी रियासतीपासून आरंभ झाला व त्यास आज एक शतक पुरें होऊन गेलें आहे. या शतकांत काव्यवाङ्मयाच्या इतिहासांत बहुतेक सारख्या अंतरानें तीन वेळां क्रांति घडून आलेली आढळते. पेशवाईची अखेर झाल्यावर इंग्रजी रियासतीच्या अव्वलीस शाळाखातें स्थापन झालें व या खात्याचा हेतु सिद्धीस नेण्यासाठीं अर्वाचीन वळणाचे कवि प्रथमतःच पुढें आले. या कविमंडळामध्यें संस्कृत भाषेंत निष्णात असलेल्या पंडितांचा भरणा बराच होता व त्यांनीं संस्कृत काव्यनाटकांच्या धर्तीवर आपल्या मराठी काव्यांस वळण दिलें. जुन्या मोडीच्या कवींचा सर्व भार पौराणिक कथा, वेदान्तचर्चा, संतचरित्रें, हरिनामसंकीर्तन, पारलौकिकसाध्य, इत्यादि गोष्टींवर होता. परंतु अर्वाचीन काळांतील या आघाडीच्या कविमंडळानें या बाबतींत एकदम क्रांति घडवून आणिली व संस्कृतांतील महाकाव्यें, खंडकाव्यें, सुभाषितें व नाटकें यांच्या नमुन्यावर भाषांतरें, रूपांतरें अगर स्वतंत्र प्रबंध विपुल निर्माण केले. ऋतुवर्णनें, ऐतिहासिक प्रसंग, नीतिबोध, वीरांचीं चरित्रें व सांसारिक कथा यांकडे मराठी कवितेचा ओढा याच कवींनीं प्रथमतः प्रमुखत्वानें वळविला. त्यांच्या प्रयत्नाला तो काळ फारच अनुकूल होता. सरकारची कळकळ व शाळाखात्याची मदत यांच्या साहाय्यानें या कविमंडळाचा बोलबाला चांगला झाला. मध्यंतरीं मुंबई विद्यापीठाची प्राणप्रतिष्ठा झाली व त्याच्या अभ्यासक्रमांत मराठीचा अंतर्भाव झाला असल्यामुळें त्या वेळीं विद्यापीठांतून बाहेर पडणाऱ्या पदवीधर विद्वन्मणींचीही या कविवर्गाविषयीं अनुकूल व सादर वृत्ति होती. या क्रांतिकारक कवींनीं काव्याच्या विषयांत जरी फरक केला तरी काव्यरीति व वर्णनपद्धति जुन्याच ठशाची अंगिकारली. त्यांच्या भाषेंतही सामान्यतः दाठरपणा व दडदडीतपणा

विशेष आढळून येतो. असो. यानंतर इंग्रजी शिक्षणाचा फैलाव जारीनें होऊं लागला. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांतून मराठीलाही अर्धचंद्र मिळाला. त्यामुळें नवीन सुशिक्षितांचा जो वर्ग तयार होऊं लागला, त्याचा आंग्लवाङ्मयाशीं परिचय दृढ होत जाऊन, मराठीचा व्यासंग बुडत चालला. इंग्रजींतील काव्याच्या नव्याच रीतीची या मंडळीस चटक लागली, आणि इंग्रजीपुढें मराठी मुर्दाड भासूं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, जुन्या वळणाच्या मराठी कवितेसच नव्हे तर नव्या वळणाच्या कवितेसही सुशिक्षितांत कोणी वाली मिळेनासा झाला. अशा रीतीनें मराठी काव्यवाङ्मयाची कुचंबणा होऊन दुर्दशा होत चालली असतां मधून मधून इंग्रजींतील लघुकाव्यांच्या धर्तीवर नवीन शिक्षितांकडून थोडथोडी भाषांतर-स्वरूपाची व कांहीं स्वतंत्रस्वरूपाची कृति प्रसिद्ध होऊं लागली; परंतु तिचें फारसें चीज झालेलें आढळत नाहीं. कारण सुशिक्षितांना अशा काव्यांचे अस्सल नमुने इंग्रजींत वाचावयास सांपडत असल्यामुळें त्यांनीं या मराठींतील पोरक्या स्फुट काव्यांचें क्षणमात्र दर्शन घेऊन थोडेंसें कौतुक करण्यापलीकडे कांहींच केलें नाहीं आणि सामान्य साक्षर जनतेला या नवीन काव्यरीतींत आदरणीय असें कांहींच दिसेना. या दुसऱ्या क्रांतिकाळांत नवीन काव्यग्रंथ फारसे प्रसिद्ध झाले नाहींत. इतकेंच नव्हे तर, पहिल्या क्रांतिकाळांतील कवींचे प्रसिद्ध झालेले ग्रंथही मागें पडून नामशेष होण्याच्या मार्गास लागले. परंतु विष्णु कृष्ण चिपळूणकर यांच्या निबंधमालेच्या अवतारानंतर मराठीची साडेसाती संपण्यास आरंभ झाला व काव्यवाङ्मयांतील तिसऱ्या क्रांतीचीं पूर्वचिन्हें ठळक रीतीनें दृष्टोत्पत्तीस येऊं लागलीं. विद्यापीठानें जरी मराठीला मज्जाव केला होता, तरी इंग्रजी शिक्षण लाभलेल्या नव्या महाराष्ट्रीय विद्वानांमध्यें आपल्या मायभाषेची सेवा करून तिचा दर्जा वाढवावा अशी स्फूर्ति उत्पन्न झाली व लवकरच नवीन काव्यवाङ्मयाचा झरा जोरानें वाहूं लागला. हा तिसऱ्या क्रांतीचा आरंभ होय. वर्तमानपत्रें व मासिकें यांच्या संख्येची वाढ या क्रांतीस पुष्कळच उत्तेजक झाली. साहित्यपरिषदा, कविसंमेलनें व अलीकडील सामाजिक व राजकीय चळवळी यांनींही या क्रांतींत पुष्कळ जोराचा बार भरला. विद्यापीठांत मराठी भाषेचा पुनः चंचुप्रवेश झाला, हीही गोष्ट या क्रांतीस उप-

कारक होत आहे. या काळांतील विशेष ठळक बाब ही आहे कीं, बऱ्याचशा आधुनिक कवींच्या कृति स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्या आहेत व होत आहेत, अशा कित्येक ग्रंथांच्या अल्प काळांत पुनरावृत्तिही निघाल्या आहेत. यावरून हें ग्रंथप्रकाशन केवळ आंतबट्टयाचें असेल असेंही म्हणतां येत नाहीं. लहान लहान काव्यांचे लहानमोठे संग्रहही पुष्कळ बाहेर पडत आहेत, प्रस्तुतची 'काव्यकौमुदी' अशाच संग्रहांपैकीं एक आहे. निरनिराळ्या कविमंडळांची स्थापना हें या काळाचें विशिष्ट लक्षण आहे आणि हें काव्यवाङ्मयाचें प्रकाशन या कविमंडळांकडूनच प्रामुख्यानें होत आहे हें फारच कौतुकावह आहे.

२ 'काव्यकौमुदी'चे तीन भाग केले आहेत व त्यांत एकंदर सुमारें दीडशें कवींच्या स्फुट-काव्यांचा व क्वचित् मोठ्या काव्यांतील लहान लहान वेंच्यांचा संग्रह करण्यांत आला आहे. पहिल्या भागांत दिवंगत कवि आले असून, दुसऱ्या भागांत हयात असलेल्या कवींचा समावेश झाला आहे. अखेरच्या भागांत सुमारें सत्तावन कवींचें संमेलन घडवून आणिलें आहे. अलीकडे मासिकांतून व वर्तमानपत्रांतून ठळकपणें वावरणाऱ्या कित्येक विद्यमान कविवर्यांच्या कृति या संग्रहांत आढळत नसल्यामुळें जरा चुकल्याचुकल्यासारखें होतें, हें नमूद करणें अवश्य दिसतें.

३ 'काव्यकौमुदी'तील वेंचे कोणत्याही एका कविव्यक्तीची कृति यथातथा अजमावण्यास पुरेशी होणार नाहीं हें उघड आहे. परंतु आधुनिक मराठी स्फुट कवितेच्या स्वरूपगुणांचा आराखडा विहंगमदृष्टीनें वाचकांपुढें रेखाटण्याइतका तो प्रातिनिधिक स्वरूपाचा खास आहे, आणि संपादकांनीं वेंच्यांची निवड करण्यामध्यें सारासारविवेक चांगलाच दाखविला आहे.

४ परशुरामतात्या गोडबोल्यांनीं प्राचीन वळणाच्या कवींच्या कृतींचें मंथन करून पन्नास वर्षांपूर्वीं जें 'नवनीत' काढिलें त्याची रुचि महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाची आहे. त्या 'नवनीता'ची या कौमुदीशीं तुलना केली असतां, विषय, विवेचन, विकार, विचार व रचना या सर्व बाबतींत महाराष्ट्र-काव्यवाङ्मयामध्यें केवढी क्रांति घडून आली आहे हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. प्राचीनांची ज्या गोष्टीवर मुख्यतः मदार होती त्या गोष्टी अर्वाचीनांत अगदींच मागसलेल्या दिसतात. परंतु निसर्ग-

प्रेम, लोकव्यवहार, ऐतिहासिक प्रसंग, राष्ट्रीय भावना इत्यादिकांची प्राचीनांत केवळ बीजमात्र अवस्थिति आढळते, तर अर्वाचीनांत त्यांचा चांगलाच विकास झालेला दृग्गोचर होतो. ही क्रांति जरी इंग्रजी काव्य-वाङ्मयाच्या परिचयानेंच बव्हंशीं घडून आली आहे, तरी 'काव्यकौमुदी'तील संग्रहामध्यें भाषेच्या दृष्टीनें व विचारविकारांच्या दृष्टीनें अगदीं विदेशी असें फारसें आढळणार नाहीं.

५ असे कितीतरी पदार्थ आहेत कीं, त्यांची जाणीव अगर ओळख आपणांस असते व त्यांचें आपण सामान्यतः वर्णन करूं शकतों; परंतु त्याच पदार्थांची शास्त्रशुद्ध, निःसंदेह व निर्दोष व्याख्या करूं म्हटलें कीं, बराच गोंधळ उडाल्यावांचून राहत नाहीं. ईश्वर, नीति, पापपुण्य, कर्तव्य, सौंदर्य इत्यादिकांच्या सर्वमान्य व्याख्या कोणीं केल्या आहेत ? तरी पण या सर्व वस्तूंबद्दल प्रत्येक साधारण व्यक्तीस कांहीं तरी जाणीव असतेच आणि व्यवहारांत त्यांचा परिणाम ह्या व्यक्तीच्या विचाराचारावर घडत असतो. काव्य ही वस्तु याच कोटींतील आहे. काव्याची दोषरहित, तंतोतंत, कांटेतोल व सर्वसंमत अशी व्याख्या उतरण्याचें यश अद्याप कोणाच्याही कलमास लाभलेलें नाहीं व भविष्यकाळींही तें कोणास लाभेल असा होरा वाहत नाहीं. याचें मुख्य कारण असें आहे कीं, काव्यतत्त्व हें स्वयंसिद्ध नसून तें काव्यकर्त्यांच्या व काव्यवाचकाच्या संस्कृति, पूर्वग्रह, भावना, अपेक्षा व मनोघटना यांवर अवलंबून असतें. यामुळें जी कृति एकाद्यास काव्यमय वाटते ती दुसऱ्यास बहुतेक टाकाऊ भासते आणि जें काव्य एकाला सरस वाटून दंगवून सोडतें त्यालाच दुसरा नीरस ठरवून नाक मुरडतो. गुणदृष्ट्या व हेतुदृष्ट्या काव्याचा व्याप अवाढव्य आहे. त्याचा बहिरंग सृष्टी-प्रमाणें रस, भाव, वृत्ति, कल्पना इत्यादि अमूर्त व विविध व्यापारांशींही जिव्हाळ्याचा संबंध आहे. प्रतिभा, अर्थ, ध्वनि, लक्षणा, नादशक्ति, वाक्प्रागल्भ्य, अलंकार इत्यादि त्याचीं साधनें आहेत. आणि संवेदनो-द्बोधन, सत्प्रेरणा, तत्त्वविकास, मनोरंजन इत्यादि त्याचीं साध्यें आहेत. यामुळें काव्यतत्त्वाची चिकित्सा करणारे लेखक आपापल्या अभिरुची-प्रमाणें काव्याच्या विशिष्ट स्वरूपाला, साधनाला व साध्याला महत्त्व देऊन तदनुरोधानें व्याख्या घडवितात आणि मग 'मूर्ति तितक्या प्रकृति' या

न्यायानें 'व्याख्याते तितक्या व्याख्या' अशी अवस्था परिणत होते. ही स्थिति अपरिहार्य आहे आणि हींत कांहीं विशेष अनिष्ट आहे अशांतलाही भाग नाहीं; कारण या अनिश्चित प्रकारामुळें काव्यग्रथनाचें अगर काव्य-रसास्वादनाचें कार्य बंद पडलें आहे, अशांतला मुळींच भाग नाहीं. किंबहुना काव्यव्याख्येसंबंधानें अनवस्था असतांही काव्याचें पीक विपुल पिकत आहे, व त्याची चव घेणारा रसिकवृंदही वाढत्या प्रमाणांत आहे. परंतु अभिरुचिभेदानें काव्यव्याख्याते आणि काव्यकर्ते यांचे जे भिन्नभिन्न वर्ग पडतात, त्यांनीं एकमेकांसंबंधें वादीप्रतिवादीप्रमाणें धोरण अंगिकारून उणींदुणीं उत्तरें करावीं, हें फार खेदजनक आहे. आपलें अंतःकरण ज्यांत रंगत नाहीं त्या प्रबंधांत काव्यच नाहीं; व त्याच्या वाचनांत जे दंग होतात, ते रसिकच नाहींत, अशा प्रकारच्या रभसोक्ति केवळ एकदेशी व अहं-मन्यतेच्या होत.

६ वाङ्मयसंस्कृतीच्या मानानें समाजाचे उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन वर्ग होतात आणि या प्रत्येक वर्गाच्या काव्यवाङ्मयाचें स्वरूप भिन्नभिन्न असतें. आजमितीस जें काव्यवाङ्मय 'काव्यकौमुदी'सारख्या संग्रहांत प्रसिद्ध होतें तें सर्व उत्तम व मध्यम संस्कृतीच्या वर्गाकरितांच असतें. साक्षर व निरक्षर कनिष्ठ वर्गाचें वाङ्मय आजकाल प्रसिद्धीला येत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. आधुनिक शिक्षणाचा प्रसार जसजसा वाढत जाईल तसतसा वाङ्मयसंस्कारानें कनिष्ठवर्ग मध्यम वर्गाच्या जवळ जवळ येईल आणि त्याच्या वाङ्मयांत समरस होऊन जाईल. एवंच 'काव्यकौमुदी'-सारख्या काव्यसंग्रहांत जरी एका विशिष्ट संस्कृतीच्या वर्गाच्या नैतिक बलाचें, मनोभावाचें व आकांक्षांचें दिग्दर्शन होऊं शकतें, तरी हीच संस्कृति महाराष्ट्रांत दूरवर व खालवर पसरण्याचा जबरदस्त संभव असल्यामुळें, भावी अखिल महाराष्ट्राच्या अंतरंगाचें प्रतिबिंब यांत आगाऊ उमटलें आहे, असें म्हणतां येण्यासारखें आहे.

७ वयोमानपरत्वेंही समाजाचे तीन निरनिराळे थर पडतात व त्यामुळें वाङ्मयंही त्रिविध होतें. बालवयांत अद्भुतता, कल्पनास्थूलत्व व नादशक्ति, यांची मोहनी सामान्यतः तात्रडतोब पडते. गुर्मीनें मुसमुसणाऱ्या तारुण्यांत प्रेमक्रोधादि मनोभावनांच्या लीलांनीं अंतरंगाला वेध लागतो; परंतु जरेला

कवटाळूं पाहणाऱ्या उतारवयाच्या अंत:करणाला शान्ति व विरक्ति हेच रस रुचिकर होतात. वयोमानानुसार प्रकट होणाऱ्या या प्रकृतिभेदामुळें काव्यवाङ्मयही या भिन्नभिन्न वर्गांकरितां निरनिराळ्या रंगांनीं नटतें. काव्येतरवाङ्मयानें बुद्धीला चलन मिळून चाणाक्षपणा, माहिती व कसब हीं पदरीं पडतात. परंतु काव्यवाङ्मयानें बुद्धीबरोबर हृदयाला प्रेरणा होऊन चैतन्यशक्तीला जागृति येते. मानवी यंत्रांतील आत्मबलाचें उद्बोधन व विकास घडविण्याचें कार्य काव्याचें आहे. तेव्हां भिन्नभिन्न वर्गांकरितां रचिलेलें काव्यवाङ्मय त्या त्या वर्गांच्या अंतरंगाप्रमाणेंच रंगलें पाहिजे हें उघड आहे. प्रस्तुतच्या संग्रहांतील काव्यें प्रमुखतः तरुणांकरितां व प्रौढां-करितांच रचिलेलीं आहेत, व बालजरठांच्या दृष्टीनें त्यांकडे पाहून चालावयाचें नाहीं.

मुरूड जंजिरा<br>तारीख १६।११।२४

वा. अ. भिडे.

## शुद्धिपत्रक

(१) 'काव्यकौमुदी' ज्या वेळीं संकलित केली त्या वेळीं रा० वासुदेवशास्त्री खरे व नाशिकचे कवि गोविंद शाहीर हे विद्यमान होते. ते आतां दुर्दैवानें दिवंगत झाले आहेत.

(२) रा० " घुरुषोत्तम वामन गोवई " यांचे जागीं रा० गोवईकर, B. A. असें वाचावें. या मुद्रणप्रमादाबद्दल मंडळी दिलगीर आहे.

चिटणीस.

# काव्यकौमुदी

## भाग १ ला

क. क्रं. ३७६
दा. क्र. २९८९
स्थळ
ठाणे,

# काव्यकौमुदी

## परशरामतात्या गोडबोले

[ जन्म सन १७९९—मृत्यु सन १८७४ ]

परशरामतात्यांच्या वडिलांचें नांव "नारायण" असून तें कित्येकांस माहीतही नाहीं. यांनीं उत्तररामचरित, मृच्छकटिक, शाकुंतल, वेणीसंहार इत्यादि संस्कृत नाटकांचीं भाषांतरें केलीं आहेत. "नवनीत" हा सुप्रसिद्ध काव्यग्रंथ यांनींच संपादिला असून काव्यकौमुदीकारांनीं हाच ग्रंथ नजरे-समोर ठेविला आहे. वरील भाषांतरित नाटकांखेरीज वृत्तदर्पणादि इतरही पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

### दंडकावन

कोठें झाडी निबिड दिसती रूक्ष ओसाड रानें
ठायीं ठायीं ध्वनिहि उठती निर्झरांचे भरानें
येथें तीर्थाश्रमगिरि तटिन्यादिकांचे विभाग
पूर्वींचेसे दिसति मज हे दंडकारण्यभाग.

कोठें शून्य भयंकर ध्वनि कुठें सत्वांचिया ऊठती
कोठें हे ज्वलन प्रसुप्तभुजगश्वासानिलें पेटती
कोठें स्वल्प जळें दरींतहि अशा सीमा पहा दीसती
तान्हेले कर भानुचे अजगर स्वेदद्रवप्राशिती.

ते हे गिरी वसति मोर सदार येथें
तीं हीं वनें मृगकुळें फिरतात जेथें

गंगातटें दिसति तूंचि सुरम्य मार्ते
व्यापून शोभविति वेत अशोक ज्यांतें.

जो जवळुनिहि पहातां घन घनमालेसमान दिसताहे
तो प्रस्रवणागिरी ज्यावरि गोदावरी नदी वाहे.
याच्या शृंगावरिच वसती जाहली गृध्रपाची
त्याच्याखालीं वसति अमुची पर्णशाळेंत साची.

वृक्षच्छाया निबिड, करिती शब्द नाना शकुंत
वाहे गोदावरिजवळ असे रम्य याचे वनांत.
जिथें होतें पाणी दिसति नदिचीं तेथ पुलिनें
विपर्यासें झालीं घन विरळ सारीं तरुवनें

बहुता काळानें मज विपिन वाटे नव जसें
स्थिती हे शैलांची सुचवि पहिलें हें वन असें.
कुंजांत घोर घुबडें वसती तयांचे
घूत्कार ऐकुनि मुके व्रज वायसांचे
श्येनस्वना परिसतांचि समस्त सर्प
वृक्षावरी लपति होउनि नष्टदर्प.
ज्यांचे गुहांत रव गद्गद फार होती
गोदाप्रवाह बहु ज्यावर वाहताती
शृंगाग्रभाग अवलंबित मेघ ज्यांचे
ते हे पहा सकल पर्वत दक्षिणेचे.
अन्योन्य भेटी घडतां जयांच्या
कल्लोळमाळा उठती जळांच्या

प्रवाह गंभीर पवित्र ज्यांचे
पहा महासंगम हे नद्यांचे.

# कृष्णशास्त्री चिपळूणकर

## [ जन्म सन १८२४—मृत्यु सन १८७८ ]

यांचें " पद्यरत्नावली " नांवाचें एक काव्यपुस्तक प्रसिद्ध असून अरेबियन नाईटस्‌चें यांनीं सुरस भाषांतर केलें आहे.

## अन्योक्तिमाला

ज्याचे पूर्वीं वसंतीं परिमलबहर्लीं आम्रवृक्षीं सुखाचे
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्तभृगांगनांचे
कैसे त्या कोकिलातें करिति अशुभ हे कावळे चंचुघाता !
कोठें थारा मिळेना ! गरिब पळतसे वांकडा काळ येतां.

झाडें पेट्टुनि वाजती कडकडां त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनिराहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे;
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा दवानल असे, मोरा ! पळे रे घरा.

तुझी वाणी कोणी म्हणति गुण हा अद्भुत असे,
मला वाटे मोठा तुजजवळि हा दोषचि असे.
शुका, तीच्यायोगें सतत पिंजऱ्यामाजि पडशी,
गड्या स्वातंत्र्याचीं अनुपम सुखें सर्व मुकशी !

भृंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें
डोळा देखोनि होते पळत भयभरें सोडुनीया धृतीतें;
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या गुहेमाजि आतां
सिंहाच्या, क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां !

मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरती सिंह पाहीं स्वभावें,
काका ! त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडासि खावें.

जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें
धाला रक्ता पिऊनी, नच मृत पशुच्या इच्छितो तो कणांतें-

कंठीं मोठा बळकट असे पाश पायांत बेडी,
बैसोनीया शिरिं नर तुझ्या अंकुशें गंड फोडी
जीपेक्षां कीं मरण बरवें भासतें त्या दशेनें
पावोनीया अजुनिही गजा! दावशी कां मदातें ?

दावाग्नी खवळोनिया तरुवरा जाळीतसे जैं बळें,
जाती सर्व पळोनि कोकिळ शिखी रावे तसे कावळे,
भक्षायास फळें चहोंकडुनिया एकत्र जे जाहले,
येतां संकटकाळ होय जवळी ऐसा न कोणी मिळे.

वनीं विलसती बहू विविध वृक्ष चोहींकडे
तयांत मज चंदनासम न एकही सांपडे,
जयांस न दिलीं फळें न कुसुमेंहि देवें जरी
शरीर झिजवूनि जो तरि परोपकारा करी

ज्याचे पल्लव मंगलप्रद, शिणा छाया जयाची हरी
गंधें युक्त फुलें फळेंहि असती ज्याचीं सुधेच्या परी;
वाटे जो रमणीय भूषण वनश्रीचे मुखींचें, भला
आम्रा त्या पिक सेवितां समसमां संयोग कीं जाहला.

कोकां शोकास त्यांच्या शमवुनि दयितासंगमें हर्षवी जो,
कारागारें करांहीं उघडुनि कमलें भृंगही सोडवी जो,
जेणें अंधार सारा पळवुनि हरिलें सृष्टिच्या दृष्टिदोषा.
त्या मित्राचा बघोनी उदय कवण तो चित्तिं मानी न तोषा !

देखोनी उदया तुझ्या द्विजकुळें गाती अती हर्षुनी
शार्दूलादिक सर्व दुष्ट दडती गिर्यंतरीं जाउनी,
देशी ताप परी जसा वरिवरि येशी नभीं, भास्करा,
अत्युच्चीं पदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा.

गर्वें पर्वतमस्तकीं जलधरा धारा वृथा वर्षसी
पीडा कष्ट करूनि नाविकजनां दुष्टापरी हर्षसी;
पाण्यावीण लता तरू सुकति हे, वृष्टी जरी यांवरी
रे मेघा करतास, कीर्ति भुवनीं होती तुझी वा तरी.

ज्या कांहीं तेज नाहीं, परम कृशहि जो त्या बिजेच्या शशीला
मोठ्या यत्नें पहाया झटति, बघुनियां वंदिती लोक त्याला
वाढें तेजें कलांहीं पुढति बहु जरी, मान तो त्या न राहे.
वस्तू वाटे नवी जों अवड बहु तिची, लोकरीति अशी हे.

पुष्पांहीं पल्लवांहीं विविध तरुवरां सर्वदा भूषवी जो,
नाना धान्यें फळेंही पिकवुनि सुखवी प्राणिमात्रा सदा जो,
हर्षे पाहोनि ज्यातें जग, धरिसि मनीं त्रास त्या अंबुदाचा
हंसा, वर्णे जरी तूं धवल तरि गुणें कृष्ण आहेस साचा.

# गणेशशास्त्री लेले

[ जन्म सन १८२५—मृत्यु सन १८९८ ]

## शिवबोध

कोणें एके काळीं येई श्रीरामदास नृपसदनीं.
चाले संतत ज्याच्या पूत श्रीरामनामजप वदनीं.

तो नर नव्हेचि, परि हो धर्म स्वयमेव मूर्त कीं आला
साधूपदेशयोगें निजमार्गा दाविण्यास नरपाला.

सत्कुलभवा नराचें विमुख कधीं साधुवंदनीं न मन
अत्यादरपूर्वक नृप जाउनि त्याच्या पदीं करी नमन.

स्वीय शिरीं मुकुटमणि श्रेणी तेचि प्रदीप शुभराजी,
तद्योगें नमनामिषें नृप गुरुचें पादपद्म नीराजी.

पाद्यार्घ्यादिक पूजा करित असे भक्तिनें नृपति त्याची,
ऐसी दृढभक्ति जनीं पुत्रालाही नसे निज पित्याची.

कर जोडोनि म्हणे नृप "केलें जैसें पवित्र गेहातें
पादरजें, तेविं करा उपदेशें करुनि याहि देहातें.

संसारसागरीं मी स्वामी ! बुडतों, ययाचिया तरणीं
भवदुपदेशावांचुनि नचि दुसरी हो मला दिसे तरणी."

दास म्हणे 'वत्सा ! तुज झाली मति हे सुपुण्यराशीनें,
सकलां अशुभां निरसुनि अंतीं सत्पदा नराशी ने.

कामक्रोधादिक षड्—वैरी हे त्रास देति जीवास,
त्यांतहि मानवदेहीं करिते हृदयांत काळजी वास.

उपडुनिया टाकावें प्रथमचि रे या मनांतुनी कामा,
सर्वानर्थकराचि तो म्हणुनि तयाची स्थिती न ये कामा.

कामावाप्ति न होतां क्रोधाची येतसे मनीं उकळ
जेथें क्रोधोत्पत्ती, तेथें आहेचि बा अगाउ कली.

कांताधनकनकादिक जैसा देतें मनास अति माज,
तैसा भांग अफू मधु यांचाही देत नाहिंच समाज.

कामानें सर्वांचें बाटविलेसें नरोत्तमा चित्त,
तेणें पूत विरक्ती न रुचे, रुचते सदारसुतवित्त.

पापाला मूळ असे लोभ, असें सर्व बोलती संत
जो त्यागी लोभातें त्याच्या सौख्या नसेचि बा अंत.

मोहाच्या योगानें ज्ञान्याही भ्रांति पडतसे मोठी
ज्यावरि ईशदया बहु, तोचि दूर ह्या मनांतुनी लोटी.

धनयौवनादियोगें येतो जो माज तोचि मद जाणे,
रावणबाणार्जुनमुख नाशियलें वश करोनिया ज्यानें.

अज्ञानें मोह पडे यास्तव तूं ज्ञान आधिं संपादीं.
नसतांही सर्प दिसे अज्ञानाच्या वशेंचि जी वादी.

आहे एक जगाचा सृष्टिस्थितिनाशनास कर्ता रे
जेणें इच्छामात्रें निर्मियले भूखगोल खग तारे.

श्रीरामादिक रूपां घेउनिया जो जगांत अवतरतो,
त्यातें प्रेमपुरःसर भजतां निश्चय मनुष्य भव तरतो.

---

# भास्कर दामोदर पाळंदे

[ जन्म सन १८३२—मृत्यु सन १८७४ ]

भास्कर दामोदर पाळंदे हे निबंधकार 'स्मॉल कॉज कोर्टा'त न्यायाधीश होते. यांनीं गीतेचें ओवीबद्ध भाषांतर, विक्रमोर्वशीय नाटकाचें सुरस गद्य-पद्यात्मक भाषांतर केलें असून रत्नमाला नांवाचा सर्वोत्कृष्ट परेशभक्तिपर पद्य-ग्रंथ लिहिला आहे.

## परमेश्वरप्रार्थना

प्रभो, प्रणतवत्सला ! बहुत पातकी दीन मी,
निराश्रित अजाणता तुज सदैव चित्तीं नमीं
चुकें तर पदोपदीं, पण नमीं, नसे घाबरा,
क्षमाच करिशील तूं भरंवसा मला हा बरा.

अगाध महिमा तुझा बुधहि गावया नेणती,
यथामति वदावया मजचि लाज ती कोणती,
पिईन परमेश्वरा विमलकीर्तिगानामृता
भिईन न कदापि मी मग पुढें जित्या वा मृता.

असंख्य दिसती नभीं रुचिर गोल जे प्रत्यहीं,
तुझें यश कथावया उदित दैवतें सत्य हीं !
दिलीस गति ज्यांस जी सतत तीच सांभाळिती,
सुबोध करण्यास त्यां, स्वनियमां न जे पाळिती.

तुझी कृति दिसावया, रवि तमास उच्छेदितो,
स्वकीय किरणामृतें सकळ विश्व आल्हादितो;
अशेष तरु, जीव हा भयद शीत तें नाशितो
तुझ्या प्रभु, कृपेमुळें सतत त्यांस तो पोशितो.

शशी विमलकांति जो गगनमंडळा भूषितो,
अदृश्य असतां रवी, पथिक यांस संतोषितो;
पहा, प्रतिदिनीं कसा क्षयविवर्धना भोगितो,
प्रभो, तुजविना नसे किमपि, नित्य हें सांगतो.

समुद्र, सरिता, गिरी, तरु जिवांस तूं निर्मिलें
विचित्र रचना तुझी बुधहि वर्णितां शर्मिले;
अनादि सकलज्ञ जो मुदित नित्य त्या मी नमीं,
असो, प्रभु! दयार्णवीं पतित एक हा मीन मी.

---

# महादेव मोरेश्वर कुंटे

[ जन्म सन १८३५—मृत्यु सन १८८८ ]

महादेव मोरेश्वर कुंटे B. A. हे पुणें हायस्कूलांत हेडमास्तर होते. हे उत्कृष्ट वक्ते असून त्यांनीं 'राजाराम महाराज' 'राजा शिवाजी' व 'मन' हीं त्या काळांत स्वतंत्रपणें लिहिलेलीं काव्यें आहेत.

## बहिर्जी नाईक

दिसे ठेंगणी मूर्ति ही बावळीशी
बहू शक्ति पायांत, हिंडे स्वदेशीं
असे रुंद छाती, खरे गोलदंड,
भरे जोर अंगांत; तक्का उदंड.

जरी मानिती लोक हें रूप भोळें
तरी न्याळिती शत्रुला तीव्र डोळे
हुशारींत ऐसा नसे तीव्र कोणी
निघे, डौल चाले, जसें काय पाणी.

कळे सर्व त्याला कुठें काय चाले,
कुठें बैसला कोण, तो काय बोले
घडे शत्रुलोकांत त्याचा प्रवेश
करी रोज तो पाहिजे तोहि वेष.

कधीं लांब दाढी, सजे वृद्ध काजी,
कधीं दर्भपंचांग स्वारी निघाली.
कळे वृत्त जें त्यास तें सर्व आणी,
कथी थोर राजास तो सत्य-खाणी.

१२



नं. ३०५
ना.
ठाणे

घडे वास त्या नारदा तीन लोकीं
सदा स्वर्ग पाताळ मृत्यू त्रिलोकी
विणा हातिं गीतें अलापीत चाले,
करी इंद्र शोभे, तिथें नृत्य तालें;

कधीं स्वर्ग सोडून पृथ्वीस येतो
महा अंतराळांतुनी धांव घेतो,
तुटे जेविं तारा नभीं चक्र होतें
पडे तेज त्या नारदाचें तसें तें.

कधीं चालतां; पोंचतो सूर्यलोकीं
कधीं आड वाटे फिरे स्वर्गलोकीं
तसा हा बहिर्जी फिरे सर्व देशीं
कशाचा पन्हाळा ? रिघे खानदेशीं.

## संभाजी

चिमुकली पगडी झळके शिरीं
चिमुकली तलवार धरी करीं
चिमुकला चढवी वर चोळणा
चिमुकला सरदार निघे रणा.

छबुकडा चिमणा करितो गण
चिमुकलें धरिलें मग रंगण
दुडदुडा पळतां पळतां पडे
गडबडे रडतां मुख आपुढें.

शिवाजीसही फार संतोष झाला;
उठे बाळ घेऊं स्वतां तो निघाला.
धरी त्यास हातांत घेऊनि झेली
महा रम्य खेळे महा–मात झाली.

# विनायक कोंडदेव ओक

[ जन्म सन १८४०—मृत्यु सन १९१४ ]

रा० वि. कों. ओक हे बालबोध मासिकाचे संपादक असून यांचा 'पुष्प-वाटिका' हा छोटा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे.

## इतिहासाचें म्हणणें

मी प्राचीन किती हें कोणा नाहीं कधीं कळायाचें,
मजला कळल्यावांचुनि कांहीं नाहीं कधीं टळायाचें!
ज्ञाता माझ्या ऐसा दुसरा कोणी जगामधें नाहीं,
नाहीं ठाऊक मला ऐसें नाहीं जगामधें कांहीं!
पुण्य असो, पाप असो, त्याची नाहीं मला मुळीं चाड,
तत्संग्रहीं न माझ्या कोणी येऊं शकेल कीं आड!
चोरुनिया मजपासुनि राहों न शके कदापिही गोष्ट,
इतर असो, मज कळतें हालवितें जो पिपीलिका ओष्ठ!
इतकें असोनि नाहीं काडीइतकाहि कीं मला गर्व,
राय असो, रंक असो, मी गणितों मित्र आपुले सर्व.
मी नित्य हात जोडुनि साह्य कराया तयां उभा राहें,
मी सेवक त्याचा जो होउनि मद्भक्त मजकडे पाहे.
अवघीं शास्त्रें माझीं मुलें तयां ज्ञान मीं दिलें सारें,
तीं नित्य चालताती लोकीं निःसंशयें मदाधारें!
यास्तव जनांस म्हणतों कीं मजला संग्रहीं सदा ठेवा,
घ्या मजकडूनि निजहित साधाया पाहिजे तशी सेवा.
माझा सहवास करा, मति तुमची सत्पथास लागेल,
निजकर्तव्य कराया रात्रंदिन ती तुम्हांस भागेल.

ग्रंथ संग्रहालय

इहलोकीं परलोकीं मार्ग हिताचा तुम्हांस लभेल,
जें पाहिजे तुम्हां तें त्याच्या योगें अखंड लाभेल.
जे भजले मजला, ते चुकवुनिया दुःख, बहु सुखी झाले.
झाले जीव तयांचे, देवमनुष्यांचिया मना आले.
हें एवढें पुरें मज, गमतें आतां तुम्हांस सांगाया,
आत्मस्तुति मज वाटे संकोच खरोखरीच ही गाया.
परि परहितबुद्धीनें वदलों याची मला क्षमाचि करा,
या माझ्या उपदेशा स्वपरहितास्तव मनांत नित्य धरा.

---

# डॉक्टर कीर्तिकर

[ जन्म सन १८४९—मृत्यु सन १९१८ ]

लेफ्टेनंट कर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तिकर आय्. एम्. एस्. यांचीं भक्तिसुधा, इंदिरा व विलापलहरी हीं तीन काव्यें प्रसिद्ध आहेत.

## करुणापंचक

अनुदिन तुज देवा शुद्धभावें नमावें,
तव विमल गुणांच्या गायनीं म्यां रमावें,
न कधिं विषयसौख्या सेवुनी गुंग व्हावें,
परि चिरसुखशांती मेळवाया झटावें.

तुजसि शरण आलों सर्वभावें दयाळा,
अशरण तव कंठीं अर्पितों प्रेममाळा;
पदरिं मजसि घेईं मागणें तूजपाशीं,
तुजसम न दुजा या लोकिं कारुण्यराशी.

दृढतर मन लागो पायिं तूझ्या उदारा,
घडिभरि विसरो हें सर्व संसारभारा,
क्षणभरि तरि होवो मंगला! भेट तूझी,
हृदयिं तुज धरावें आवडी हेचि माझी.

तव शुचि यश गातां चित्त संतोष पावे,
प्रियतम गमशी तूं नाम जेव्हां जपावें;
सतत मजसि लाधो बा तुझी पादसेवा,
तव पदरजि मोठें मानि मी सौख्य देवा!

नामाचा जयघोष होउ, सदया देवा, तुझ्या सर्वदा,
वत्सांच्या हृदयीं सदैव रम तूं, हे वत्सला, शर्मदा!
कोठें ठाव मिळो न एक पळही दुर्वासनेला कदा,
बंधुप्रेम महीवरी जनमनीं वाढो, टळो आपदा.

# धैर्य व तलवार यांची गाळण!

वधप्रसंगीं कृष्णाकुमारीची धीरोदात्त मूर्ति पाहून मारेकऱ्याची निष्ठुरता विरघळली व समशेरही गळून पडली! त्या प्रसंगाचें चित्र.

जी तर्वार रणांगणांत समरीं वीरापुढें गाजुनी,
योद्ध्यांतें करवी सचैल रुधिरस्नाना शिरें छेदुनी,
छेदाया अबले अरक्षित अशा व्हावें पुढें कां तिणें?
मी हातीं तिजला धरून मिरवीं! धिक् धिक् जळो हें जिणें!

आहे अंकुश का गजा त्यजुनिया मुंगीस हाणावया?
व्याघ्रा सोडुनि पारधी टपत का शेळीस छेदावया?
कौमार्यें सजली गुणीं मधु कळी ही शुद्ध हो सर्वथा!
मारोनी हिजला कुठें किति सहूं मी पातकाच्या व्यथा!

हिंसेला असल्या अगा! नरकही साजे न तो शासन;
देवा! भाग पडेल शासन मला योजावया नूतन!
हें होवो कधिं मृत्यु नेइल तधीं! आधींच ह्या यातना
भोगाया नच सिद्ध मी! प्रलय हा वाटे गिळी मन्मना!

वाटो योग्य मला अयोग्य अथवा; दुष्कर्म हें तों खरें!
मारावें असती अरक्षित तयां हें कोण बोले बरें?
जे होती रणशूर वीर समरीं, हिंसा तयातें अशी
धात्री जांचणिची! अनंतपरिंनीं चित्ता न जाळी कशी?

चित्ताला जळणूक मी अशि कशी लावून घेऊं सदा?
माझें पाप सदर्थ हें उपजवी कैसें न हो आपदा?
कन्येच्याहि जिवावरी जनक तों झाला उदार स्वयें!
पाणी सोडुन मीहि शांतिवर कां व्हावें तसें निर्दयें?

---

# शिवराम रामकृष्ण नित्सुरे

[ जन्म सन १८५०—मृत्यु सन १८७८ ]

यांच्या कृष्णाकुमारी काव्याला दक्षिणा प्राइझ कमिटीकडून बक्षिस मिळालें आहे. विद्याधनप्रशंसा हें यांचें एक प्रसिद्ध काव्य आहे.

## पत्नी–विलाप

हा रोष केला तरि आज कां गा ?
अन्याय झाला तरि काय सांगा ?
कांहीं तरी हो पतिराय बोला !
कां हो असा राखितसां अबोला !

किंवा जाउनिया प्रदीप्त सदनामार्जी बहू भागलां,
विश्रामार्थ महीतळीं घडिभरी डोळा असे लागला ?
पुष्पांच्या पहुडे सदा मृदुलशा शेजेवरी काय हा,
आहे योग्य पडावया क्षितितळीं धूळीवरी काय हा ?

कीं वाचाळ सदा प्रिया प्रियवचां मागे, अशी हांवरी,
टाकोनी वरिली सुशील सुखदा निद्रा दुजी नोवरी ?
कीं कांहीं वदलें कठोर म्हणुनी हा रोष केला असा ?
कैसा अंत तरी पहाल इतुका ! भारी कृपाळू असां.

कीं द्यावें प्रिय जें अपूर्व मज तें आलें असें अंतरीं,
तें नाहीं क्षितिमंडळीं म्हणुनियां शोधार्थ गेलां वरी !
झाला शोध, पुरे ! नको प्रियतमा ! सारें मला पावलें !
लाहें मी अनुपम्य सौख्य तुमचीं हीं सेवितां पावलें.

अहा देवा ! कैशी विपरित अशी गोष्ट घडली !
कुऱ्हाडी आकाशींहुनि अवचितां केविं पडली !
करूं काई आई ! मज उदरिं दे ठाय जगतीं !
असारीं संसारीं पतिविण सति व्यर्थ जगती !

## पति–विलाप

मनीं धाके, हांकेररसि मग भारीच पळते
उभी राहे; पाहे फिरफिरुनि मागें चपळ ते;
अशी जातां जातां अडखळुनि रंभोरु पडली,
महावातें कीं, ते डळमळुनि रंभा उपडली !

आधींच होती सुकुमार बाळी
जे धांवतां श्रांत अशांत झाली;
ऐशांतही आपटतां कपाळीं,
ते भीरु सोडी असु तेचि काळीं !

अहा जाये ! कायेसम मृदु न कापास तुझिया !
कशी गे ! तापातें क्षणभरि सहाशील अजि या ?
रुसोनी कां मौना धरिसि तरि माझ्यावरि सये !
नको रोषूं प्राणेश्वरि ! जवळि बैसोनि हंस ये !

कीं श्रांत कोमल तुझी तनु फार झाली,
यालागिं गाढ तुज सुंदरि ! झोंप आली;
मार्गी असें न निजणें बरवें अगे हें !
आलीं पहा जवळ फार समीप गेहें !

गृहीं यावें जेव्हां श्रमुनि बहु बाहेरुनि सदा,
निवावें देखोनी तव वदन चंद्रासचि तदा !
प्रिये ! एकाएकीं त्यजुनि तरि कां गेलिस मला ?
तुझ्या चित्ता कैसा प्रियतर दुजा लोक गमला !

स्वकरिं घे धर, ऊठ, मुलास ये !
कशि नसे ममताच तुला सये !
क्षुधित कोमल हें निजलें करीं,
न धरिं निष्ठुरता निज लेंकरीं.
देवा ! विचित्र करणी तरि केविं केली ?
गेली प्रिया ! त्यजुनि ते मज आज गेली !
झालें मला त्रिजग शून्यच कीं अहाहा !
जाळी न आज मज पावक कां महा हा ?

# विठ्ठल भगवंत लेंभे

[ जन्म सन १८५०—मृत्यु सन १९२० ]

या कवींचीं मित्रदर्शन, विष्णुनिधन, शोकावर्त, सुरतरंगिणी, खंडिता आणि आनंदकंद अशीं स्वतंत्र खंडकाव्यें असून त्यांची स्फुट कविताही विपुल आहे. यांची कविता बहुतेक सर्व मासिकांतून प्रसिद्ध झालेली आहे.

## अद्यापि

एके प्रभातसमयीं नव मंडपांत
आनंदकंद वसुनी क्षण तो निवांत
बोले, अहा ! अझुनि ती रमणीय लीला
आनंद दे, इतर धिक् पुरसुंदरीला.

अद्यापि ते कुटिल कुंतल नील तींचे
जाणो विलास अवघ्या भ्रमरीकुलांचे
देती, अहा ! सुखचि या मम मानसातें
तें शोभवी धवल कोमल पुष्प ज्यातें.

हा चंद्रमा, जडहि, गारहि पांढराही,
याशीं प्रियावदन तुल्य ! अयोग्य पाही,
हें पांढरें कमल काय तुळे बिचारें ?
तूतें प्रसन्नवदना उपमा नको रे.

अद्यापि तो वदनसौरभ-रंजनाला
दे, ज्यासवें भ्रमरसंभ्रम गुंजलीला
भाळीं टिळा अरुण कुंकुमकेशरांचा
आलेख्य जो प्रणयसंगम मंगलाचा;

अद्यापि ते श्रुतिमनोहर मंजु वाणी
जी वर्णिली कुशल किन्नर गायकांनीं
जीच्या पुढें पुरुष ते रव वल्लकीचे
मातें स्मरे अखिल जें स्थल रंजनाचें.

अद्यापि ते कनक–चंपक–गौरकाया
माझ्यांसमोर दिसते परि हाय ! वाया
जी जिंकिते रुचिरता नव पल्लवांची
धन्या अशी भुजलता झणिं सुंदरीची

अद्यापि ते चपल, रम्य विशाल डोळे
ज्यांचे कटाक्षशर हाय, असह्य झाले.
ते भ्रूविलासहि तशा स्मरजन्य लीला—
विश्राम दे, हृदय एकचि साक्ष याला.

बिंबाधर स्मरुनि तो अझुनीहि मातें
आनंद होय, परि त्या अधरामृतातें.
सेवील कोण ? न कळे मज पुण्यशाली
चुंबोनियां सहज रम्य कपोल–पाली.

सौंदर्यसार अवघ्या सुरसुंदरींचें
चांचल्य वा कुसुमभूषित वल्लरींचें
सौरभ्य ही विकचपंकजकेसराचें
माधुर्य धन्य जगिं त्या अधरामृताचें.

अद्यापि रम्य सरला विमला सुनासा
आनंदवी हृदयमंदिर चारुवेषा
दंतावली भ्रमुनि दाडिमतेस आली
नासा म्हणोनि जणुं ती शुकचंचु झाली.

धिक् ते कवीश्वर अहा! मतिमंद ऐसे
ज्यातें प्रियावदन सोज्ज्वल चंद्र भासे,
भ्रूभंग–विभ्रम–कटाक्ष–निरीक्षणानें
कोपप्रसाद–हसितें शशि काय जाणें?

अद्यापि पुष्पहरणीं हरिणेक्षणेची
लीला मनोरम तशी करपल्लवाची
लोकीं असे कमल वा कर हेंचि शंका
यालागिं ती वरि रणत्करकंकणांका

वेधें अनंत रमणी जरि निर्मियेल्या
दोषास्पदाचि परि त्या अवध्याहि झाल्या
सार स्वयें सकल सुंदर वस्तुंचें हें
वेधा रची भुवनसुंदर रूप पाहें.

विद्युल्लता चमकुनी चपला घनांत
जावी तशी निघुनि जाय अहा! वनांत,
पात्री अहा! करगता मधुरा रसाची
वेड्या मना! लवडलीस वृथैव मार्ची.

## अयोध्या

जेथें विंध्य नितंब शाद्वल वनीं उत्फुल्ल वृक्षावली
जेथें बालरविप्रभा अरुणता दे निर्झरातें भली,
जेथें गद्गद नाद घोर कुहरीं अंभोजवें ऊठती
जेथें बाल तमाल नील सुषमा बिंबें जळीं दों तटीं;
जेथें हंस मयूर रत्नपुलिनीं लीलालसें लोळती,
जेथें वेतस मंडपीं सुरुचिरा बिंबाधरा क्रीडती,
जेथें वायु जवें गभीर सरयू नाना तरंगा करी,
जेथें फुल्ल निकुंज गंधपवनें रम्या वनश्री करी;

जेथें कुंकुमरागरक्त सुपथीं दिव्यांगना चालती,
ज्यांचे नूपरनाद चंद्रवदनें कामीजनें हारिती !
जेथें गार तुषार मंदपवनें आल्हाद देती मना,
छाया वृक्ष जिथें स्वपल्लव-दलें बोलाविती स्त्रीजनां !

जेथें तोयविहारसक्तललना जाणों जलीं पद्मिनी,
क्रीडागद्गद नाद जेथ उठती जाणों मृदंगध्वनी
जेथें रम्यलता निकुंजभवनीं प्राणप्रिया शोधुनी
प्रेमें तोडुनिया सुहास्यवदना आलिंगिती कामिनी.

जेथें स्त्रीजनपादरक्त बघुनी सोपानमाला कळे,
कीं गेल्या अभिसारिका प्रियगृहीं उन्मत्त कामानलें !
जेथें कोमल पल्लवांकुरमयी शय्या लतामंदिरीं
दावी कीं विरहानलांत पडल्या उत्कंठिता सुंदरी !

जेथें कोमल पल्लवा धरुनिया पुष्पें सुरम्यें करें
उद्यानीं खुडितां स्त्रिया झणरवें आल्हाद चित्तीं भरें;
जेथें चंद्रकरांकुरें सुधवलें रम्यें मुखांभोरुहें
देखोनी मधुलुब्ध भृंग उडती सानंद गुंजारवें

जेथें पल्लव चामरें तरुलता आल्हाद देती जना
पक्षी ज्यावरि बैसुनी जयरवें संतोष देती मना.
पुष्पें सुंदर वर्षुनी वरिवरी रम्या वनश्रीवरी
जेथें रम्य वसंत मंद पवनें आनंदवी सुंदरी

जेथें मंद सुगंधि वायु उधळी, आधीं परागें स्वयें
देई नंतर मोद कुंदरदना आलिंगुनी निर्भयें
जेथें मत्त—मयूर—पक्षरचना देखोनि वाटे मना
कीं पाहे उघडूनि नेत्र मधु हा सानंद चंद्रानना;

जेथें चित्रविचित्र रत्नखचिरें श्रीमंदिरें गोपुरें
जेथें इंद्रधनुष्प्रभा चहुंकडे दैदिप्यमान स्फुरे
जेथें सोज्वल चंद्रकांतधवलें हर्म्यस्थळें साजिरीं
ऐशी श्रीसरयूतटाकघटिता शोभे अयोध्यापुरी.

---

# पांडुरंग व्यंकटेश चिंतामणिपेठकर

[ जन्म सन १८५१—मृत्यु सन १८७९ ]

यांना अनेक भाषांचें ज्ञान होतें. यांचें गंगावर्णन हें काव्य पुनर्मुद्रणाच्या मानास पात्र झालें आहे. हे अस्खलित वक्ते व प्रो० जिन्सीवाले यांचे परमस्नेही होते.

## गंगा

हे देवि, ऐहिक सुखें मिळती जनांला,
जीं कां तुझ्याकडुनि, त्यांविषयीं तयांला,
गंगे ! विशुद्ध उपकार तुझे मनांत,
मानावयासचि खरोखर पाहिजेत.

वर्षाऋतूंत तुजला प्रतिवर्ष माते !
येतो न पूर, तव जो भिजवी तटातें
पान्हा फुटूनाचि जणों हरुषें पयातें
तूं देवि ! पाजिसि तथा निजनंदनातें.

तें क्षीरपान घडतांचि पहा तयाची,
मुद्रा क्षणांत किति जाय फिरून साची !
होऊनि सस्यफल पुष्पसमृद्धि, माते !
तो लागतो टवटवीत दिसावयातें;

चोहींकडे तव थडींत अनेक धान्यें,
नानाफळें मधुर लोकरुचीस मान्यें,
पुष्पेंहि नैकविध, रम्य, सुगंधशाली;
उत्पत्ति पावति अखंडित योग्य कालीं;

गंगे, तुझ्या तळवटांतचि पूर्वकालीं,
राज्यें असंख्य बहु थोर बलाढ्य झालीं.
भासे मला विमल भारतभूमिका हे,
त्वत्स्रोत हेंचि शुभ मंगलसूत्र वाहे!

तीरीं पुरें विलसती घन लागलेलीं,
मुक्ताफळेंचि जणुं त्यांतुनि ओंवियेलीं!
पाहून, जन्हुतनये! वदु फार काय?
स्वर्लोकही मजसि होउनि तुच्छ जाय!

# विष्णु मोरेश्वर महाजनी

[ जन्म सन १८५१—मृत्यू सन १९२३ ]

रावबहादुर महाजनी एम्. ए. हे कुसुमांजलि या पुस्तकाचे कर्ते होत.

## विश्वमंदिर

ईशें विश्व विशाल मंदिर पहा ऐसें कसें निर्मिलें
शोभा दाखविण्यास हेर रुचिरीं द्वारीं उभे ठाकले;
येती प्रेक्षक हे तयांस बघुनी ते बाहती सत्वरीं:—
या हो या जनहो विलोचनसुखा घ्या, या शिरा मंदिरीं.

या हो आंत पहा चमत्कृति किती ! द्या इंद्रियां तर्पण
नेत्रां चित्र मनोहराकृति तसे श्रोत्रांस मंजुस्वन,
द्वारीं मात्र करा प्रणाम शिरसा त्या ईश्वरातें अर्थी
जो दे सर्व तुम्हां, तया स्तुतिसुमां अर्पा तुम्ही हो सुधी.

येणंपरी नमुनिया जन आंत जाती,
विश्वास पूर्ण धरुनी बहु सौख्य घेती,
वाहे समीर, मकरंद हरी फुलांचा,
संताप सर्व शमवी झणिं मानसींचा.

श्रवण नयन धाले, लोटला मोद पूर,
हृदयिं विकसलें तें प्रेम विश्वास थोर,
नयन गतिहि जेणें बद्ध केली पुरा तें,
पटल गळुनि जातें; गूढ ना तें नसतें.

जे न वंदिति पदास विभूच्या,
भावही न धरिती वरि त्याच्या,
ते जरी प्रविशती सदनांत,
त्यास हा सुखनिधी न मनांत.

## चद्र

चंद्रा ! पांडुर कां असा ! गगन कीं आरोहतां भागसी ?
तारा या तुजसी प्रिया न गमती ! त्यांहीं न तूं मोहसी !
रात्रीचें तम सारतां दुरवरी कीं भागसी एकला ?
कीं कांहीं प्रिय ना दिसे म्हणुनि हे वृत्ती तुझी चंचला ?

## साध्वी नदी

साध्वी निर्झरिणी बघूनि नयनीं धालों मुदें मी किती !
शान्तातःकरणा, पवित्रचरणा, मंदा असे तद्गति;
स्वानंदांत निमग्न मूढजनसंमर्दा त्यजूनी दुरी,
लक्षी मार्ग बरा, सदा, निजबलें विघ्नां समस्तां हरी.

जे जे ते करिते परोपकृति तें सौंदर्य ते पावते,
जाते जेथ तिथें मुदा वितरते, आशीर्वचा लाभते;
कैशीं निर्मल हृज्जलीं विकसलीं प्रेमाबुंजें साजिरीं,
स्वर्गीचें प्रतिबिंब त्यांत पडलें सत्वप्रिया गोजिरी.

# गणेश जनार्दन आगाशे

[ जन्म सन १८५२—मृत्यु सन१९१९]

रावसाहेब आगाशे, बी. ए. यांनीं बरीच स्फुट कविता केली आहे. ते इंदूरच्या नवव्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष होते.

## रूढिमहिमा

अये रूढे! वर्णूं अतुल महिमा मी तव किती?
न शास्त्राची सुद्धां तुजपुढति गे चालत गती!
तुझे झाले पाहीं जन सकलही सर्व जगतीं!
नमस्तुभ्यं रूढे! खचित अससी तूं बलवती!

त्वदाज्ञेनें लोकीं जन विफल वित्तव्यय करी,
त्वदाज्ञेनें सोशी अमित विपदा कष्टहि वरी,
त्वदाज्ञा भंगाया नच विबुधही लोकिं धजती,
नमस्तुभ्यं रूढे! खचित अससी तूं बलवती!

महानाम्नीत्यादिव्रतसमुदयारंभसमयीं
असावी चित्ताची स्थिति, तशि गृहाची, शुचिमयी;
अशा कालीं द्वारीं, अहह! गणिका नाच करिती!
नमस्तुभ्यं रूढे! खचित अससी तूं बलवती!

नसे म्होद्वाहीं विहित वरहुंडा ऋषिजनीं,
नसे त्यांच्या ग्रंथीं विहिणंकरणी मानभरणी,
परी पारंपर्यापुढति ऋषिवाक्यां विसरती,
नमस्तुभ्यं रूढे! खचित अससी तूं बलवती!

खऱ्या कर्मा फांटा, कधिंहि नच तोटा अविहितीं,
भिकाऱ्याला सोटा, परि विनय मोठा धनयुतीं!

द्विजा पैसा खोटा, गणपतिस रोठा वितरती,
नमस्तुभ्यं रुढे ! खचित अससी तूं बलवती !

कधींही एकांतीं जरि न पतिची गांठ पडली
अकालीं त्या येतां मरण, विधवा खास ठरली,
मुकोनी संसारा रडति झुरती आणि मरती,
नमस्तुभ्यं रूढे ! खचित अससी तूं बलवती !

मनःपावित्र्याची च्युति नच घडावी म्हणउनि,
असे स्पर्शास्पर्शादिक नियम केला ऋषिजनीं;
मनीं पापा ध्याती, परि जन विटाळासि जपती,
नमस्तुभ्यं रूढे ! खचित अससी तूं बलवती !

---

# गोविंद वासुदेव कानिटकर

[ जन्म सन १८५४—मृत्यु सन १९१७ ]

हे कवि सर्वज्ञ होते. यांची बरीच स्फूट कविता असून संमोहलहरी नांवाचे खंडकाव्य प्रसिद्ध आहे.

## स्वातंत्र्याची योग्यता

स्वातंत्र्याच्यासाठीं झाला सिद्ध न जो नर मरणाला,
धिक् धिक् त्याचें जीवित, आला प्राणि कशास्तव जन्माला!
स्वातंत्र्याविण दुःखद ऐसें जीवन लोकीं काशाला?
स्वातंत्र्याचा एकहि दिन तो स्वर्गसुखा दे मनुजाला!

रक्तानें या पहा माखल्या हीन दीन निज भूमीला,
पळा! पळा! हो सत्वर धांवा प्रियमातेच्या साह्याला.
सदय अशा या मृत्युमुखाचा लाभ गणावा शेवटला;
मृत जे होती ते नच भीती इहलोकींच्या जुलुमाला!

बांधा कंबर युद्धासाठीं, येति वीर जे धरणीला
सद्गुणमंडित रणपंडित ते, तेच मिळविती कीर्तीला!

## चंद्रकलेचा ग्रास

चण्डरश्मि तापवुनी सकलही मही
मावळला, तदपि गमे सुख न अल्पही
पालटती अंबरगत वर्ण ते कसे!
रजताची चंद्रकोर कनकमय दिसे!
इतुक्यांतचि एक मेघ, केवि ना कळे
उग्ररूप कृष्णवर्ण तिजकडे वळे.

आसि नभीं चंद्रकोर दुष्ट दांडगा
हरिणीतें जेंवि वनीं घोर लांडगा.

घाबरली परम मनीं, बळ पळावया
तिळ न उरे, पाहुनि ये मज तिची दया.

दुर्बल मी पामर या मर्त्यलोकिंचा
टाळावा हाय! कसा घात म्यां तिचा?

गगनींही तीच कथा भयद पाहिली
सर्वत्रचि दुःखमयी सृष्टि भासली

इच्छा त्या प्रभुची हें समज बा मना!
न करिं शोक, जिंकाया शीकि वासना.

## माझी विनंती

व्याकुळ झाला, लागुनि राही प्रेमाची मजसि तहान
रात्रंदिन तळमळतो, माझा जीव, जलाविण तो मीन

शोध करित तव भटकत फिरतों, दूर दूर कां तूं पळसी
रानिंवनिं गिरिकंदरांतुनी कां तापससम तूं लपसी?

वृंदावनिच्या कुंजवनामधिं राधेपासुनि तूं जैसा
इकडे तिकडे लपुनि राहसी प्रेमपरीक्षेस्तव तैसा

तिमिरपटांतुनि दाट धुक्यांतुनि पुसट तुझ्या छाया दिसती
कारण असुनी कार्यहि होसी तुज जगदात्मा बुध म्हणती.

होउनि राहसि तूंच चराचर कां न दिसे मज तव मूर्ति?
भक्तांच्या हृदयांत अखंडित वास तुझा लोकीं कीर्ति.

तो ज्ञानेश्वर तुकाराम तो एकनाथ तो शांत असा
प्रेमळ तुलसी कबीर सुंदर या भक्तांना दिससि कसा?

आलें माझें जीवित संपत दिसत यमाचा ध्वज आतां
अंत पहासी किति तरि आतां अन्य न तुजवांचुनि त्राता.
उदास वारंवार होय मन, दुःखाच्या शिखरीं बसलों
खरेंच नाहीं संसारीं सुख, खऱ्या सुखा कीं मी मुकलों ?
होवो दर्शन तव मज दुसरी उत्कंठा राहिलि नाहीं
पूर्ण दयाघन असुनि तुला कां अझुनि न येइ दया कांहीं ?
अससि विभो ! तूं जेथें कोठें तेथें पावो मत्प्रणति
वासुदेव–सुत गोविंदाची मान्य करीं इतुकी विनति.

---

# मोरो गणेश लोंढे

**[ जन्म सन १५८४—मृत्यु सन १९२० ]**

हे शिक्षक असून त्यांची नीतिबोधपर कविता मुलांच्याच उपयोगाची आहे. यांचीं बोधशतक, पुष्पगुच्छ, वगैरे लघुकाव्यें प्रसिद्ध आहेत.

## तारुण्यांतील उमेदी

चल झडकरि जाऊं कीर्तिशैलीं चढून,
सतत नियम ज्याचा काय त्याला कठीण !
चिर समय रहावें आपलें नांव लोकीं,
सकल बुध जनातें हें मनीं आवडे कीं,

जनपदहित साधी मेळवी जो जयाला,
स्वजनहित करूनी त्या सुकार्यी निमाला,
जनपदहितकर्ता नांव हें त्यास लाधे,
सकल जन तयाला नित्य गातात मोदें.

लवकर उतरूनी ज्ञानसिंधूंत यत्नें,
निवडक वर काढूं सर्व चातुर्य रत्नें,
सविभव मिळवूं या ज्ञानरूपीं निधानें,
अधिक अवनिमाजी जीं हिऱ्याहूनि मानें !

गमन करुं पुढें या पाय मागें न घेऊं
सुमति करिं धरूनी सत्पथांतून जाऊं
निजगुण निजकीर्ती वाढवूं नित्य नित्य,
सुगुणचि सुख लोकीं कीर्ति सौंदर्य सत्य !

वचन वदुं मुखानें आचरूं तेवि, हातें
करुनि वर कृतीला, मार्ग दावूं दुजातें.

सुमन गुंतवुनी हें आपलें सत्कृतींत,
जनपद बनवूं हा स्वर्ग यत्नें खचींत.

## रायगडावर काय आहे?

राष्ट्राचा इतिहास पूर्ण करणें कर्तव्य हें आपुलें
ज्यांच्या निर्मल हृत्पटावर असे हें स्पष्ट रेखाटलें
त्यांनीं रायगडीं प्रवास करुनी घालावयाला भर,
त्यामध्यें निजबुद्धिला रमवुनी व्हावें सदा तत्पर.

तेथें काय असे गडावर असें आणा न चित्तीं कदा,
तेथें काय नसे मनास अपुल्या ऐसें पुसावें सदा,
केलें राज्य शिवाजिनें बनवुनी जें वर्णनीय स्थल,
तेथें काय कमी तयास पडतें सद्बुद्धिचें ज्या बल!

येथें ये कवि दर्शनार्थ तरि तो चित्तांत दुःखें भरे,
भग्ना पाहुनिया समाधि जल तन्नेत्रांतुनी पाझरे,
स्फूर्तीचे फुटतील नूतन गमे वाणीस त्याच्या झरे
जैसा पाहुन चंद्रकांत विधुला प्रेमामुळें पाझरे!

पूर्वींचा इतिहास रम्य सगळा चित्तांत त्याच्या भरे,
त्याची लीन मती क्षणीं शिवगुणीं रंगुनिया बावरे
त्याची—चित्र चरित्र—गायनरसीं—वाणी शिवाच्या सरे
चाखाया रस त्यांतला रसिक ते होतील कीं घाबरे.

जिज्ञासावश जाल होउनि तरी ज्ञानार्थ जोडाल कीं,
प्रेमानें जर जाल तेथ भर ती घालाल मोठी सुखीं,
कर्तव्यास मनीं धराल तरि दे उत्साह तुम्हांप्रती,
टाका आळस जा, वरी बघुन घ्या नेत्रीं शिवाच्या कृती.

---

# बलवंत जनार्दन करंदीकर

## बलवंत

[ जन्म सन १८५५—मृत्यु सन १९०३ ]

बलवंत जनार्दन करंदीकर हे धुळ्याच्या 'खानदेश वैभवा'चे संपादक होते. प्रसिद्ध कवि 'विनायक' हे यांचे कनिष्ठ बंधु होत. यांनीं प्रेमालेख्य हें एक खंडकाव्य लिहिलें आहे.

## हृदय संगम हाच सुसंगम

प्रेमव्यवहारास पाहिजे लग्न कशाला केलें ?
जखड बंधनीं आजवरी हित असें कोणतें झालें ?

प्रेम पवनसम वियुक्त त्याला न प्रिय बंधन वाटे!
विवाहबंधन बघतां मागें पळत सुटे तें वाटे !

सामर्थ्य प्रेमाचें आहे अघटित अद्भुत जोर
विवाह केवळ थट्टा वाटे प्रेमाची, अनिवार.

मानधनास्तव मान मानिनी करोत कोणीं खालीं
सत्प्रेमाची अवगणना मज वाटे त्यांनीं केली!

कीर्ति, मान, धन, ह्यांचा प्रेमापुढें काय बडिवार?
ठाव न ह्यास क्षणभर देती प्रेमोदात्त विचार!

प्रेमामध्यें प्रेमावांचुन वांछिति फल भलतेंच
अशा विकारां सामान्यत्वें वश जन होती तेच!

प्रेमदेवता क्षुद्रजना ह्या होय न कधीं प्रसन्न!
ईप्सित त्यांचें न पुरे यास्तव असती सदैव खिन्न!

नृपवैभव, सिंहासन, राज्यहि देइन झिटकारून
सार्वभौम नृप पडले जरि मम पदीं होउनी लीन!

प्रेम स्वातंत्र्यास अनुसरे, नैसर्गिक धर्मानें
वाटे आत्मीं आत्मा मिळतो, राहे अभिन्नतेनें!
उरे न वांछित पुरून सारे कांहीं इच्छाबास,
सकल वासना तृप्ति पावती, जाणे मन न त्रास-
प्रकट व्हावयापूर्वी समजे अन्य मनांतिल भाव,
ह्या हृदयीं जें तें त्या हृदयीं, प्रेम तयाचें नांव!
हृदयसंगमीं खरोखर अशा स्वर्गसुखाची जोड
आशा होती मिळवायाची, परी पावली मोड.

## स्वामी कोण तुझा?

स्वामी कोण तुझा? पुनः परिसिलें, स्वामी तुझा कोणता?
कोणाचा ध्वनि? कोठुन प्रसवला? कांहीं न ये जाणता.
वारंवार असा घुमे स्वन. जरी चौंहीकडे पाहिलें,
कोणीही न दिसे. करूं तरि कसें? मच्चित्त साशंकलें.

"शंका लेश धरी मनीं न सखया! प्रश्नोत्तरें द्यावया.
दृष्टीतें पडतों तुझ्या न, म्हणुनी पावूं नको तूं भया.
कोणीही असलों, तरी न तुज मी देईन कांहीं इजा.
प्रश्नांचा करुनी विचार पुरता, तूं उत्तरें देत जा."

कोणी काय कथूं? मलाच न कळे, आश्वासिलें यापरी
गेली भीति मनांतली, मग पटे विश्वास, दे खातरी.
'आहे सेवकभाव सर्व जगतीं व्यापून ह्या राहिला;
स्वामी कोण तुझा म्हणून पुसतों,' ऐसे ध्वनी बोलला.

प्रश्नाचें कळतां रहस्य न खरें, द्यावें कसें उत्तर?
चिंता ही पडली समुत्सुक मनें द्याया जरी सादर.

'कोणाची करिशी न काय उदरासाठीं' वदे 'चाकरी'
'हो, हो, हो! करितों. खरोखरच तो स्वामी न माझा तरी.'
'झाले जें तुज विश्वदर्शन घडायाला स्वयें कारण,
केलें बालपणीं दयार्द्रहृदयें ज्यांनीं तुझें पोषण;
ज्याहूनी जगतीं न दैवत दुजें, संसेव्य मातापिता,
स्वामी काय तुझे नव्हेत वद ते.' 'नाहींत बा तत्वता.'
'शिक्षा देउन मानवत्व तुजला ज्यानें असें आणिलें,
ज्ञानाच्या तुजला हितप्रद तसें मार्गा जयें लाविलें,
पूज्याहूनहि पूज्य तो गुरु नव्हे, स्वामी तुझा सांग हें'
'मी त्याचा असलों ऋणी किति जरी, स्वामी तरी तो नव्हे.'
'निर्बंधीं तुज वर्तवी, परि तुझ्या राहे न जें बंधनीं,
सर्वां आकळुनी धरी प्रबल जें संमोहनेच्छागुणीं,
ज्याचा विक्रमदर्प पाहुनि बळी निर्वीर्यता पावतो,
स्वामी तें मन कां नव्हे तव?' 'न तें स्वामी खरें सांगतों.'
'प्राणाधार जयास सुज्ञ म्हणती, जें चित्स्वरूप स्वयें,
ज्याच्या मानवजीवसृष्टि सगळी व्यापून गेली जयें,
श्रेष्ठश्रेष्ठ कवीस बोध पुरता चैतन्य ज्याचा न हो.
तें स्वामी तव कां नव्हे?' 'मम खरें स्वामित्व त्याला न हो.'
ज्याचें तेज अपूर्व कोण? न तसें अत्यल्प ही भास्करीं,
स्वर्गारोहणमार्ग दुर्घट, परी सोपा प्रभावें करी,
आहे भाजन द्यावयास मनुजा दुष्प्राप्य जें सद्गति,
स्वामी ज्ञान न तें तुझें?' 'न गणिते स्वामी तया मन्मति.
'ते राहोत समस्त अन्य, परि जो आहे जगन्नायक,
सृष्टीच्या बहुचित्र आत्मविभवें चक्रांस जो चालक,

तो स्वामी सकलांस होय, म्हणुनी त्वां पाहिजे मानिला.'
'सूक्ष्मत्वें करितां विचार पुरता, वाटे न तोही मला.'
'स्वामी कोण तुझा तरी ? न कळतें; किंवा न कोणी तुला ?
'मी सर्वांतर हेतुकार्य अवघें, स्वामी नसे वेगळा.
माझा मीच धनी;' असो, मज कथी जाणूं तुला साधनीं
मी कोण्या ? 'भ्रमशी, कळे तुज न कां ?' 'मी जाण अंतर्ध्वनि'

# गंगाधर रामचंद्र मोगरे

[ जन्म सन १८५७—मृत्यु सन १९१५ ]

मोगऱ्यांची फुलें भाग १,२,३,४,५ इतकीं यांचीं काव्यपुस्तकें असून अभिनवकादंबरी हें कादंबरीचें अपुरें भाषांतर यांनींच लिहिलें आहे. विविधज्ञानविस्ताराचे हें काव्यसंपादक होते.

## हिंदुस्थानावर शिकंदराची स्वारी

ऐश्वर्य विद्या बल ह्या तिहींचे
होऊनियां स्थानचि, या महीचे
स्वामित्व जी भोगितसे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

धरोनियां लोभ जिचा स्वचित्तीं
गेले बहु क्ष्माधिप चक्रवर्ती
शोधावया मृत्युपथा, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

विद्यावधू ज्ञानसुधारसातें
पाजीतसे नित्य जयां स्वहस्तें
ऐशा सुतां जी प्रसवे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

सौंदर्य एकत्र जिथें क्षितीचें
होऊनि दावी भगवत्कृतीचें
अगाध वैचित्र्य, अहा कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

लोभी जसा द्रव्यकरंडकातें
रक्षीतसे, तेविं सदाहि जीतें

संरक्षिलें आर्यजनीं, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

कौशल्य शाळा वसुधातलाची,
जी होय माता सकला कलांची
सुवर्ण भूनाम धरा, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

घेवोनि चारी पुरुषार्थ संगे
जेथें रमा संतत सानुरागें
क्रीडा कराया वसली, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

हरोनि अज्ञानघनांधकारा
संतोषवाया नरलोक सारा
ज्ञानार्क जेथें उगवे, कधीं मी
पाहीन ती सुंदर आर्यभूमि ?

* * *

करित हृदयीं होतों जीच्या अहर्निशि चिंतना,
बहुत सुख ती आर्यक्ष्मा दे अजी मम लोचना;
सुकृततरुला आलीं माझ्या फळें बहुतां दिनीं,
म्हणुनि बघतों आजी मी ही जगज्जनमोहिनी.

स्वप्नींही बहुधा नसेल जननी ज्यांनीं तुला पाहिलें,
तेही आतुर दर्शनास्तव तुझ्या होऊनियां राहिले;
व्हावें सौख्य किती तयांस तुजला फारां दिसीं पाहुनि,
जे त्वत्पुत्रचि आपणां म्हणवुनी घेतात हर्षे जनीं ?

गेला स्वीय कलत्रमित्र अवघे सोडूनियां मातपिता,
त्याला दुःसह जाहली न बहुधा त्यांची वियोगव्यथा;

वारंवार परंतु फार रडला होतां तुझी त्या स्मृती,
त्याची ती वदतां नयेच मजला अत्यंत दुःखस्थिती.
दुःखें आज लयास ती सकलही गेलीं पहातां तुला,
आनंदाश्रुजलौघ अस्खलित हा नेत्रांतुनी चालिला;
मार्गींचे श्रम सर्वही विसरलों, चिंता पळाली दुरी,
देतों आज बुडी स्वयें गमतसे आनंदरत्नाकरीं.
स्वर्लोकाप्रति नंदन स्वविभवें शोभा जशी देतसे,
सौंदर्यें अपुल्या जयें क्षितितला ह्या शोभवीलें तसें
त्या ह्या आर्यमहीकपालतिलका काश्मीर देशाप्रती
आनंदातिशयें बघुनी सुख मी भोगीतसें संप्रति.

---

# वासुदेव बळवंत पटवर्धन

## वसंत

[ जन्म सन १८६१—मृत्यु सन १९२२ ]

वा. ब. पटवर्धन, बी. ए. हे शेवटीं शेवटीं फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपाल होते. काव्य आणि काव्योदय, सारेंच विलक्षण, ही यांचीं गद्य पुस्तकें आहेत.

## शब्द

शब्द बापडे केवळ वारा,
अर्थ वागतो मनांत सारा,
नीट नेटका शब्द पसारा,
अर्थाविण पंगू.

मना मनांचा संगम झाला,
हृदया हृत्संदेश मिळाला,
शब्द बोबडा अपुरा पडला,
निरुपम घे गोडी.

शुद्धाशुद्धाकडे बघावें,
वैय्याकरणीं शब्द छळावें,
शुष्क बंधनीं कां गुंतावें,
प्रेमळ हृदयांनीं ?

व्याकरणाचे नियम कशाला,
कोण मानतो साहित्याला ?
उठला जो हृदयास उमाळा,
हृदयीं विरमावा !

सुंदर वाक्यें, शब्द मनोहर,
सरस्वतीचें मंजुळ नूपुर !
ऐकायातें हट्टन अंतर,
बसो पंडितांचें.

ममतेचे दो घांस घ्यावया,
प्रेमरसाचे घुटके प्याया,
उत्कंठित—उत्सुक त्या हृदयां,
काय होय त्यांचें ?

अशुद्ध वाक्यें शब्द मोडके
अवाच्य अक्षर वर्ण तोटके
गोड जसे अमृताचे घुरके
होती प्रीतीनें

## मन

जाहले पांढरे केश, परि नाहीं संयम लेश, ठाउका,
वर्षांवर चढलें वर्ष, उद्दाम हृदय बेहोष, अजुनही,

शांतीचा धरिला वेष, अंगार भडकला रोष, अंतरीं,
धांवतें, स्वैर नाचतें, बंध तोडितें
कवळितें दोष, वारें—मन करितें नाश, अजुनही !

# ताजमहाल पाहिल्यावर

मानवधर्मा विसरविती, दिव्य गुणातें चमकाविती,
शिल्पकलेच्या या रीती, सौंदर्याच्या या स्फूर्ती,
मनांत असती,
जनांत दिसती,
स्वर्गी वसती,
स्वर्ग आणिती भूवरती, दिव्यपदा भू चढवीती !
इहलोकाचा बंध तुटे पार्थिवतेचा रंग विटे,
व्यंगपणाचा दोष फिटे, सान्ताचा परिवेष सुटे,
अनंत उमले !
अव्यक्त खुलें !
अज्ञात कळें !
परिचित वस्तुक्रम उलटे, नवें विश्व नव सत्य उठे !
सौंदर्याच्या या मूर्ती, प्रसन्न काव्यें जीं रचिती
चित्रें रंगीं रंगविती, सत्याचीं रूपें असती
मूळ स्फूर्ती
एक प्रकृती,
निर्गुण वृत्ती,
सदानंद लहरी चित्तीं, उठती त्यांची ही व्यक्ती !
सर्व सृष्टिमधिं जें फिरतें, ब्रह्म कटाहीं जें घुमतें,
स्वर्गी जें जन्मा येतें, प्रलयीं विलया जें जातें,

निर्गुण हंसतें,
सगुण विलसतें,
असतें नसतें
नाचें सारें तें येथें, पाहे त्यासच तें दिसतें
अमूर्त रूपां हें आलें, नव्हतें असलें तें झालें
मनांत संकल्पीं उठलें, जनांत कृतिरुपीं वठलें.
हें प्रेमाचें,
हें प्रीतीचें
परस्परांचें
देणें येथें हो दिधलें, कुणीं म्हणावें तें फिटलें!

# एकनाथ गणेश भांडारे

[ जन्म सन १८६३—मृत्यु सन १९११ ]

हे कवि 'सुवर्णमाला,' मासिकाचे संपादक व सोलापूरच्या 'कल्पतरु' पत्राचेही कांहीं वर्षें ते संपादक होते.

## आर्यमातेचा शोक

सिंहा सदृश शूर धीट मम ते सुत्पुत्र गेले कुठें ?
ज्यांना पाहुनि पारणें सकल या नेत्रद्वयांचें फिटे !
गेले होउनि सर्व ते अतिबली देशाभिमानी खरे,
काळाच्या जबड्यांत तेहि पडतां आतां न कोणि उरे !

आहे सांप्रत कालचक्र फिरलें, गेली सुनीती लया,
गेला धर्म रसातळास अवघा कोठें न थारा तया,
गेलें साहस, धैर्य, शौर्य, विलया द्रव्योदधी आटले,
तें सारें अजि नामशेष उरलें, जें म्यां स्वतः पाहिलें !

द्रव्याच्या सरिता झराझर जिथें होत्या सदा वाहत,
कोणा छत्रपतीहि एक न मिळे हा ! हा ! तिथें सांप्रत,
जेथें केवळ दानशौर्य सहजीं होतें अहा गाजत,
दुर्दैवें अपहार बुद्धि विलसे तेथें अतां शाश्वत !

जेथें शूरपणा अनंत समरीं शत्रूप्रती दीपवी,
तेथें भीरुपणा कमाल करुनी देशास ह्या लाजवी.

## स्मशान—शांतता

उग्र भेसुर हे उंच शैल नाना
सौम्यतेनें बघतात शवस्थाना !

निश्चलत्वातें अखिल पवन सेवी
महासागर गांभीर्य असे जेवीं !

परी याहुनियां थोर शांततेंत
स्वस्थ बसलेले असति समाधींत
स्मशानाच्या विस्तीर्ण अंगणीं या—
येथ, येई जणुं शांतता रमाया !

चंद्र सूर्यांची गरज तिला नाहीं !
दुःख शोकाचें अशुभ तिला नाहीं !
अंतकाची मुळिं भीति तिला नाहीं !
मनोव्याधी कसलीहि तिला नाहीं !

## स्वप्न

रात्र भयंकर कोण अहा ! ती तिमिर भरी चहुंकडे
कालरंजनि कज्जलोदधींचे घाली जगभर सडे !
सोसाट्याचा वायू सुटला रगडित तरुचीं हुडें
डळमळली कुंभिनी भयानें उलथी गिरिचे कडे !

विद्युल्लेखा स्फुरणमिषानें चक्क नयन होती
विद्युज्जिव्हा यमरायाची मूर्तिमंत हो ! ती !
गड गड गड गड मेघ गडाडति पर्जन्यें न्हाती
गिरिशिखरें धरणीधर सागर घाबरुनी जाती !

पंचमहाभूतांहि घातले ऐसे धिंडवडे
वाटे मानवसत्र रजनी कोण करीं येवढें ?
प्रळयकाळिं या अशा भयंकर सांपडला हा कवी
वाटे त्यातें मस्तकिं पडतो दुर्दैवाचा पवी !

चुकवाया तो पळत सूटला घोरभयें अटवीं
सिंह भयंकर पुढें ठाकला गजपति घाबरवी!
चवताळुनियां कृतांत कटकें मजभोंतीं जमतां
थरथर कांपू अहा! लागला दीनकवी हा स्वतां
भयें फोडुनी किंकाळी तो पळ घे भलतीकडे
प्राणा ऐसें प्रियकर दुसरें कांहिं न जगतीं नडे!
धांवत धांवत चढला कवि तो गिरिशिखरीं एका
धों धों जेथुनि निचरे गंगा अघदानव मर्दिका!
तटीं तियेच्या कोल्हापुरची आई मज भेटे,
उचलुनि घेतां प्रेमें मजला कंठ तिचा दाटे!
म्हणे 'बालका! भिऊं नको मी साह्य तुला आहे,
खड्ग चक्र मम रक्षिति तुजला सत्यचि मानीं हे!'
तिचें वचन ऐकुनी जहालों. जागृत उर धडधडे!
केव्हांपासुनि चित्त लागलें तिच्याच चरणांकडे!

---

# नारायण वामन टिळक

[ जन्म सन १८६५--मृत्यु सन १९१९ ]

रेव्हरंड टिळक यांची समग्र स्फुट कविता 'टिळकांची कविता' या पुस्तकांत ग्रथित केली आहे. त्यांत त्यांची वनवासी फूल, सुशीला व बापाचे अश्रु इत्यादि मोठालीं काव्यें आहेत. 'ख्रिस्तायन' नांवाचें एक महाकाव्य त्यांनींच रचिलें आहे. 'भक्तिपर अभंग' ख्रिश्चनांस पसंत आहेत. 'शीलपरं भूषणम्' नांवाची एक नाटिकाही त्यांनीं लिहिली आहे.

## जन्मभूमि

सृष्टी तुला वाहुनी धन्य माते, अशी रूप सम्पन्न तूं निस्तुला
तूं कामधेनू ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला;
या वैभवाला तुझ्या पाहुनीयां मला स्फूर्ति नृत्यार्थ होते जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी !

माते ! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते, तुझे शूर योद्धे, तुझे सत्कवि,
श्रेणी तयांची सदा माझिया गे मना पूजनीं आपुल्या वांकवी !
यांचीं यशें ज्या नव्या सद्गुणांना मला अर्पिती, ध्येय ते गे जरी,
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मीं न कोठें तरी !

तुझ्या महोदार सारस्वताच्या महासागरींचा जरी मीन मी
झालों, तरी गे तृषा मन्मनाची कधींही कधींही न होणें कमी !
आई ! गुरुस्थान अन्तीं जगाचें तुझें यांत शंका न कांहीं जरी
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, तसें पाहिलें मी न कोठें तरी !

वारा तुझ्या स्पर्शनें शुद्ध झाला. मला लाधला ! भाग्य हें केवढें !
माते ! स्वयें देसि जें अन्नपाणी, सुधा बापुडी कायशी त्यापुढें !
तूं बाळगीशी मला स्कन्धिं अंकीं ! सुखाची खरी हीच सीमा पुरी !
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी, असें पाहिलें मीं न कोठें तरी !

# पुरें जाणतों मीच माझें बल

हा एक कक्षेंत छावा गजाचा, दुजीमाजि हा सिंह केकावतो,
हा जाहला अर्ध मेला भयानें लपोनीं मला व्याघ्र डोकावतो;
हे पर्वतांचे उभे क्षुद्र धोंडे, महासागराचे पुढें पल्वल!
बोला हवें तें, मला काय त्याचें? पुरें जाणतों मीच माझें बल!

भूगोल हा दोन बोटांत माझ्या, नको अन्तराला तुझी थोरवी!
पाहीन एके दिनीं मीच सारें कुठें झांकलेले तुझे ते रवि!
हीं पंचभूतें मला सेविणारीं, खरें सांगतों मी न गर्वाकुल;
बोला हवें तें मला काय त्याचें? पुरें जाणतों मीच माझें बल!

मी भासतों कीट, ही भूति माझी परी भेदि सूर्याचिया मंडळा,
तूं हास काला मला, मी तुलाही सदा हांसतों गर्विता, चंचला;
हे आधिनों, व्याधिनों, मक्षिकांनों! तुम्ही बापुडीं कायशीं दुर्बल!
बोला हवें तें, मला काय त्याचें? पुरें जाणतों मीच माझें बल!

हें विश्व सारें विहारास माझ्या पुरेसें न होईल शंका नको,
हा मर्त्य, हा देहकारानिवासी, बळें हीन हा, कांहिं कोणी बको!
मी मर्त्य, मी मृत्युला जिंकणारा! जगीं धूळ, मी दिव्यता उज्ज्वल!
बोला हवें तें, मला काय त्याचें? पुरें जाणतों मीच माझें बल!

मीं ओळखीलें मला पूर्ण; आतां कशाला मला पाहणें आरसा?
माझ्या पुढें नित्य आत्मानुभूती; पटावा दुजा तर्क आतां कसा!
मी ईश्वराच्या जगत्कारणाच्या खरी हेतुची पूर्तता मंगल!
बोला हवें तें, मला काय त्याचें? पुरें जाणतों मीच माझें बल!

# कोण सांगेल नांव?

दुःखक्षेत्रीं अविरल अशी वृष्टि हो आसवांची,
जेव्हां तेथें उगवुनि पुढें जें वियोगोष्ण जाची;

तेंव्हां होई सुफलित जिची नित्य आस्वर्ग धांव,
ऐशी विश्वीं अमरलतिका! कोण सांगेल नांव?

जीच्या स्पर्शें सहज उठुनी पांगळा धांव मारी!
मूका गानस्फुरण जगतीं दृश्य अंधास सारीं!
जीच्या स्पर्शें मृततनुमधें संचरे दिव्य जीव!
ऐशी मात्रा अनुपम जगीं! कोण सांगेल नांव?

वेडा लोकीं परि करितसें शाहणा अंतरंगीं,
"मी तूं" सारें हरुन मनुजा रंगवी एक रंगीं!
ज्याची झाली सुखद मग त्या लोक सारेच दिव्य,
आहे जादू खचित असली! कोण सांगेल नांव?

# एक सुंदर कवि

कवी! खरा हो कवी गातसे सदैव कविता नवी,
संसृति कोलाहलें त्रासल्या-जीवाला रंजवी.
पुनरावृत्ती दोष म्हणा हो! कुणी पाहिजे तरी,
विविधार्थाची गिरा द्विजाची मनोहरा मज खरी,
मीच कशाला? दिशा हांसती, शिरा तरू डोलवी,
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी.
एका तरुला कुशल विचारी, दुसऱ्याला हांसवी,
करि रोमांचित एक लतेला, दुसरीला लाजवी,
फुलांसंगतीं खेळे ओंव्या गाउनि त्या खेळवी,
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवी!
क्षणांत वरतीं क्षणांत खालीं स्फूर्ति यास नेतसे,
अंतर्यामीं क्षणांत गातो हंसतो फूलचि जसें,

ग्रं. क्र. २५

लीला त्याच्या सांगति कीं हा कवी खरा सत्कवी,
एक विषय ठाउका द्विजाला परमेशाला स्तवीं!

निंदास्तुतिच्या सवद्यासाठीं रचना याची नसे,
भक्तिरसीं हा निमग्न याला स्फूर्ति देव देतसे.

कविता माझी जळो! मला हे पक्षिराय लाजवी,
'हीच वृत्ति दे,' प्रभुपाशीं हें मजकडुनी मागवी!

## सारीं फुलेंच फुलें !

आकाशांत फुलें, धरेवर फुलें वाऱ्यावरीही फुलें,
माझ्या गेहिं फुलें, धरेवर फुलें, भूगर्भि सारीं फुलें!
माझें चित्त भुलें, सुगंध सुटलें! हें विश्व आनंदलें!
कोणीं आकळिलें? कुणास कळलें उद्यान विस्तारलें?

नक्षत्रें, सुमनें, विहंगम, मुलें, काव्यें, मणी! हीं जरी
नांवें भिन्न, खरोखरी मज फुलें हीं रम्य सारीं तरी!
घेतो ह्यांतुनि थोडका रस! पुन्हां त्याच्याकडे धांवतों,
धांवाधांव म्हणा, परी हिजमधें कैवल्य मी पावतों!

जातीच्या भ्रमरास "सोडुन फुलें ये फोड हीं लांकडें"
ऐसें कोण म्हणेल? कोण भलतें घालील हें सांकडें?
देवानेंच जयास पुष्पहृदयीं खेळावया निर्मिलें,
त्याला वृत्ति दुजी सुचेल कुठुनी? प्राणा जरी घेतलें!

बोला 'चंचल हा क्षणांत गगनीं धावें क्षणें भूवरीं!
हा वाऱ्यावर! हा गृहीं! निजमनीं! हा भूमिच्या भींतरीं!'
हासा मानुनियां निरर्थ मम हो ह्या गोड गुंजारवा
माझें जन्मच हें फुलां निरविलें! भीतों न मी मानवा!

मज गमें मजसाठिं जगत्पती,
फुलवितो अवघ्या जगताप्रती!

# तें गृह

सर्व माझें पण एकवटे जेथें
जिथें प्रेमाचें राज्य सदाचें तें,
स्वार्थ कपटाचा लेश नसे जेथें,
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

जिथें नाहीं अभिमान कुणा ठावा,
एकमेकांची जिथें सौख्य सेवा;
जिथें परहित तें स्वहित मानवातें,
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

भिन्न मूर्तींमधिं चित्त एक जेथें,
भोगि दुःखातें अनुभवी सुखातें,
स्वर्ग वाटे हा मर्त्य लोक जेथें!
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

मनाच्या ज्या अत्युच्च, रम्य वृत्ति
अंकुरित त्या होऊन वाढताती;
फुलें, सुफळें येतात त्यांस जेथें,
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

वीर पंडित, कवि, संत सती यांला
सिद्ध करुनी जें देतसे जगाला,
सर्व संसृतिचें मूळ नांव ज्यातें,
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

ज्ञान अपुलें द्यावया मानवाला
स्वयें देवें स्थापिली पाठशाला;
दिलें त्यानें गृह नाम मुदातीतें,
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

त्रिवर्गाचा सोपान सिद्ध केला
जगन्नाथें, तो दिला मानवाला;
देव मंदिर·आपुलें गणी ज्यातें
जगीं उपमा कोणती त्या गृहातें!

# सुशीला

सुशीलेचें परि बाल्य सरत आलें,
स्वप्न पुढचें तें तिनें पाहियेलें!
यौवनाच्या देहलीवरी राहे
उभी कन्या, आंत हो काय पाहे!

किती किल्ले ती नवे नवे बांधी
किती कार्यें कल्पना बळें साधी!
कंठिं बाल्याच्या ठेवुनियां हात
फिरे रमणी तारुण्य काननांत!

क्षणें प्रौढ, पुन्हां क्षणें बाळ व्हावें,
ज्ञान सांगावें, क्षणानें रुसावें;
क्षणें बाळांतुन दूर निघुनि जावें,
क्षणें त्यांसह नर्तना सिद्ध व्हावें!

बाल्य आणी तारुण्य यांजमध्यें
परम सौख्याची स्थिती तिला लाभे;
अभिमतार्शी परि पूर्वपरिचितार्शी
अधिक लग्ना ती दिसे शैशवार्शी.

अर्ध सौरभ, सौंदर्य हृदीं राहे,
अर्ध केवळ बाहेर दिसत आहे;
अर्ध पुष्पपणा पावली कळी ती
बाल्य सीमेवर हंसत डुलत होती!

# ब्राह्मण किंवा महार

मी ब्राह्मण वा महार मी, गणीं न कवणालाच मी.

या सृष्टींतिल दिव्यपण; तेंच तेंच हें मनुजपण;
मांगल्याची ही ठेव, हीस्तव देइन मी जीव;
हिच्याहि मोला
गणीन त्याला,
महाखलाला
नीच, नीचतर गणीन मी जन्मभूमिसेवा धर्मी.

हिंदभूमि माझी जननी, आले हीच्या कुशींतुनी
हिरेच अवघे माझे ते, मन्मन त्यां मोहुनि जातें;
मलांत पडले,
खनींत दडले,
मुकुटीं जडले,
अवघे उचलुन घेइन मी जन्मभूमिसेवा धर्मी.

विपन्नता ज्यांच्यासाठीं, जीव कळवळे त्यासाठीं;
अज्ञपणा ग्रासी ज्यांतें, प्रियतर दुर्बल मज ते तें !
त्यजुनी सकलां,
रुग्णदुर्बला.
उचली बाला
जननी; तीसम वेडा मी, जन्मभूमिसेवाधर्मी.

माना मानाचें गोवें, कसें असे कवणा ठावें !
खाइन अवघ्यांच्या लाथा, देइन सेवेला माथा;

निजभूचें ऋण;
अवघें फेडिन,
मरून जाईन!
रक्षिन गुरुपद माझें मी, जन्मभूमिसेवाधर्मी.

होइन नीचाहुन नीच करीन अवघ्यांनां उंच;
ते ब्राह्मण मग महार मी, कोण गणी मग मला कमी-
कमी गणीना
कांहिं म्हणेना
कुणी, तयांनां
विचारितों मग कसला मी, जन्मभूमिसेवाधर्मी.

पांच कशाचे, हे जितुके, हिंदभूमिबालक तितुके.
मम देहाचे प्राण खरे, कसेहि असले तरि सारे!
जें वाटे तें
सांगायातें
शब्द न पुरते,
धरितों मौना यास्तव मी, जन्मभूमिसेवाधर्मी.

# कृष्णाजी केशव दामले

## केशवसुत

[ जन्म सन १८६५—मृत्यु सन १९०५ ]

यांच्या समग्र कवितांचें संपादन कै० हरि नारायण आपटे व रा. रा. सीताराम केशव दामले यांनीं वेगवेगळे केलें असून यांच्या लोकप्रिय कवितांचीं छोटीं पुस्तकें अनेकांनीं प्रकाशिलीं आहेत. हे आधुनिक कवितांचे एक विशिष्ट सांप्रदायकर्ते होते यांत आतां मतभेद नाहीं.

## तुतारी

एक तुतारी द्या मज आणुनी,
फुंकिन जा मी स्वप्राणानें,
भेदुनि टाकिन सगळीं गगनें,—
दीर्घ जिचा त्या किंकाळीनें; अशी तुतारी द्या मजलागुनी.

अवकाशांच्या ओसाडींतिल,
पडसाद मुके जे आजवरी
होतिल ते वाचाल सत्वरी
फुंक मारितां जीला जबरी; कोण तुतारी ती मज देईल ?

सारंगी ती सतार सुंदर,
वीणा, बीनही, मृदंग, बाजा,
सूरहि, सनई, अलगुज माझ्या—
कसची ही हो पडतिल काजा; एक तुतारी द्या तर सत्वर.

रुढी जुलूम यांचीं भेसूर
संतानें राक्षसी तुम्हांला
फाडुनि खाती त्या हतवेला—
जल्शाची कां ? पुसा मनाला ! तुतारिनें ह्या सावध व्हा तर !

अवडंबरलीं ढगें किती तरी,
रविकिरणांचा चूर होतसे,
मोहर सगळा गळुनि जातसे,
कीड पिकावरि सर्वत्र दिसे; गाफीलगिरी तरि हि जगावरि!

चमत्कार! 'तें पुराण तेधुनि,
सुंदर, सोज्वल, गोडें मोठें!'
'आलिकडलें तें सगळें खोटें!'
म्हणती, भरुनी ढेरीं पोटें; धिक्कार अशा मूर्खांलागुनि.

जुन्या नवीं या ताजे तारक,
जुन्या भूमिवर नवीं टवटवी,
जुना समुद्रहि नवरत्नें वी;
जुन्यातून जी निष्पत्ति नवी—काय नव्हे ती श्रेयस्कारक!

जुनें जाऊं द्या मरणालागुनि,
जाळुनि किंवा पुरुनि टाका,
सडत न एक्या ठायीं ठाका
सावध! ऐका पुढल्या हाका! खांद्यास चला खांदा भिडवुनि!

प्रासकाळ हा विशाळ भूधर,
सुंदर लेणीं तयांत खोदा,
निज नामें त्या वरती नोंदा,
बसुनि कां वाढवितां मेदा? विक्रम कांहीं करा, चला तर!

अटक कशाला बसला घालुनी?
पूर्वज वदले त्यां गमलें तें
ऐका खुशाल सादर चित्तें;
परंतु सरका विशंक पुढतें—निरोप त्यांचा ध्यानीं घेउनि!

निसर्ग निग्रण त्याला मुर्वत–
नाहीं अगदीं पर्वा कशाची !
कालासह जी क्रीडा त्याची,
ती सकलांला समान जाची–चुरुनी टाकी प्रचंड पर्वत !

त्याशीं भिडुनी झटुनी झगडत
उठवा आपुलें उंच मनोरे,
पुराण पडक्या सदनीं कां रे !
भ्याड बसुनिया रडतां पोरें ! पुरुषार्थ नव्हे पडणें रखडत !

संघशक्तिच्या भुईंत खंदक
रुंद पडुनि शे तुकडे झाले,
स्वार्थान पेक्ष जीवीं अपुले
पाहिजेत तें सत्वर भरलें–घ्या त्यांत उड्या तर बेलाशक !

धार धरिलिया घ्यार जिवावर
रडतिल रडोत रांडा पोरें,
गत शतकांचीं पापें घोरें–
क्षालायाला तुमचीं रुधिरें–पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हां तर !

जाऊं बघतें नांव लया प्रत,
तशांत बनलां भऊ मेंढरें
अहह ! घेरिलें आहे तिमिरें,
परंतु होऊं नका बावरे––धीराला दे प्रसंग हिंमत !

धर्मांचें माजवूनि डम्बर,
नीतीला आणिती अडथळे,
विसरुनिया हें जातात खुळे,
नीतीचें पद जेथें न ढळे––धर्म होतसे तेथेंच स्थिर.

हल्ला करण्या तर दंभावर—तर बंडांवर,
शूरानों ! या त्वरा करा रे !
समतेचा ध्वज उंच धरा रे
नीतीची द्वाही पसरा रे, तुतारिच्या या सुराबरोबर !

नियमन मनुजासाठीं मानव—
नसे नियमनासाठीं जाणा,
प्रगतिस जर हें हाणी टोणा—
झुगारुन तें देउनि, बाणा—मिरवा निज ओज्याचा अभिनव !

घातक भलत्या प्रतिबंधावर
हल्ला नेण्या करा त्वरा रे !
उन्नतिचा ध्वज उंच धरा रे !
वीरानों ! तर पुढें सरा रे—आवेशानें गर्जुन 'हर हर'

पूर्वीपासुनी अजुनी सुरासुर
तुंबळ संग्रामाला करिती;
संप्रति दानव फार माजती,
देवावर झेंडा मिरवीती ! देवांच्या मदतीस चला तर !

## दिवस आणि रात्र

दिवस बोलतो "उठा झणी !" रात्र विसांवा घ्या म्हणते.
या दों वचनीं दिनरजनीं, बहुत सुचविती, मज गमतें.
दिवस सांगतो "काम करा." रात्र—"विचारा करा मनीं."
दिवस बोलतो "मरा मरा !" रात्र—"मजमुळें जा तरुनी."
दिवस वदतसे "पहा प्रकाश." आंत शिरतसे परि अंधार !
रात्र बोलते "पहा तमास" परि आंत पडे प्रकाश फार !

दिवस म्हणे " जा घरांतुनि–" रात्र वदे " या सर्व घरास."
स्पर्धा लावी दिवस जनीं; रात्र शिकविते प्रीति तयास!
नक्षत्रें जगतीं वरलीं, दिवस फुलवितो, असें खरें;
पुष्पें आकाशामधलीं, रात्र खुलविते, पहा बरें.
एकच तारा दिन दावी, असंख्य भास्कर परी निशा;
दिवस उघडितो ही उर्वी, रजनी अनंत आकाशा!
दिवस जनांला देव दिसे परि गद्यच त्याच्या वदनीं;
रात्र राक्षसी भासतसे, परि गाते सुंदर गाणीं!
" ही भूमी, हा नरक असे," वदे अदय दिन वारंवार;
" ही धरणी हा स्वर्ग असे " गाते रजनी, जी प्रिय फार!

## झपूर्झा

हर्ष खेद ते मावळले,
हास्य निवालें,
अश्रु पळाले,
कंटक शल्यें बोथटलीं,
मखमालीची लव वठली;
कांहीं न दिसे दृष्टीला,
प्रकाश गेला,
तिमिर हरपला,
काय म्हणावें या स्थितिला? झपूर्झा! गडे झपूर्झा!

हर्ष–शोक हे ज्या सगळे
त्यां काय कळे,
त्या काय वळे?

हसातिल जरि ते आम्हांला,
भय न धरूं हे वदण्याला—
व्यर्थी अधिकचि अर्थ असे,
तो त्यांस दिसें,
ज्या म्हणति पिसे
त्या अर्थाचे बोल कसे ? झपूर्झा ! गडे झपूर्झा !

शताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून
चिद्घन चपला ही जाते,
नाचत तेथें चकचकतें;
अंधुक आकृति तिस दिसती
त्या गाताती
निगूढ गीतीं;
त्या गीताचे ध्वनि निघती—झपूर्झा ! गडे झपूर्झा !

नांगरिल्याविण भुईवरी
असे किती तरी;
पण शेतकरी
सनदी तेथें कोण वदा ?
हजारांतुनि एकादा !
तरी ना तेथुनि वन माला
आणायाला
अटक तुम्हांला;
मात्र गात हा मंत्र चला—झपूर्झा ! गडे झपूर्झा !

पुरुषाशीं त्या रम्य अति
नित्य प्रकृति
क्रीडा करिती
स्वर स्वंगम त्या क्रीडांचा
ओळखणें, हा ज्ञानाचा
हेतु; तयाची सुंदरता
व्हाया चित्ता—
प्रत ती ज्ञाता,
वाटे कोडें गा आतां झपूर्झा! गडे झपूर्झा!

सूर्य चंद्र आणिक तारे
नाचत सारे
हे प्रेमभरें
खुडित खपुष्पें फिरति जिथें
आहे जर जाणें तेथें.
धरा जरा निस्संगपणा,
मारा फिरके
मारा गिरके
नाचत गुंगत म्हणा म्हणा—झपूर्झा! गडे झपूर्झा!

## स्फूर्ति

कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या!
प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या!
अमुच्या भाळीं कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची,
म्हणेल जग आम्हांस मद्यपी, पर्वा कसली मग याची!

जिव्हेचीं बंधनें तर ढिलीं करा तीव्र या पेयानें,
यदुष्णतेनें द्यावा पृथ्वी द्रवुनि मिसळती वेगानें !
होऊनियां मग दंग मनीं,
व्हावें तें आणा ध्यानीं;
गा मग सुचतिल तीं गाणीं;
परिसुनि त्यांचे शब्द, रूढिचे दास क्षणीं ते खवळूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या !

सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनीं उकळीला,
शेष तयाचा द्या तर लौकर पिपासु जे त्या आम्हांला !
औचित्याच्या फोल विवेका ! जा निघ या दुरवस्थेनें
अम्हां घेरिलें म्हणुनी घेतों झिंगुनियां या पानानें !
कल्पनेची मग करुनि नौका व्योमसागरावरि जाऊं,
उडुरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेंकुनियां देऊं !
अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं
हार न खाऊं रतीभरी !
देवदानवां नरें निर्मिलें, हें मत लोकां कळवूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या !

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देऊं कसें
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देऊनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे !
'महादेव ! हरहर !' समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येऊनि घुमतो अमुच्या कर्णीं—" निजती ते ठारचि मरती ! "

उठा! उठा! बांधा कमरा!
मारा किंवा लढत मरा!
सत्वाचा 'उदयोऽस्तु' करा!
छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या!
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेंस भराभर उसळूं द्या!

## आम्ही कोण

आम्ही कोण म्हणून काय पुससी? आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके!
सारेही बडिवार येथिल पहा! आम्हांपुढें ते फिके;
पाणी स्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करां माजिया
फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्व आम्ही निकें!
शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणीं सुरांच्या बरें?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते?
ते आम्हीच; सुधा कृतीमधुनियां ज्यांच्यासदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्या पासुनी लाभतें!
आम्हांला वगळा गतप्रभ झणीं होतील तारांगणें;
आम्हाला वगळा—विकेल कवडी मोलावरी हे जिणें.

## म्हातारी

घेऊनि हृदयाशीं सुतेला, स्थित मी दाराशीं;
म्हातारी आली तरंगत, मुलगीला दिसली;

हात पुढें केले धराया तिला तिनें अपुलें,
तिच्या शिरावरुनी तर्वी, ती गिरक्या घे उडुनी.
हांसत वरि करुनि हात; ती धरूं झटे फिरुनि
त्या चलनें वरती उडाली म्हातारी परती;
खिदळत तें बघतां उडा या पाहीं मम दुहिता;
दडपण संसृतिचे निघालें मम चित्तावरचें;
मन्मनही लागे तरंगूं म्हातारी संगे;
वारा तों तिजला लागला दूरच न्यायाला
चुंबुनि वत्सेला
वदें मी मग म्हातारीलाः—

*　　*　　*

" थांब, थांब ? जाशी अशी कां ? फिर येगे मजशीं;
वयास्कता माझी म्हणुनि जर करिसी इतराजी
तर माझी सोनी पाहुनी, येगे परतोनी
तुजला पाहूं दे तियेला, खिदळत राहूं दे!
मज वय विसरूं दे, मुग्ध—मधु बाल्यीं उतरूं दे!
ते दिन पुष्पांचे, कोवळ्या किरणीं खेळाचे!
हे दिन—हाय!—
हे दिन चिंतेचे परंतु लटिकें हसण्याचे!
हे दिन जाऊं दे!
मला तुज गाणें गाऊं दे!

*　　*　　*

म्हणती म्हातारी तुज, कधीं होतिस तरुणपरी
तव जनिं मृति न दिसे, अजामर रूप तुझें भासे
कोठुनि तूं येशी न वदवे, कोठें तूं जाशी;

स्वैरपणें भ्रमसी;
यदृच्छा मूर्तच्च तूं गमसी!

* * *

येशी तूं का गे यक्षिणी कुंजातुनि? सांगे,
कैशा वागुनियां मिळविती अक्षय यौवन त्या;
झिजवित नित्य जिणें तयांला पडतें कां मरणें
वद त्यांची रीती
घ्यावया आम्ही लागूं ती.

* * *

"वा गंधर्वाचें विमानच सूक्ष्मरूप साचें!
वद असशी का तूं तरंगत वातावरणांतून्?
सूक्ष्म देह धरुनी असति का तुजवरि ते बसुनी,
दिव्य असें गाणें गात ते असतिल सौख्यानें;
ते मज पाप्याला कशाचें ये ऐकायाला!
परि मम वत्सेतें गमे तें परिसाया मिळतें;
म्हणुनिच उल्हासें,
अशी ही वेडावुनि हांसे!

* * *

"आज्ञाता मधला मूर्त तूं गमसी ध्वनी मजला;
अर्थ तुझा कोण मला तो देइल सांगोन?
कळेल जर मज तो, तर जगीं भरला जो दिसतो
मी तो अंधार
लोपवूं झटेन साचार!

* * *

" खपुष्प तूं असशी काय गे ? सांगुनि दे मजसीं ?
तुझे रंग वास न कळती मर्त्य मानवास;
जर ते कळतील तर इथें स्वर्गच होईल;
मग तुज धरण्यातें
मुलांपरि मोठे झटतिल ते

*　　*　　*

" स्वरुप सत्य तुझें मुळींही तें मजला नुमजें.
तरी तुझ्या ठायीं वसतसे अद्भुत तें कांहीं.
प्रत्यक्षांतुनि तें परोक्षीं शीघ्र मला नेतें;
तेथें स्वच्छंदें विचरतां मोद मनीं कोंदे.
मग गणमात्रांतें
जोडणें केशवपुत्रातें."

## दोन बाजी

त्या शूरानें भगवा झेंडा हिंदुस्थानीं नाचविला,
निज राष्ट्राचें वैभव नेलें एकसारखें वढतीला;
जिकडे तिकडे समशेरीची कीर्ती अपुल्या गाजविली,
खूप शर्तिनें कदर आपली गनीमांस त्या लावियली;

आणि तुवांरे ?–त्वां नीचानें पाठ आपुली दावुनियां;
रणांतुनी पोबारा केला, शेपुट भ्याडा वळवुनियां !
गुणी जनांची पारख करुनि त्या धीरानें गौरविलें,
उत्साहाच्या वातें आपुल्या तेज तयांचें चेतविलें.

प्रतापदीपज्योति पोषिली सुजनस्नेहा वाढवुनी
गनीम मशकें कितीक गेलीं तिच्यामध्यें खाक होवोनी.

आणिक तूं रे ? नाचलासी तूं नग्नच संगें अधमांचे !
धूळ खात गेलास लाविले सर्वत्र दिवे शेणाचे !

भटांस जे रणधुरंधर तयां पाचारुनी या सिंहानें
माराया कीं मरावया अरिवरि नेलें आवेशानें;
'हरहर !' शब्दा परिसुनि वळली कितिकांची घाबरगुंडी.
'आला मराठा !' म्हणत पळाल्या सैरा वैरा किति लंडी;

तूंहि भटांला पांचारियलें—
काय त्यांसवें परि केलें.

यथेच्छ लाडू मात्र झोडिले—नांव हायरे बुडवीलें.

घोड्यावरिचा हुरडा चोळित शत्रुशासना धांवोनी
तो गेला. तूं बिछान्यावरी राहिलास रे लोळोनी.
वीर भले खंबीर आणखी मुत्सद्दी ते सद्बुद्धी.
त्यांच्या साह्यें निज सत्तेची त्यानें केली रे वृद्धि.

पण तूं रे ?—तूं नगर भवान्या नाच्ये पोऱ्या घेवोनी
दौलतजादा केला—धिग् धिग् भटवंशीं रे जन्मोनी.
या भटवंशीं महाप्रतापी ख्यात जाहले असूनियां
तुळशीमध्यें भांग निघाली अभद्र ऐशी कोठुनियां ?

निजनामाचा 'गाजी' ऐसा अर्थ उरवुनी तो गेला
तर हळहळली आर्य माउली ऐकुनि त्याच्या निधनाला !
मरणा आधिंच मरण आणुनि काळोखी निजराष्ट्राला,
तूं मेलासी करून 'पाजी' अहह पितामह नामाला !

---

# काशीनाथ हरी मोडक

## माधवानुज

### [ जन्म सन १८७१—मृत्यु सन १९१७ ]

डॉ० काशीनाथ हरी मोडक यांचें 'मेघनादवध' हें महाकाव्य प्रसिद्ध असून स्फुट काव्यें विपुल आहेत.

## लाजरी

उद्यानीं फिरतां सुरेख दिसली कुंडीमधें लाजरी,
होतें शोभत तीवरी कितितरी ताजे हिमाचे कण,
गेले बाष्पजलें भरूनि गमले मातें तिचें लोचन !
प्रातःकाळ उजाडला म्हणुनि ती आनंद वृत्ती धरी.

गेलों मी जवळीं तिच्या झरझरां तों ती मनीं लाजली,
भीतीनें बहु कांपली जणु सती पापी नराच्या छलें,
हस्तानें इतुक्यांत मी निज तिचें वेगें वपु स्पर्शिलें,
झाली तत्तनु कोमला पुलकिता दृष्टी क्षणीं झांकली.

भारी वाइट वाटलें मज तिची पाहून ऐशी स्थिती,
झालें काय तरी कळे नच उभा मी ठाकलों विस्मयें,
तों झाला मजला मुळी न कळता कानांत माझ्या ध्वनी
दुष्टा पापमयी तुझी निशिदिनीं आहे जगीं या कृती !

वागावें जगतीं कसें तुज दिसें माहीत नाहीं नयें,
नाहीं योग्य तुला सतीस छळणें जी शुद्ध वागे जनीं!

## स्मशानगीत

या क्रूर माझिया हातीं, लोटितों तुझ्यावर माती,
दगडाची करुनी छाती—शिशुवरा !

ये चंद्र नभीं उदयातें, स्पर्शितसे तुझिया तनुतें
परि शक्त न उठवूं तूतें—प्रियकरा !

हा रम्य वाहतो वारा, बहु हलवी तव कचभारा,
परि उठवी तव न शरीरा—प्रियकरा !

मी येथ गातसे गाना, काढुनिया मेसुर ताना,
परि न शके घालूं प्राणा—प्रियकरा !

लय होतां चैतन्याचा, या चंद्र मरुद्गणांचा,
उपयोग न होई साचा,—प्रियकरा !

हे अश्रु टपाटप खालीं, गळतात शुष्क तव गालीं,
यांहीं तुज न्हाऊं घालीं—शिशुवरा !

जातों मी अपुल्याठाया, यम येइल तेव्हां न्याया,
येईन तुला भेटाया—प्रियकरा.

## प्रियेचे अश्रू

अश्रु हे किति तरी रमणीय, यांस पाहुन मना सुख होय
प्रीतिचा खवळला तव सिंधु, स्पष्ट दाविति सखे जलबिंदु.

प्रीति सत्य नसतां हृदयांत, कोठुनी जल निघे नयनांत,
प्रीतिअश्रु जननी मज वाटे, दाटतां जलमिषें उर फाटे.

अश्रु दुःख तव हे कथिताती, सुंदरी मजपरी सुख देती,
प्रीतिची उलट ही बघ रीती, भिन्नभाव हृदयीं उठवी ती.

अश्रूंनो ! स्थिर रहा नयनीं या, चालला त्वरित कां ढळुनीयां
कामिनीनयनकंजदलाची, संगति प्रिय तुम्हां नच कैची ?

दिव्य शक्ति तुमची समजें मी, टाकितां सहज भारुनि कामी,
कोणता प्रणयि जो नच कांचे, अश्रु चारु बघतां ललनेचे ?

प्रीतिमुग्ध असतो जन कामी, दूषितों म्हणवुनी न तया मी,
जे परी गतविकार महंत, तेहि पाहुनि तुम्हां द्रवतात.

अश्रुंनो! स्थिर रहा नयनीं या, चाललां त्वरित कां पळुनीयां,
हाय हाय! परि अश्रु गळाले, स्फूर्ति सर्व मम घेउनि गेले.

अश्रूंस या घन जरी करण्यास येतें,
मातें अहा! विपुल सौख्य सदैव होतें
गुंफूनि अश्रुमणिंचा मग रम्य हार,
कंठांत घालुनि तया करितों विहार.

## सांत्वन

प्रियकरे, रडशील किती तरी,
कर विवेक जरा हृदयांतरीं,

प्रिय जरी तुज बालक तें अती, रडुनि कां परते वद संप्रती?
उगवतां गगनीं नव चंद्रिका, मुदित हो मन पाहुनि ती न कां

क्षणभरें मग जाय लयाप्रती, रडुनि काय पुन्हां परतेल ती
चमकतां चपला बहु चंचला, कवण हर्षभरें न वधे तिला?

झडकरी परि जाय लया द्युति, रडुनि काय पुन्हां परतेल ती?
सुचविते कवितें नव कल्पना, विपुल होय तदा सुख तन्मना,

क्षणभरें न उरे जरि तत्स्मृती, रडुनि काय पुन्हां परतेल ती?
उमलता कलिका लतिकेवरी, मधुर रूप तिचें नयना हरी,

विकसुनी सुकली जर मागुती, रडुनि काय पुन्हां फुलणार ती?
बहुत सुंदर जें असतें तया, स्थिरपणा असणार कुठूनिया?

नच करी स्थिर सुंदर संगती, रडुनि काय बरें घडणार ती?
असुनि सुंदर अल्प बरें जिणें, नच कुरूपपणें बहु वांचणें,

समजतों तुज भाग्यवती सती, प्रसवतीस अशी रुचिराकृती

मृदु मना जरी होय तव क्षती, करुनि शोक कशी भरणार ती?
प्रभु भिषग्वर गे सखये सुधी, स्तव तया तुज देइल औषधी.

## काल, कीर्ति व विस्मृति

मार्ते भव्य अशी इमारत पुढें विच्छिन्न झाली दिसे,
कोणाच्या करण्या चिरंतन यशा ही बांधियेली असे?
काला प्रश्न विचारला, मज परी देतां न तो उत्तरा,
गेला पंख उभारुनी उडुनिया व्योमीं करोनी त्वरा!

व्हावें स्मारक हें म्हणोनि कवणें प्रासाद हा बांधिला?
केला प्रश्न असा फिरोनी, बघुनी मार्गीं उभी कीर्तिला;
माझा प्रश्न तिनें जसा परिसला, दुःखीं बुडाली सती,
वेगें निश्वसुनी बघे निजमनीं लाजूनि ती खालतीं!

गेलों चालत मी तसाच पुढती तों देखिली विस्मृती,
प्रासादावर एकली विहरतां स्वच्छंद गर्वें अती;
केला प्रश्न तिला न जों, मज करी ती सत्वरी उत्तरा;
पूर्वीं बांधियला कुणास्तव असो—हा आज माझा खरा.

## संगम

सखे गे, सुरेख संगम किती! कृष्णा मिळाली कोयनप्रती.
किति विशाल तट हे अहा! प्रिय सखे उभी तूं रहा
क्षण येथिल शोभा पहा, सखे०

बहु चकाकते यावरी, ही सुरेख सिकता, परी
जाय गळून धरितां करीं. सखे०

जगीं असे सुखाचे क्षण, नर झटे धराया, पण
जाति तयास ते फसवून. सखे०

बघ दोघींची मैत्री किती, एकमेकींस आलिंगिती,
दोन असूनि एकचि होती. सखे०

जर अशींच आपुलीं मनें एक होतिल गे प्रीतिनें,
मग सुखास कुठुनी उणें ? सखे०

स्थल पवित्र हें गे जनीं, जन बघेल जो लोचनीं
अघ हरेल त्याचें क्षणीं. सखे०

---

# विनायक जनार्दन करंदीकर

## विनायक

[ जन्म सन १८७२—मृत्यु सन १९०९ ]

यांच्या समग्र कविता श्री॰ अनंततनय यांनीं एका स्वतंत्र पुस्तकांत संपादिल्या आहेत. वीरमती नांवाचें एक नाटक यांच्या नाट्यकीर्तीची साक्ष पटवितें.

## जोहार

विलासिनी रमणीसह सुमनाच्या शय्येवर पहुडला !

हृदयाशीं हृदय मिळें ! अधराशीं अधर जुळें
करपाशीं कंठ ढिले—भिन्नभाव लोपला.

स्वप्नसुखीं चित्त दंग ! खैर करी रंग रंग
सर्वपरीं होय भंग—दूर वीर जाहला.

घेउन तलवार बळी गेला शेजेजवळी
प्रेमाची ती पुतळी—भंगाया सज्जला.

बघतां ती मूर्ति परी धडकी भरली तदुरीं
धैर्य गळें; कंप भरीं—खड्ग पडे भूतला.

एक चित्त जाय रणीं एक न सोडी रमणीं
एका प्रिय कीर्ति जनीं—एका स्त्री प्रेमला.

एकच घेईन मुका केला निर्धार निका
दहशत घेऊन मुका—तो मुकाच राहिला.

आंवरून मोह धरी घेई खड्गास करीं
जागृत ललनेस करी—भाव तिला समजला.

धैर्य देवता नवरी उठे, मनीं भय न धरी.
पतिपुढें मान करी–सिद्ध उभी मृत्युला.
खड्गाया हात फिरे पडला मृत देह धरे
पतिवधित स्त्रीरुधिरें–भूमि भाग रंगला.
सौख्यशांति समाधान विषय विलासस्थान
होय तें क्षणीं स्मशान–अंधकार पसरला
प्रेमाच्या हेतुविणें शून्य दिशा शून्य मनें
भारभूत होय जिणें–मृत्यू प्रिय एकला.
मरणाला जो तयार तोच अरी करिल ठार
रणदेवी विजयहार–घाली त्याच्या गळां.
यास्तव रजपूत कुळीं देती स्त्रीतनय बळीं
धन्य तेच भूमितळीं—पाश जयीं तोडिला.

## महाराष्ट्र लक्ष्मी

महाराष्ट्र लक्ष्मी मातें जगीं धन्य वाटे,
यशोगीत तीचें गातां मनीं हर्ष दाटे

पुनः पुन्हा परचक्रानें ताडिली बिचारी,
दीर्घकाल खचली होती पारतंत्र्यभारीं,
द्वादशाब्द दुष्कळानें जाहली भिकारी,
संकटांत तीच म्हणोनी करी उंच माथे.

मावळांत वास न ठावें जया बाह्य वारें,
नेमधर्म ज्यांचें लोकीं कृषीकर्म सारें,
विळा कोयतीच जयांची काय तीं हत्यारें.
तें वीर बनले समयीं मावळे मराठे.

क्रमांक ३८५

नये नीट धरितां ज्याला लेखणी करांनीं,
कृपादृष्टि संपत्तीची न ज्याचे ठिकाणीं,
परी यवनसत्तेची जो करी धूळधाणी
कोण तया शिवरायाच्या पावला यशातें ?
साधुसंत झाले, असतीं, तयांची न वाण,
मात्र रामदासा लाधे समर्थाभिधान,
जो मनीं स्वदेश हिताचें धरोनी निशाण,
ध्वजा कौपिनाची मिरवी भारतांत थाटें.
कढी भात खाऊं म्हणती ब्राह्मणा जगांत,
ढिली कांस ज्यांची म्हणुनी हांसती, हंसोत,
तयांनींच करणीं केली प्रसंगीं अचाट,
खोल गढे परसत्ता ती ढासळली लाथें.
पूर्व दिव्य ज्यांचें, त्यांना रम्य भाविकाळ,
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ,
कासया वहावी चिंता मनीं मग जहाल,
रात्र सरे तेव्हां उगवे दिनही पूर्व वाटें.

## हतभागिनी

सळहातीं टेकुनी ही स्वशिरातें बैसली !
मस्तकीं केश विखुरले,
श्वास चालले, अश्रु लोटले,
गळे जल गालीं—चिंतेनें पोळली !
वस्त्रें तीं अपुरीं जुनीं,
तेथ कोठुनी, असावा मणीं,
दीनता ल्याली—दुःखानें कावली !

दारिद्र, घरीं जागतें,
अन्न कायतें, दिसेना कुठें,
वायुजलवाली—गगनाची सांडली.

होती ती सिंहासनीं,
भाग्य शालिनी, धनी विजयिनी,
परी तिज खालीं—दुर्दैवें ओढिली.

एकाश्रुबिंदु कारणें,
तियेच्या रणें, झुंजलीं मनें,
असे सुत व्याली—जयकालीं माउली.

कारटीं करंटीं तिथें,
निपजलीं भुतें ! मातृशोणितें—
स्वतांला लाली—आणाया धांवलीं !

कल्याण काय नेणतीं,
नित्य भांडतीं, आपसांत तीं,
परां वश झालीं—सत्त्वाला विसरलीं !

गेले दिन यावे कसे,
वर्तनें असे. एकदा फसे—
गाय जी गाळीं, चेंगत ती चालली.

## प्रीति निमाली तर—

नादें मंजुल आपल्या रिझवितें जी मन्मना नेहमीं
ती एका निमिषांत रम्य मुरली भंगून टाकीन मी !
अंगातें जडवून पंख उसने जाईन कीं सत्वर—
मी येथून उडून उंच गगनीं प्रीती निमाली तर !

माझी कोण करील उत्सुक मनें मार्गप्रतीक्षा घरीं ?
प्रेमें बालक कोण सुंदर वदा देईल माझ्या करीं ?
आतां भासतसें मला भवन जें सर्वस्व चेतोहर—
त्या येईल खरोखरीच वनता प्रीती निमाली तर !

अस्ता जाईल सूर्यतेज वितरी विश्वास जें जीवन,
तेणें व्याप्त समस्त होइल जगत् दुःखांधकारें घन;
सौख्याचा लवलेशही न मनुजा लाभेल ही दुर्धर,
भीतीनें मरतील मानवकुलें, प्रीती निमाली तर !

## यापुढें

कोठचा शिवाजी राजा
निजधर्मांचा अभिमानी—यापुढें !
कोण देशकार्यासाठीं
सोडील स्वहितीं पाणी—यापुढें !
कोठची रामदासाची
बोधाची मधुरा वाणी—यापुढें !
मावळे, जयांनीं दिले, आपले गळे, देशनिर्वाणीं,
नांवही न त्यांचें कानीं—यापुढें !

निपजणार कोण धनाजी
तारण्या मराठेशाही—यापुढें !
रडवील कोण रणरंगीं,
यवनाना भायी भायी—यापुढें !
भासून रूप कोणाचें
दचकतील ठायीं ठायीं—यापुढें !
राखिलें, राज्य आपलें, असें व्यापिलें जया यवनांहीं—
कोण असा प्रसवे आई—यापुढें !

फांकडा शिपाई बाजी
दापील निजामा कोण—यापुढें !
वारील छत्रसालाचें
सांकडें वीरवर कोण—यापुढें !
घालील महाराष्ट्राला
निरभिलाष आळा कोण—यापुढें !
जें शिवें, स्थापिलें नवें, राज्य त्या जवें, वाढवी बाजी
सर करील त्याची कोण—यापुढें !

अटकेवर झेंडे न्याया
आणितां कुठून भरारी—यापुढें !
थिजलीच, न चालेल पुन्हां
भाऊंची शौर्य—भरारी—यापुढें !
फडणवीस नाना गेले.
त्यांची न दिसेल हुषारी—यापुढें !
जी खनी, प्रसवली मणी, यापरि जनी, बहुगुणी भारी
झाली ती हाय भिकारी—यापुढें.

ऐश्वर्य लयाला गेलें.
जडलें दारिद्र्य कपाळीं—यापुढें !
हास्याचे दिन मावळले
आंसवें लोचनीं आलीं—यापुढें !
मित्र सर्व वैरी झाले
संकटीं न उरला वाली—यापुढें !
यापरी, नाडलों तरी, लोचनांतरी, नीज जी भरली—
ती निघेल कवण्याकाळीं—यापुढें.

विनायक जनार्दन करंदीकर

# देशभक्ताचा अपूर्व सोहाळा

देशभक्ता प्रासाद बंदिशाला
शृंखलांच्या गुंफिल्या त्यास माळा
चिता सिंहासन शूल राजदंड
मृत्यु दैवत दे अमरता उदंड.

---

# दत्तात्रेय कोंडो घाटे

[ जन्म सन १८७५—मृत्यु सन १८९९ ]

दत्तांची समग्र कविता रा० विठ्ठल दत्तात्रेय घाटे यांनीं प्रसिद्ध केली आहे. विद्यमान कवि चंद्रशेखर यांच्याशीं दत्तांचा अकृत्रिम स्नेह होता.

## विश्वामित्रीच्या कांठीं—

बघुनी मन धालें । साफल्य दृष्टिचें झालें

पाउस बर्फाचा जणुं पडतो । रजताचा जणुं मेघ वितळतो
किंवा चंद्रकांत पाझरतो । जणूं शितांगीं, प्रिय मला आलिंगी

शीतल चंदनरसांत पडलों । अथवा अमृतडोहीं बुडलों
किंवा सुखस्वप्नीं सांपडलों । न कळे कांहीं जिव वेडावुनी हा जाई

शांतिदेवतानिकारिणी । वसतें जणुं या मंगलस्थानीं
सांगे मजला या उद्यानीं । चंचल बाला, बघ इथें जगन्नाथाला

सृष्टिसुंदरी नटली थटली । सूक्ष्म धवल [illegible]
खुलली जणुं सुमवेली फुलली । रम्यही शोभा, हिजपुढें काय ती रंभा

शांत तटिनि जणुं पथ स्फटिकांचा । जाति पुष्पपथ वनदेवीचा
किंवा ओघ सजिव रजताचा । कीं रत्नाची, मेखलाच उद्यानाची

विश्वामित्री जलिं या कालीं । तट वनभूमी बिंबित झाली.
वरतीं तैसें दिसतें खालीं । अद्भुत झालें, पाताळ आजीं पाहिलें

तारागणही स्पष्ट बिंबलें । स्नाना जणूं हे मुनी अवतरले.
तेजोनिधि कीं ऋषी बैसले । ध्यान धरोनि, जलसमाधिस्त होवोनि

शशिरायाही आंत उतरला । कलहंसापरि पोहुं लागला.
तटिनीनें जणुं हृदयीं धरिला । प्रेमलकांत, पाहुनि येथ एकांत
जेथें असली श्रेष्ठमंडळी । तिथेंच गरिबा जागा दिधली
शंका सखये परि उद्भवली । खरी ममकाया, उदकांमधिं वा भूवरि या
वरती खालीं दिसतें गगन । मध्यें लंबित अपुलें भवन
वातावरणीं आधाराविण । गोजिरवाणी, फेंकिला चेंडू हा कोणीं ?
वरतीं खालीं ही शशिकांती । द्विगुणित शोभा द्विगुणित शांति
द्विगुणित आनंदाची भरती । दृष्टि वावरली, वर पाहूं किंवा खालीं
स्मरण शक्तिके जागृत होईं । दर्शन दुर्लभ शोभा पाही
विसरु नको बघ यांतिल कांहीं । वारंवार, कोठुनी असें दिसणार ?

## निज नीज माझ्या बाळा !

बा नीज गडे नीज गडे लडिवाळा
निज नीज माझ्या बाळा
रवि गेला रे सोडुनि आकाशाला
धन जैसें दुर्भाग्याला
अंधार वसे चोहिंकडे गगनांत
गरिबाच्या जेंवि मनांत
बघ थकुनि कसा निजला हा इहलोक
मम आशा जेंवि अनेक
खडबड हे उंदिर करिती
तृण शोधायातें फिरती
परि अंतीं निराश होती
लवकरि हेही सोडितील सदनाला
गणगोत जसे अपणाला !

बहु दिवसांच्या जुन्या कुडाच्या भिंती
कुजुनी त्या भोंकें पडती
त्यांमधुनी त्या दाखविती जगताला
दारिद्र्य आपुलें बाळा.
हें कळकीचें जीर्ण मोडकेदार
करकरकर वाजे फार
हें दुःखानें कण्हुनि कथी लोकाला
दारिद्र्य आपुलें बाळा
वाहतो फटींतुनि वारा
मुकवीतो अश्रूधारा
तुज नीज म्हणे सुकुमारा
हा सूर धरी माझ्या या गीताला
निज नीज माझ्या बाळा.

जों वरती हें जीर्ण झोंपडें अपुलें
दैवानें नाहीं पडलें
तोंवरती तूं झोंप घेत जा बाळा
काळजी पुढें देवाला
जोंवरती या कुडींत राहिल प्राण
तोंवरि तुज संगोपीन
तदनंतरची करूं नको तूं चिंता
नारायण तुजला त्राता.
दारिद्र्या चोरिल कोण ?
आकाशा फाडिल कोण
दिग्वसना फाडिल कोण
त्रैलोक्यपती आतां त्राता तुजला
निज नीज माझ्या बाळा.

तुज जन्म दिला सार्थक नाहीं केलें
 तुज कांहिं न मी ठेवीलें.
तुज कोणि नसे, छाया तुज आकाश
 धन दारिद्र्याची रास
या दाहि दिशा वस्त्र तुला सुकुमारा
 गृह निर्जन रानीं थारा
तुज ज्ञान नसे अज्ञानाविण कांहीं
 भिक्षेविण धंदा नाहीं
  तरि सोडूं नकोस त्याला
  धन अक्षय तेंच जिवाला
  भावें भज दीन दयाळा
मग रक्षिल तो करुणासागर तुजला
 निज नीज माझ्या बाळा.

---

# कृष्णाजी पांडुरंग लिमये

## राधारमण

[ जन्म सन १८७७—मृत्यू सन १९२२ ]

'मोरोपंतांचा प्रभुद्रोह', 'आर्यभूमाता दुःखोद्गार' व 'कालचक्र' हीं खंडकाव्यें असून 'नाना फडणीस' व 'गजासुरवध' हीं महाकाव्यें प्रसिद्ध आहेत. पुण्याचे रा० किनरे व राधारमण यांनीं 'काव्यदोहन' प्रकाशित केलें.

## पानपतचें युद्ध

वाग्देवते ऊठ न अश्रु गाळीं, आलें चुके हें न तुझ्या कपाळीं
लाखों बळीं जो तव पूर्वजांचे संग्राम घे तो वद सार वाचे.

प्रचंड झाला रणवाद्यघोष, हाले धरित्री घुमला खकोष !
वीरांगसुता आणि शौर्यदेवी ऐकूनि त्यातें प्रतिबोध सेवी.

रांगा रणा उद्यत सैनिकांच्या लाटाच कीं विक्रमसागराच्या,
सिंह ध्वनीनें करुनी सलामी, आरंभिती तुंबळ युद्ध नामी.

जशी झरारा झड पावसाची, तशीच शस्त्रास्त्रसमुच्चयाची,
रणांगणा वृष्टि अखंड हाणी ! सुटे परी मृत्युमुखासि पाणी.

जीं कंठनाळां व्यतिरिक्त झालीं, घर्में नव्हे वीररसेंचि न्हालीं.
असंख्य त्या वीरशिरोऽबुजांनीं वाटे जयश्री पुजिली तयांनीं !

सर्वत्र वाहे समरांगणांत, खळा खळा लाल दिसे नितांत
पाहोनि तो रक्तरसातिरेक, वाटे तिचा होत महाभिषेक !

संग्राम ऐसा घनघोर चाले, कोणी न कोणां लव हार आले
आर्यांकडे ना यवनाकडे ना, कोठें जयाचा कल तें कळेना.

मराठियांनीं बहु शर्थ केली, ती पाहण्या वृत्ति गमे भुकेली,
म्हणूनि वाटे स्थिर सूर्य राहे ख-मध्यभागीं रणचित्र पाहे!

संतोषली पाहुनि युद्धरीती, माला जयश्री करिं घेउनी ती
आर्योसि आली वरण्यास रागें, हा ! हा ! कशी ती परि जाय मागें

देखे रणीं भारत-वीर-पत्नी, माझ्या पुढें होतिल या सपत्नी
या कारणें कीं खवळोनि रागें, जाई जयश्री परतोनि मागें ?

साम्यासि ज्याच्या अभिमन्यु साजे, विश्वास जो बाळ रणीं विराजे
तो पाठिराखा मृत लाभतांच, गेली त्वरें ती निघुनीच साच!

युद्धार्थ लक्षावधि सैन्य आलें, भूयिष्ठ त्यांतील अहा! निघालें
सदाशिवाच्या निधड्या मनास, शिवे न चिंता अणुमात्र खास!

कृतांत घे ऐकुनि जीस धाक, क्रोधें अशी फोडुनि दीर्घ हाक,
निर्वाणिचें युद्ध करावयाला, तो सूर्यपुत्रासम सिद्ध झाला!

दावी प्रतापी भट तो अपूर्व, रणीं चमत्कार अभूतपूर्व !
शत्रूंसही कौतुक पाहुनी तें वाटे, मुखीं घालिति अंगुलीतें

क्षण क्षण क्षीण सहाय भार, तो शोच्य पूज्य स्पृहणीय फार !
दिसे रणीं संनिहितास्त काळ, रवी जसा क्षीणमयूखजाल !

कुडींतुनी जीव जसा निघावा, गेला कसा कोठ न तो कळावा,
तसा त्यजोनी स्वचमूशरीर, तो जाहला क्षिप्र अदृश्य वीर !

उच्छेद हा निस्तुल युद्धकालीं, माझ्या असे कां लिहिला कपाळीं
विचारण्या हें चतुराननास, सदेह गेला जणु तद्‌गृहास !

सदाशिवाला अशिवागमाचा, होतां असा स्पर्श अगम्य साचा !
जी हीन दीन स्थिति तद्दलास आली, व ती गोचर वाग्बलास !

---

# श्रीपाद नारायण मुजुमदार

[ जन्म सन १८७७—मृत्यु सन १९०९ ]

यांची 'शिवछत्रपति' व 'श्रीसुभद्रा' हीं महाकाव्यें प्रसिद्ध आहेत. शिवाय प्रियोपलब्धी, कपटविपाटक, हंसदूत वगैरे यांच्या कविता प्रसिद्ध आहेत.

## बालविधवा

रवें करुण हंबरें सुरभि पंकमग्ना जशी
विलाप करिते सदा विगतभर्तृका ती तशी
अनन्यगतिका तिला जगिं कुणी न वाली खरा
तिला गमतसे जणों नरकवास हा दूसरा

जरी गमन ती करी नृपपंथांतुनी एकली
तरी हसति दाउनी खल तिच्याकडे अंगुली
अवाच्य वचनें तिला वदुनि पीडिती दुर्मती
कवींसहि न वर्णवे सकरुणा तिची ती स्थिति

समूर्तच पुढें उभी विरहयातना ती खरी
म्हणून हतभागिनी दिसतसे सदा बावरी
स्वदेह अवमानिते तृणसमान ती अंतरीं
कसें अशनपान तें मग सुचेल चित्तीं तरी ?

तिला अशुभकारिणी गणुनि जाइ निद्रा दुरी
सचिंत हृदया निशा सकल घालवी जागरीं
रडे, शयनिं ती सदा तळमळे, अभागी खरी
गमे तिज भयावहा रजनि कालरात्री परी

छळी वदुनियां तिचा वच कठोर सासू वळें
न शब्द कधिंही तिला किमपिही सुखाचा मिळे
तनू झिजविते सदा लव कदन्न सेवून ते
अभागि गृहकर्मि ती पशुपरी सदा राबते

परी परगृहा करी गमन काल काढावया
कठोर वचनें तिला वदति मैत्रिणी निर्दया—
"कपाळकरटी अम्हां वदन दावि ही कासया!"
गिळून पतितें मुखा कशि न लाज दावावया?

अशी चहुंकडे तिची बहु विटंबना होतसे
जगीं सतत सोशिते छळ तयास सीमा नसे.
जिवंतपणिं हा तिला भयद मृत्यु वाटे खरा
'विमुक्त करिं सत्वरीं!' म्हणुनि प्रार्थिते ईश्वरा.

जरी परम दुःसहा मरण-यातना—ती खरी
तरी गमत याहुनी लघुतमा तिला अंतरीं!
जरी मरण दुःख देइ- तरि देतसे एकदां
जिवंत परि मृत्यु हा तनुस जाळितो सर्वदा!

अपार छळ सोशिती विगतभर्तृका जो असा
विदीर्ण नच होतसें हृदय पाहुनी तो कसा?
तटस्थ बसुनी जरी बुध समस्त तो पाहती
तयां असुख—सागरा मग निराश्रया ही क्षिती!

तरी बुधजनांस ही विनति अल्प माझी असे
तटस्थ बसणें असें उचित आपणांतें नसे.
विमुक्त अबला करा निबिड दुःखपंकांतुनी
न कीं उचित मार्ग हा सुकृतिचा? विचारा मनीं

'उपाय नच सूचती !' उचित हें नसे आपणां !
न व्हा सुजन हो असे विमुखवृत्ति सत्कारणा
करा झटुनि सर्व जें उचित आपणांते दिसें
तुम्हांविण तयां जगीं इतर कोण वाली असे ?

अहा अनय काय हा ?–पति जरी मरे यौवनीं
तनू झिजविणें तिनें नियमनव्रतोपोषणीं
सुखासुख विमानुनी, नियमुनी मनोवासना
सदा अहह ! सोसणें परमघोर ही यातना !

कदन्नकण सेवुनी, त्यजुनि सर्वहो मंडना
अहा ! करित राहवें अनुदिनीं वपुर्दंडना
कषाय वसना,–जणों जगिं खरीच संन्यासिनी
सदाहि वसणें तिनें असिसमव्रतोपासनीं

पुरें न पतिचें जिनें मुखहि देखिलें एकदां
जरी तिजवरी महा भयद येइ ही आपदा
विमानुनि सुखाऽसुखां नरकयातना ही पहा
तिनें सतत सोसणें ! अहह ! काय अन्याय हा !

स्त्रियांस पुरुषापरी नसति का मनोवासना
न का असुखकल्पना ? विविध त्यापरी कामना
जगीं जनन घेति का असुख मात्र भोगावया
पशूहुनिहि नीच का असति दुर्भगा या स्त्रिया ?

कशी ऋषिजनीं अशी असम नीति ही बोधिली
कशी नयपरायणा अतुलवृष्टि ती लोपली
कशी सदयता तरी सकल जाहली नष्ट ती
कशी नयपराङ्मुखा विहित वाटली ही कृती.

विमुक्त करणें तयां निबिड दुःखपंकांतुनी
अवश्य दिसतें जरी सकल सुज्ञ लोकां मनीं
उपाय गमतों बरा विगतभर्तृकोद्वाह हा
विचार करुनी मनीं उचित होय तो का पहा

असे विफल सुज्ञ हो, गतधवाशिरोमंडन!
करील तरि तें कसें विषयवासनाखंडन?
सुनीतिपथसेवनीं उपजवील कां तें रती
उगाच विधवाजना छल करावया ही कृती.

---

# विष्णु बाबाजी कुलकर्णी, कल्लोळकर

[ जन्म सन १८७७—मृत्यु सन १९२३ ]

रावसाहेब वि. बा. कुलकर्णी, यांच्या स्फुट कविता अजून पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्या नाहींत. मासिकें व अर्वाचीन काव्यसंग्रह यांतून त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

## स्वर्गीं भेट घडेल !

जन्मा येउनि अर्ध मासहि तुला कन्ये ! न झाला पुरा,
तो संसार पुरा करून अपुला गेलीस लोकांतरा !;
वार्ता ही श्रवणान्तरीं मम शिरे संतप्त तैलापरी,
शोकव्याकुल जाहलों; उसळल्या खेदोर्मि हृत्–सागरीं

'गेल्याचा करणें न शोक' वदती ज्ञाते अशीं भाषणें;
येतां तोच पण प्रसंग रडती तेही मृतां–कारणें !
मायामोह निगूढ मूढ बनवी देवाधिदेवेश्वरा;
माझी काय कथा ? वृथा स्तुति नको वेडा बने मी पुरा !

केली कां इतुकी त्वरा ? उठति या नाना मनीं कल्पना
'कीं संसार असार' खूण पडली अल्पावकाशीं मना ?
मायाजाल करील बद्ध पुढतीं ही भीति येतां मनीं
कीं मुक्त्यर्थ उपासिला द्रुत तुवां प्रेमें जगाचा धनी !

'कन्या एक असे; दुजी उपजली ! कोणास होती हवी ?
माता या कटु भाषणीं तुजसि कीं निष्प्रेमता दाखवी !
आला कोप म्हणून ? जन्म दिधला कां या स्थलीं तूं मला ?
हें धात्यास पुसावयास्तव तुवां स्वर्लोक कीं गांठिला ?

निर्मी मूर्ति बहु श्रमें पण न ती चित्तास वाटे बरी,
तेव्हां मोडुनि मूर्तिकार तिजला तो टाकितो ! त्या परी;

होती ज्या परिं कल्पना न बनली त्वन्मूर्ति तैसी श्रमें,
वाटे लाज; म्हणून शीघ्र तुजला नेई विधाता गमे !

आनंदें नवमास भार तव जी वाहून गे ! स्वोदरीं
देई जन्म तुला; तुला नच जिच्या प्रेमा त्रिलोकान्तरीं;
गे नानापरि कष्ट सोसुनि जिनें केलें तुझें रक्षण
जावें लोटुनि दुःखसागरिं तिला हें काय सल्लक्षण ?

झाली गोष्ट जुनी; उपाय नुरला सारें खरें हें कळे
बाळे ! शल्य परंतु हें निशिदिनीं माझ्या मनीं या सले;
केली मूर्ति तुझी अदृश्य अदयें कालें; तयाला पण
नष्टप्राय करावया स्मृति तुझी यणार नाहीं क्षण !

रम्या मूर्ति न एकवारहि तुझी म्यां देखिली लोचनीं
कर्णीं आयकिला तसा न तनये ! त्वन्मुग्ध मंजुध्वनी;
प्रेमें त्वन्मुख चुंबिलें न तनये ! ऐशा अभागी जनां
बाळे ! 'तात' म्हणावयास तुझिया वाटेल लज्जा मना !

कन्ये दोष परंतु यांत लवही माझा न झाला खरें
हा ! हा ! योग असा घडू नच दिला त्या पूज्य विश्वंभरें
झालें दग्ध तुझ्या अखंड विरह-ज्वालानलें यन्मन
पाहे हा तव तात येथ करितो शोकाश्रुसंतर्पण !

'प्रेमाचें जगतांत तात जननी' बोलास या बोलती
तूंतें प्रत्यय हाय ! पूर्ण उलटा आला खरें संप्रति
नेलें ओढुनि अंतकें तुज बळें, तैं सोडवाया त्वरें
कोणीही नच पातलों ! सकलही गे दूर झालों खरें !

केली ही क्षण भंगुरा नर-तनू विश्वाचिया नायकें
मृत्यूतें चुकवावयास जगिं या प्राणी न कोणी शके
तूं गेलीस तसाच काल भरतां येईन मी जेधवां
स्वर्गी भेट घडेल शाश्वत तुझी कन्ये ! मला तेधवां !

# दिनकर नानाजी शिंदे

## इंदुकांत

[ जन्म सन १८८२—मृत्यू सन १९१४ ]

यांच्या कविता अजून अप्रकाशित आहेत. विच्छिन्नबुकुल, वल्लभवांछित वगैरे कविता काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झाल्या आहेत.

## प्रदोष तारा

[ प्रणय तारका ! गगनललामा ! विरहाकुल जनसुखैकधामा ! मंदपवन-युत मनोज्ञकालीं, प्रदोषिं पाटल विपति विशालीं राजसि रुचिर प्रकाशशाली करिसी प्रमदा प्रदीप्तकामा ]

सागर तरंग तुषार शीतल, वीजित करि जो तुज मंदानिल,
यशोगीत तव विहंगमंजुल गाती सहर्ष, मंगलनामा.

आनंदप्रद तुझ्या दर्शनीं, करिती सुहास्य सुमनें भुवनीं
मधुर तयाचा सुगंध भरुनी, टाकी अवनिसि तैसें व्योमा.

एकलि भुविं तीं दिव्यसंनिभा ! अस्तमान दिनकरसखया ! वा !
तारामंडलिं तव अतुला भा, वितरी प्रमोद–शांति–प्रेमा

विजयध्वज तूं गमसी मजला, नभिं उत्तुंगीं स्वयें रोंविला,
मदनें जिंकुनि चराचराला, दावाया निज विश्वा महिमा !

वस्तुजात हें निखिलहि लोकीं, मग्न होतसे प्रणयविपाकीं
प्रसन्नवदना तुज रजनीमुखि, निरखुनि अंतरिं, हृदयविरामा !

मनप्रदतिनिधि वैभवशाली ! अभ्युदयीं तव सुयोगकालीं,
प्रियाऽलिंगनीं मरीचिमाली होई सोत्सुक तशी त्रियामा.

दिनमणि रमणी संध्या स्वैरिणि राग रंजिता पतिप्रयाणीं,
करी विलासा तुजसह गगनीं जैसी परनरानिरता रामा.

उपवनिं मंडितसुमतरुपुंजीं, मुखरितमिलिंदमंजुल गुंजीं,
कुसुम सुगंधित निभृत निकुंजीं, सकांत करितो विलास रामा !

मंगलताराकवरावंतसा ! विलोकुनी तुज विकसित भासा
दिवस वियोजित दयितनिवासा येती उत्कंठित विश्रामा !

प्रणयीजन मधुसंगम घटका ! मनोविकारां पातकात्मका,
नेउनि विलया तीव्रहि दुःखा आनंदविसी अंतर्यामा.

प्रणयवती मम दयिता ललना निकटिं असे जें सुहास्यवदना.
दीर्घकाल करिं नभीं विलसना विनती तुज ही सहप्रणामा !

---

# राम गणेश गडकरी

## गोविंदाग्रज

[ जन्म सन १८८५—मृत्यु सन १९१९ ]

यांच्या सर्व कविता 'वाग्वैजयंति' या नांवाच्या ग्रंथांत ग्रंथित आहेत. प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन, राजसंन्यास व वेड्यांचा बाजार, हीं नाटकें महाराष्ट्र रंगभूमीवर येऊन नाट्यसृष्टींत त्यांनीं क्रान्ति केली आहे यांत मतभेद नाहीं. 'रिकामपणची कामगिरी' हें पुस्तक यांच्या विनोदी लेखांचें आहे. बिनजोडाक्षराची लहान मुलांकरितां एक 'इसापनीति' त्यांनीं लिहिलेली प्रसिद्ध आहे.

## मुरली

ही एक आस मनिं उरलि—कन्हय्या बजाव बजाव मुरली ॥

जरि फुटले दोन्ही कान । नच राही भूक तहान ॥
तिळभरही नुरलें भान
बघ वृत्ति वृत्तिंमधिं मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

कां गाणें मजला व्हावें । चित्तासही नाहीं ठावें ॥
दृष्टीला कैंवि दिसावें ॥
मम आस नसे परि पुरलि । कन्हय्या बजाव० ॥

मी अगदीं भोळी राधा । तूं माधवजी ! नच साधा ॥
मोहिनी करी सुखबाधा ॥
तुज दासी विनवुनि झुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

चांदणें चहुंकडे खुललें । पत्तरही सारे फुललें ॥
आनंदें विश्वहि झुललें ॥
स्फूर्तीच त्यांत तव शिरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

तीनेंच शब्द मम निघती । जग फिरुनि, फिरुनि मनिं रिघती ॥
मज आतां दुसरी न गति ॥
जगतींच सारि जणुं जिरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

अणुरेणुहि देहीं स्वैर । भिन्नता विसरलि वैर ॥
अब नंदलाल ! कर खैर ॥
प्रेमाची दुनिया उरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

बुद्धीचा तुटला धीर । आशामय होय शरीर ॥
जलिं बुडे जलधिचें तीर ॥
बघ, बघतां दृष्टिहि विरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

कथुं काय काय मजवाटे । आनंद मात्र मनिं दाटे ॥
तरुशिरीं मूळ उफराटें ॥
शून्यांत परार्धें भरलिं । कन्हय्या ! बजाव० ॥

जन्माचें झालें चीज । कायमची मेली नीज ॥
विश्वाचें गवसें बीज ॥
चिद्वृत्ति त्यांत अवतरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

मायेची मेली बिजली । परि खऱ्या जलीं ती विझली ॥
तीव्रता तियेची थिजली ॥
सुकलेलीं विश्वें भिजलिं । कन्हय्या ! बजाव० ॥

कोसळति सरींवर सरी । लहरींवर उठती लहरी ॥
अश्रूंची गरदी भारी ॥
अवकाशें तुडुंब सगळिं । कन्हय्या ! बजाव० ॥

पुष्पाविण येई वास । वाऱ्याविण चाले श्वास ॥
हर्षाविण आतां हास ॥
मरणाविण सुटका झालि । कन्हय्या ! बजाव० ॥

ब्रह्मगोल त्वन्मय झाला । चहूंकडेच मुरलीवाला ॥
त्वद्रूप गोपिकाबाला ॥
मी मला शून्य या कालिं । कन्हय्या ! बजाव०॥

सांवळ्या यशोदाबाळा ! । बंधाला पडला आळा ॥
स्वैराचा वाढे चाळा ॥
बावरी राधिका बनालि । कन्हय्या ! बजाव० ॥

किति करूं कन्हय्या ! धांवा । गा, नाच, वाजवीं पांवा ॥
त्यांतच हा जीव विरावा ॥
यावांचुनि इच्छा नुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

एकेक ऐकुनी सूर । दुःखांचा हो जरि चूर ॥
सारखी तरी हुरहूर ॥
नकळे ही लागे कसलि । कन्हय्या ! बजाव० ॥

तूं मनांतला चंडोल । मग माझ्या मनिंचे बोल ॥
जरि हृदयीं लपले खोल
तरि खोल हृदय या कालिं । कन्हय्या ! बजाव० ॥

बोल, बोल तव बिनमोल । जीवाचें देइन मोल ॥
परि बोल एकदां बोल ॥
ना तरी राधिका मुकलि । कन्हय्या ! बजाव० ॥

फिर विश्वाचा हा गोल । सांभाळुनि माझा तोल ॥
प्रेमाचा भरुनी सोल ॥
बघ मागुनि राधा आलि । कन्हय्या ! बजाव० ॥

मुरलीची प्यालें भांग । घडिघडी थरारे अंग ॥
या लहरि उठति कां सांग ॥
आनंदवृत्ति पाझरालि । कन्हय्या ! बजाव० ॥

उलगडति पीळ हृदयाचे । जणुं सुटति बंध देहाचे ॥
कीं जीव देहभर नाचे ॥
कुणिकडे राधिका भकलि । कन्हय्या ! बजाव० ॥

ही लहर अशा देहाची । हालचाल आनंदाची ॥
चेतनाच कीं जीवाची ॥
तुज भेटाया जणुं आलि । कन्हय्या ! बजाव० ॥

तिजमुळें होउनी दंग । वाऱ्यांत तरंगे अंग ॥
अणुअणुही होति दुभंग ॥
त्यांमाजि नादवीं मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

हृदयाचे ठोके पडती । अवकाश त्यांत जे उरती ॥
करि मुरलि स्वाची भरती ॥
मग एकच धडकी सगळि । कन्हय्या ! बजाव० ॥

मुरलीचा मंजुळ नाद । हृदयांत खुलवि पडसाद ॥
मम जीवाची ही साद ॥
तुज हांका मारित सुटलि । कन्हय्या ! बजाव० ॥

सारखा मुरलि वाजीव । अणुअणुसि देहिं दे जीव ॥
त्यांमाजि नाद गाजीव ॥
हृदयाचे पडदे उकलि । कन्हय्या ! बजाव० ॥

जीवाच्या कमळा भुलवीं । निज गुंजारविं त्या डुलवीं ॥
पाकळी पाकळी खुलवी ॥
झुलवी त्या पाडुनि भुरळि । कन्हय्या ! बजाव० ॥

कृष्णजी ! त्यांत तूं भृंग । त्यांतच रे होई गुंग ॥
गुंजारव करिं उत्तुंग ॥
ही मोहरात्र ओसरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

चांदणें खुलें दिलरंगीं । हो एक नादरस रंगीं ॥
पोहत मी स्वैर तरंगीं ॥
बघ शुद्धबुद्ध मम हरालि । कन्हय्या ! बजाव० ॥

या रसीं देहकण न्हाले । जो तो निज नादीं डोले ॥
क्षणभरांत सारें फुललें ॥
बघ फुले तयांचीं झालिं । कन्हय्या ! बजाव० ॥

करुनि त्या फुलांचा झेला । जीवाचा छेलछबेला ॥
नटवीन कधीं अलबेला ॥
झेला मज, आलें जवळिं । कन्हय्या ! बजाव० ॥

शृंगाररसानें नटली । तुज राधा रमवूं झटली ॥
जन्माची ओळख पटली ॥
कृष्णांत राधिका रमलि । कन्हय्या ! बजाव० ॥

वांकड्या अधरिं हा पांवा । वांकडाच डोळा डावा ॥
किति वेळ असाच पहावा ॥
अब खेल करो बनमालि । कन्हय्या ! बजाव० ॥

श्वासें मज हृदयीं भरवीं । नादें कीं ओढुनि नेईं ॥
चुंबनेंच कीं मज बनवीं ॥
तव ओंठावरली लालि । कन्हय्या ! बजाव० ॥

दृढ आलिंगन दे अथवा । अवकाश न त्यांत असावा
एकरूप जीवाभावां ॥
तव देहिं देह मम जिरविं ॥ कन्हय्या ! बजाव० ॥

बघ आतां घटका भरली । बोलाची बोली सरली ॥
जीवाची भाषा हरली ॥
ठायींच वृत्तिही हरलि- । कन्हय्या ! बजाव० ॥

जीवाचा पंचीप्यारा । मज आतां दिससी न्यारा ॥
मुरलीचा पिउनी वारा ॥
चहुंकडेच राधा झुकलि । कन्हय्या ! बजाव० ॥

उरलें न शीत वा उष्ण । कांहीं न शुभ्र वा कृष्ण ॥
एकरूप राधाकृष्ण ॥
नयनाद गात ही मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

चहुंकडेच आतां शांत । विश्व शांत, आत्मा शांत ॥
कृष्ण शांत, राधा शांत ॥
मुरलींत शांतता भरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

भोगुनी तापमय उष्णा । मुरलिची लागतां तृष्णा ।
जग गाइल राधाकृष्णा ॥
ही साक्ष मनोमन मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

ही अखंड मुरली वाजे । सर्वांच्या हृदयीं गाजे ॥
मग कोण वदाया लाजे ॥
की धन्य धन्य ही मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

त्या नादरसाचे प्याले । मनिं 'गोविंदाग्रज' प्याले ॥
शाहीर मुरलिचे बनले ॥
मग गानिं वाजविति मुरलि । कन्हय्या ! बजाव० ॥

## प्रेम आणि मरण

कुठल्याशा जागीं देख ।
मैदान मोकळें एक, पसरलें ॥
वृक्ष थोर एकच त्यांत ।
वाढला पुन्या जोमांत, सारखा ॥

चहूंकडेच त्याच्या भंवतें ।
गुडघाभर सारें जग तें, तेथलें ॥
झुडुपेंच खुरट इवलालीं ।
मातींत पसरल्या वेली, माजती ॥
रोज तीं । कैक उपजतीं । आणखी मरतीं ।
नाहिं त्या गणती । दादही अशांची नव्हती, त्याप्रतीं ॥

त्यासाठीं मैदानांत ।
किति वेली तळमळतात, सारख्या ॥
परि कर्माचें विंदान ।
कांहितरी असतें आन, चहुंकडे ॥
कोणत्या मुहूर्तावरतीं ।
मेघांत वीज लखलखती, नाचली ॥
त्या क्षणीं । त्याचिया मनीं । तरंगति झणीं ।
गोड तरि जहरी । प्रीतीच्या नवथर लहरी, न कळतां ॥

तो ठसा मनावर ठसला ।
तो घाव जिव्हारीं बसला, प्रीतिचा ॥
वेड पुरें लावी त्याला ।
गगनांतिल चंचल बाला, त्यावरी ॥
जातिधर्म त्याचा सुटला ।
संबंध जगाशीं तुटला, त्यापुढें ॥
आशाहि । कोठली कांहिं । राहिली नाहिं ।
सारखा जाळी । ध्यास त्यास तीन्ही काळीं, एक तो ॥

मुसळधार पाउस पडला ।
तरि कधीं टवटवी त्याला, येइना ॥

२५५

जरि वारा करि थैमान।
तरि हले न याचें पान, एकही, ॥
कैकदां कळ्याही आल्या।
नच फुलल्या कांहीं केल्या, परि कधीं ॥

तो योग। खरा हठयोग। प्रीतिचा रोग।
लागला ज्याला। लागतें जगावें त्याला, हें असें ॥

ही त्याची स्थिति पाहुनियां।
ती दीडवितीची दुनिया, बडबडे ॥
कुणि हंसे कुणी करि कींव।
तडफडे कुणाचा जीव, त्यास्तव ॥
कुणि दयाहि त्यावरि करिती।
स्वर्गस्थ देव मनिं हंसती, त्याप्रती ॥

निंदिती। कुणी त्याप्रती। नजर चुकविती।
भीतिही कोणी। जड जगास अवजड गोणी, होइ तो ॥

इष्काचा जहरी प्याला।
नशिबाला ज्याच्या आला, हा असा ॥
टोंकाविण चालू मरणें।
तें त्याचें होतें जगणें, सारखें ॥
हृदयाला फसवुनि हंसणें।
जीवाला न कळत जगणें, वरिवरी ॥

पटत ना। जगीं जगपणा। त्याचिया मना।
भाव त्या टाकी। देवांतुनि दगडचि बाकी, राहतो ॥

यापरी तपश्चर्या ती।
किति झाली न तिला गणती, राहिली ॥

इंद्राच्या इंद्रपदाला ।
थरकांप सारखा सुटला, भीतिनें ॥
आश्चर्यें ऋषिगण दाटे ।
ध्रुवबाळा मत्सर वाटे, पाहुनी ॥
तो स्वतां । तपोदेवता । काल संपतां ।
प्रकटली अंतीं । " वरं ब्रूहि " झाली वदती, त्याप्रती ॥

" तप फळास आलें पाहीं ।
माग जें मनोगत कांहीं, यावरी ॥
हो चिरंजीव लवलाहीं ।
कल्पवृक्ष दुसरा होई, नंदनीं ॥
प्रळयींच्या वटवृक्षाचें ।
तुज मिळेल पद भाग्याचें, तरुवरा ॥ "
तो वदे ! " देवि सर्व-दे, । हेंच एक दे ।
भेटवीं मजला । जीविंच्या जिवाची बाला, एकदां ॥ "

सांगती हिताच्या गोष्टी ।
देवांच्या तेतिस कोटी, मग तया ॥
" ही भलती आशा बारे ।
सोडिं तूं वेड हें सारें, घातकी ॥
स्पर्शासह मरणहि आणी
ती तुझ्या जिवाची राणी, त्या क्षणीं ॥
ही अशी । शुद्ध राक्षसी ! काय मागसी ॥
माग तूं कांहीं । लाभलें कुणाला नाहीं, जें कधीं ॥ "

तो हंसे जरा उपहासें ।
मग सर्वंच वदला त्रासें, त्यांप्रती ॥

" निष्प्रेम चिरंजीवन तें ।
जगिं दगडालाही मिळतें, धिक् तया ॥
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा, मग पुढें ॥ "

निग्रहें । वदुनि शब्द हे । अधिक आग्रहें ।
जीव आवरुनी । ध्यानस्थ बैसला फिरुनी, वृक्ष तो ॥

तो निग्रह पाहुनि त्याचा ।
निरुपाय सर्व देवांचा, जाहला ॥
मग त्याला भेटायाला ।
गगनांतिल चंचल बाला, धाडिली ॥
धांवली उतावेळ होत ।
प्रीतीची जळती ज्योत, त्याकडे ॥

कडकडे । त्यावरी पडे । स्पर्श जों घडे ।
वृक्ष उन्मळला । दुभंगून खालीं पडला, त्या क्षणीं ॥

दुभंगून खालीं पडला ।
परि पडतां पडतां हंसला, एकदां ॥
हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पानें सारीं, हांसलीं ॥
त्या कळ्या सर्वही फुलल्या ।
खुलल्या त्या कायम खुलल्या, अजुनिही

तो योग । खरा हटयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभतं मरणही त्याला, हें असें ॥

स्मरणार्थ तयाच्या ही बोलांची रानपालवी
मराठी रसिकांसाठीं 'गोविंदाग्रज' पाठवी

# श्रीमहाराष्ट्रगीत

मंगल देशा ! पवित्र देशा ! महाराष्ट्र देशा !
प्रणाम घ्यावा, माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा !
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा
अंजन कांचन करवंदीच्या कांटेरी देशा
बकुलफुलांच्या प्राजक्तीच्या दळदारी देशा
भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा,
ध्येय जें तुझ्या अंतरीं
निशाणावरी, नाचतें करीं
जोडी इहपरलोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासि वैराग्यासि
जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा १

भिन्न वृत्तिचीं भिन्न भिन्न हीं एक जीवसत्त्वें
तुझिया देहीं प्रकट दाविती दिव्य जीवतत्त्वें
चित्पावन बुद्धीनें करिसी तूं कर्तबगारी
देशस्थाच्या खुल्या दिलाची तुजला दिलदारी
कायस्थाचें इमान फिरवी रक्ताचा फेर
ठाक मराठी मनगट दावी तुझें हाडपेर
ध्येय जें तुझ्या अंतरीं— २

तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणीकोंडा
वहाण पायीं अंगिं काम्बळी उशाखालिं धोंडा
विळाकोयता धरी दिगंबर दख्खनचा हात
इकडे कर्णाटक हांसतसे, तिकडे गुजरात
आणि मराठी भाला घेई दख्खन—कंगाल
तिकडे इस्तंबूल थरारे, तिकडे बंगाल
ध्येय जें तुझ्या अंतरीं— २

# एकनाथ पांडुरंग रेंदाळकर

[ जन्म सन १८८९—मृत्यु सन १९२० ]

कविभूषण व कविकुंजर रेंदाळकर उत्तम पंडित कवि असून नियमक कवितेचे जोरदार पुरस्कर्ते होते. कांहीं काळ हे मनोरंजनाचे काव्यसंपादक होते. 'मोहिनी', 'बाष्पबिंदु' व पुष्कळ स्फुटकाव्यें यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत.

## काय बरें झालें ?

वनराणीपरि असावयाची हिंडत शेतांतुनी
अशी कां खिन्न आज साजणी ?

हलुनि गव्हाच्या पिंवळ्या लोंब्या हळूच वाऱ्यावरी
बहारी कशी दिसे बघ तरी !
नदीकांठच्या कुरणामधुनी 'राया' चाले कसा
मानकरि काय कोठला जसा !
बघ तिकडे 'पवळी' रंवथ करित राहिली
बघ तिकडे करडें कशीं नाचनाचलीं,
तूं मात्र इथें आहेस उगी बैसली !
पण हा मोत्या पहा तर खरा गेला भांबावुनी
ऊठ ना खिन्नपणा सोडुनी !

हा डोंगर ठाकला वाहतो ओढा दुसरीकडे,
शेत हें तुझेंच हो ना गडे ?

तुझ्या हातचा चारा खाया उतावीळ पाडसें,
मुलें हीं तुझीं न का राजसें ?

या शेतामधलीं झाडें पानें फुलें
हें असो, प्राणही तुजला मीं वाहिले !
तूं राणी, कांहीं उणें न तुज ठेविलें !
कां ग मंजुळे ! मग मज बघतां खुद्कन् ना हांससी !
चूक तरि काय जाहली अशी !

## एकदां हांस

गांभिर्याचें बंड कशाला तुझ्याच वदनावरी,
भगिनी ! हांस एकदां तरी !

विश्व नाचतें, हांसहांसतें अल्लड बालापरी,
तूंच कां स्तब्ध बैसली परी ?
खळखळ धांवे ओढा तिकडे अफाट माळावरी,
पांखरें भिरभिरतीं अंबरीं
पुष्पबालकां धरुनि कडेवर लता उपवनांतरीं,
करती क्रीडा नानापरी !

हे तारे व्योमीं रत झाले नर्तनीं;
नच शिणले वारे रात्रंदिन धांवुनी,
वनदेवी बसल्या हांसत बघ सुमगणीं !
स्वैर सुखीं जग मग्न, तूंच मग किमर्थ वद सत्वरीं,
धरिलें व्रत हें भलतें तरी !

जायाचे हे आटुनि निर्झर, सुकावयाचीं फुलें,
नर्तनस्मित तेव्हां कोठलें ?
वसंत नसती अनेक जीवनिं कोणाला लाधले,
पुढें दिन दुःखाचे पसरले !

पूर्णचंद्रिका–प्रकाश विरळा, कां त्यावर मंगले,
निविड तम अवसेचें पसरलें ?
दे फेकुनि सत्वर भलती गंभीरता,
हो विश्वासह या सुखोत्सवीं तूं रता
तो प्रसन्न होइल जाण जगाचा पिता !
विश्वगायनोत्सव चाले हा किमर्थ मग तेथलें
आपलें स्थान रिक्त ठेविलें ?

# त्र्यंबक बापूजी ठोंबरे

## बालकवि

[ जन्म सन १८९०—मृत्यु सन १९१८ ]

यांचीं 'मधुगीतें' हा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे. यांचीं पत्रें अत्यंत वाचनीय आहेत.

## निर्झर

गिरिशिखरें वनमाला हीं दरी दरी घुमवित येई!
कड्यावरुनि घेऊन उड्या खेळ लतावलयीं फुगड्या.
घे लोळण खडकावरती, फिर गरगर अंगाभंवतीं,
जा हलुहलु वळसे घेत, लपत छपत हिरवाळींत.
पाचूंचीं हिरवीं रानें झुलव गडे, झुळझुळ गानें!
वसंत मंडप—वनराई आंब्याची पुढती येई.
श्रमलासी खेळुनि खेळ नीज सुखें क्षणभर बाळ!
हीं पुढचीं पिवळीं शेतें सळसळतीं—गातीं गीतें,
झोंप कोठुनि तुला तरी हांस लाडक्या! नाच करीं
बालझरा तूं—बालगुणी बाल्याचिरे! भरिसी भुवनीं!

* * *

बालतरू हे चोहिंकडे ताल तुला देतात गडे!
प्रेमभरें त्यांवर तूंही मुक्तामणि उधळुनि देई!
बुदबुद—लहरी—फुलवेली फुलव सारख्या भवतालीं
सौंदर्यें हृदयामधलीं दे विश्वीं उधळून खुलीं!
गर्द सांवल्या सुखदायी वेलींची फुगडी होई!
इवलाली गवतावरतीं रानफुलें फुलतीं हंसतीं

झुलवित अपुले तुरेतुरे निळी लव्हाळी दाट भरे
जादूनेंच तुझ्या बारे ! वन-नंदन बनलें सारें !
सौंदर्याचा दिव्य झरा बालवसंतचि तूं चतुरा;
या लहरी लहरीमधुनी स्फूर्ति दिव्य भरिसी विपिनीं !

* * *

आकाशामधुनी जाती मेघांच्या सुंदर पंक्ति;
इंद्रधनूची कमान ती ती संध्या खुलते वरती;
रम्य तारका लुकलुकती नीलारुणफलकावरती;
शुभ्र चंद्रिका नाच करी स्वर्गधरेवर एकपरी;
हीं दिव्यें येतीं तुजला रात्रंदिन भेटायाला,
वेधुनि त्यांच्या तेजानें विसरुनियां अवघीं भानें,
धुंद हृदय तव परोपरी मग उसळो लहरी-लहरी.
त्या लहरींमधुनी झरती दिव्य तुझ्या संगीततती,
नवल न, त्या प्राशायाला स्वर्गहि जर भूवर आला !
गंधर्वा ! तव गायन रे वेड लाविना कुणा बरें !

* * *

पर्वत हा, ही दरी दरी तव गीतें भरलीं सारीं.
गाण्यानें भरलीं रानें, वर खालीं गाणें ! गाणें !
गीतमय स्थिरचर झालें ! गीतमय ब्रह्मांड डुले !
व्यक्त तसें अव्यक्तहि तें तव गीतें डुलतें झुलतें !
मुरलीच्या काढित ताना वृंदावनिं खेळे कान्हा;
धुंद करुनि तो नादगुणें जडताही हंसवी गानें;
दिव्य तयाच्या वेणुपरी तूंहि निर्झरा ! नवलपरी—
गाउनि तें झुळझुळ गान विश्वाचें हरिसी भान

गोपि तुझ्या हिरव्या वेली    रास खेळती भंवतालीं!
तुझ्या वेणुचा सूर तरी    चराचरावर राज्य करी!

* * *

काव्य देविचा प्राण खरा    तूंच निर्झरा! कवीश्वरा!
या दिव्याच्या धुंदिगुणें    दिव्याला गासी गाणें.
मी कवितेचा दास, मला    कवी बोलती जगांतला,
परि न झरे माझ्या गानीं    दिव्यांची असली श्रेणी!
जडतेला खिळुनी राही    हृदयबंद उकलत नाहीं!
दिव्यरसीं विरणें जीव    जीवित हें याचें नांव;
तें जीवित न मिळे मातें    मग कुठुनी असलीं गीतें?
दिव्यांची सुंदर माला    ओवाळी अक्षय तुजला!
तूंच खरा कविराज गुणी    सरस्वतीचा कंठमणि!
अक्षय तव गायन वाहे    अक्षयांत नांदत राहे,

* * *

शिकवीरे शिकवी मातें    दिव्य तुझीं असलीं गीतें!
फुलवेली—लहरी असल्या    मम हृदयीं उसळोत खुल्या!
वृत्तिलता ठायीं ठायीं    विकसूं दे सौंदर्याहीं
प्रेमझरी—काव्यस्फूर्ति    ती आत्मज्योती चित्तीं
प्रगटवुनी चवदा भुवनीं    दिव्य तिचें पसरी पाणी!
अद्वैताचें राज्य गडे    अविच्छिन्न मग चोंहिकडे!
प्रेमशांति सौंदर्याहीं    वेडावुनि वसुधा—माई—
मम हृदयीं गाइल गाणीं    रम्य तुझ्या झुळझुळ वाणी!
आणि जसें सगळें रान    गातें तव मंजुळ गान,
तेंवि सृष्टिची सतार ही    गाइल मम गाणीं कांहीं.

* * *

# कवीची इच्छा

जगाचे बंध कोणाला, जगाचा बांधला त्याला
मला जो थांबवी ऐसा जगीं निर्बंध ये कैसा !
जगानें देह हा केला जगाला वाहिलें त्याला
हणा मारा खुडा तोडा परि आतां मला सोडा
न कीर्तीला न प्रेमाला न सौख्याला विलासाला
न विघ्नाला न मृत्यूला मला ये आडवायाला !
वृथा या वाहणें चिंता वृथा अश्रू वृथा ममता
वृथा निःश्वासमालाही मला जी थांबवीना ही
पुरे संबंध प्रेमाचा नको हा खेळ प्रेमाचा
खरा जो प्रीतिचा प्याला जगीं प्याला सुखी झाला.

---

# सौ० लक्ष्मीबाई बेहेरे

[ जन्म सन १८९६—मृत्यु सन १९१४ ]

प्रोफेसर नारायणराव बेहेरे यांच्या या दिवंगत पत्नी असून त्यांच्या स्फुट कविता 'सुमनमाळ' या नांवानें रा० बेहेरे यांनीं प्रसिद्ध केल्या आहेत.

## कोती दृष्टि

उद्यानें जागोजाग
आवडते मज हीं बाग !
देश किती या पृथ्वींत, सकलांचें एकच चित्र !
तारा सुंदर,
फुलें मनोहर,
मनुजें प्रेमळ
असती साऱ्या देशांत, मायदेशिं रिझतें चित्त

सुंदर पुष्पें सर्वत्र, सकलांचें एकच चित्र !
कलिका फुलती,
प्रेमें हंसती,
पुष्पें होती
कुठल्याहि जरी बागेंत, एकचि ठसली हृदयांत !

भ्रमर गुंगती सर्वत्र, सकलांचें एकचि चित्र !
कलिका भंवतीं,
ते बागडती,
गाणीं गाती
वेड लाविती सर्व जरी, एकच खेळे हृदयीं परी !

सुंदर बाळें सर्वत्र, सकलांचें एकच चित्र
आई वदती,
गळा बिलगती,
चुंबन घेती
कुठल्याही संसारांत, मातेला प्रिय तत्पुत्र!

रम्य गृहें जरि सर्वत्र हृदयिं ठसे एकचि चित्र
गाई गीतें,
पति मम येथें,
बाळ हांसतें
घरकुल तें मज आवडलें, प्रासादा मम मन विटतें.

---

# काव्यकौमुदी

## भाग २ रा

# कृष्णाजी नारायण आठल्ये

## [ जन्म सन १८५२ ]

यांना 'महाराष्ट्र–भाषा–चित्रमयूर' ही पदवी आहे. हे 'केरळ कोकिळ' या मासिकाचे संपादक होते. माहेरचें मूळ, सासरची पाठवणी इत्यादि स्त्रीगीतें यांचींच आहेत. हल्लीं हे लोकमित्र मासिकाचे सहसंपादक आहेत. यांची कृष्णगीता अपुरीच प्रसिद्ध झाली आहे.

## भीमकर्मा राघोबा

अहा ! दत्ताजीचा चरचर पहा कंठ चिरला
मराठ्यांचा देवा हरहर ! कसा काल फिरला
कसा एकाएकीं प्रिय कुमर विश्वास पडला
कसा श्रीमंतांच्या निरुपम यशा रोग जडला.

कसे भाऊ नेटें यवनसदनामाजि घुसले
जयश्री ही झाली पतित म्हणुनी काय रुसले
पळाले बाकीचे त्वरित फुटली वाट तिकडे
प्रसंगीं पोटाला मिळति कितिकांच्या न तुकडे.

नसे कोणा बंडी कुडकुडत थंडींत पडले
अरी मागें लागे म्हणुनि किति झाडींत दडले
हजारों लोकांचे सतत पळतां पाय सुजले
कितीकांचे मार्गी रुधिर गळुनी काय भिजले.

अरीनें कापोनी अगणित शिरें ढीग रचले
महा योध्यांचेंही बिकट समयीं धैर्य खचलें
चलो भागो आगे म्हणत कडवे शत्रु उठले
चमू वाटे फाटे चहुंकडुन आकाश फुटलें.

खाना; तोडी न माना अति करुणरवें प्रार्थिती लोक नाना-
त्राता ना नायकांना घळघळ रडती पाहुनी अंतकांना.
यानावांचूनि नाना फडणिस पळती सोडुनी देहभाना,
प्रार्थीती प्राणदाना विकलजन पुसे कोण मानापमाना.

नाना कष्टें उपाशी निशिदिनिं फिरले लावुनी राख अंगीं
देशाचें भाग्य मोठें म्हणुनिच समजा वांचले त्या प्रसंगीं
दुर्दैवानें परंतु प्रियतम जननी आपुडी नष्ट झाली,
मोठ्या कष्टांत पत्नी परतुनि नगरा प्राण घेवोनि आली.

झाला घोर अनर्थ थोर पडला घाला मराठ्यांवरी
होते शूर बलाढ्य होळकरही झुंजार शिंद्यापरी
झाले भग्न हताश वीर, अवघे खालीं वसे पारडें,
दुःखाग्नी बहु चेतला पसरलें देशांत साऱ्या रडें.

तेजस्वी दोन मोत्यें अवचित गळलीं मोहरा सातवीस
गेला सांडोनि खुर्दा अगणित पुतळ्या मोजवेना कवीस
ऐशी संकेतवार्ता प्रथमच कळली देशिंच्या सावकारा
दुःखाचा पूर आला प्रळय उसळला थोर झाला पुकारा.

भाऊ विश्वास ह्यांचा परिसुनि समरीं निश्चयें काळ झाला
शोकाग्नी पेशव्यांच्या हृदयिं भडकला झोंबला काळजाला
देहाचें भान गेलें क्षितिवरि पडले जाहले फार खिन्न
आली निस्तेजताही रुचिरतरमुखा टाकिलें गोड अन्न.

राघोबा तो भरारी सकल परिसुनी बंधुची मात कानीं
हारे! हारे! कसारे झळफळत वदे घात केला ठकांनीं
बोले गर्जोनि; केव्हां करिन निजकरें शत्रुची सर्व होळी
बोटें मोडी कडाडा रदन करकरां चावुनी हात चोळी.

भाऊ गेलासि कोठें रिपुकर धजले रे कसे प्राण घ्याया
आम्ही झुंझार योद्धे म्हणवुनि समयीं जाहलों सर्व वायां
दत्ताजी भीम साचा अतुलबलनिधी तोहि युद्धीं निमाला
झाली कैसी जयश्री च्युत यवनगळां घालुनी कीर्तिमाला !

जाऊनी काय वेगें धरुनि कडकडां शत्रु दाढेंत चावूं !
संग्रामीं त्यास दाऊं यमपुर अथवा देह फाडूनि खाऊं
घालूं रक्तांत न्हाऊं तनुवरि वसनें बांधुनी अग्नि लावूं ?
तीव्रें शस्त्रें करूं कीं तिळतिळ तुकडे सांग रे सांग भाऊ !

आणा त्या रोहिल्याला त्वरित मजपुढें दाखवा एक वेळ
दुष्कर्मी आगलाव्या कुटिल मसलती सर्व त्याचाचि खेळ
कोठें गेला दुराणी खळ बळ वळवा एकदां त्यास दावा
वक्षःप्रांतीं बसोनी चिरुनि नरडिचा वाटतें घोट घ्यावा.

दुःखें सर्वांग पोळे अनलसम करी भैरवाकार डोळे
शत्रू दंडूनि कंडू शमन करुं बरा हेंचि चित्तांत घोळे
केली सारी तयारी निवडुनि पथकें नेमिलें शस्त्रधारी
स्वारीचा थाट भारी सबळ सकळही पातले साह्यकारी.

बंधूची घेत आज्ञा बहु बहु विनयें सांगुनी चार गोष्टी
नानासाहेब भाऊ स्मरुनि पुनरपी जाहले फार कष्टी
वंदोनी श्रीगणेशा बहुधन वसनें वांटुनी ब्राह्मणातें
आवेशें सिद्ध झाले रिपुजनहनना जाउनीयां रणातें.

तोडे घालूनि घोडे ठुमकत निघती उंट सांडा उदंड
हस्ती दावूनि मस्ती गगनिं उडविती शुंडदंड प्रचंड
हातींचीं दिव्य खड्गें विविध चमकती शोभती उंच भाले
वीरश्रीयुक्त बाहू स्फुरति रणपटूवीर सारे निघाले.

झाल्या तोफा धडाडा फडफड सुटले बंदुकी हस्तनाले
शिंगें कर्णे तुताऱ्या झडति खणखणा दुंदुभी घोष चाले
मध्यें पुष्टांग दंती धरि जरिपटका शोभला जो झुलीनें
जातांना सैन्य वेगें गगन दशदिशा धुंद झाल्या धुलीनें.

जातां मार्गांत लागे जयपुर नगरी वैभवें जेंवि लंका
नाना विद्याकलांचें भुवन बहु बरें तोषवी रावरंका
वेढूनी तीस दादा हटकुनि नृपती सिद्ध झाला रणाला
वाटे उड्डाण साधी मृगपति विपिनीं पाहुनी वारणाला.

---

# पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी

[ जन्म सन १८५६ ]

रावबहादूर डॉक्टर पुरुषोत्तमपंत जोशी, पी. एच्. डी. एफ्. आर्. जी. एस्., जे. पी. यांचें 'काव्यरत्नमाला' हें पुस्तक प्रकाशित आहे. डॉक्टर-साहेबांच्या कवितांबद्दल प्रशंसापर उद्गार काढून फ्रान्स व अमेरिका येथील पाश्चात्य पंडितांनीं आपली गुणग्राहकता प्रकट केली आहे. 'परिषदभिनंदन' या काव्याचें इंग्रजी भाषांतर अमेरिकेंत प्रसिद्ध झालें आहे.

## स्वातंत्र्याची महती

परवश जें जें तें तें दुःखप्रद सर्व जाणिजे मनुजें
कवि हें नवें न सांगे हितगुज मनुजा पुरा कथी मनु जें.

परवशता दुःखाचें सदन, स्वातंत्र्य सर्वसौख्याचें
मंगलधाम मनोहर वर्णन करवे न तन्महत्त्वाचें.

स्वातंत्र्याचें कळतें बुद्धिविहीनां पशूंसही मोल
पक्ष्यांसहि तें कळतें शुक पिंजऱ्यांतिल तुम्हांस सांगेल.

द्वार क्षणभर उघडा मग अवलोका कशी घडे मौज
सुंदर पंजर सोडुनि शुक आनंदें नभीं उडे सहज.

वेद पुराणें स्तविती मनुसम मुनिवर्य वर्णिती ज्याला
त्या स्वातंत्र्य—रवीच्या वर्णील कवि केंवि दिव्य तेजाला !

स्वातंत्र्य—मित्र पावे उदय जिथें ती मही महाधन्या
मान्या होय जगीं ती तत्सुत सुकृती सुखी तिच्या कन्या.

तृणसदनीं वास बरा वल्कलवसनें बरीं न परवशता
फलमूलाहार बरा न बरी परि ती परान्न—सेवकता.

ऐसे पूर्वज अमुचे स्वातंत्र्यप्रिय सुधी सदाचारी
तत्कीर्ति—सौरभानें भरल्या भूमंडळीं दिशा चारी.

आचारीं व्यवहारीं रुचली स्वजनां स्वतंत्रता अशनीं
मुक्तिस्तव किति गेले पूर्वीं मुनिवर रहावया विपिनीं.

परवशता स्वीकरुनी कांचनभवनीं मिळे जरी वसती
तरि ती न रुचे आर्यां उटजीं स्वायत्तता बरी म्हणती.

अब्द अपरिमित गेले स्वातंत्र्याच्या सुखांत आर्यांचे
शौर्याचें, धैर्याचें, जीवन त्यांचें परोपकार्याचें.

परि दैवदुर्विलासें गृहकलहें यादवी इथें माजे
मुकलों स्वातंत्र्याला परके जन जाहले इथें राजे.

परवशतेचें आम्हां असिधाराव्रत करावया प्राप्त
झालें, गेलें वैभव परवश कार्यांत सर्व आसक्त.

कांचन—रजत—हिऱ्याहुनि मरकतरत्नाहुनी असें मोलें
स्वातंत्र्य थोर, त्याचें मूल्य न कोणास सांगतां आलें.

स्वातंत्र्य हें सुखेहुनि अधिक गुणें प्राणही तयापेक्षां
अधिक न, कीं तें जातां मागावी लागते जनां भिक्षा.

व्यापारीं, व्यवहारीं सर्व तऱ्हेनें स्वतंत्रता द्यावी
आर्यजनांनीं विनयें प्रभुपाशीं हीच गोष्ट मागावी.

आतां अनन्यभावें देवातें हीच प्रार्थना कविची.
दिव्य प्रभात धाडीं आर्यावर्तीं स्वतंत्रता—रविची.

सर्व जगांत नसावा परवशतात्रस्त एकही देश
देशद्रोह नसावा, दुर्भिक्ष नसो, नसो कुणा क्लेश.

स्वातंत्र्याची महती संतत गावी सहर्ष आर्यांनीं
‘पुरुषोत्तम’ कवि विनवी विनयें विबुधां सुबोध आर्यांनीं.

# वासुदेव वामन खरे

[ जन्म सन १८५८ ]

हे इतिहाससंशोधक, नाटककार व कवि, ' यशवंतराव 'या महाकाव्याचे कर्ते असून तारामंडळ, चित्रवंचना, गुणोत्कर्ष, कृष्णकांचन व शिवसंभव हीं यांचीं नाटकें रंगभूमीवर येऊन दणदणलीं आहेत.

## समुद्र

तूं शांत होसी जंव सिंधुराया.
पृष्ठास शोभा दिसते कशी या,
जों दृष्टि चाले क्षितिजास दूर,
तों स्वच्छ देखें तव नील नीर.

धन्या कन्या चपल लहरी पाठवोनी निजाया.
तूं एकांतीं बससि चरितें मागचीं आठवाया,
आनंदानें तदुपरि तुला तंद्रि लागे मनांत.
आणी वारा प्रियसख तदा जागृतीच्या दशेंत.

त्वत्पृष्ठभाग अति शांत सुरम्य नीळ,
वाटे जणो रचिलि लावुन भूमि नीळ.
वारा सुटे हलुहलू मग लाट हाले.
कीं हार मौक्तिक हिरे रचुनीच ठेले.

अशा वेळीं दूर क्षितिजिं मिळतें तें गलबत
शिडें त्याचीं शुभ्रें असति गगनांतीं फडकत
तुझ्या पृष्ठीं वाटे मणिमय जमीनीच वरुन
पदें टाकी हंस स्तिमित निजपक्षां उभरुन.

तारे अंबरिं ते क्वचित् चमकती जैसे जनीं सज्जन
तद्विंबें कुसुमें जणों उधळलीं त्या शांत पाण्यांतुन
जाते लाट हळू उठोनि न कळूं देतां कुलस्त्रीगती
ऐशा या समयीं प्रकांत दिससी गंभीर रम्याकृती.

सुपुष्पोद्यानांतीं भ्रमर जणुं गुंजारव करी
तसा वारा कर्णीं सुटुन हळु झंकार विखरी
निजे पृष्ठीं वाटे तव हरि तया नारद मुनी
स्तवूं गातो त्याचे ध्वनि पडति कर्णांत दुरुनी.

फुटाया ज्या तेव्हां उठति लहरी त्याचमधुन
जणों झोंके खाती पडुन उदकीं चंद्रकिरण
अशा कालीं रात्रीं बसुन तव तीरीं जलनिधी
तुला प्रेमें हर्षें नयनिं सखया पाहिन कधीं.

## जन्मभूमि

पोटासाठीं भटकत जरी दूरदेशीं फिरेन,
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन;
नेवो, नेतें, जड तनुस या दूर देशास दैव,
राहे चित्तीं प्रिय मम परी जन्मभूमी सदैव.

या संसारीं जरि निजशिरीं वाहतों क्लेशराशी,
चिंताज्वाला निशिदिन जरी जाळिती मन्मनासी,
होतें तेव्हां स्मरणच तुझें, जन्मभूमी, क्षणैक,
तेव्हां शांत स्थिर मन कसें होतसें, जाय दुःख.

वेळोवेळीं तुजसि बघुनी नेत्र संतुष्ट व्हावे,
इच्छा होते, परि तुजकडे चित्त हें मात्र धांवे;
यावें देहें, परि असससि तूं शेंकडों कोस दूर,
आहे त्याच्या त्वरित गमना विघ्न हें दुर्निवार

पाहें नेत्रें बहुविध असे संपदेचे पसारे,
नाना सौख्यें अनुभविति हे येथले लोक सारे;
येथें राहूं परि नच शिवे वासना ही मनातें;
यावज्जीव प्रियतम अशी तूंच होशील मातें !

जेथें माझें जनन घडलें पूर्वपुण्येंच थोर,
जेथें गेले दिवस, असतां बाळ, सौख्यांत फार,
जेथें होते करित वसती पूर्वज प्रेमभावें,
कां त्या भूमिप्रति चिर न म्यां पूज्यभावें स्मरावें ?

पाथोधींची श्रवणिं पडतां गर्जना मंदधीर,
वृक्षच्छायांतरिं झुळझुळू वाहतां वात गार,
होतों अंकीं निजत, जननी ! जन्मभूमी, तुझ्या ते
गेले कोठें दिवस ? झुरतों आठवोनी तयांतें !

होतों लहान बहु खेळुनि तृप्त झालों
अंकीं तुझ्या, तिथुन थोरपणीं निघालों;
मातेसमीप असती, परि थोर होती
तेव्हां पिलें सहज सोडुन तीस जाती !

' निःसत्त्व, निर्धन ' तुला म्हणतात लोक,
वाटे मला लवहि त्यांस नसे विवेक;
लक्ष्मीस देइ जननाप्रति वारिराशी,
सेवार्थ तो सतत सिद्ध तुझ्या पदाशीं

बघुनि तव, अहाहा ! थोर सौंदर्य, झाले
बहुतच दिन जेव्हां नेत्र हे फार धाले;
अजुनिहि दिसताहे दृष्टिला काय नव्य,
हृदयपटिं असे तें रेखिलें चित्र भव्य !

# विद्याधर वामन भिडे

[ जन्म सन १८६१ ]

वि. वा. भिडे यांचीं राघवीय परीवाह, पक्कपंडित, तंतुवायनिकाय, करालकरवाल वगैरे काव्यें प्रसिद्ध असून श्रीशारदा, शंकातंक, मदमाधुरी, पापपंक्ति वगैरे अप्रकाशित आहेत. यांनीं निबंधलेखन व सुलभ अलंकार हीं पुस्तकेंहि प्रसिद्ध केलीं आहेत.

## भरतभेट

रघुवरा भरत देखुनि हर्षला, जणुं तयीं शितिगलीं घन वर्षला
भरतहर्ष मजला नचि बोलवे, गजपिपीलिककरास न तोलवे
रघुवरा बघितलें भरतें यदा प्रमदबाष्प बहु ढाळियलें तदा
परमकोटिगत दुःख नरा जसें करि उदश्रुनयना सुखही तसें
रघुवरास दृढ घालुनियां मिठी, भरत लावुनि तदीय मुखीं दिठी
प्रमदनिर्भरमनें रडला तदा, हरपल्या सकळही भरतापदा
प्रमद जो भरत त्या क्षणिं पावला अतुल तद्हृदयिं तो न समावला
उदधिच्या न उदरांत जसें जल ठरतसे विधु विलोकुनि शीतल
स्वगत तो भरत भाषण यापरी रघुवरास कवटाळुनिया करी.
भरतभक्तिपरि भक्ति न भूवरी, कवण मात मम हे न म्हणे खरी
" प्रियसखा मजसि राघव भेटला अधिक ज्याहुनि न राज्य गमे मला
चिर अदृष्ट दिसला मज राम हा, खचित धन्यतम मी भुवनीं अहा !
त्रिदिववास मनुजा न खरोखरी मधुर रामसहवास मिळे तरी
मजपरी इतर धन्य न मानव, मजसिं रामपरिरम्भण–वैभव "
भरत यापरि वदोनि रडे चिर, शिथिल खेंव न करी जडली स्थिर
कृपण हेमपिटिका दृढ आवळी, भरत–रामतनु त्यापरि सांवळी

रघुवरें मग हळूच निवारिला भरत आगमनहेतु विचारिला
"प्रियसख्या! रडसि गद्गद कां असा? त्यजुनि राज्य इकडे फिरसी कसा?
जनक काय कुशली भरता असे तनयवत्सल यदन्य जगीं नसे?
कुशलिनी अपुलिया जननी घरीं असति कीं? मज सख्या वद सत्वरीं
पुरजन प्रमदनिर्भर कीं असे? वनिं गुरू नगरिं कीं अपुला वसे?
प्रिय सुमंत्र कुशली मम सारथी? कुशल सर्व भरता! मजला कथीं
परिशिला रघुवरोदित शब्द हा अशनिपात गमला भरता अहा!
रुदित त्यास नचि आवरलें तदा, स्मरुनि तात रडला बहु गद्गदा.
भरत मोकलुनि धाय तदा रडे, क्षितितलावरि शुगाकुल तो पडे
बघुनि हा भरतशोक रघूत्तम बहु खचे, मनिं तदीय नुरे शम
मग रघूत्तम पुसे भरता असें "रडसि कां? तुजसि संकट कायसें
मज निवेदन करीं, न असा रडें, कथुनि अल्पतर होइल सांकडें
मग तया सकल वृत्त निवेदिलें, लवहि वृत्त भरतें न उरों दिलें.

———

# नारायण नरसिंह फडणीस

[ जन्म सन १८६१ ]

जळगांवच्या काव्यरत्नावलीचे फडणीस हे संपादक आहेत. यांची महाराष्ट्र–मुक्तामाला प्रसिद्ध आहे. काव्यकौमुदीचे हे एक संपादक आहेत.

## महाराष्ट्रमुक्तामाला

पुण्यश्लोकशिखामणि, सदाश्रयी जो निवारि तापाला
नित्य जयी, नरकपिसख; वंदीं त्या नित्य देवदेवाला.

वरदानव्रत ज्याचें, करुणसुधायुक्त नित्य मन ज्याचें
वैराग्यशील योगी, नमितों पद त्या दयालु रामाचें.

पुत्राधिक्य वृथा तें, दशरथ तो श्रेष्ठ चार पुत्रांनीं
यशार्थ पुत्र देउनि, झाला जो वंद्य दानशूरजनीं.

भो ! गाधिज तुजपाशीं शिकले ते गालवादि शिष्य किती !
परि त्यांत एक राघव, अंबुधिपानांत मेघ तो सुकृति !

पादस्पर्श घडे जरि, होशि अहल्ये ! विनम्र रामपदीं
भृगुपदताडण साहुनि, विष्णु जसा भृगुऋषीस तो वंदी.

अबलालीला केवळ, "असा धनुर्भंग तो वृथा होय."
ऐसें वदतां राघव, देई श्रीपरशुराम त्या अभय.

कंपायमान झाली वसुधा शिवचापभंगनादानें,
बाला सीता मुदिता होय, जणूं रम्य वेणुनादानें.

सीता गुरुस मिळावी, म्हणुनी धनु तें स्वनाश घे करुनी;
संजीवनी पित्याला लाभावी, म्हणुनि सिद्ध कच मरणीं.



रा• नारायण नरसिंह फडणीस.

" मी कार्तवीर्यजेता ! " रामा ! कां गर्व यापरी करिशी
ग्रासी दुर्विध अरियश, पर्वदिनीं राहु जेविं सूर्याशीं.
मुनिवर्या ! रामाला, मुहूर्त दिधलास तूं असुखमूल,
वनगमनकाल कोठें ? कोठें राज्याभिषेकमहकाल ?
जैं अंगनानुजांसह होई मार्गस्थ राम कांतारीं,
तन्मुख अवलोकाया, वाळें टाकूनि धांवती नारी.
घनभासें शिखि नाचति दूर्वापुंजभ्रमेंचि मृग पळती
गुंजति भृंग मुखाब्जीं अध्वग रामासि त्या असो प्रणती.
सौरकुलीं असतांही, सुधांशु वितरी; नृपास जे पूज्य—
गौरासित रत्नमणी पौरांनों ! वाटले कसे त्याज्य ?
बहुपरि निषेध करुनी, कैकयिनें राम धाडिला विपिनीं
सत्यार्थ पिता निष्ठुर, कविंनीं तो राम गायिला स्तवनीं.
व्यर्थ विषाद निषादा ! मानिशि कां बघुनि दैन्य रामाचें
वनचर, जटिल; जरी तो वदनाब्जीं राजतेज तें नाचें.
आहे कुमार कुशली, गे माये ! तूं करूं नको रुदन
मुनिजन तपोबलानें सुखें करो ! रामदर्शनीं पान.
"जनकांकावरि लोळें, सेवीं मी मातृसौख्य नगरांत."
यापरि तव सुत वदतो, माये ! मग तूं कशी अरण्यांत ?
"जा नंदना ! वनाला," वदला रामास अजकुलोत्तंसा
मग त्यास शोधण्याला नंदनवनमार्ग सेविला कैसा ?
जरि रामनाम सेवीं तरि कां हा ताप वृद्धिला पावे
वदुनी असें, म्हणुनि का स्वर्गीं दस्त्रांस भेटण्या धावे.
स्त्रैणपणा बघुनि नृपा ! एकांतीं निंदिती तुला मंत्री
देवेंद्र मुनिजनासह, हांसे स्वर्गीं बघोनि तुज नेत्रीं.

हरिलें तुझें अयोध्ये ! अटवीनें रामरूप सौभाग्य
पतिलाभ व्हावयाला, अटवीचा वेष तो तुला योग्य.

न करीं मातृविडंबन, भरता ! झाला तुझा गुणोत्कर्ष
उचित नसे जलसेचन, पदताडण योग्य तें अशोकास.

विषयविरक्ती चित्तीं, तैशी गुरुभक्ति; सज्जनीं महती,
मातृकृपेनें लाभे; भरता ! तूं तत्पदीं धरीं विरती.

जे जनपरोपकारी, त्यांमाजीं श्रेष्ठ तूंच कैकेयी !
जनकल्याणार्थ तुवां, दुःसह वैधव्य सेविलें आई !

दशरथनृपास मान्या, तुजविण गे ! कोण ती दुजी भ्रमरी,
माये ! भोळी तूं; तुज फसवी ती नीच मंथरा नारी.

दावूनि नीति कुटिला, मोद गमे कार्यसिद्धिला बघुनी;
ये फळ अनयतरूला, आतां कां अश्रु मंथरे ! नयनीं ?

शोकदवानलवेष्टित—अंतःपुरकाननांत; साश्रुजलीं—
सुस्नात व्हा मृगींनो ! शोधुं कुठें राममेघ वनमाली ?

दीप विझे निःश्वासें, न विझे शोकाग्नि; पावतो वृद्धि;
परि मंद मंद बाष्पीं शोकशमीं सहज लाभते सिद्धि.

विषयोपभोग असती क्षणभंगुर, शेवटीं असुखमूल—
संपत्ति कोणती गे चिंते ! जी नित्य मोद वितरील.

प्रत्यक्ष भाग्यमूर्ती, दयाळु तैसा, सुधासरीं सरस;
पातक ममत्व हरितो, सुख वितरो रामभद्र आम्हांस.

सिद्धि तपस्विजनांची, शिवकंठांतील सुंदरा माला—
ती नीलमूर्ति हांसे स्वगुणें त्या शेष—शशि—पयोधीला.

भुवनावनकुशली, जो पृथ्वीचा पति तसाच जामात
संपूज्य धातृसदनीं, यज्ञपती शोभतो अरण्यांत.

रा.ज्ञा.१०५
३०६



राक्षसदहनीं तत्पर, लक्ष्मीवक्षोज गिरिहरी राम—
शुभ्र यशानें मिरवी, अस्मत्सुख इंद्रनील अभिराम.
दुष्प्राप्य तस्करांला, साधूला प्रिय, तसेंचि मदरहित—
अत्यंत मूल्य ज्याचें, मोदास्पद वित्त ओढितें चित्त.
जो निष्कलंक, तैसा अमृतमयी; शंकरास दे शांती
नित्य कलावृद्धि घडे, करिं रामशशीस मी चकोर नती.
जटिल भले वटतरुपरि, तेंवि धनुर्धर किरात किति विपिनीं
शिवमदनश्रीहरणीं एक श्रीराम हा समर्थ जनीं.
रजनीयाम—प्रहरीं ध्यान करायास योग्य जी मुनिला
ती घननील विभूती सामाविण लभ्य होय कवणाला!
असुनी अबला केवळ! तेंवि नभःक्षितिसमान तें शील;
श्रीरामपादुकांनीं! अराजकीं रक्षिली प्रजा सकल.
यौवन—नय—मंडित तूं असतां भरता! अधीर कां स्वमनीं
जड पादुकाच गमती धन्या ज्या तारिती तुम्हां व्यसनीं.
भो याज्ञवल्क्यशिष्या! सन्निष्ठा जेंवि नित्य तुजपाशीं;
राही भवनीं विपिनीं त्वत्कन्या रामभद्रसहवासीं.
सीतालाभ विराधा! मोद न देतां, घडे तुझी हानी
कपटपटू राहूला दुष्कृत्यें मरण ये सुधापानीं.
जंगम कल्पतरूला मृदुलारुण पादपल्लवें असती
त्या तरुसमेत दिसली कल्याणप्रद सुवर्ण लतिकांनीं.
धन्वी, जटी, पलाशी तैशी ज्याला न भीति लवलेश,
सीतादर वंद्य जया, करि ऋष्याश्रम पवित्र जगदीश
सजल घनापरि ज्याचें भ्रमण करी तेज दंडकारण्यीं,
त्या तेजें अवगणिली मलिना शशिकांति तुच्छ लेखूनी,

हरिणवधार्थ हरीनें त्यजुनि गुहा सांडिली तिथें मुक्ता
ती नीच वंचकानें नेली नच गणुनिया बलाबलता.

गे सीते जरि केलें, हरण तुझें नीच रावणश्वानें.
त्वत्कीर्ति वृद्धि पावे कीं तद्दुष्कर्म बुद्धियोगानें.

फळ भोग जानकी गे! लक्ष्मण कां ताडिला कठोरवचीं ?
पात्रीं क्षत्रीं होते, विशालता गुप्तदान बीजांची

होतो मृगबालक तो गरललता सेवनीं जसा तप्त,
कटुवचनतप्त असतां, कां सौमित्रास निंदिलें व्यर्थ

जे धैर्यशील असती, निंदास्पद वचन त्यास साहे न.
रोदन करीत गेला! लक्ष्मण तैसाच आश्रमांतून!

जाशील कुठें चोरा ? हरुनि श्रीरूप रत्न रामाचें!
अपराध समुद्राचा केल्यावरि मीन काय तो वाचे ?

---

# महादेव हरि मोडक

[ जन्म १८६४ ]

रा० म. ह. मोडक, बी. ए. यांचें सती ठाकुरणी हें महाकाव्य अप्रकाशित असून सुताविरह, बैरागी वगैरे मोठालीं काव्यें प्रसिद्ध आहेत.

## कमल

सरल, सुबक, गौरा गोजिरी गात्रयष्टी.
उपजत बघुनीयां अंतरीं फार प्रीती,
अमृतमधुर, मुग्ध, स्निग्ध पाहूनि अंगें,
विमलसुखसमुद्रीं चित्त माझें तरंगे!

तिलसुमसम रम्या नेटकी नासिका ती,
बहुत खुलत जेथें भूषणांतील मोतीं,
उपरि उभविल्या या भोंवया की कमानी
तिलक निटिल देशीं शोभतो रक्त वर्णी!

शिरिं विपुल विराजे स्तोम तो मूर्धजांचा,
अति तनु समरेखा भेदिते अर्ध ज्यांचा,
नव नवल परींची घालुनी नित्य वेणी,
निववि नयन माझे बालिकांची शिराणी.

विलसति करकंजीं भूषणें रक्तवर्णें,
चटुल रव जयांचा तोषवी नित्य कर्ण,
चरणिं धरित तोडे साजिरे शिंदशाई,
कविस रुचिरता ती वर्णितां येत नाहीं.

## मृत्यूस

अहा मृत्यो! नेशी हरुनि कमला कोमल अशी,
वृकें हिंस्रें न्यावी उचलुनि कुरंगी मृदु जशी,

दया, माया, लज्जा, नय, विनयही सर्व त्यजुनी,
कसा बा तूं काळा ! विहरसि असा निर्भय जनीं !

तुला 'राजा' कोणी म्हणति दुसरे 'धर्म' वदती,
तसे कोणी कोणी म्हणति 'समवर्ती' 'पितृपती,'
गलिच्छा धर्मज्ञा विषमचरणा, वत्सकदना,
तुला ऐशा संज्ञा रुचतिल कशा ! दुःखसदना !

## समाधान

जरी केली कीटें कवळुनि मुखीं ध्वस्त कलिका,
तरी तीचा राहे परिमल सदा ज्ञात रसिका,
तशी नेशी माझी जरि हरुनि तूं दिव्य कमला,
तरी नांदे तीची रुचिर भुवनीं कीर्ति विमला.

वृक्षाची महती कळे त्रिजगतीं आल्यासि पुष्पें फळें,
आम्रातें म्हणती रसाल, फल तें वर्षी जरी मावळे,
तैशी ही कलिका विकासुनि जरी तत्काल गेली लया,
झाली मत्कुलकीर्तिहेतु सुखदा ही ईश्वराची दया.

---

# दामोदर गणेश पाध्ये

[ जन्म सन १८६५ ]

रावबहादूर दा. ग. पाध्ये एम्. ए. यांचें दुःखाश्रुमाला हें शोकगीत प्रसिद्ध आहे. यांनीं विविधकाव्यमाला हा काव्यसंग्रह संग्रहित केला असून विविध-ज्ञानविस्ताराचे हे काव्यसंपादक आहेत.

## ईश्वरापाशीं फिर्याद

इच्छा नाहीं परि मज मुळीं दोष मृत्यूस द्याया,
कर्तव्यें तन्नियत असतीं, लागतीं त्या कराया;
मातें कार्या व्यवहृति परी ईश्वराशींच खास;
मुख्य न्यायाधिप भुवनिंचा,—प्रश्नही एक त्यास.

भीतार्तांचा सकरुण सुहृत्, नीतिचा तूं नियंता,
न्यायाचा तूं उगम असशी, संकटांचा विजेता,
सद्भावाचा प्रियतम सखा, शासिता दुर्जनांचाः—
गाती ऐसा बुधजन तुझा धन्यवाद स्तुतीचा.

कर्ता, भर्ता, असासि सजला शक्तिनीं तूं अनंतीं;
संबोधीती विबुध तुजला सच्चिदानंदमूर्ती;
ऐसा एक—प्रभु असुनि तूं, कां दिसावी जगांत
न्यायापेक्षां प्रबलतमता क्रूरतेची अनंत !

ठावें मातें, कथिति बुध कीं, जन्मजन्मांतरींचीं
कर्में केलीं असतिल, फळें येति त्या त्या परीचीं;
हा कर्मांचा नियमच परी न्यायनीतीस तोडी;
सौख्या दुःखाविषयिं न शके सोडवायाहि कोडीं.

एका जन्मीं करि मनुज तीं अन्यजन्मीं फळाला
येतीं कर्में; स्मृति न उरतां होइ शिक्षा नराला !
पूर्वीं केली सुकृति म्हणुनी काय पाप्यां मिळावीं
सौख्यें, पापाचरणिंहि यशःश्री जगीं प्राप्त व्हावी ?

या जन्मींचे कितिक गुणवान्, पुण्यवान् साधु संत
होती आपच्छर्ति हत, सदा गांजिलेले जगांत ?
त्यांच्या हस्तें कधिंहि घडलें पाप वाटे न मातें,
होती पात्र प्रभु ! अनियता कां न ते त्वत्कृपेतें ?

इच्छा नाहीं, बल न मज हीं सोडवायास कोडीं;
अल्पा माझी मति शिकविणें व्यर्थ अज्ञा विषूढीं;
कां कोपूनी परि वद विभो ! आग ही सांडलीस ?
घाला दैवा मजवरि असा घोर घालूं दिलास ?

या जन्मीं मीं प्रभुवर ! कधीं न्यायनीतीविरुद्ध
केलेला न स्मरत मजला अक्षमाही प्रमाद;
अल्पांशत्वें तरि परहित–ध्येयिं धी ठेवियेली;
सत्या–सत्वा–वरिल शिथिल प्रीति केंव्हां न केली.

एका भावें सुखि असुखिंही भक्ति केली पदांची;
श्रद्धा नाहीं ढळलि कधिंही त्वत्पदींची मनींची;
हें सारेंही विफल भगवन् ! केविं तूं मानियेलें ?
शिक्षा केली मजसि गहनीं कां तमीं लोटियेलें ?

या लोकींचे नृप अवसरा बंदिवानांहि देती
भेटायातें समयिं सुहृदां, अंतरीं आर्द्र होती;
कर्मन्यायासन परि तुझें ओळखीना दयेला !
नाहीं कोणा स्थळ लव तिथें ठेविलें कीं क्षमेला ?

होती पत्नी परि मम किती जाणसी पुण्यशील;
माझेपेक्षां शतगुण तिचा हक्क तूझेवरील;
संसाराला सरस चढला रंग, अव्यंग आला
सौख्याचा जों परिणत ऋतू तोंच नेलें तियेला !

सत्कृत्यें तन्मनिंचिं सगळीं जागचीं जागिं ठेलीं;
होती अंतःकरणिं विविधा हौस तीही निमाली;
झाले दुःखी प्रियजन,—तये थोरही दुःख तीतें:—
होती पात्र प्रभुवर! कशी ती अशा क्रूरतेतें ?

# श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

[ जन्म सन १८७१ ]

रा० रा० श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए., एल्एल्. बी. यांची समग्र कविता 'गीतोपायन' प्रसिद्ध आहे. 'साहित्य बत्तिशी' ही 'सुदाम्याच्या पोह्यांची' सुधारलेली आवृत्ति आहे. वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, वधूपरीक्षा, सहचारिणी, प्रेमशोधन, जन्मरहस्य, परिवर्तन, शिवपावित्र्य इत्यादि नाटकें महाराष्ट्र रंगभूमीवर आलीं आहेत. १९२२ सालीं हे पुणें येथील कविसंमेलनाचे अध्यक्ष होते.

## विलक्षण न्यायसभा

प्रतिवर्षीं मन्मानस भरवी एका न्यायसभेतें;
विचित्र तीची रीति रसिकहो ! परिसा तद्वार्तेतें.

गतवर्षीं जो दोषमुक्त हो तोचि पुढीलहि वर्षीं
न्यायासनापुढें राहि उभा, पूर्वीचि दोषें दोषी

वकिल मित्र मम दावुं पाहतिल कायद्यांतलें कलम;
त्यांसि विनवि मी, पहा पुढति जें गमे कृष्णमुख कलम.

आरोपी नच दुजा, मूर्तिमान् विश्वपिता जगदीश,
अभावरूपी त्यावरि राहे महाविलक्षण दोष !

अश्रद्धा नास्तिक्य तयावरि ठेविति हा आरोप,
तद्वच ऐकुनि मानस डोले होउनि संशय लोप.

अवसरिं अशा पुढें सरसावे प्रतिपक्षी हिमकाल.
सकंप यत्तनु कंबलवेष्टित, शिरिं नीहार दुकूल.

मीलितदंतपंक्तितुनि वाहे त्याचा वक्तृत्वौघ;
कर्कश रव करि, जलौघ जेवीं उपलीं रोधित वेग.

श्रद्धा अश्रद्धेवरची परि न शके तो उडवाया,
नास्तिक्याच्या वास्तव्यातें संशयिं कीं ठेवाया.

विरतवचन जैं होई, पुढती उष्णकाल सरसावे;
चंदनचर्चित तनुवरि कुसुमें, व्यजन करीं दोलावे.

मुखावरुनियां प्रवाह वाहे मोठा घर्मजलाचा,
वाक्प्रवाहही कोकिलवदनें चाले मंजु रवाचा;

विश्रांती न निज ओष्ठां देई तो ज्येष्ठापर्यंत,
त्या मागें सारुनि येइ पुढें वर्षा, जणों कृतांत.

झंझावात श्वास तयाचा, हातिं धुळीचा सोटा;
इंद्रधनूच्या दंष्ट्रेमधुनी निनाद करि तो मोठा.

विद्युज्जिव्हा लांब पसरुनी मेघगर्जनारूपें;
वाणीचा वर्षाव करि, सरी कोसळुनी शिरिं कोपें.

फिर्यादींची दुकल तत्क्षणिं करी पलायन वेगीं;
मानस उडुनी स्थानावरुनी ईशातें आलिंगी.

निवृत्त होई संशय सारा; प्रकाश हो हृदयांत;
ब्रह्मानंदहि खेळूं लागे स्वच्छंदें आत्म्यांत.

दुजा नसे पर्जन्यकालसम जगदीशासि वकील;
चुकलों—हुकलों—मद्रमणींचे विस्मरलों मृदु बोल.

शांत अशा रजनीच्या काळीं करीं घेउनी वीणा,
सुंदर कंठांतुनि आलापां काढी मंजुल गाना.

प्रत्यक्ष तत्क्षणिं ये ईशाचा; बुद्धि होतसे शांत;
तत्तारस्वर वाहन करुनी मन जाई स्वर्गांत.

ईशाची ही होय प्रतिभू, चिंतुनि हृदयीं ऐसें,
पावाया तादात्म्य तियेशीं आलिंगीं मी हर्षें.

एकचि आशा पुरवीं आशा; घन जैं कर्कश गर्जे,
रमणीगायन कर्णिं तरंगे, निधन तईं हो माझें.

---

# चंद्रशेखर

[ जन्म १८७१ ]

चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे यांच्या स्फुट कविता काव्यदोहन, रसतरंगिणी, अभिनव काव्यमाला, विविधकाव्यमाला वगैरे काव्यसंग्रहांतून आणि मासिकांतून प्रकाशित आहेत. चंद्रशेखर 'अर्वाचीन कविता' या पुस्तकाचे संग्राहक होते.

## उत्कंठिता

पथापथांतुनी छायेछायेमधुनि किती हिंडतें,
जागोजाग तुला धुंडितें,
रम्य रुपेरी खळखळणाऱ्या ओढ्याओढ्यावरी,
फिरतें ओढवुनी बावरी,
तरुराजींच्या वळणांमाजीं सीमांच्या संगमीं,
भ्रमतें पडुनि तुझ्या संभ्रमीं;
वळतें निराश मी मागती.
जळतें अपुली बघतां गती,
भलते विचार मनिं वागती,
सैरावैरा धांवुनि वेडें हें मन वाऱ्यावरी,
येतसे परतुनि थाऱ्यावरी.

खेदभरानें रात्रंदिन हें तनु माझें तापतें.
अंतर प्रेमानें व्यापतें,
येशिल नाथा ! पुन्हां कधीं ह्या खंतीनें सारखी
अनाथा तळमळते ही सखी;

किती निसासे त्यजितें, झिजतें, मी वरळें, विव्हळें,
वियोगें अशी तुझ्या आहळे;
पाडुनि या हृदयाला घरें,
करुनी शांतीचें खोवरें
छळिती किति विपदा–संघ रे !
कुणी कुणाच्या प्रेमावर कधिं असा बिब्रा फांसला
असे का ! सांग सख्या तूं मला.

हें स्थल केवल भूतलवरिचें नंदनवन साजतें,
जहालें उदास परि आज तें !
येथिल मौजावरुनी माझें दुःखाचें फैलावलें,
सुखांना ग्रहण तयें लाविलें !
मधुर सुगंधी बहु रंगेला वसंत मज भेटतो,
वृथा ! कीं विरह तयें पेटतो.
पालवी रमवीना कोमला,
ताजा गुलाबही कोमला
वाटे नको ! असें हो मला,
कीं उपयोगी नेउनियां जें भोगांवरि वासना
सजणा ! त्वां हरिलें त्या मना.

बहु रंगांचें मोहर, झेले, कीं मधुचीं वैभवें,
पहांटीं अभिनव होतीं दवें,
सुमन–सुवासें दरवळलेल्या कुंजांतें हालवी,
परिमल झुळुक कशी कालवी;
हे देखावे दिपावीति डोळे केवळ राजावळी,
भंवत्या सर्पगती हिरवळी,

आंबे तम ज्यांतुनि दाटते,
कोकिल बोलाविति भाट ते,
किलबिलं संगीतच्च वाटतें,
वनदेवींच्या सुमार्दवाच्या सुमधुरतेचा निधी !
तरि मज हा रमवींना कधीं.

हे तत्त्वांनों ! मी बडबडतें, व्यामोहा पावतें,
जिवाची ज्योत विझूं पाहते !
प्राणविसांव्या महाशया ! कां उशीर करिसी असा ?
मन्मनीं सवार हो, ये कसा !
असला काल करालहि उभा,
तरि ये, त्याची न धरीं सुभा,
दावी मुखचंद्राची प्रभा,
ये ये वेगें या करपाशीं—हृदयाशीं—राजसा !
जिव्हाळा, रामच माझा जसा.

---

# नरसिंह चिंतामण केळकर

[ जन्म १८७२ ]

रा० न. चिं. केळकर, बी. ए., एलएल्. बी., एम्. एल्. ए., संपादक केसरी, हे कवि, नाटककार, निबंधलेखक व टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. तोतयाचें बंड, कृष्णार्जुन युद्ध, चंद्रगुप्त, वीरविडंबन, भानुदास हीं यांचीं नाटकें रंगभूमीवर आलीं असून आयर्लंडचा इतिहास, स्वराज्याची कैफियत, सुभाषित आणि विनोद, लोकमान्यांचें चरित्र, ग्यारीबाल्डीचें चरित्र वगैरे ऐतिहासिक, राजकीय चरित्रात्मक ग्रंथ सर्वविश्रुत आहेत. बडोद्याच्या साहित्यसंमेलनाचे हे अध्यक्ष होते. भारतमहिला विश्वविद्यालय व टिळक-विश्वविद्यालय यांच्या सेनेटचे हे सदस्य आहेत.

## वेषभूषा

रचिसि वेषभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?
सुटले काळे केश मोकळे तैलबिंदु त्यांवरती,
विंचरिती मग हस्तिदंतमय कंकत घेउनि हातीं.
रचिसी केशभूषा ? अथवा कुसुमचापपाशा !

कुरळ कुंतला स्वैर बालकांपरि आवरुनी ठायीं,
उन्नतिमार्गें हळुहळु रिझवुनि नेतां श्रम तुज होई.
रचिसि मौलिभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

पेड पिळाचा वळुनि बांधितां ऐटदार वांटोळा,
शिवपिंडीतें वाटे वेढी सर्पराज जणुं काळा !
रचिसि वेणिभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

अर्धोन्मीलित कुंदकळ्यांचा गजरा घालिसि वरती,
गमतें गिरिशिरिं गंगामंडळ धरि रविकिरणें कां तीं.
रचिसि पुष्पभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

स्थिर तर्जनिनें सुरम्य कुंकुमतिलक लावितां भाळीं,
रक्त गोल जणुं प्रभात रविचा प्रकटे प्राचीमुळीं !
रचिसि भालभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

रत्नमुद्रिकामंडित अंगुलि ईचि करुनि शलाका,
विशाळ निर्मळ नयनसंपुटीं काढिसी कज्जलरेखा.
रचिसि नेत्रभूषा ! अथवा कुसुमचापपाशा ?

भूषाभूषित देहयष्टि मग बघसि जयीं आदर्शी,
प्रतिबिंबातें विंच तेंवि मम मन तव मन आकर्षी.
रचिसि वेषभूषा ? अथवा कुसुमचापपाशा ?

## कांटेरी गुलाब

अहा ही दैववशें लाधली,
विपिनीं फिरतां अवचित मजला कंटककलिता कळी.
करिं भरतां देई दिव्यगंध परिमळा,
उघडितां नयन करि प्रेमदृष्टि सोहळा,
ओष्ठासि देतसे स्पर्शमोद आगळा,
स्नेहसागरा संचित करिते वाटे प्रति पाकळी ॥ अहा ही !

परिवेष्टन ईचें दुःख फार देतसे,
विषकंटक हस्ता ठायिं ठायिं तो डसे,
नैराश्य येउनी जडत मनाला पिसें,
स्थिति ऐशी ही रक्त आटवी अंतःकरणा पिळी ॥ अहा ही !

तुज मान्य असे हें अमान्य अथवा कसें ?
दिल खुलवुनि कलिके ! बोल तुझें मन जसें,
रक्षणार्थ देसी दास्य मूल्य कीं असें ?

परवशतेंतुनि मुक्ति कराया तुजसि न कां कुणि बळी? ॥ अहा ही!
वद अथवा तुजला वेष्टन हें आवडे,
दाविसी दास्य कीं सोय सुखाला पडे,
धरुं नको बोलण्या स्पष्ट मनीं सांकडें;
करित मनाचें समाधान मग देउनि आशे बळी. ॥ अहा ही!

## माझा आवडता फकीर

जेवुनि खाउनि सुखें बैसलों रात्रहि दस घटका झाली
तंव फकिराची दीर्घ हांक ती मार्गामधिं ऐकूं आली.
न करि याचना न करि वंचना आशीर्वाद फुका देतो,
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो.

जसा एकला जगीं उपजला तसाच अजवरि तो राहे;
पुत्र कलत्रें स्नेही चाकर यांचा बंध न मुळिं साहे.
अन्य उपाधी कांहिं न जाणे देहावांचुनि सुखदुःखा
स्थान न उरलें; 'अल्ला' नामाशिवाय इतर न येत मुखा.
जसा पाहुणा दों दिवसांचा तटस्थ हा तैसा असतो;
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो.

जरी विरागी प्रपंचविन्मुख न करि जिवाचा कंटाळा;
ज्या देवानें निर्मियलें त्या सहज न म्हणतो कां पाळा?
क्षुधातृषादिक देहधर्म हे जन रीतीनें वारावे
याच हेतुनें केवळ खाउनिपिउनि पुष्टता तो पावे.
परि रुचि अरुची गोड कडू हा विवेक किमपि न मनिं करतो
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो.

जीवावरती लुब्ध असति जे त्यांचे प्राण हरायाला
विशेष गोडी मनीं वाटते क्रूर दुष्ट यमरायाला.

मृत्युभयातें हा नच जाणे; चाड त्या न या जीवाची;
चित्रगुप्त मग पान काढुनी फुकट कशाला हो वाची!
नव्वद झालें वय फकिराचें सदा निरोगी तरि असतो,
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो.

दिवसवेळचे प्रहर चारही निवांत जागा पाहोनी
अंधारामधिं सुखें घालवी ध्यानीं 'अल्ला' आणोनी.
रवितेजानें उजळुनि जातां प्रकट होउनी स्पष्टपणें
रूप जगाचें मलिन नीचसें दिसेल नयना या भेणें.
भिउनि तमाचा धरी आसरा घूकापरि विवरीं बसतो;
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा तो दिसतो.

रवि मावळुनी सकळ जगावरि छाया काजळि जंव पडते,
व्याघ्र सर्प वा तस्कर यांच्या नयनांनीं रजनी बघते.
तंव फकिराची स्वारि सोडुनी गुहा हळुहळू मग निघते.
अंगिं गोधडी तशि लंगोटी मिणमिण ज्योती धरि हातें!
थाट असा हा विचित्र पाहुनि कुतरा अंगावरि भुकतो,
भिक्षा मागुनि जरब राखिता धनी जगाचा हा दिसतो.

---

# Bee

[ जन्म सन १८७२ ]

नारायण मुरलीधर गुप्ते यांच्या कविता मनोरंजनादि प्रसिद्ध मासिकांतून व अर्वाचीन काव्यसंग्रहांतून प्रसिद्ध आहेत.

## बकुल

जीवाचें पहिलेंच फूल फुललें, दे, मींहि तें घेतलें.
स्वच्छंदें दिन दोनचार मग मी तत्संगमीं रंगलें,
रूपोन्मादभरागमें मज गमे सौंदर्य लोकेश्वरी
मी, माझा सहजाधिकार सुमनस्वीकार हा यापरी!
येता हो करभार घेउनि पुढें अन्य द्रुमांचा थवा
च्याकाटे मम चित्तवृत्ति बघुनी तो थाट त्यांचा नवा!
प्रारंभींच निशा वनांत अपुला अंधार पाडीतसे,
हातींचें बकुलप्रसून गळलें, केव्हां कळेना कसें!
सूर्याच्या प्रखर प्रभेंत न मुळीं नक्षत्र नेत्रां दिसे
जाणे चित्त परंतु नित्य गगनीं अस्तित्व त्याचें असे
चेतोगर्भनभांत नित्य तळपे नक्षत्र माझें तसें
तें मातें अथवा तयास बिसरे मी—हें वदावें कसें!
श्वासें देह करी सुवासित जरी संसर्ग याचा घडे,
चित्ता छंद जडे, अनावर मिठी प्राणास याची पडे,
स्फूर्तीच्या उठती अखंड लहरी याच्याच जीवांतुन
ठावें काय मला स्वभावाचि असे याचा असा दारुण.
पाहूं वाट किती! क्षमस्व म्हणतें! लाचार माझी स्थिती!
नेत्रीं प्राण उरे, करूनि बघणें आतां परीक्षा किती!

नारीधर्मरहस्यभाग नव्हता ठाऊक मातें जसा,
नारीचा हृदयस्थ भाव कळला नाहीं तुलाही तसा !

# तो दिवस

तमालदलसन्निभाभिरामा ती बोलूं गेली
वनराजांसह शरच्चंद्रिका ईषदेक हसली

'आठवतो'—वदली ती—'मजला घातक तो दिवस,
मोह अजुनही पाडूं बघतो जो मृत चित्तास,

निळ्या अंबरीं निळी निशा ओढूनि निळी बुंथी
उत्कंठेनें येतां लक्ष्मी 'कोणाला' पंथीं;

नेत्र तिचे त्या नेत्रा मिळतां लाल बुंद झाली,
घाबरल्या रजनीची पटकन् मग संध्या बनली;

मखमालीच्या तकतकणाऱ्या आस्तरणावरती
रात्या कमळाच्या कुणिं रचिल्या पंक्तीच्या पंक्ती,

गांवाच्या बाहेर वनीं मी तें पाहत होतें,
अकस्मात युवराजांचीही स्वारी ये तेथें.

अबलख वाजी, फेस मुखीं, उत्संखळ गति त्याची,
घामानें वर डबडबलेली मूर्ती स्वाराची.

लाल नयन, मुख लाल, करीं समशेर लाल लाल,
वेष शिकारी, उन्मादें मन झालें बेताल;

गौर तनूवर नूर विराजे, खुले वीरवृत्ती,
क्षणांत टाकुनि उडी खालती मज धरिलें हातीं

हिरवे, पिवळे लाल गुलाबी रजनीचे रंग
पटपट बदलुनि निवळुनि झालें नितळ तिचें अंग.

# फुलांची ओंजळ

सृष्टीचा लडिवाळ बाळ वेल्हाळ कवी धाकटा
अफाट जग-हाटांत पाहिला हिरमुसला एकटा.

कळवळली कनवाळु मनीं असमाय माय-मावली
बाजारांतुन काढुन माया-पांखर वर घातली.

चंद्र सूर्य खेळणीं दिलीं खेळाया तेजागळीं,
कुरवाळी हळुवारपणें पण न फुले कवि-मन-कळी

नक्षत्रांची—चटक फुलांची—माळ टपोरी नवी
जरतारी तारांत गुंफुनी लेंकरास लेववी

आकाशाचें अंगण झाडुन अवीट रंगें वरी
विचित्र रेखा—लिही लिही ती कळाचतुर सुंदरी

' बाळ उदासी वणवण भटकुन अपार निष्ठुर जगीं
असेल थकला—विचारांत या क्षणभर झाली उगी

निज प्रेमासम अमर्याद, अक्षय्य, विनिर्मित करी
शुद्ध दुधाची नदी; पाहती अजुनी जन अंबरीं.

एकाहुनि आगळीं एक, रुचिरत्वें निस्तुळ खरीं,
दृश्याचीं तीं असंख्य लेणीं पुढें मुलाच्या करी.

शिशुमन रमवायास करी आयास माय ती असे
अगाध माया मोठ्यांनाही नाचविते भलतसें !

अळुमाळ परंतु न तो रिझला—काळोख दाट दाटला—
अजाणपण—जाणीव उपजतां दृश्य—लोभ आटला

दृश्याचा अवडंबर अंबर पदर दूर सारुन
विशाळ वक्षीं घट्ट धरी मग कवीस कवटाळुन

सान्त अनंताची मिळणी ती, अगम्य अद्‌भुत खरी!
माय–लेंकरें अभिन्न झालीं निजानंद–सागरीं

सृष्टीशीं कवि समरस झाला–प्राण तिचा आंतला—
हृत्कमलाची तिच्या कळाली फुलती–मिटती कळा.

बोजड बाह्यालंकाराची–झणत्काराची–रति
नुरली, अर्थाकार तयाची झाली प्रेमळ मति.

कवीच झाला सृष्टी सारी, सृष्टी झाली कवि,
दिसण्याचें लपण्याचें गारुड अपूर्व हा भासवी.

आकाशाचा अणू घेउनी त्यांत विश्व दाखवी,
फुंकर घालुनि अजस्र विश्वा क्षणार्धांत लोपवी.

हा हंसतां हंसते ती अथवा हा रडतां ती रडे,
पहांट फुटते हा उठतां, हा निजतां झांपड पडे.

पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे,
लांबण मोठी, वाट बिकट ती, उतार चढ वांकडे.

सृष्टिचक्र हें तोल जाउनी कलतें भलतीकडे,
खडतर मार्गीं दीर्घकाळ तें केव्हां केव्हां अडे.

चक्र सचेतन, सतेज, पण कीटाच्या काळ्या पुटें
वक्र काळ हा काळवंडुनी करी कधीं हिंपुटें.

उंचवट्यावर केव्हां जातां प्रकाशकण पाहतें
पूर्णत्वाच्या भ्रांतीनें तेथेंच स्वैर नाचतें.

पाणथळीच्या खोटा तेजोभास पाहतां कधीं
सैराटपणें भडकुनि तिकडे फसतें चिखलामधीं.

स्नेहाभावें एक्या जागीं फिरूनि घरघर करी
तेंव्हां वाटे मार्ग कंठिला आपण हा कितितरी!

जाणीव आणि नेणीव मिळोनी स्वभाव याचा घडे,
तेजोन्मुखता परी न मोडे जरी सदा तें पडे:—

सुखाभिलाषें अंग चोरणें, थंडपणें सांदणें.
लाभालाभा तोलुनि मोजुनि रूढीतें चिकटणें;

या अवमेहुनि त्या अविचारी बुद्धीचे थोरले
पात निपात अनंत बरे तेजोभिमुखत्वामुळें:—

आनंदाला म्लानपणा नच सौंदर्याला क्षय
स्थलाकडे त्या जाताहे हें विश्वचक्र निर्भय.

मार्गाची रूक्षता न याला यत्किंचित जाणवो,
परिश्रमाची प्रचंडता नच अनुत्साह उपजवो.

काव्यरसामृत यास्तव कारुण्यानें निर्मुनि कवि
मृदु मधुरोज्ज्वल गीतें गाउनि तेजोबल वाढवी.

भूतकालचें वैभव किंवा सांप्रतची हीनता
प्रकर्षे भावी समोर दावी कवी समय—जाणता.

हित केव्हां कटु बोल बोलुनी, हातभार लावुनी
सृष्टिचक्र हें नीट चालवी वाट उजू दावुनी

भूताधारें समजुनि चालू काळ नीट निर्मितो
सोज्ज्वल भविष्यकाळाला; कवि धन्य नव्हे काय तो!

काव्य अगोदर झालें नंतर झालें जग सुंदर,
रामायण आधीं, मग झाला राम जानकीवर!

झाले कवि होतील पुढें, या विशाल कालोदरीं
अघटित घटना घडुन राहिली—कोण कल्पना करी—

भारतराष्ट्र—नभोमुकुरावर—साऱ्या पूर्वंभर—
चिन्हें दिसती महाकवीच्या आगमनोत्सवपर.

'राजनिष्ठ' कवि सांप्रतचे ते सर्व चला या मिळा,
या रायाचा मार्ग झाडुनी रचा चारुतर फुलां.

तुमच्या परंपरेंतचि याचा व्हायाचा संभव,
जनकत्वाचें पद तें तुमचें—तुमचें तें वैभव!

सृष्टीचे लाडके तुम्ही, संलाप तुम्हांशीं करी,
प्रलाप किंवा विलाप त्याला म्हणोत कोणी तरी!

“अद्वितीय उत्तम नसे सर्व तें अधम” म्हणुनि लेखिती.
दूषक तुमचे अपूर्व त्यांची तर्कांची पद्धति!

विजय असो तुमचा, तुमचे जे दूषक त्यांचा तसा,
रानफुलें हीं तुम्हां वाहिलीं नंदनवनसारसां!

---

# लक्ष्मण गणेशशास्त्री लेले

[ जन्म सन १८७२ ]

प्रोफेसर ल. ग. लेले पुणें यांची पद्यमंजरी, अलंकारप्रकाश, टिळक-सुमनांजलि, महाराष्ट्रवंदन, वगैरे काव्यपुस्तकें प्रसिद्ध असून 'विश्वमंगल' हें नाटक प्रकाशित झालें आहे. अभिनव काव्यमालेचा ४ था भाग यांनींच संपादिला आहे. यांचें 'अबलाविजय' हें खंडकाव्य अप्रसिद्ध आहे.

## आर्यमातृवंदन

नमो देवि मोदें तुला आर्यमाते
तुझा पुत्र मी हा पाहिं यातें
तुझ्यावांचुनी या गती अन्य नाहीं
पदीं लीन झालों तुझ्या दीन पाहीं,
तुझें तेज, सौंदर्य, औदार्य, शांति,
कृपादृष्टि, ऐश्वर्य, पावित्र्य, कांति,
विशालत्व, गंभीरता, प्रेमभाव,
क्षमा, स्थैर्य, धैर्य, प्रताप, प्रभाव;
सुगंधी, गुणांची अशा, दिव्य माला,
असे योग्य सर्वांचिया वंदनाला
स्मरोनी तिला अंगिं रोमांच थाटे,
स्तवोनी तिला लोचनीं नीर दाटे,
तुझें नाम माझ्या मुखीं गोड यावें,
तुझें रूप मीं अंतरंगीं पहावें;
त्वदीया गुणां आदरें नित्य गावें,
तुझ्या सेवनीं चित्त माझें जडावें.

तुझ्या अंगचें तेज माझ्यांत यावें,
तुझा पुत्र मी हें जनाला पटावें;
मला बालका दाखवीं मार्ग साचा,
तयानेंचि जाईन; हें सत्य वाचा
तुझा पुत्र शोभेन सर्वप्रकारीं,
असें व्हावयाची मनीं आस भारी;
तुझें नांव राखावया जन्मलों मी,
तुझें प्रेम माझ्या वसे रोमरोमीं,
तुला डाग लावील किंवा नडेल,
अशी कल्पनाही मला नावडेल;
दयासिंधुचा मोददायी तरंग
तुझा शांतवो, गे! मदीयान्तरंग.
प्रभुस्तोत्र तद्भक्त आहेत गात,
जनीं चंद्रसूर्यप्रभा फांकतात
तुझी तोंवरी कीर्तिगंगा प्रशांत,
शुचि, श्वेत, गंभीर राहो वहात.

## अबलांचें बल

श्रीकृष्णाची परिसुनि मृदु मधुर स्निग्ध लाडकी **मुरली**
मनुजाची काय कथा ? सुखतृष्णा ती मृगांसही नुरली,
दुग्धा नवनीत, सुमां सौगंध्य, तशीच वाङ्मया **कविता.**
कीर्तनरंगीं डोले नर **सारंगी**—स्वरासि आयकितां.
**मषिका** द्वितीय करिते कृष्णमुखी **लेखनी** विलास किती,
सुखदुःखाब्धिस भरती ओहोटी आणि ती पहा जगतीं.
पंडित कवि वीर नृपति सज्जन शिल्पी अशांस ती **शाला**
प्रसवे; केंवि तियेच्या सांगा गावें मनोहर यशाला?

परतीरातें न्याया समर्थ आहे जनामधें नाव
वसन, ध्वज यांलागीं दे शुचिता देवपणहि ती काव
मोठा किल्ला तरिही लहानशी रक्षिते तया किल्ली !
विस्तीर्ण भरतखंडा भूषविते भाग्यशालिनी दिल्ली.
जीवाला कंटाळति त्यां आश्रय दे कधीं कधिं विहीर.
म्हणुनिच जीवन-दानीं समर्थ तो वर्णिताति कविहीर !
जनतृष्णेसि हराया वाहति संतत तरंगिणी भुवनीं !
जिह्वासदृश रसज्ञा कवण ? नतिसमान कार्यसाधु जनीं ?
साधाया पुरुषार्थ प्रकतिविणें होय पुरुष असमर्थ.
वाणीशिवाय कोठें बसेल अन्यत्र नेटका अर्थ.
स्वमदें स्तुति देवांही खुलवी, भुलवी, तदंतरा मिळवी
निद्रा सुखवि दरिद्रा, उद्यमनिरता तदाधिही पळवी
युक्तीशीं शक्ति मिळे तरि मग साधे न कोणता अर्थ !
परमार्थी व्यवहारीं भक्ति फलप्रद, नरा करि कृतार्थ.
माळा गळां पडुनिया मंगलविजयार्थ सूचना करिती,
रंगावलि गूढार्थप्रकाशनीं फार निपुण कीं असती.
वक्राहि इंदुकला ती रमणीय गमे जनासि फार जनीं
शांतिप्रदा बहु रुचे मना तमस्तोमधामही रजनी
रुचि भिन्न भिन्न रूपीं सगळ्या सृष्टिस विचित्रता आणी
गीता शांतिसुखातें वितरुनि भवमुक्त करितसे प्राणी
बुद्धि-स्मृति-धृति-कृतिंना तर या लोकांत बहुत आदरिती
मृति सकलासि ग्रासी, रतिलागी हृदयमंदिरीं धरिती.

# बाळकृष्ण अनंत भिडे

[ जन्म सन १८७४ ]

रा० रा० बा. अ. भिडे, बी. ए. हे कवि व मार्मिक टीकाकार मुरूड जंजिरा हायस्कूलचे हेडमास्तर आहेत. ' फुलांचे झेले ' हें यांच्या कवितेचें पुस्तक प्रसिद्ध आहे.

## यशोमार्ग

१

" वज्रशिलांचा कणखर, काळा, अभेद्य, सुळका कोट पहा;
उंचीनें गुरकावी गगना, स्थूलपणानें दिशा दहा !
अकुंठ हा मति कुंठित करितो; कसला येतो हा हातीं !
वाट न कोठें पद ठेवाया; खात बसावें कां माती ? "
भ्याड वचन हें कानीं घुसलें शस्त्र माखलें हलाहलें,
धीर वीर दळपती खवळला, रक्त–रसायन सळाळलें !
वक्ष स्फुरलें, शस्त्र चमकलें, ठिणगी नयनांतुन झडली;
वीरमुखांतुन वाणी नाहीं, वीजच वाटे कडाडली !
" खबरदार हा ! मागें न वळा, पाउल उचला पराक्रमी,
पुढें घुसा, रे; वाट शोधितों, किंवा करितों नवीच मी ! "

२

सुंदर वस्तू जगांत भरल्या, कांहीं नाहीं कुठें कमी;
परी म्हणावें, " मार्ग शोधितों, किंवा करितों नवाच मी ! "
कीर्तिदेवतादर्शन व्हावें, मनीं असे का हा ध्यास ?
फार चांगलें ! कंबर बांधा सहन कराया आयास.

उंच कड्यावर अधान्तरीं जणुं त्या देवीचें राऊळ;
चढण निसरडी, अरुंद, खडतर; पाउल न ठरे मुळमूळ.
टकमक बघुनी, हात जोडुनी, गातां वाणी रडगाणी,
अजागळाला न लाभणारीं या देवीचीं हीं ठाणीं
सिंहासन हें भव्य कांचनी, स्थळीं मांडिलें जरि विषमीं,
मिळेल, बोला, "मार्ग हुडकितों, किंवा करितों नवाच मी!"

३

सरस्वतीचा प्रसाद व्हावा, अशी असे का उत्कंठा?
उद्यमभक्तावांचुन इतरा रीघ नसे त्या वैकुंठा
ब्रह्मकुमारी श्रीमन्तीला, अंगबळाला, मोजीना;
भक्तिश्रम या पायठण्यांनीं तिचा बांधिला असे जिना!
राजसुताचा, कृषीवलाचा, हिसाब येथें समसाम!
वेगवेगळ्या गिऱ्हाइकास न वेगवेगळा दरदाम!
सरस्वतीची प्रसादगंगा तयार येण्या तुजसाठीं,
भगीरथाची ताठ चिकाटी मात्र पाहिजे तव गांठीं.
अभ्यासाचें, धीरपणाचें, बळ व्हावें; रुचि असो श्रमीं;
घोष करावा, "वाट हुडकितों, किंवा करितों नवीच मी!"

४

ती व्हावी तुज 'लक्ष्मीदेवी सुस्मित वदनें पाहाती?
मेषपात्र जो अजगर, त्याला धरी न देवी ती हातीं.
सात सागरांपलीकडे ही क्षीरसागरीं जन्मा ये,
न मिळे, जुळुनी कर, आळवितां दैन्यें, 'पावें, गे, माये!'
सरळ पदाचा, अढळ कराचा, अचल मनाचा, नर-वीर,
तोच साजतो या अंबेचें मनाजोगतें करवीर.

शुभानना ही उभी धरोनी सोनफुलांची माळ करीं,
भूषवील ती कंठ तयाचा, अविश्रान्त जो काज करी.
स्थिर वृत्तीनें, दृढ भावानें, रमा, रमा, रे, सदुद्यमीं,
घोष करा, रे, " मार्ग हुडकितों, किंवा करितों नवाच मी."

# दोन चित्रें

## प्रणय–लोभ

### निसर्ग

बिंब रवीचें उदया आलें,
क्षितिज झळाळे लाल गुलालें.
किमया गमतें करि हें मातें,
उदयगिरि दिसे सम हें मातें.

स्वकरांचा रवि करा कुंचला,
विविध रंग मग तयें सिंचला;
चित्रकार हा क्षितितलफलकीं,
चित्र चितारी; विचित्र फल कीं!

सर्व सृष्टिचे वर्णजात हा.
एकवटोनी कुशल रवि, पहा,
पसरि गालिचा येथें सुंदर,
ज्यांतुन लाभे स्फूर्तिस कविवर.

विमल मधुजला नदी निर्झरी,
तयांत खेळति सुंदर लहरी;
असंख्य फुलत्या डुलत्या कमळीं.
परिश्रमें हा लोलमति अली.

कुठें धबधबा मिरवी शेखी,
तुषारांत सुरधनूस लेखी,
फेनमिषानें दांत विचकुनी
नाचे खिदळे, 'खो खो' करुनी.

दलसंघीं तरुवल्लीवरती
विहंग पुरविति संगीतरति,
प्रेमाचीं ते गाती गाणीं,
नंदनवनिंची तुच्छ कहाणी.

सुभगकान्ति, मृदु, मधुर, मनोहर,
दरवळति अती परिमळ मोहर;
गुंजारत, उन्मद मधु–पानीं,
रुंजि मांडिली या मधुपांनीं.

गगनांत निशीं शशी प्रकाशे,
सुरतरु कुसुमचि काय विकासे!
सस्मित किंवा रंभा–मुख तें
प्रेमकौतुकें क्षितिस निरखतें!

मंथर, शीतल, सुगन्ध, झुळझुळ,
प्रणयी पवन सुखा दे विपुळ;
स्पर्श तयाचा अद्भुत जादू,
तनूमना दे स्फुरण स्वादू.

## मानव

नीलाभ, प्रतिबिंब नभाचें,
विमल सरोवर शोभे त्याचें;
मेळा कमळांचा मधिं विलसे,
भ्रमरा भ्रमवी सुगंध सुरसें.

(N)



त्यांच्या कांठीं सुंदर खेडें
मना वेधुनी करितें वेडें;
द्राक्षमळ्यांचा वेढा भोंतीं
नयना सुख कर्पूरज्योती !

भरुनी नव दल, कुसुमें फुलली,
उपवनभूमी नटली, खुलली !
प्रिय पवन भिडे तिस त्या कालीं
पेर सुमांचा पडतो खालीं !

होई सुमफल–सुगंध साच
घ्राणमनोऽक्षिस निबंधसाच,
लतामंडपीं तरुण जनाचे–
सर्व मनोभू–प्रताप नाचे !

संगीताचे सूर नादले,
अतमृरसाचे लोट लोटले !
किति कंठाची मृदुमंजुलता !
काय खुमारी तालकुशलता !

उंच उसळुनी तरंगमाला
तुळे मन क्षण विहंगमाला;
प्रेमाचा निःश्वास प्रगटे.
प्रणयी अश्रुस अश्रू लगटे !

अधर अधरपण दे बिंबाला,
यौवनरस परिपक्वचि झाला !
लोचन चंचल तेजःपरिकर,
जणों तुडुंबे प्रणयसरोवर !

कामुक युवयुवतीच्या युगलीं.
प्रेमनदी भरपूरें फुगली !

परस्परांतें बघतीं उगली,
  करिती नयनें परंतु चुगली!
मेळविती तीं हस्ता हस्त,
  प्रणयसुखें मग झालीं स्वस्त!
आलिंगन न, प्रेमपिंजरा
  वाटे कोंडी कामुकान्तरा!

## प्रलय-क्षोभ

## निसर्ग

वीज कडकडे, मेघ गडगडे,
  पांची भूतें करिती झगडे!
तिमिरापासुनि तिमिर प्रसवे,
  प्रलय-पवन घसघसे अतिजवें.

रुधिरोक्षित जणुं दुर्धर चपळा
  जाळिल भूमिस गमे पळपळां!
द्वादश रवि हे जणूं भेटले,
  नभ त्यानें हें काय पेटलें!

सागरवीची गर्जति फेनिल,
  त्यांस चाळवी हा प्रलयानिल;
उच्चंबळोनी त्या गिरिसानू—
  तशा भासती; तें किति वानूं!

प्रलयकाल हा ऐसा भडके,
  भूमी कांपे, धडके, तडके!
भूस्फोटांतुनि निघती ज्वाळा,
  अणुसम फुटती पर्वत-माळा!

काळहुताशज्वाळारसना
चंचच्चपला चाटी भुवना,
दिशादसकडी होउनि धमनी
तिला स्फुरविते त्रिजगद्दहनीं.

घन तिमिरानें झांके भुवनीं,
लोट धुळीचे भरती गगनीं,
वृष्टि क्षितिला ताडी प्रजवीं,
सागरवीची गगना भिजवी!

दया—क्षमा ती पार दडाली.
सृष्टि क्षोभे, अद्भुत व्याली!
भूतगणें ज्या विश्व जाहलें,
त्यांनींच तया आज दाहलें!

प्रभंजनाच्या विषफूत्कारें,
प्रचंड सूर्यातप विस्तारें,
वारिक्षोभें, रसा विकंपे;
विश्वविरचना विघडे संपे!

विस्खळली ही भुवन—सांखळी,
भूतपंचकीं माजून कळी!
शून्यामधुनी जें ये उदया,
शून्यांतचि तें पावे विलया!

## मानव

दुंदुभिनादें गगन व्यापे,
रणघोषानें श्रुतिपुट तापे,

वाहुनि यंत्रें, भांडीं, चापें,
वीर धांवतां भूमी कांपे.
गोलस्फोट; प्रचंड गर्जन;
यंत्रहुताशनकृत बळभर्जन;
भल्लवाण—मुखिं रुधिर घोंटलें,
धूमप्रकरें तिमिर लोटलें.

गोलस्फाटें नरगजहयगण
किंकाळोनी उडती तडकण!
वायु जसा सुमपक्वफलांतें.
पाडिति यंत्रें शवशकलांतें!

वीरसहस्रें करिती हल्ला,
कठिनें कष्टें झेपुनि पल्ला;
झटती घ्याया अरिच्या तोफा,
ज्या यमगृहिंच्या गमती सोपा!
धूम्रघनांमधिं घुसती नेटें,
प्रलयानळ—सळ भोंवति पेटे,
गोळ्यांचाही वर्षे पाउस,
थांबविती हे परी न धुडकुस!

हटे न, सहुनिहि अपाय, पाय!
प्रसवे वदनीं न 'हाय! हाय!'
स्वतां मरति, परि अरिस मारिती!
ही काळाची विकट आरती!
व्याघ्रादि पशु क्रूर अकारण,
स्वजातिची परि करी शिकार न;

अपार मग यद्बुद्धिवैभवें,
  त्या व्हावें का नीच मानवें !

बुद्धि योजुनी, बनवुनि अस्त्रें,
  मनुजा ! घडुनी खरतर शस्त्रें,
स्वकीयजीवां वैरी ठरसी !
  वनपशुहि बरा गमतो मजसी.

सूंसूं सुटती जहाल गोळे,
  धडधड असंख्य मानव लोळे !
मानव न च हे राक्षस खासे
  प्रलय कराया जमले भासे !

---

# भास्कर रामचंद्र तांबे

[ जन्म सन १८७४ ]

प्रो० मायदेव यांनी रा० तांबे यांची समग्र कविता प्रसिद्ध केली आहे. त्यांच्या नांवाचें अजमीरास एक मंडळ आहे.

## विधवेचें स्वप्न

"सखे अगे ऊठ रवी उदेला !
झोपेंत तूं हांससि गे कशाला ?
गे ऊठ, गे ऊठ बहूत होई
गंगेस जाण्यास उशीर बाई."

गेली कुठें ती सरिता कुठें ती
उद्यान-शोभा, नवचंद्रकांती
गेले कुठें प्राणचि सौख्यदाते
नेल्याविना हाय अगाइ मातें.

कीं काय तें स्वप्नचि सर्व होतें
हो स्वप्नची; मी निजतें पुन्हा तें
पडो, मला तें सुख देइ फार
वाटे मला जागृति ही असार.

स्वप्नीं तरी हो सहवास कांता
सदा घडो हींच विनंति आतां
कोठोनियां हो सुख जागृतीं तें
लाभेल दुर्भाग्यवतीस मातें.

भेटा मला मी निजतें पुन्हा या
कां गे सखे जागवितेस वाया ?

अपार मग यद्‌बुद्धिवैभवें,
त्या व्हावें का नीच मानवें !

बुद्धि योजुनी, बनवुनि अस्त्रें,
मनुजा ! घडुनी खरतर शस्त्रें,
स्वकीयजीवां वैरी ठरसी !
वनपशुहि बरा गमतो मजसी.

सूंसूं सुटती जहाल गोळे,
धडधड असंख्य मानव लोळे !
मानव न च हे राक्षस खासे
प्रलय कराया जमले भासे !

हो नीजतें मी न पुन्हां उठेन
स्वप्नींच त्या सौख्यभरें असेन.

गडे भ्रमिष्टासम आज कां गे
तूं बोलसी यापरि नीट सांगें
झोपेंत कां गे वद हांसलीस ?
झालें असें काय तुझ्या मनास ?

स्वप्नांत उद्यान नदी विशाला !
ज्योत्स्ना सुरम्या, बघतां प्रियाला
तेथें तृषार्थी नयनीं पिऊनी
आनंद होता हंसलें तयांनीं.

रडूं नको सांग सखे पुढें तें
बोलाविलें खूण करोनि हातें
ही नीजतं मी न पुन्हा उठेन
स्वप्नींच त्या सौख्यभरें असेन.

## बिजली जशि चमके स्वारी

दुंदुभी दुमदुमे भारी
नभमंडल भरती भेरी !
धूलिनें धुंद दिक् चारी.
सेनाहि दिसेना सारी !
रणकंदन माजे भारी !
बिजली जशि चमके स्वारी
गडगडाट या तोफांचा !
खणखणाटही टापांचा !
ऐकुं ये त्यांत स्वारीचा

## भास्कर रामचंद्र तांबे

ध्वनि वीरां देत हुशारी !
बिजली जशि चमके स्वारी.

लखलखाट तलवारींचा,
चिलखतें आणि भाल्यांचा,
तिकडील तुऱ्या तोड्यांचा,
कशि बाइ ! मूर्ति मल्हारी !
बिजली जशि चमके स्वारी !

झुंजती वीर वीरांशीं !
तळपे मधिं स्वारी खाशी !
पाडीत अरींच्या राशी.
खणखणा झडति तलवारी !
बिजली जशि चमके स्वारी !

जळ झुले जसें वाऱ्यानें
तिकडील तशा शब्दानें,
कशिं बाइ झुलति हीं सैन्यें !
देईल विजय मल्हारी !
बिजली जशि चमके स्वारी !

हां दिली पाठ सेनांनीं
परि कशी स्वारि मागोनी
गंभीर, धीर शब्दांनीं
अरिवरी फिरवि माघारी !
बिजली जशि चमके स्वारी !

हो अरिंची दाणादाण !
लोटलें सैन्य मागून !
चमुशिरीं वारुवर कोण ?
तिकडीलच बाइ भरारी !
बिजली जशि चमके स्वारी -

# राजकन्या व तिची दासी

"प्रेम तयावर होतं, तर मग, तुमचं ना भारी ?"
"छे ! छे ! कसलं ? लेंक नृपाची मी; तो व्यापारी !"

"कुंवरजीस दावितां जवाहिर तो, तुम्हि त्यावरती
दृष्टि रोंखली हलु वरचेवर स्नेहें कां तर ती ?"

"छे, छे, भलतं ! खुळे, तयावर कां रत्नावर ग ?"
"खुळीच मी मज कशीं कळावीं मनांतलीं बिंगं ?

बोलुं लागतां कान दिला जरि चपापला स्वांतीं,
डोळ्यावरुनी गालीं कितिदां क्षणिं झळके कांती !"

"कळेचना मज तुझ्याच मनिंचे हे सारे चाळे !"
'खुळीस' कां मज शक्य 'नृपाच्या लेंकिस' जें जाळे ?

तुम्हास दावावया जवाहिर येतां कां त्याला
'जा जा' वदला मुखें—न नयनें लालि खुले गालां !

कां ओशाळ्या झालां ? लज्जित जणुं कवणा झालां !
कां पाण्याला—रत्नाच्या ? कां डोळ्याच्या ?—बोला !"

कधिं ग लाजलें ? कधीं पाहिलं मीं तेव्हां खालीं ?
नको जवाहिर, म्हणुनि म्हणालें 'जा;' कसली लाली !"

"काय आतांशा झालं तर मग तुमच्या जीवाला ?
कोमेजूं कां गाल लागले ?—तो येथुनि गेला !

उगिच बसोनी कां वाऱ्याला कान कधीं देतां ?
उगिच कुणाचा भास होउनी किति फुगतां फुलतां ?

हात ठेवुनी दारावर किति वेळ उभ्या असतां ?
जणुं उघडिल कुणि दार ! गवाक्षीं कां ढुंकित बसतां ?"

" कधिं ग दिला कुणिं कान ? कुणाला कधिं ग भास झाला "
" कळेल कैसं, देउनि चुकतां हृदयचि दुसऱ्याला ? "
" घे, घे, सटवे ! आळ घेसि तर भलता मजवरतीं
जा म्हण बसलं मन त्यांवर, चल निघ येथुन परती ! "
" कंवराणीजी ! का रागवतां ? ही 'लोचट' दासी !
क्षीण अवयवीं किति तरि खुलते छबि ही आतांशीं !
संचरलं तें वारं—स्मर कीं काय म्हणाति ज्याला
बहार उसळे किती चहुंकडे शरीर—वेलीला !
खैरपुराच्या गुणवयरूपें योग्य कुमाराला
राणाजी ते देतां म्हणतां 'ना' कां मग त्याला ? "
खैरपूर किति धनाढ्य त्यांना योग्य अम्ही कां ग ! "
" कंवराणीजी ! किती लपवितां मन ! किति हीं सोंगं ?
किति भोळ्या तुम्हि खैरपुरेशचि ते ! न व्यापारी !
वेष पालटुनि आले इकडिल बघण्या ही स्वारी ! "
" काय ?—पुन्हां !—ते—खैर—तेच—या—का—कूं—वरजी ते ! "
" मी खोटी, मी सटवी, लुच्ची, उर कां धडधडतें ? "

## मुषाफिर आम्ही

" मुषाफिर आम्ही
आम्ही वनवासी !
कशास्तव भुललिस आम्हांसी ? "
उभी महालीं ती
ती रजपुतबाला
तेथुनी बोले पांथाला:—

"तुमचि हो भरली
भरली मूर्ति मनीं
असां का परदेशी कोणी !
हृदय हें दिधलें
दिधलें तुम्हांला
इतर जन बापबंधु मजला !"
"मुली ! कुलशीला
कुलशीला बघुनी
करावा पति तो युवतींनीं !"
"महाकुल दिसतां
दिसतां रजपूत !
जाहलें भाग्य जरी अस्त !"
"वनफळें खातों
आम्ही वनवासी
राहतों किंवा उपवासी !"
"वनीं पक्वान्नें
पक्वानें करुनी
जशी तूं भोगिशि या भुवनीं !"
"तुम्हांविण अन्न
अन्न जरी अमृत
विषाहुनि कडू इथें खचित !"
"वनीं कोठोनी
कोठोनि कुसुमशय्या
टाकितो दगडावर काया !"

" तुम्हांविण शय्या
शय्या कुसुमाची
रुते मज कांट्याहुनि साची। "
भटकणें अमुच्या
अमुच्या या भाळीं
वणवण करुं रानोमाळीं ! "
" तुम्हांविण भुवन
भुवन मनोहर हें
वनाहुनि भयंकरचि आहे ! "
" कोठली आई
आई दादा ते !
राहतों वनपशुसह तेथें "
" तुम्हांविण आई
आइबाप असुनी
वाटतें शून्य मला सदनीं ! "
" जिवाला धोका
धोका रानांत !
नीट हें आणि ध्यानांत ! "
" तुम्हांविण जगणें
जगणें मृत्युच कीं
तयाहुनि दुःसह या लोकीं ! "
" कशाचें आम्हां
आम्हां घरदार !
कशाचा अमुचा संसार ! "

चालला वारू
वारू तेथोनी
धावली अबला मागोनी !

## 'आतां गाडि फू दादाशीं'

" तुझ्या गळां
माझ्या गळां
गुंफूं मोत्याच्या माळा!"
" ताई! अणखी कोणाला !"
" चलरे दादा! चहाटळा!"
" तुज कंठी
मज अंगठी!"
" अणखी गोफ कोणाला!"
" वेड लागलें दादाला!"
" मला कुणाचें ?—ताईला!"
" तुज पगडी
मज चिरडी!"
" अणखी शेला कोणाला!"
" दादा! सांगूं बाबांला?"
" सांग तिकडल्या स्वारीला"
" खुसूं खुसूं
गालिं हंसूं
" वर वर अपले रुसूं रुसूं!"
" चल निघ, येथें नको बसूं."
" घर तर माझें तसूं तसूं!"

"कशी कशी
आज अशी
गंमत ताईची खाशी!"
"आतां गाडि फू दादाशीं!"
"तर मग गट्टी कोणाशीं?"

## घट भरे

घटभरे प्रवाहीं बुडबुडुनी
न दिसे तुज का न पडे श्रवणीं!
पदर उडाला, उडे वायुवर
कुरळे उडती केसहि भुरभुर
प्रमदे! बघ त्यां सावर आवर
कां उभी प्रवाहीं शून्य मनीं?
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी!

स्वैर गार या झुळुका वाहती
मातीचा ये वास सभोंवति
क्षितिजीं बघ ढग वरवर चढती.
बघ घरा निघाल्या सोबतिणी.
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी.

सळ डोळ्यांवर, काय पहासी?
कान देउनी काय ऐकसी!
अचंचळ उभी व्याकुल दिससी!
उचलित घट का येवोनि कुणी?
घट भरें प्रवाहीं बुडबुडुनी.

पाउल नच तें शेत सळसळे.
शब्द न मानवि वारा बोले.
शीळ न, वायुच वंशीं खेळे!
कां विरघळसी भ्रमिं फिराफिरुनी!
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी.

कवळुनि पद, जल थरारुनिं हले,
स्पर्शुनि शरिरा वारा बरळे,
वेली हंसाति तुज, फुलवुनी फुलें
डोलती विनोदें तरु बघुनी!
घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी.

---

रा.क्र.१०४
३०६

# भालचंद्र

[ जन्म १८७४ ]

रा० गणेश नारायण टिपणीस हे महाड हायस्कुलांत शिक्षक आहेत. यांचें वासंतिका हें नाटक रंगभूमीवर आलें असून प्रसिद्ध आहे. वेड्यांचें इस्पितळ, नीलांबरी हीं प्रहसनें पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत. मासिकांतून यांचीं, क्लबांचें बंड, सासूबाई, बायकोचें भूत, व शुभमंगल वगैरे सामाजिक प्रहसनें प्रकाशित झालीं आहेत. तसेंच कांहीं विनोदकथा व संशोधनात्मक लेखही प्रसिद्ध असून हिंदूंची व्युत्पत्ति याचें इंग्रजींत भाषांतर झालें आहे.

## हिरकणी

[ **रायगडावरील हिरकणी टोंका**संबंधींची आख्यायिका प्रस्तुत पोवाड्यांत गाइली आहे.]

आश्विनमासीं पौर्णिमा दिशीं "या कोजागरिसी"
द्वाही ऐसी **शिवरायाची** फिरली मुलखासी!

खंडोगणती दूध पातल रायगडावरती .
लाखोगणती गवळी गवळिणि घेउनिया जमती !

त्यांत चमकती पहा **हिरकणी** हिरकणीच साची!
नाजुक साजुक केवळ पुतळी पिंवळी सोन्याची !

पोरवयाची परि आवरती ती संसाराची !
प्यारी **येसाजीची** ! भारी तालेवाराची!

"नत्ती ती नवलाख गर्डीची पाहियली नाहीं!
पाहुनि येत्यें, तान्हुकलें तें उठलें जंव नाहीं!"

लाडकोड पुरविता धनी तो "जा ये पाहुनि त— !
दूध घालवुनि फिर माघारी गवळ्यां सांगातीं!

घाई येई उभी गडावरि पांचाडाहुनि ती;
दोन विसा नी दोन दुधाच्या चरव्या सांगाती.

गडीं दुधाचे समुद्र पडले ! त्यांतचि दोन विसा—
दोन दुधाच्या चरव्या पडतां, पडला दिवस कसा.

रात्र पातली ! नगारखाना नौबत झडली ती,
ऐकत गुंगत गवळ्यासंगत रमली त्यांतचि ती !

रात्र पातली ! पुनवेचा तो चांद उडी घेई !
दूधचांदणें पडे, त्यांतची बुडे तिचें मनही !

रात्र पातली ! सनइचौघडे सुटले गडभर ते
ऐकत नादावत त्यांताचि हो वेडें पाडस तें !

रात्र पातली ! बत्ति पेटली नवलाख गर्दी ती,
पाहत पाहत चमकत चाले चांदणि त्यांतचि ती!

बत्ति उजळली वर आभाळीं ती दरबाराची.
कांचेची ती, साची जोती तळपे मुलखाची !

बत्ती ती पाजळे मनोऱ्यावरति महालाच्या,
जळीं तळीं भडकलीच दिसली गंगासागरिच्या !

बत्ती ती जगदीश देउळीं दीपस्तंभाची,
जिव्हा जी मोजितां होत हो मूकस्तंभाची

बत्ती वरती ! बत्ती खालति ! बत्ती चौफेरी !
बत्ती ती नवलाख पेटली ह्या परि गडाभरीं !

नटली नगरी शिवरायाची इंद्रपुरीच जशी,
बघतां गुंगे गवळ्यासंगें हिरकणि ती न कशी !

तोफ उडे तों धडड गडिंची पहिल्या प्रहराची !
साडेसात घडी रात्रीची, दिंडी बंदीची !

धडड ऐकतां दचके चमके हिरकाणि नागिणिशी
जीव उडे तो, ऊर धडाडे ! आतां गत कैशी !

उडे गड्यांतुनि धांवत दिंडीकडेस यायाला;
घडे पाहतां नको तेंच ! तों धीर तिचा तुटला !

दिंडी ती मृत्युची उघडणें सोपें हो साच !
ब्रह्माचा लेखही लिहविणें पुनरपि, तैसेंच !

परी गडावर शिवरायाच्या दिंडी उघडविता
इहलोकीं ना ! उद्यां तयातें भुवनत्रय मिळतां.

पाहुनि दिंडी·काळकठोरा बंद अशी " हाय !
तान्हुकल्याची पान्ह्याविण गति आतां हो काय !

हाय ! तान्हुल्या ! " करीत वेगें धरणीवर पडली
" तान्हुकल्या रे " करीत तीची शुद्धबुद्ध गेली !

दोन विसा नी दोन धांवते गवळी पाठिवरी
दिंडीशीं येऊनि पाहती धनीण धरणिवरी !

" पाणी ! पाणी ! " करीत कोणी पाणी तें आणी !
डोईवर शिंपडतां होई सावध तोंच झणीं !

" तान्हुकल्यारे " करीत सुटली तीरासारी ती !
" तान्हुकल्यारे ! " करीत ये पश्चिमटोंकावरती !

काळखाइसें काळकाइचें खोरें त्या खालीं !
वरी उभी ती कांठावरती हिरकणि हो झाली !

" किर्र " दरींतुनि रातकिड्याची, " घू—घू " घुबडाची
साद येत त्या, 'तान्हुकल्यारे' पडसादचि साची !

" तान्हुकल्यारे " करीत फुटला पान्हा तिजलागी !
पान्हा दे बळ तान्हाजीचें त्या अबले—अंगीं !

"तान्हुकल्यारे ! येत्यें आतां ! ताडमाड पाहीं
पहाड सारी दूर तुला तरि, आतां गति नाहीं !

अंबेनें घडविला साच हा तासुनिया हातीं
तरी तुला ती माझ्यापासुनि दूर न हो करिती !

तान्हुकल्यारे !" करीत टेंकी हात कड्यावरती,
दूधचांदणें भरी दरी ती, तींतचि उतरे ती !

दोन विसा नी दोन पातले गवळी तों तेथ,
"अर्वा !" करुनी बसती मटकन मर्दतिशीं बघत !

दूधचांदणें भरी दरी ती, तींतचि झळके ती !
बघतां बघतां बनीण हिरकाणि दर्यांतिल मोती !

× × ×

इकडे पांचाडीं येसाजी होई साच पिसा,
हिरकाणि येना म्हणून, जैसा जळाविणीं मासा !

तोफ उडे ती धडड गडिंची पहिल्या प्रहराची,
जीव उडे तों येसाजीचा, झोंपहि तान्ह्याची !

शंभ्यानें साधिला कायरे दावा ! मुलखाचा
दुस्मान—उभा कुळाशिळाचा—आयाबहिणींचा !

ठेवी डोळा तिच्यावरी तो फार दिवस पाही !
लेक पोळ हा सुटला ! करितो राजा तरि कायी !

बघ गे आतां बये तान्हुलें ! घेउनि मी येतों
तीशीं, दिंडी फोडुनी !—बघतों काय बाप करतो !

सडा उडाला, आवळुनि जरीफेटा डोईशीं !
फडां ठाकली मेढ उपटली ती हिसक्यासरशी !

टाकी ती खांद्यावर ! हा कीं भीमसेन दुसरा !
गदा टाकुनी स्कंधीं धांवे शत्रूसंहारा !

चोर टांगत्या आंब्याशीं तो एकदमीं येई!—
तोंच झळकली तळीं पहाडा हिरकाणि ती पाही !

धनी देखतां आंगावर ती उडी तया घेई !
मेढ टाकुनी, हातीं तीशीं झेली तो घाई !

खांद्यावरती टाकी ठोकी धूम, घरा येई !
"तान्हुकल्यारे ! " करितां हातीं तान्हुकलें देई !

* * *

दुज्या दिशीं ती वार्ता सरशी जातां रायाशीं,
पाचारी तो झणीं हिरकणीशीं येसाजीशीं !

प्रभू प्रजेचा, सिंधू साक्षात् तो वात्सल्याचा !
चोळीपाताळ गांव देउनी, गौरव करि साचा,

खरी हिरकणी ! खणी गुणाची धनीण येसाजीची,
नांव तीच ह्या पश्चिमटोंका होई ती साची !

म्हणुनि बांधी टोंकावरती बुरूज तो खंदा,
तत्कीर्तीचा गाता शाहिर भालचंद्र बंदा !

# हक्काची फांक

[ सरदेशमुखीचें वतन म्हणजे स्थानिक उत्पन्नाचा दहावा हिस्सा घेण्याचा हक्क ! ह्या हक्कासंबंधींची रायगडच्या सरदेशमुखाची आख्यायिका प्रस्तुत पोवाड्यांत गाइली आहे.]

थाटला हाट मोकाट गडावरि भारी !
ये टीप उकळण्या देशमुखांची स्वारी !

डोईस पागडी कंदी !
आंगीं ती बाराबंदी !
पायींची वहाण खंदी !
ये ठोकित काठी देशमुखांची स्वारी !
थाटतां हाट मोकाट गडावरि भारी !
" चल टाक टीप !". काढुनी सूर सरदारी
आरडे हरेका स्वारी भर बाजारीं !
" बागवानिणी ! कां देरी ?
चट टाक टीप ! का बाहिरी ? "
टकमक पाहीं म्हातारी
" हा पहा भोंपळा एकच ! भाजी दुसरी
नायींरे दादा ! करूं अतां काय तरी ! "
" आं काय ! भोंपळा एकच ! तर काढ सुरी !
नी टाक आमची हक्काची फांक तरी ! "
" भोंपळा कांपुं ! रे दादा
आहे तो जोंवर समदा
तों वरीच होई सवदा !
कापून मातिचें मोल तया बाजारीं !
फांकीस मोकळ्या कोणी रे न विचारी ।
" आं ! सटवे !" उसळे देशमुखाची स्वारी,
" घेतला भोंपळा !—काय तुझी दरकारी ? "
" भोंपळा नायिंरे दादा.
देणार तुशी मी कंदा !
टाकीन त्या परिस समदा

हा गडाखालतीं " म्हणून फेंकी ! स्वारी
" आं ! सटवे ! " आरडली, तैं घुमलीं खोरीं !
" आं सटवे ! जेथें वतन, तिथें हा ! थोरी
त्यापरीस दुसरी काय तरी संसारीं ! "

बोलोनि उडी हो घेती !
काळाला कवटाळी ती !
वतनाच्या पाठीं जाती !

कीर्तिचें मेळविति वतन देशमुखस्वारी–
थाटतां हाट मोकाट गडावर भारी !
" वाह्वा ! वाह्वा ! "–शिवरायाची स्वारी
गर्जली, वृत्त हें कळतां त्या दरबारीं !

वाह्वा देशमुख !–स्वारी
मात ही करितसां भारी !
ये तुमची आम्हां न सरी !

वेंचुनी जीव पुरुषार्थ साधिता चारी !–
थाटतां हाट मोकाट जगावरि भारी ! "

## महाराष्ट्र–धर्म

अजीवांत ज्यानें सजीवत्व यावें,
अबुद्धांत ज्यानें प्रबुद्धत्व व्हावें,
अवीर्यास ज्यानें नवें वीर्य द्यावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

हताशास ज्यानें नवी आस यावी,
नवी पालवी जीर्ण खोडा फुटावी,

नवें भाग्य ज्यानें अभाग्यास द्यावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

नवा जोम यावा, नवें तेज यावें,
जुने भोग ज्याच्यानियोगें निमावे;
खरे बद्ध ज्यानें पुरे उद्धरावे,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

जुन्या द्वैतवैरास ज्यानें हरावें,
जुने भेद ज्याच्यांत सारे विरावे,
महा घोर दौर्बल्य ज्यानें सरावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

खरी स्फूर्ति व्हावी, खरी शक्ति यावी,
खरी भक्ति राष्ट्रांत ज्यानें भरावी;
महाराष्ट्र ज्यानें खरें श्रेष्ठ व्हावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

महाराष्ट्र–भक्ती, तशी राजभक्ती,
जनीं मानसीं रोमरोमांतरीं ती
खरी संचरावी जयानें प्रभावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

महाराष्ट्र ज्यानें खरें एक व्हावें,
जळाचे जसे बिंदु वेगें मिळावे,
जयानें कळी काळही कांपवावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

स्वराष्ट्रास ऐश्वर्य मांगल्य यावें,
स्वराष्ट्रें महीमंडळा भूषवावें,
स्वराष्ट्रास ज्यानें असें ध्येय द्यावें,
महाराष्ट्र–धर्मा अशा जागवावें !

———

## श्रीकृष्ण नीलकंठ चाफेकर

[ जन्म सन १८७८ ]

हे हल्लीं डेक्कन कॉलेजमध्यें प्रोफेसर आहेत. यांचीं स्फुट काव्यें बरींच असून विद्वान् व अस्खलित वक्ते म्हणून यांची कीर्ति महाराष्ट्रांत पहिल्या प्रतीची आहे.

### मुरली

वंद्य सदा मुरली, प्रभूची, वंद्य सदा मुरली;
शब्दसृष्टि तशि जननमरणगति,
जिला वर्णितां कविची सरली; वंद्य सदा मुरली ॥ ध्रु० ॥

प्रभुहृदयाची अंतःस्फूर्ति,
चराचराची नादप्रीति,
अखिल जगाची शाश्वत शांति
जीच्या ठायीं समरस मुरली । वंद्य सदा मुरली ॥

दोन वितींची बहु छिद्रांची,
सहज भंगुरा स्थिति वनिं साची,
पुण्याई परी सद्वंशाची,
म्हणुनि कृपें करिं प्रभुनें धरिली । वंद्य सदा मुरली ॥

भवतापें सद्हृदयें उलती
अमित तींच जणुं मुरलिंत शिरती,
करुणामृतमय अधरप्रांतीं,
भरुनि सुखवि त्यां नित वनमाली । वंद्य सदा मुरली ॥

नादाचे आदि सकल जगताचा,
नादांतुनि उद्भव शब्दाचा,

शब्द जनकं शुचि काव्यनदीचा।
ममूर्त नादब्रह्मचि मुरली। वंद्य सदा मुरली ॥

# सुवर्ण—पिंपळपान

सुवर्ण पिंपळपान!। अमुचें। सुंदर आर्यस्थान
अमुचें। एकचि प्रेमनिशान
परांचें। ईर्ष्या—लोभस्थान
सुवर्ण पिंपळपान!। अमुचें। सुंदर आर्यस्थान ॥ ध्रु० ॥

विमल धवल, शिरिं हिमनगमुक्तावली हरितसे भान
मुक्तावली। हरितसे भान
परांचा। जिरवि सकल अभिमान
ज्यासम। उच्च न गिरि जगिं आन ॥ सुवर्ण० ॥

तिन्ही बाजुला सदा लकाकति सजल नीलमणि छान!
सागर। सजल नीलमणि छान
करिती। स्निग्ध मनोहर गान
अगणित। जीवां वसतिस्थान
जयांमधिं। निर्भय नौकायान ॥ सुवर्ण० ॥

शुचि, पावन, नदनदीजलौघें चमके जें चिरकाल
जलौघें। चमके जें चिरकाल
जयासम। अन्य न रम्य विशाल
जयातें। कवळूं न शके काळ ॥ सुवर्ण० ॥

कनक—रत्नमय लंका लोलक तळाग्रिं तळपे जाण
लोलक। तळाग्रिं तळपे जाण
जेथें। हरुनी रामनिधान

गमवी । रावण स्वेष्टप्राण
अगणित । रत्नांची जें खाण ॥ सुवर्ण० ॥

कर्मवीर, जगदीश, रवीन्द्रहि अढळवीर तो बोस.
रत्नें । उजळति विश्व विशाल
जयांतिल । दिपविति दिगंतराल
जयांचा । कर्मयोग करवाल
यशस्वी । कर्मयोग करवाल ॥ सुवर्ण० ॥

अनेक संकटिं यास रक्षिलें वेंचुनि बुद्धि, प्राण
पूर्वजीं । वेंचुनि बुद्धि, प्राण
रिपूंची । नमवुनि गर्वकमान
करुनी । अमर जगीं निजमान
असे हें । अमोल लेणें जाण ॥ सुवर्ण० ॥

प्रलयकालच्या प्रशांत समयीं योग–सुषुप्तिस्थान
प्रभूचें । योग–सुषुप्तिस्थान
मंगल । शैशवलीला–स्थान
अमुचें । संस्कृतिभाग्य–निधान ॥ सुवर्ण० ॥

अमर अमोलिक नित्य गणुनि हें लेणें प्राणसमान
गणुनी । लेणें प्राणसमान
मानुनी । ईशकृपावरदान
तयाचा । लव न करा अवमान
धरा शिरिं । भारत–भू–संतान ! ॥ सुवर्ण० ॥

---

# कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी, कल्लोळकर

[ जन्म सन १८८० ]

रा० कृ. बा. कुलकर्णी यांच्या कविता काव्यरत्नावली, अभिनवकाव्यमाला, विविध काव्यमाला, कवनगुच्छ यांतून प्रसिद्ध आहेत.

## भूस्वर्ग

जिचें पाहुनि मुख पूर्ण चंद्र लाजे !
जिच्या सर्वांगीं सुघटुता विराजे
केतकीच्या परि कान्ति जिच्या देहीं
गमे मूर्तच सौंदर्य जणुं असेही !

स्वरूपाला अनुरूप जिच्या ठायीं
सद्गुणांचा समुदाय जमुनि राही
श्रीच दुसरी जी भासते मनास !
अशी सत्कान्ता शोभवी गृहास.

अनायासें होतात जिच्या साह्यें
मानवांचीं बहुतेक जगीं कार्यें
सुखाचा जी बहुतांशिं हेतु आहे
अशी लक्ष्मी परिपूर्ण गृहीं राहे.

जया–वांचोनी इतर सर्व सौख्यें
खास जीवांना वाटतात दुःखें
जगीं सौख्याचा मूळ हेतु आहे
असें गेहीं आरोग्य मूर्त राहे !



रा. कृ. बा. कुळकर्णी.



कै. माधवसुत.

पूर्ण विद्या यद्देहिं भरुनि राहे
तरी विनयच हा मूर्त जणूं आहे
गमे किंवा गृह–दीप हा अखंड !
असा सत्सुत गृह शोभवी उदंड.

पौत्र अनुरूपच जे अशा सुताला
गृहीं करिती सानंद विहाराला
सदा चाले आनंद-राज्य गेहीं
कधीं दुःखाला वाव मिळत नाहीं.

बघुनि सद्रस ज्यांतील सुधा धाली
परम लज्जा पावून मान खालीं
अशा सत्काव्यांतील मधुरसाचें
गृहीं घडतें आतृप्ति पान साचें.

दीन दुबळ्यांचा जेथ परामर्ष
घेत असतांना दाटतसे हर्ष !
विविध शास्त्रांची देश-हिताचीही
सदा चर्चा चालते जिथें पाही.

सुखें असती अनुकूल सर्व ज्यांत
ठाव असुखाला कुठुन त्या गृहांत
नांव उचितच भू–स्वर्ग त्या स्थलास
नसे तदधिक सुरलोकिं सौख्य खास.

## रसालास

तूं खरा साधु गमतोसी। या जगीं रसाला ! मजला
निजशिरीं सुखें धरितोसी। संतापद रवितापाला

परि अर्पुनि सच्छायेसी । आश्रितां देसि सौख्याला
त्रास तूं न लवही गणिसी । जन जरी छळिति बहु तुजला

उलट त्यां फळें अति मधुर !
देउनी करिसी उपकार
ही स्तुत्य रीति तव फार !

तूं जगताचा सुखहेतू । सेवितें सदा तें तुजला.

---

# सुमंत

[ जन्म सन १८८१ ]

रा० आप्पाराव धुंडिराज मुरतुले यांचीं शोकतरंगिणी, माझे दुर्दिन, कन्यादान-फल, हीं खंडकाव्यें प्रसिद्ध आहेत. मौक्तिकमाला नांवाचा यांचा समग्र काव्य-संग्रह प्रसिद्ध आहे. सीतापुनर्वियोग हें यांचें नाटक प्रकाशित आहे. कवि-कुंजर व कविमौक्तिक या पदव्यांनीं हे विभूषित आहेत.

## अलोकगानेच्छा

लोकीं कुणी न भावे
मीं तेंच गान गावें ॥ धृ० ॥

गंभीर या मनाचें
जें कोड गूढ साचें
तुजमात्र पूर्ण ठावें
मीं तेंच गान गावें !

स्वर्गीं अनंत कालीं
तुझिया अपूर्व तालीं
जें जाहलें स्वभावें
मीं तेंच गान गावें !

स्वर्गीय सौख्यशैलीं
जी नेत गानशैली
जेथें स्वरूप पावे
मीं तेंच गान गावें !

गत--जन्म--पुण्य--राशि
जो वागवी उराशीं

गंधर्वराज व्हावें
मीं तेंच गान गावें !

आनंदकंद भक्षी
उड्डाण घेत पक्षी
लक्षी अलक्ष्य भावें
मीं तेंच गान गावें !

## पांवा

चुंबुनी सदा तूं लीलेनें फुंकावा !
सद्वंशखंड हा विश्व–विमोही पांवा
मुख याचें न्यारें, कंठहि याचा न्यारा
हृदयांत याचिया नसे आढ्यते थारा
ते विकार याचे गेले या छिद्रांनीं
हा रिताच केवळ भरोनि सर्व सुरांनीं
प्रतिसूर काढुनी लाव यास बोलाया
प्रतिराग रागिणी लाग यांतुनी गाया
हृदयानें याच्या उमटे हृदय तुझें तें
किति मृदुल माधुरी तुझी प्रत्यया येते
तव रूप भावुनी दीपीं भुलतो प्राणी
पांव्यांत गुंगतें श्रवुनि भुवन तव गाणीं
गुणवंत गुणानें गाजवितो निज नांवा
सद्वंशखंड हा विश्वविमोही पांवा !

## निराशा

तूं छेडुनि वीणा गात निघोनी जासी
हें दान राहिलें माझें माझ्यापाशीं !

मम गेहीं येउनि हांक मारिसी मजला
मी हृदयभावना नाहीं कथिली तुजला
मज भेटायाची तुझी न इच्छा होती
मातींत मिळालीं माझीं माणिकमोतीं

भंगिसी सुखाची निद्रा, स्वप्नें सरलीं
या जागृतींत ही केवळ तळमळ भरली
ठेविसी स्मृतीचीं पदचिन्हें मद्द्वारीं
कंठितों जन्म हा शोचूनि तदाधारीं

वायूत स्वर तूं उमटविसी त्या बोलें
विरहानल शमनीं करीन मी मन ओलें
तुजसाठीं धरिलें नित्य प्रेम उराशीं
हें दान राहिलें माझें माझ्यापाशीं.

## पूर्व आणि पश्चिम

सर पूर्वेची ये पश्चिमे न केव्हांही
दानवी दानवी, देवी देवी राही

पूर्व दे प्रकाशा, पश्चिम तिमिरा सोडी
धरि सुधा भिन्न, धरि सुरा भिन्न गुणगोडी

पूर्वेचीं रत्नें पश्चिम गिळिते सारीं
नांदतो केवळ स्वार्थ अधम संसारीं

पूर्वांतर गोरें, गोरी पश्चिम काया
प्रेमाच्या श्रीनें नटते निष्प्रभ माया

चिर पूर्व त्यागी, पश्चिम संग्रहकारी
धनदाची महती मिरवी नीच भिकारी

जन्मास घालिते पूर्वाचि, पश्चिम मारी
अधिकार गाजवी मृति प्रकृतिविस्तारीं
पूर्वेची सात्त्विक वृत्ति पश्चिमे नाहीं
दानवी दानवी, देवी देवी राही

## भिन्न मार्ग

सन्मार्गानें जातों आम्ही, कोण अम्हांला अडवील ?
तुम्ही लागलां दुर्मार्गाला, मार्ग तुम्हां तो रडवील
खडे बोंचितिल अमुच्या पायां
मिळेल आम्हां उष्णच्छाया
भरेल रक्तें तुमची काया
तमीं प्रस्तरां शिर जोरानें ठायीं ठायीं बडवील;
तुम्ही लागलां दुर्मार्गाला, मार्ग तुम्हां तो रडवील.

आनंदाची तार तुतारी लक्ष्य आमुचें वेधील
कारुण्याच्या किंकाळीनें व्हाल तुम्ही बहु बेदील
माध्यान्हींचा मित्र करांनीं
आशीर्वादिल अम्हांस मार्नी
शाप निशींचा श्रवाल कानीं
गळेल तुमचा धीर, भीरु मन भयें तुम्हां गडबडवील
तुम्ही लागलां दुर्मार्गाला, मार्ग तुम्हां तो रडवील.

पहाड तुडवुनि, तरुनि दरिया, गाठूं आम्हीं परदेश
खोल दराच्या पडुनि पंकीं, घ्याल तुम्ही पद नरकेश
पुण्य आमुचें अम्हांस साथी
पातक तुमचें चढेल माथीं
धराल दावा दीनानाथीं

विष ओकाल त्वेष दावुनी, तुम्हांलाच तें सडवील
तुम्ही लागलां दुर्मार्गाला मार्ग तुम्हां तो रडवील.
स्वतंत्र आम्ही बनूं आमुची विजयपताका फडकेल
अजयें जातां मरुनि, तुमचें पित्त द्वंद्वीं भडकेल

अम्ही सुखाची घेऊं गोडी
सुटतिल सारीं अमुचीं कोडीं
तुम्हांस शासिल ही घरफोडी

अभेद मोडुनि भेद पाडिला, खेद तुम्हां दृढ घडवील
तुम्ही लागलां दुर्मार्गाला, मार्ग तुम्हां तो रडवील.

---

# अनंततनय

## दत्तात्रेय अनंत आपटे

[जन्म सन १८८१]

पुण्याच्या ‘श्रीमहाराष्ट्र शारदा मंदिरा’चे पहिल्या दोन वर्षांचे हे अध्यक्ष होते. यांचीं (१) शारदादूतिका, (२) पुण्याची पर्वती, (३) अंतर्विद्धकलिका, (४) झोंपाळ्यावरील गीता इतकीं खंडकाव्यें प्रसिद्ध आहेत. स्फुटकविता हृदयतरंग भाग १ व २ यांत ग्रथित केली असून यांची अप्रकाशित अशीं आणखी स्फुटें आहेत. (१) तिलक-विजय आणि (२) माधव हीं दोन महाकाव्यें यांनीं हातीं घेतलीं असून तीं पूर्ण होत आलीं आहेत. भगवद्गीतेचें "महाराष्ट्र गीता" या नांवाचें यांचें भाषांतर विशेष प्रसिद्ध आहे. पुणें येथील कविसंमेलनांतील गद्यपद्य–लेखसंग्रह ‘कविसंमेलन’ या नांवाच्या पुस्तकानें ते प्रसिद्ध करणार आहेत. विद्यमान नामांकित कवींचीं चरित्रें दोन भागांत देण्याचाहि यांचा निश्चय आहे. हे काव्यकौमुदीचे एक संपादक आहेत.

## छत फोडतांना—

घाव हा आधीं घालितों, मीच आतां ॥ ध्रु० ॥

हिंदुद्वेष्ट्या पादशहाचे, गाई चरचर चिरणारांचे,
सिंहासन हें छत त्यावरचें, दिवसा ढवळ्या भाउ फोडितो !

अष्ट दिशींच्या दिक्पालांनो, गंधर्वांनो मरुद्गणांनो,
हे श्रीकृष्णा, पंडुसुतांनो, द्या तुमचें बल शौर्य मागतों !

छत्रपती शिव, तान्हा बांका, वीरासह या अप्पा, काका;
बसुनि विमानीं स्थलिं या ठाका, द्या आशी, कृतकार्यी होतों !

मात्रागमनी सैतानांनो, कुतुब नजीब्या उन्मत्तांनो,
यवनांच्याही अफदालींनो, वज्रबाहु हा पहा उचलतों !



१ अनंततनय, २ गो. गं. पोतदार (उभे), ३ ना. के. बेहेरे.



कै० रा० सा० वि. ना. कुळकर्णी.

या या सारे डोळे उघडा, केश उपटुनी दाढ्या तोडा,
तरीं मनगटें चावा फोडा, पहा छताला कर हा भिडतो !
काका तुमचा पगडीभाऊ, दावितसां मज ज्याचा बाऊ
सगळा कीं तो अर्धा खाऊं, बोला कां तो तोंड लपवितो ?
गात बढाया नृपनिष्ठेच्या, गोष्टी आत्याबाइपणाच्या,
सांगे तो मज थोर नीतिच्या, दिसे न कोठें सुरजमल्ल तो !
कोठें काका तुमचा कलिजा, जाट हजारों आणा जा जा !
हात धराया आतां माझा, माय कुणाची व्याली बघतों !
आणुनि दौलत रूमशामची, सिंहासन कां शाहा विरची ?
फोडाया मग भीति कुणाची ? निष्ठा कसली मला शिकवितो ?
श्रीकृष्णाचीं मथुरेमधलीं, श्रीरामाचीं अयोध्येंतलीं,
वदा मंदिरें कुणीं फोडिलीं ? कोण परी हा विचार करितो ?
श्रद्धापूर्वक पूजा--अर्चा, सदा करितसां तुम्ही जयांच्या,
पहा पायऱ्या केल्या त्यांच्या, पदीं शहा त्या नित्य तुडवितो !
खांब कळसही हे सोन्याचे, काबुलचे कीं इस्तंबुलचे,
सलति न का हे नेत्रीं तुमचे ? कोंवि वदा अपमान गिळवितो ?
जागा अमुची पैसे अमुचे, मालमसाले तेही अमुचे,
महाल मग हे वदा कुणाचे ? काय बायकी नीति शिकवितो !
जिकडे जिकडे दृष्टी फिरते, तिकडे तिकडे मजला दिसतें,
अमुचे सारें भरलें येथें, काय न बोला जीव जळे तो ?
जाट ** तो जावो निघुनी, जिवंत सुटलों जरी यांतुनी,
पुढचें पुढतीं घेउ पाहुनी, काय फोडुनी धरणी जातो ?
पहा हात हा खालीं आला, निशाणिंचा हा घाव बैसला,
गोरगरीब या वेंचायाला, रत्नमण्यांचा पाउस पडतो !

* * *

खळळ धप्प तों छत कोसळलें, सिंहासन त्या योगें फुटलें,
मणिमोत्यांचे पर्वत खचले, कोण कितिक त्या तरी वेंचितो ?

# गरीब गोवऱ्यावाली

"हात जोडिल्यें, पदर पसरिल्यें, पायीं लोळण घेत्यें,
नको नको बा, नको मला तूं लाथाडूं दीनेतें.

हाय हाय ! हा कसा वाहतो हात तुझा उलथाया--
माझ्या पाटी तशा गोंवऱ्या दाहि दिशां फेकाया ?

गवऱ्या इतुक्या करावयातें किती लागले कष्ट ?
याची तुजला काय कल्पना, जातीचा तूं नष्ट !

गल्लोगल्लीं आळोआळीं--नाहीं रस्तोरस्तीं,
सदा भटकल्यें नाहिं पाळिल्या लाज भीड या शिस्ती.

रानोरानीं माळोमाळीं ढोरांच्या मी मागें,
सदा हिंडल्यें घरीं न बसल्यें जीव जरी हा भागे.

नाहिं बघितली खिंड दरी कीं, नाहीं डोंगर म्हटला,
सदैव फिरल्यें घरीं न बसल्यें, देह जरी हा वठला.

नाहीं म्हटली मसणवटी मी सदा नदीचे कांठीं,
वण वण वण वण किती हिंडल्यें अपुल्या पोटासाठीं !

सकाळ नाहीं दुपार नाहीं नाहीं संध्याकाळ
पहाट नाहीं रात्रहि नाहीं फिरल्यें रे अळुमाळ !

नाहीं थंडी नाहीं वारा नाहीं पाउस ऊन,
सोबत संगत नाहिं पाहिली फिरल्यें कांट्यांतून ?

कसलीही भयभीती नाहीं उजेड ना काळोख,
पोटापाठीं दृष्टि ठेविली भली बुरी कीं चोख.

तहान भूकहि म्हटली नाहीं, नाहीं गणिली काया
पोहटि पोहटि शेण जमविलें पोटा या जाळाया

स्तनास असलें पोर तरीही तसेंचि तोडुनि त्यातें
शेण धराया धांवत जात्यें खळीस या भरण्यातें.

ओलें ओझें वाहुनि वाहुनि कंबर जरि ही मोडे
वांकुनि वांकुनि तरी जमवित्यें शेणहि थोडें थोडें !

जड ओझ्यानें थाळ जरीही आली या डोईतें
तरी न बसत्यें क्षण न टेंकत्यें घ्याया विश्रांतीतें !

त्या या गवऱ्या दारोंदारीं फिरवुनि पोटाकरितां
विकुनि मिळवित्यें पैसाअडका मी तेलमिठापुरता.

नाहीं कळणा, कोंडा नाहीं नाहीं कांहिं घरांत
मुलें उपाशीं सारीं बसलीं लावुनि दांतां दांत !

म्हणुनि गोंवऱ्या घेउनि आल्यें धांवत धांवत येथें
चांडाळिण मी, पोर तान्हुलें रडत टाकुनि तेथें !

बाबा म्हणत्यें दादा म्हणत्यें म्हणत्यें माय तुला मी
येवो करुणा अभागिनीची जाऊं दे मज धामीं !

नको नको बा ! नको नेउं तूं माझी दे मज पाटी !
जात्यें जात्यें खरें सांगत्यें पुन्हा न ये या हाटीं.

हिसकाहिसकी नको करूं मज घाल एवढी भीक;
दे दे पाटी दे आतां ही मागत्यें न आणीक !

किती ओरडूं किती रडूं रे ! पडूं कितीदां पायां ?
कशी न येई हाय निर्दया ! कांहीं तुजला माया !

नको ओढुं फरफरां, जराही नुरलें देहीं त्राण !
कालपासुनी उपवासी रे, याच गळ्याची आण !

पोट मिळालें पाठीला हें कसें बांधिलें पाहीं !
काकुळतीला किती येउं मी, पाटी सोड अतां ही !

परोपरींनीं असें विनविलें जरी तियेनें त्याला
दया न लवही नराधमाच्या शिवली त्या हृदयाला!"
फरफर ओढित नेलें तिजला पाटीसह त्या दुष्टें;
अधिकाऱ्यांचें कसें निर्मिलें चित्त गूढ हें मोठें!

## पुथून ताकला !

श्रांतमनें जडपदिं मी आलों पाहुनि गृहास परतून;
आलीं हांसत बाळें, चंद्रागमनीं चकोर धावून!
कोणी मत्कर ओढी, कोणी धरि उत्तरीय वस्त्रांतें,
घाली गळां मिठी कुणि, कोणी कवळी सर्वेंचि चरणांतें.
दिसतां न वत्सवृंदीं 'वनमाला' वत्सला सुता मज ती
मी जों पुसें न दारामागुनि 'हौगा' करीत ये पुढती.
प्रेमभरें म्यां तेव्हां लगबग त्या बालिकेस उचलोनी
किति चुंबिलें परोपरि हर्षें तिज दृढ धरून भुजकोणीं!
होता न तृप्त येणें पूर्ण करुनि घ्यावयास इच्छा मीं,
'दे गोड गोड' वदलों, 'पापा मज एक आणखी नामी'
'थांगा आर्दी' वदली बाला, 'मद काय आनिला थाऊ -
द्या मद मग मी देतें पापा हा गोल इकलचा भाऊ!'
परि मी न हें परिसतां उभय तिचे गाल चुंबिले बहुत,
सोडुनि खालीं वदलों, 'खाऊ देऊं उद्यां तुला' हंसत!
झालें; निमित्त पुरलें; तुरुतुरु जाऊन कोंपरा गांठी;
फुगले गाल चिमुकले पडलें क्षणभर कुलूपही ओठीं.
बोले काय पुनरपी बाला ती मत्समीप येऊनी,
'हूं हूं भाऊ! थाऊ देतां पापाच काडुं कीं पुथुनी!'

‘खाऊ न आज;’ वदतां, बोले, ‘हा ताकिलाच पापा’ तीं—
‘पुधुनी,’ काढि खरोखर निपटुनि तैं गाल चिमकुल्या हातीं..
‘नाहिंच पुधुला,’ ‘पुथला,’ ‘नाहिंच,’ ‘पुथला,’ ‘मुळींच गे नाहीं’
‘पुथला अगदीं पुथला, पुथला बल का, न लाहिला कांहीं !’
न सरे ‘नाहीं’ माझें, ‘पुथला’ न सरे, अखेर चिरडीला—
गेला प्रकार, आली बाला ती थकुनि फारचि रडीला !
रागारागानें तैं चुंबुनि मज रडत बालिका बोले,
‘नाहीं पुथला तालि द्या पापे हे पलत आपुले थाले !’

# नरहर शंकर रहाळकर

[ जन्म सन १८८२ ]

रा० न. शं. रहाळकर, बी. ए. यांच्या कविता काव्यरत्नावली, मनोरंजन मधून प्रसिद्ध झाल्या आहेत. समग्र कविता अजून अप्रकाशित आहे.

## भवितव्यता

प्रभात झाली, सूर्य उधळितो गुलाल गगनांत;
वृक्षलताही फुलें उधळिती प्रेमें डौलांत.

झुळुझुळु वाहुनि ओहळ सरिता गाति गोड गीत;
गान मधुर बहु पक्षी गाती मस्त लकेरींत.

पुच्छ उभारुनि थवा गुरांचा निघे वनीं जाया;
घुमवुनि पांवा गोड सुरांचा राखि गुराखि तया.

अशा अवसरीं एक कुमारी कटिं घट घेवोनी
मंद पाउलें टाकित आली गात मनीं गाणीं.

वय चवदाची, सरळ मनाची, खाणहि रूपाची,
नाजुक, मोहक बांधा शेंगच जणुं ती चवळीची.

श्वेतवर्ण ती, श्वेतवसनही ल्यालेली रमणी
अवतरली ही पुन्हां जणुं महाश्वेता या भुवनीं !

सरळ नासिका चांफेकळिपरि मोहक तरतरित
डोळे तीचे हृदयविदारक मारक गरगरित.

कुंतल काळेभोर मोकळे स्कंधावरि रुळती,
तरुणांचें मन बद्ध कराया जाळें पसरविती.

## नरहर शंकर रहाळकर

कठिण उच्च कुच वक्षीं बसले चकोरपक्षि अहा !
चंचुपुटें तीं सिद्ध कराया हृदया विद्ध पहा !

तनुलतिकेला बहार आला दोन फुलें फुलली,
उरस्थलीं तीं मुसमुसुनीया दिसती गरगरली.

पोर कुणाची ? ही गरिबाची, रूपें श्रीमंत,
ठुमकत मुरडत गजगति चालत धुंद यौवनांत.

निर्झरतीरीं जों न पातली काय असें झालें !
घट कटिंचा तो पडला खालीं, मुखही बावरलें.

पदर गळाला उडूं लागला वाऱ्यावर स्वैर,
केंस मोकळे उडूं लागले वदनीं भुरभूर.

काय ऐकते ? काय पाहते ? वृत्ती बावरली;
स्वतांस विसरुनि दृष्टि हिची ही कुणीकडे खिळली ?

* * *

तरुण बांड सरदार कोण हा घोड्यावर स्वार ?—
घोडा फेंकित अबलक आला कटितटिं समशेर !

झोंकनोक त्या सरदाराचा बाणा सरदारी,
शिरीं खुलतसे ऐटिंत त्याच्या मंदिल जरतारी.

भव्य भाल तें, भव्य वक्षही, रुबाब भव्य तसा
हया दावया पाणी आला त्या ठाया सहसा.

दृष्टि मिळाल्या, वृत्ति जुळाल्या, मनें एकवटलीं;
परस्परांचें भान हरपलें, हृदयें हारवलीं.

प्रीतीचें साम्राज्य माजलें; एकजीव झाला,
'मी तूं' 'तूं मी' मुळीं न उरलें, भिन्न भाव गेला.

* * *

ढग आकाशीं आले काळे, सुटला तो वात,
पोर परतली घरा, स्वारही गेला वाड्यांत.

तरुणि उसासे टाकी, चिंतन ध्यान करी त्याचें;
तोहि तसा निःश्वास टाकितां मनन करी तीचें.

लौकिक रीती, समाजरीती, उच्चनीच–भाव,
विषम स्थिति ही देइ न परि ती प्रेमाला वाव.

*　　　　*　　　　*

सरदारानें थोर कुलांतिल अन्य कुमरि वरिली;
मातापितरें तिलाहि दुसऱ्या गरिब वरा दिधली.

राजमहालीं जरी वसतसे मोठा सरदार,
प्रतिक्षणीं परि तिची मूर्ति त्या दिसे सभोंवार.

क्षुद्र झोंपडी तिच्या नशीबीं आली जरि दैवें,
सरदाराचें तरी करितसे ध्यान, नित्य भावें.

*　　　　*　　　　*

विधिनिश्चित भवितव्यताहि तिज कोण बदलणार !
" हें नच होतां तें जर होतें—" मनिं जग वदणार.

# नारायण महादेव भिडे

[ जन्म सन १८८४ ]

रा॰ना. म. भिडे बी. ए. यांच्या कविता मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

## फुलपांखरूं

सुरधनुष्य सुरम्य नभीं दिसे
गगनभूमिस जोडुनि जें वसे;
रचियलें गमलें जणुं मंडन
दिनकरागमनार्थ सु-तोरण.

उपरि नील वितान विराजतें,
अचलिं आसन खालतिं शोभतें;
अमर—चारण—गायन मंदसें
परिसुनी मृदु पद्मतती हसे.

सबल शत्रुसमुच्चय कंदुनी
गगनराज करांसह लंघुनी,
अतिविशाल नभोदर चित्रित
करितसे निज आसन मंडित.

वसन रक्त नवीन वसुंधरा
बहुत शोभत नेसुनि सुंदरा;
बघुनि कांति तिची तइं उज्ज्वला
तरलभाव झणीं कवि जाहला.

त्वरित जाउनि तो मग एकला
उपवनीं धरणीवरि बैसला;
स्थिरवतां निजतंद्रिसुखांतरीं
मधुर नूपुर झंकृति ऐकिली.

झटिति सावध होउनिया तयें
युवति कोमल देखियली वयें;
उलटली जिस षोडश वत्सरें
मदन पाहुनि रूप जिचें विरे.

समवयस्क सखी प्रिय सद्गुणी
स्मितमुखी सुमुखी निज घेउनी
विहरण्यास मुदें वनिं पातली,
बघुनि पुष्पफलें अति हर्षली.

सुखकरें स्वसखीसह हिंडली;
रुचिर पांखरुं पाहुनि बोलली,
'दिसत रम्य किती फुलपांखरूं
बघ गडे! चल आपण तें धरूं.'

वदुनि सोबतिणीप्रति यापरी
हळुच सावरिलें लुगडें वरी
करुनि केशनिबंधन मागुती
नितरमंद पदें उचली सती.

निकट पाखरुंच्या क्षणिं पातली,
पसरितां कर, बांगडि वाजली;
उडुनि जाइ दुजा लतिकेवरी
अभय रम्य पतंग सुखा वरी.

फिरुनि यत्न करी, सरली पुढें
विफल सर्व; तदा मनिं ती कुढे;
छबुकलें फुलपांखरुं तें उडें
विहरलें गगनीं मग बापुडें.

सकल यत्न दिसे तइं निष्फल
चमकलें नयनांत तिच्या जल
युवतिलोचनिं अश्रु दिसावया
लघुहि कारण होइ पुरें तया.

बहुत त्या सखिनें समजावुनी
तिजसि सांगितलें, 'अपुल्या मनीं
उगिच खेद नकोस करूं पुन्हां
खचित तें गवसेलचि आपणां.

पुसुनि नेत्र तिनें पदरा घरीं
परत जाइ सखीसह सुंदरी;
स्वगत तो कवि नंतर बोलला,
'अहह, खेद तिला किति जाहला !

'मनुज–जीवन–भव्य–वनान्तरीं
'रमति काम–पतंग किती तरी !
'सकल जाति उडोनि अनुक्रमें
'विदित होइ कसें न तुला रमे !'

प्रगटला उडुपुंज नभोदरीं,
वरुन शुभ्र धरा तइं पांघरी,
रजनिनाथ तिला करिं लोभवी
परतला स्वगृहीं मग तो कवि.

# साधुदास

[ जन्म सन १८८४ ]

रा० गोपाळ गोविंद पाटणकर यांचें 'वनविहार' हें महाकाव्य प्रसिद्ध असून 'रणविहार' हें अप्रकाशित आहे. सबंध रामायणांत 'विहार' करण्याची यांची मनीषा आहे.

## तें पाउल कोणाचें ?

गगनाच्या अंगणीं, उमटतें पाउल शुभलक्षणी
नाजुक गोंडस असें कुणाचें सांगा मजला झणीं !

संध्यारागांतुनी, तयाचा तळ दिसतो साजणीं,
स्वर्गंगेसमरेषा दिसती कधीं कधीं त्यांतुनी !

पाउल पडतां क्षणीं, जाहली तुटातूट पैंजणीं
कांहीं अस्ताव्यस्त विखुरले नक्षत्रांचे मणी !

कांहीं उरले गुणीं तयांतुनि रुणझुण उठतो ध्वनी,
कानीं येतो अव्यक्ताच्या तो अवकाशांतुनी !

गगनीं एके क्षणीं, दुजा तें उठलें क्षितिजांतुनी
पाउल दिसतें परी तयाचा कोण असावा धनी !

## संध्याकाळची सहल

पोकळ पाण्यावरती रे ! काळ्या नावा तरती रे
जाऊं त्यांच्यावरती बाबा, पाहूं नाना गमती रे.

शून्याच्या मैदानीं रे, अद्वैतांचीं गाणीं रे,
नटली संध्याराणी बाबा, ल्याली सुंदर लेणीं रे.

अधांतरींचा गिरीरे, त्यावरि चढली नारी रे
सृष्टि कवळुनि सारी उधळी, गुलाल नाना परी रे !

आरपारशा छतीं रे, जळती अनंत वाती रे
वातींच्या त्या ज्योती चाळूं, ओतूं द्युतिचीं पोतीं रे !

उभ्या नदीच्या थडीं रे, रत्नांच्या उतरंडी रे
रत्नें घेउनि थोडीं करूं या, तिजवरुनी कुरवंडी रे !

शुभ्र विधूचा चेंडू रे, मुठीमधें तो कोंडूं रे
प्रतिभेचा या दांडू करुनी कळिकाळाला दंडूं रे !

स्वर्गंगेचा पूल रे, त्याच्यावरती झूल रे
जाऊं नेदी तोल बाबा, सहलाचें हें खूळ रे !

---

# केशव महादेव सोनाळकर

[ जन्म सन १८८६ ]

या कवींच्या समग्र कवितांचा 'कमलपराग' नांवाचा संग्रह प्रसिद्ध आहे. गद्यवाङ्मयांत 'प्रेमयोग' हें नाटक व 'अमृततुषार' हें तात्त्विक विचारांचें पुस्तक अशीं दोन पुस्तकें यांच्या नांवावर वाङ्मयमंदिरांत दिसतात. "कमला" नांवाचें एक महाकाव्य यांनीं लहानपणापासून आरंभिलें होतें. पण तें हरवलें, हे काव्यकौमुदीचे एक संपादक आहेत.

## ईशस्तवन

सुधा-कलश प्रभु प्रेमरसाचा । प्रेमरसाचा । भूवरि साचा ॥ सुधा० ॥
लाभे मजसी न्यून नसे तरी । व्यर्थ असे हव्यास सुखाचा ॥
या रसरंगीं रंगे कोणी । तो भाग्याचा भूवरि साचा ॥ सुधा० ॥

## प्रेम

जीवलतेवर कळी उमलली, गुलाब त्याचा हा फुलला
प्रेम जगीं म्हणती त्याला.
चिद्ब्रह्माचा अंश भूवरी जो ईशें ओतून दिला
प्रेम जगीं म्हणती त्याला.
हास्य विधूचें, सुरांगनांचें गान स्वर्गी म्हणती ज्याला,
प्रेम जगीं म्हणती त्याला.
हंसती फुलती नभीं गुंगती तारागण बघुनी ज्याला.
प्रेम जगीं म्हणती त्याला.
भूप्रारंभापासुनि मारुत धुंडितसे त्रिभुवनिं ज्याला
प्रेम जगीं म्हणती त्याला.



१ केशवराव सोनाळकर, २ नाथ निफाडकर, ३ नानासाहेब फडणोस.



कवि गणेशप्रभु.



कवियत्री सौ० फुलमाळीण.

ज्या जादूनें भारुनि ब्रह्मा *चालविलें ब्रह्मांडाला,
प्रेम जगीं म्हणती त्याला.
सृष्टीच्या नैसर्गिक सौंदर्याचा जो भरला पेला.
प्रेम जगीं म्हणती त्याला.
ज्या स्फूर्तीनें तन्मयतेनें कवि करतो नव काव्याला,
प्रेम जगीं म्हणती त्याला.

# प्रेमरहस्य

प्रीति ग बाला । वाजवी तंतुवाद्याला ।। ध्रु०।।

जीवसृष्टिची सतार करुनी
मनोवृत्तिंच्या तारांवरुनी
कोमल कर अपुला फिरवोनी
सुस्वरतेला । लाजवीत वाटे बाला ।।

सप्त लोक मधु-रवें भारुनी
विश्वाची अनभिषक्त राणी
बसली तेजोमय सिंहासनिं
ब्रह्मांडाला । नवजीवन अर्पायाला.

प्रभा जियेची दिव्य पसरली
व्यापुनि जी ब्रह्मांडा उरली,
जिणें आणिला स्वर्ग भूतळीं.
शिकवायाला ।। समतेच्या गूढार्थाला ।।

---

* या ठिकाणीं मूळ—'चालवीत ब्रह्मांडाला' असें होतें, तें माझ्या बाल-कवीनें "चालविलें" असें केलें! त्यामुळें त्या विचाराचें काय स्वरूप झालें तें रसिकांनींच जाणावें.

सुर-मानव हा भेद न उरला.
रंक–राव शब्दार्थ लोपला
दिव्य ओळखी दिव्यत्वाला
सुखदुःखाला। दिव्यत्वीं मोक्ष मिळाला॥

प्रीति–हेतु परमेश यांतलीं
भेद–बुद्धि येथेंच निमाली
प्रीति भक्ति दिव्यत्वें झाली
दिव्यत्वाला। स्वर्भू हा भेद कशाला ? ॥

## प्रेमसंशोधन

हारपलें मम काय ? जें मी शोधितसें जगिं हाय !
नाम तयाचें काय ? कोठुनी आलें कोठें गेलें
कुणी, कसें मद्हृदय–मंदिरीं, शिरुनि तयाला हरिलें ?
कुसुमसौरभा हारुनि वाहे पवन मंद ज्या कालीं
वसुंधरेला धवलचंद्रमा धवल करें कुरवाळी !
वसंतागमें वनदेवीच्या हास्य विकसलें गालीं
प्राप्त जहालें मला अहा ! तें सुखद अशा त्या कालीं.
हृदयपद्म–मधुलुब्ध–भृंग हा कोठुनि वैसा आला
समग्र मधु समवेत घेउनी लुप्त कसा तो झाला ?
सलज्ज–सस्मित–वदना रजनी धवल नुरें ओढोनी
सहर्ष हा संचरे तियेसह हिमांशु गगनोद्यानीं
आम्रवृक्ष–परिरंभित लतिका आनंदानें डुलती;
नसेल ना लाभलें तयांना जें होतें तें चित्तीं ?
खरेंच कां तें हारपलें वा मद्हृदयीं तें राहे–?
हत दैवा ! मज हेंहि कळेना–वेडी तर मी नाहे ?

केशव महादेव सोनाळकर

## प्रेमयज्ञ

[स्वार्थत्याग व प्रसंगविशेषीं प्राणत्याग हीं सत्प्रेमाचीं भयंकर दिव्यें होत.]

भूषित करिशी वसुंधरा
सख्या! पांखरा! रसिकवरा!
प्रणय-गूढ उकलोनि जनीं
प्रणयरूप जाशी बनुनी.
म्हणोत कोणी
जन अज्ञानी
"अविचारें दीपावरती
त्वां अपुली दिधली अहुती.

ममत्व अंतरिं ठेवोनी
वांच्छिति प्रणयीं सौख्य कुणी
विकारवश जीं अशीं मनें
तींच निंदितिल तुला मुने,
प्रीति-हेतुला
सर्वस्वाला
अर्पुनि तूं तन्मय होशी
पूज्य म्हणुनि गणितों तुजशीं.

प्रणयरूपिणी मधुर सुधा
प्राशुनिया विधिनें बहुधा
मूर्ति तुझी गोजिरवाणी
निर्मियलीसे सत्य जनीं
कारण त्याविण
प्रेमाकर्षण

जें अद्‌भुत त्वद्‌हृदीं वसे
संभवेल हें सख्या! कसें?

प्रेम तुझा जीवन--हेतु
तूं प्रेमाचा बिसतंतु
अमूर्त प्रेमाची मूर्ती
दिव्य दीपिकेची ज्योती,
मोक्ष--कालसा
वाटुनि सहसा
तन्मय तूं सखया होशी
वेडें परि मजला करिशी -

---

# नाथ निफाडकर

## एकनाथ यादव निफाडकर

[ जन्म सन १८८७ ]

यांचीं मधुमालती, तारागड, सोनपत-पानपत, हीं खंडकाव्यें प्रसिद्ध आहेत. शिवसाम्राज्य नांवाचें महाकाव्य अप्रकाशित आहे. विद्याधर, पद्माबाला व कुस्करलेलें फूल हीं यांचीं अप्रकाशित खंडकाव्यें व नाट्यगीतें होत. यांचीं गद्य पुस्तकेंही पुष्कळ आहेत. कर्मयोगी मासिक, लोकमान्य मासिक व संदेशदैनिक यांचे हे संपादक होते. कै० बालकवींचीं मधुगीतें यांनींच संपादिलीं आहेत. हे काव्यकौमुदीचेही संपादक आहेत. यांची सर्व लहानमोठी कविता 'काव्यमंदिरा' नांवानें लवकरच प्रसिद्ध होईल.

## हे दिन !

हे दिन—हा! कसे पहा आलेत अम्हां !
येतात तरंग नाना चित्तांत;
खळबळतें हृदय आमुचें रसरसतें;
परि नाहीं बोलाया सत्ता कांहीं !
रानांत उगवुनि कलिका मरतात;
गगनांत अनंत उडुगण दडतात;
राष्ट्रांत प्राणी असंख्य मरतात;
चित्तांत उठुनी विचार फुटतात;
हृदयांत थबथबले रस सुकतात;
देहाला वाव मिळे ना फिरण्याला;
मग सृष्टि दृष्टीसम फिरते उलटी;
हे दिन—हा !
असे पहा आलेत अम्हां !

# पार्वतीची भीति व भाऊचें धैर्य

पार्वती—

" प्रिया न येई धीर मला हो अपुल्या या वचनीं,
कसेंसेंच या मनास होतें न कळे मज अजुनी !
क्षणांत वाटे मीं सिंहासनिं पाहियला पुत्र,
उगाच वाटे कधीं न जावी ही अजची रात्र.
कधीं गमे वेडीच जहाल्यें निष्कारण मी हो !
मधुनीमधुनी वाटे आतां जीव निघुनि जावो !
एक खरें कीं मला अजूनी दिसते ही मूर्ति
प्रज्वलीत तेजस्वि तपाची मूर्तिमंत पूर्ती.
येथें आल्यापासुनि अपुल्या हातीं तरवार
दिसते, मजला पायांखालीं प्रेमें अनिवार.
लढतां लढतां मामंजी मम दोघे येतील,
शौर्या भुलुनी तुम्हांस माझ्यापासुनि नेतील.
नका नका हो ! नका नका हो ! नका नका नेऊं !
माझ्या प्राणाविना कशी मी या लोकीं राहूं ?
या लोकाची इतुकि न परवा, वरच्या लोकांत
माझ्या भर्त्याविना न कोणा स्थल या चित्तांत.
असतिल अपुले सुत माझे परि जीवींचेच धनी,
नाथाविण मी अनाथ कैशी राहूं त्रयभुवनीं ?
अपुला सुत अपणांस हवा तर यावें या जगतीं
समशेरीनें पुनः करावी देशाची भक्ति.
पहा पहा हो, या अधमानें वेढियला अपुला
सुत, मोठ्या कपटेंच नजीबें द्वेषें दंशियला.

आली वेळा पराक्रमाची, कीर्तीची आतां,
छे छे शिवबासाम्राज्याच्या सेवेची ताता!
कशास मग मम भर्त्या, अपुल्या त्या लोकीं नेतां?
नेतां येथें कुणीं करावें साम्राज्या आतां?
सारें साम्राज्यच हें बनलें कैतव आज कसें?
महाराष्ट्रबुद्धिही अशी कां युद्धीं आज फसे!
हरहर माझा प्राण लोपतीं लोपेलच देश!
साहवती ना मामंजी या हृदयातें क्लेश!
माझ्याकरितां जरी न, देशाकरितां राहूं द्या!
या मूर्तीचें प्रचंड वैभव लोकीं गाऊं द्या!
जातां मूर्ती मरेल अपुला महाराष्ट्र खास;
कशास घेतां या राष्ट्राच्या प्रेमें जीवास!
शेवटला हो, शेवटला हा महाराष्ट्रवीर!
नेतां याला शत्रूतें हो, येईलच धीर.
पदर पसरत्यें, पाया पडत्यें स्वप्राणां देतें!
मामंजी, द्या भिक्षा यांची माझ्या राष्ट्रातें!!"
बघुनि अशा या पुढच्या चित्रा पत्नीप्रेमाच्या
भाऊच्याही हृदयिं उदेल्या वृत्ति निराशेच्या.
परंतु नव्हतें लेचेंपेचें भाऊचें हृदय;
नशिबाचेही फेरे पचले तेथें किति अदय!
खरा मराठा! खरा मर्द तो! नशिबाही खाई!
मरणाचा मनिं वालीशम त्या भयलेशहि नाहीं..
मृत्यूच्या दाढेंत आपणां नेत्रें जरि पाही,
आकांक्षेतें पराक्रमाच्या धरि तो तेथेंही.

तारेतें वालिनें भाउनें तसें पार्वतीतें
म्हटलें गेलें नाथकवीच्या खोल अंतरीं तें

भाऊसाहेब—

" भार्ये, आलें मरण उद्यां जर रणसंग्रामांत,
येवो, यावा असाच शस्त्रें वीरातें अंत.
देव शिवाजी परंतु अपुल्या मंदिरींच मेले,
राजारामहि नच शस्त्रां परि रोगा बळि पडले.
खरा वीर तानाजि तसा तो बाजि देशपांडे,
मरतां मरतां रणांत त्यांनीं कापियले लांडे.
किल्ला आला परंतु गेला मित्र जिवाचा तो
रणांत म्हणुनी धाय धाय गे, शिवराजा रडतो.
शिववा गेले, गेले त्यांचे वंशजही दोन;
गेले दोनच पूर्व पेशवे रणयश मिळवून;
परंतु आला आजवरी गे, कुरुक्षेत्रिं कोण ?
एक रघू कीं दुजा सदू हा, यांतें तो मान !
दादा आले परंतु शत्रू टेंचियला नाहीं;
अजुनी अमुच्या समोर पूजी रणखांबा पाहीं !
कार्य तेंच भर्त्यास तुझ्या या राखियलें त्यांहीं,
करील गोळा इस्तंबूलीं भाऊ चवथाई.
दख्खनची सौभाग्यगळसरी शिवसाम्राज्याची
देउन माझ्या विश्वासातें इस्तंबुलिं साची.
रुद्राचें आरक्त रक्त या सदाशीवदेहीं,
शत्रुमर्दनासाठिंच आलें भूमीवरि पाहीं !

बाजींनीं सोडिलें निजामा करण्यातें बंड,
त्याच निजामा रगडुनि केलें भाऊनें थंड!
तोंच उदेला शत्रुत्रिपुरच उत्तरेंत आतां;
कसा न यावा बळी तयाचा रुद्राच्या हाता?

हिकमत करुनी अब्रदलीनें भाऊ वेढियला—
छे! सिंहाचा जठराग्नी गे त्यानें चेतविला!
झांगड नौबत दणादणा गे, तासे रणब्रहिरी,
मर्फे तर्फे रणांत कर्कश वाजतील भेरी.

जखमांची गणती न उद्यां गे, कबंध नाचतिल;
अमुच्या शौर्या बघुनी स्वर्गी देव डोलतील!
गोळ्यासरसा चुटकीसरसा उडेल अब्दली
गिझनी घोरी कशास त्यातें दिसेल ना दिल्ली

उलटा वारा नशिबाचा तव भर्त्यावर फिरला
तर जाइल सानंद सुखानें तो गे स्वर्गाला.
करितां करितां कार्य धन्याचें येइल रणिं मरण
भीतीनें शत्रूस मराठा जाइल का शरण?

अथवा मोहें करील का गे शिबिरांतच गमन?
पत्नीचें इच्छील सतत का समयीं आलिंगन?
पत्नी तरि कां तयास ठेविल आलिंगनिं धरुनी?
नच कां काढिल समशेरीतें त्याच्या कोशांतुनी?

वदेल आणिक, " जावें जावें नाथा, समरांतच;
समशेरच ही योग्य धराया समरीं, नच हें कुच.
अथवा भार्ये, प्रिये लाडके, कशास ही चिंता?
ठरलेलें येईल आमुच्या रणयश गे हातां.

नच कां पूर्वजभरतभूमि ही हिंदूची भार्ये !
अनार्यींहि आर्यत्व ओतिलें नच कां गे आर्ये !
अनार्यत्व पुनरपी उदेलें आहे या क्षेत्रीं.
नच बघवे आर्यास मुळीं तें अजुनीही नेत्रीं,
' आर्यांचा हा आर्य ' कुरूच्या क्षेत्रीं गे आला,
देइल कां मग ईश अशाला अपयश–कीर्तीला ?
आर्ययशा अपयशा अनार्यच आहे गे ठरला,
कसें धरावें मग भार्ये, या नाहक चिंतेला ? "

## सुगंध व स्फूर्ति

हें केतकिचें रान करी गुंग मम मती;
हा सुगंध मंद पवन भारितो अती ॥ धृ० ॥

तो मत्त पीत नाग कुसुमरेणु चर्चुनी—
आनंदें नेइ तिथें चपल नागिणी;

उमलविते ज्योत्स्ना ही धवल कुमुदिनी,
रात्र तरी भ्रमर घेइ मधुहि चोरुनी;

वनदेवी प्रेमभरें प्रेम पसरुनी
गावविते स्फूर्तिमदें मजसि आज ती ॥ हें केत०

# दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी

[ जन्म सन १८८७ ]

यांचीं संग्रामगीतें प्रसिद्ध असून, काव्यरत्नमाला, काव्यकुसुमांजलि, मनोहरलीला, प्रसन्नराधा हीं कवितेचीं पुस्तकें प्रकाशित आहेत.

## वीर–विधवा

शेवटच्या रावबाजींनी पटवर्धनांच्या जहागिरी जप्त करण्याचा विचार मनांत आणिला हें जाणून परशुरामभाऊ पटवर्धनांनीं श्रीमंतांस आपल्या घरीं मेजवानीस बोलाविलें. भोजनोत्तर श्रीमंत परत जावयास निघाले, तों दाराजवळील पडवींत १८ विधवा खालीं माना घालून टिपें गाळीत जेवीत होत्या ! श्रीमंतांनीं भाऊस विचारिलें, "हें काय ?" भाऊंनीं उत्तर दिलें. "पेशव्यांच्या गादीकरितां इतक्यांच्या नवऱ्यांनीं समरांगणावर प्राण दिले आहेत ! पटवर्धनांच्या जहागिरीवर इतक्या विधवांचीं पोटें अवलंबून आहेत ! अश्रूंनीं ओले झालेले या विधवांच्याही तोंडांतील घांस काढण्याची कोणाला दुर्बुद्धि होईल ?" रावबाजींनीं तो नादच सोडिला.

जो बाणासम संगरांत शिरला 'घे–घे' मुखें बोलुनी
ज्यानें हैदरच्या मुखीं वदविली भाषा तहाची रणीं
तो "गोपाल" मदीय बंधु अपुल्या कीर्तीस विस्तारुनी
गेला स्वर्गिंहिं वीर, वीर–विधवा ही जेवते अश्रुंनीं.

"व्हा तोफां पुढतीं विखंडित जरी काया रणीं जाहली,
वाहा स्वामियशार्थ आज तनुची रक्तांजली आपुली"
आज्ञेनें मग "नीलकंठ" सरला, तों ठार झाला रणीं
ही त्याच्या स्मरणांत वीर–विधवा आयुष्य कंठी जनीं.

जातें शत्रुकरीं निशाण बघिलें 'हा! हा!' ध्वनी जाहला
सक्रोधें रणिं "पांडुरंग" रिपुला कापीत तैं चालला
आला घेउन तें निशाण, निकरीं पाठींत भाला घुसे
गेला शूर–नरेंद्र वीर–विधवा दुःखाश्रु ती ही पुसे.

"कोठें हैदर दाखवा?" खवळला, शोधीत जो चालला
"कान्होजी" रणिं कंसहारि सकलां कान्हाच तैं भासला
अश्वीं अश्व भिडे, कडाबिन उडे, योद्धा चढे स्वर्गृहीं
घेते श्वास करांत वीर–विधवा निःश्वास सोडीत ही.

"बंधूचा उगवीन सूड" म्हणुनी घोडा पुढें घातला
'हा तो श्रीपति भीष्महारक' असा तैं "श्रीपती" भासला
खड्गाचे फिरवीत हात उरळे, शीर्षीं गदा आदळे
गेला वीर, परंतु वीर–विधवा ही तद्वियोगें जळे.

युद्धक्षेत्रिं महारथी पहुडले बंधू तिघे पाहुनी
'आतां मारिन कीं मरेन' वदला तो "वासुदेव" क्षणीं
देहाचीहि न शुद्धि त्यास उरली संबद्ध झाला तरी
ओले गाल पुशीत वीर–विधवा ही घांस घेते करीं.

खड्यांच्या समरांगणीं मजवरी कल्पांत जैं जाहला
माझा "विठ्ठल" फोडुनी फळि तदा भ्रात्रीय तो धावला
प्रेतें पाडुन शौर्यशालि पडला नाहीं पुन्हां बोलला
त्याची ही विमनस्क वीर–विधवा, माझी स्नुषा कोमला.

जे योद्धे पटवर्धन; प्रभुयशःसंरक्षणीं कष्टले
स्वामी कीर्तिपथावरून अमरस्थानास ते पोंचले
त्यांच्या या हतभागि वीर–विधवा; ज्या अश्रुंशीं जेविती
त्यांचे घांसहि काढण्यास कवणा दुर्बुद्धि होईल ती!

## दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी

# कल्लोलिनी

" भग्न प्रासादाजवळून सरित्प्रवाह खळखळ वाहत आहे. कालवश झालेल्या राजस्त्रियांची या नदीला स्मृति होत आहे काय ? "

सौधीं बैसुन रम्य नक्तसमयीं संभोगलीलावती
चंद्राचें प्रतिबिंब ज्यांत पडलें नद्योघ आलोकिती
भ्रांतीनें विधुच्या चकोर बघती यद्विंब चुंबावया
प्रासादाजवळी नदी रडतसे गेल्या कुठें त्या स्त्रिया ?

खालीं पाहत पुष्पयुक्त कबरी सौगंधतैलान्विता
कंठस्पर्शसुखावह प्रियकरें चांचल्य ती पावतां
पुष्पें जीं गळतीं जलीं, अलि सुखें जाती तदा मागुनी
श्यामांच्या कबरी न या, वटजटा येती तिथें लोंबुनी

देहीं लावुनिया विलासललना सच्चंदनाची उटी
कस्तूरि प्रियलेप चर्चुन तसा दोन्ही कुचांच्या तटीं
गेल्या कंठकलावती रति सुखस्वादास सेवोनिया
तेथें का घुबडें बघून रडते कल्लोलिनी ही अहा !

वाराया नव कुंदकांतिधवला संभोगजन्यश्रमा
तोयस्पर्श सशीत वायुलहरी देहानुकूलोत्तमा
होत्या सेवित त्या न आज दिसती कांचीक्कणत्कारिणी
'वायो ! निष्फल वा ! विहार' वदते ही निम्न संवाहिनी

नेत्रांशीं समता करीति नलिनी, नासेशिं चाफेकळ्या
ओष्ठांशीं उपमानता कितिकदां ताम्राजिनी पावल्या
गेल्या त्या उपमेय भामिनिसवें सद्वस्तुही येथुनी
" भोक्ता जेथ न, तेथ सत्य बसुनी राहे न कोणी गुणी "

ज्यांचें हास्य बघून शुभ्रकुसुमीं जाई फुलूं पाहती
संतोषास बघून बंधुकलता ताम्रानना शोभती
हंसी वा करिणी यदीय गमना साश्चर्य आलोकिती
त्यांचा गे! करिशील दुर्गतनये! तूं शोक लोकीं किती!

पायीं नूपुर ज्यांचिया कटितटीं हेमप्रभामेखला
मुक्ताहार पयोधरावरि अशा भूपांगना पातल्या
स्नानामोदकषायित स्वजल हें प्रत्यूषिं जें होतसे
मोहव्यास अलिभ्रमें कमलिनी प्रत्येक रिक्ता दिसे

आकाशांतिल निर्जरी कर करीं अन्योन्य घालोनियां
प्रेमालाप करीत देवतटिनीतीरांत पोहावया
केंवी येति कशा सुखें विरमती त्या पाहिल्या कोणि ना
येथें स्त्रीजलकेलि मात्र बघतां झाल्यांस ये कल्पना

पातालाहुन लक्ष्मिकांत वळला स्वर्गास जें जावया
कांता सृष्टि कलापटुत्व विधिचें ये त्यास पाहावया
झाला संस्थित येथ पात्रनिकटीं तें विष्णुमंदीर हें
" ऐसा कोण तरी सुतोत्कटगुणा पाहून जो ना रमे?"

तो तैसाच मनोज्ञ काल सरिते! तैशाच होत्या स्त्रिया
ज्यांनीं संगरधीर वीर दिधले देशांत जन्मास या
होत्या सज्जनसंघ मान्य इतुक्या त्या राष्ट्रसंजीवनी
कीं ज्यांचें स्मृतिदुःखगीत न सरे केव्हां तुझें गाउनी.

# सौ० शारदाबाई परांजपे

[ जन्म सन १८८८ ]

## कालियामर्दन

जलीं स्थलिं दिसे प्रभू नयनिं कर्म–कंसा सदा;
प्रमोद बहु होय त्या, अवतरे अरी तो यदा;
अनादि विभु पातला जठर–बंदिशाळा–गृहीं,
गमे हरिस तैं मिळे सुखद योग्यसें क्षेत्रही.

अधर्म कलि मातला, सबल रूढि ही जाहली,
नुरे सुकृति नीति वा, समुळ उन्नती खुंटली;
स्वधर्म परिपाळुनी सुपथ दाखवावा जनीं
म्हणूनि शिव येतसे जगतिं जीव तैं घेउनी.

चतुर्भुज सुलक्षणी बटु पुढें उभा पाहतां,
सुखोदधिंत पोहुनी जननि भोगि एकात्मता;
क्षणांत परि तो हरी रुचिर बाल–रूपा धरी,
सतृष्ण–हृदयें तया निरखि माय डोळे–भरी.

पडे विकल देवकी स्मरुनि कंस–कर्मे परी,
म्हणे पतिस–"बाळ हें लपवितां नये स्वोदरीं!
कसें करुनि वांचवा तनय एवढा हा तरी !
न कंस वधि यास तों कुणिकडेहि ठेवा दुरी!"

पुशी पदरिं नेत्र ती, गहिंवरे, धरी त्या उरीं,
करी हृदय वज्रसें, तनय देइ नाथा करीं;
पिता जड–पदें निघे, वचहि बोलवेना तया;
असंग नर तो खरा, द्रव न पुत्रशोकें जया.

अपार यमुना भरे, वरुनि मेघही वर्षती,
जलीं हरि–पिता शिरें, तरि न चालवे त्याप्रति;
दुभंग परि होउनी तटिनिमार्ग देई तया;
घडे सुजन–संग जैं कुमतिवर्ग जाई लया.

भयार्त वसुदेव तो लपत नंदगेहीं चढे,
तयें निरखिली तदा नवसुता यशोदेपुढें;
हरीस मग ठेवि तो उचलि योगमायेप्रती;
वसेल हरि त्या स्थलीं कधिं न सांपडे माव ती,

चिरंतन परेश तो प्रकट जाहला गोकुलीं.
व्रजीं सकल त्यामुळें प्रबल चेतना लाभली.
जगज्जनक त्या स्थलीं जनन घेइ इच्छागुणें
शिशु–स्वरुपि ईश तो रडुनि शब्द ' कोऽहं ' म्हणे.

प्रमोद निजनंदना बघुनि होइ नंदाप्रती,
जिवाहुनि जपे सुता सतत वासना–माय ती;
दुरी न करि, बांधवी स्वकरिं ती तया घेउनी,
शुचित्व–गुटि पाजि ती सजावें त्यास दिव्यांजनीं.

सदाचरण–तीट ती तनयभालिं लावी करें,
तदीय तनु झांकिते विमल पुत्र मायांबरें;
परोपकृति–ताइती हरिस भारुनी बांधि ती
तशाच भवबंध ह्या यदुस सांखळ्या शोभती.

करी जननि कौतुका स्मरुनि जन्महेतूपरी
सखे करुन गोकुला रमवि त्याप्रती श्रीहरी
अकर्म–दधि–गोरसा पचवि त्यासवें चोरुनी
अलिप्त गतिनें कृती सफळ हें सदा क्रीडनीं

## सौ॰ शारदाबाई परांजपे

दशेंद्रिय–गणांसवें शिरुनि देह वृंदावनीं
प्रपंच–भंवऱ्यांप्रती फिरवितो सदा हर्षुनी;

मना–परिस फेंकितो निज परिस्थिती कंदुका
स्वसंचित फळें तशीं स्वकरिं वांटि गो बालकां.

गमे अबल तो जनां बघुनि बाह्य बालाकृती,
परी सहज खेळतां करि अतर्क्य दैवी·कृती

निराकृति अनाम जो जननी पुत्र मानी तयां
व्रजा स्ववश ठेवितो हरि निरोधुनि इंद्रिया

खुडी स्व–अघबीज तो वधुनि कोप कामाऽसुरां,
वधी कुमति–पूतना तशिच शोषुनि तद्ररा

विराट पुरुषा बघे हरि मुखीं जई जन्मदा,
प्रभु–स्वरूप बाल्य हें जणूं कथी तिला तो तदा

वदेल हरि तें करी बनुनि पूर्ण सत्याग्रही
पदार्थ झटतो तसा अनुचरांसवें प्रत्यही

पडे कु-वच मेघ जैं करि तदा स्वकार्याविना
हरि स्वबल वर्धनें उचलि धैर्य गोवर्धना

जमाख्य यमुनाजलीं प्रबल जाहलासे कली.
विकार गरलें तयें सुजन–मानसें दूषिलीं,

पिईल जल तो पडे तटिं गतासु तै होउनि
म्हणून सजला हरि कुटील कालियामर्दनीं

अधर्म भय मानुनी करुत लोक धर्माश्रया
म्हणून अहि हा असे; उलट तोच मोही तयां.

भुजंग–खलता अशी बघुनि कोपला गोपती
म्हणे–" करिन केधवां बिगत तेज मी त्या प्रती."

---

# नारायण गंगाधर लिमये

[ जन्म सन १८८९ ]

रा० रा० ना. गं. लिमये, बी. ए., एल्. टी., सुपरिंटेंडेंट म्युनिसिपल स्कूल्स्, मुंबई, यांचीं 'बाल-गीतें' व 'स्फुट कविता' हीं पुस्तकें प्रकाशित आहेत.

## वहिनीला काय झालं ?

ठाउक कोणाला—काय जहालें वहिनीला !
दार वाजतां वाऱ्यानें ती कानोसा घेते
मागें पुढतीं तिरकी दृष्टी करुनि किती बघते
कशी कुंचली वांचुनि गालीं लाल रंग भरिते

पदर न गळला तरिहि सांवरी वरचेवर हातें
श्रम न जाहले तरी भराभर टाकी श्वासातें
मधेंच टाळी वाजवुनी ही खूण कुणा करिते ?
दिपले डोळे नच, तरि मिटते कोणां कीं हंसते ?

उलटें तिजला पुस्तक कैसें वाचाया येतें !
कारण पुशितां मुकेपणाचें उत्तर त्या देते
दादा गांवाहुनी आल्यावर पुसेन मी त्यांतें
ठाउक कोणाला—काय जहालें वहिनीला !

## श्री

किती रात्री जशा आल्या तशा गेल्या गडे लोली !
खुशालीचें खुलाशाचें तुझें कां पत्र ना आलें ?
मिळावें वाचण्याला हें वियोगाचें नवें गाणें
अशा हेतू सवें का तूं धरीसी मूकता नेणें !

जिवाचें रान या होई, तर्री या भावना-वेली
कशा फोंफावती; पाणी वियोग प्रेमळे ! घाली
वियोगानें कसें वाटे तुला आहेच तें ठावें
पुन्हां मी लेखणी द्वारें कशाला तेंच सांगावें ?

दर्दीच्या उष्ण निश्वासें तुवां आलेखिलीं गाणीं
अजूनीही तशीं ताजीं अहा ! माझ्या गडे ! कानीं
उषा भानू, निशा चंद्रा,-अशा जोड्यांसि पाहोनी
कसें होतें मना तें तें स्वतांच्या घे विचारूनी

म्हणोनी दोन ओळींची, मला जी दोन लाखाची
अशी हुंडी खुशालीच्या झणीं गे धाड पत्राची.
कळावें, लोभ वाढावा मिळावा तो अनंतांत
लिहावें काय मी जास्ती ? रजा घेई-तुझा नाथ

## तो प्रसंग !

माझें चित्र विलोकण्यांत रमली होती प्रिया सुंदरी
'केव्हां याल सख्या ?' असें गुणगुणे सोत्कंठ नानापरी
मार्जारासम मागुती न कळतां गेलों पुढें सत्वरी !
प्रेमें चुंबुनि लाल रंग दिधला म्यां गोड गालांवरी

## आणि तो प्रसंग !

होती तल्लिन काढण्यांत कशिदा चोळीवरी सुंदरी
टाके घालि भराभरा सु-चतुरा यंत्राहुनी सत्वरी
गेलों चोरुनि चुंबना,-क्षणिं सुई येऊनि बाणापरी
रक्ताची मम हाय ! हाय !! उठली लाली कपोलावरी !

---

# नागेश

## नागेश गणेश नवरे

[ जन्म सन १८८९ ]

हे मनोरंजनांतील एक प्रसिद्ध कवि आहेत.

### अखेरचा फासा*

राजसबाळा! हेंच अतां मज बरवें—
कीं तुजसह मीं अखेरचें खेळावें.

खेळुनि फासे केली अजवरि हौस
परि ते सारे झाले रे गळफास!
ही मम संसृति झालि कि रे जोखीम
न दिसे कोठें तींत चुकुनिही राम
परि तुज हें मी कथणें नाहीं बरवें
राजसबाळा! सध्यां तूं खेळावें!

यें रे बाळा! ये पट झटपट मांडूं
तूं कायमचा माझा रे खेळाडू!
मम जीवाचे कायमचे सहवासी
सोडुनि गेले खेळत असतां मजसी;
त्यांच्या विरहें जीवन हें एकाकी
न रमे क्षणही बाळा! सुखि वा दुःखीं.
परि तुज हें मी कथणें नाहीं बरवें!
राजसबाळा! सध्यां तूं खेळावें!

---

* कृष्णा! मनमोहना! मधुसूदना! मनरमणा! या चालीवर.

राजसबाळा! काढ तुझे ते फासे
खेळूं तू मी अखेरचें रे खासें
टाकियले मी डाव जगाच्या हातीं
परि ते कुजले हातीं ये करवंटी
लागुनि बसला डाग जुवेबाजीचा
हेतू फसला या मम आयुष्याचा
परि तुज हें मी कथणें नाहीं बरवें
राजसबाळा! सध्यां तू खेळावें!

राजसबाळा! खेळ तुझे ते फासे
खेळाया मम आतुर मन झालेंसें
जे मम म्हणुनि भिड्ड भरंवसा धरिला
तेच शेवटीं फिरले; सौदा फसला!
जरि कधिं नशिबें दानें बरवीं पडलीं
तरि तीं खोटीं अंतिं तिहीं ठरवीलीं!
परि तुज हें मी कथणें नाहीं बरवें
राजसबाळा! सध्यां तू खेळावें!

राजसबाळा! खेळगड्या! खेळावें
पळ मोलाचें व्यर्थच कां दवडावें?
कितिक सोंगट्या पगें भराभर चढल्या
परि त्या माझ्या जागिंच अंतीं कुजल्या!
सारे आले अंगावरि मम डाव
म्हणुनि न नशिबा अतां उरे तिळ ठाव
परि तुज हें मी कथणें नाहीं बरवें
राजसबाळा! सध्यां तू खेळावें!

राजसबाळा ! खेळ खेळ कर जलदी
खेळायाची मज बहु झाली गरदी !

टाकीं तुजसह अखेरचा हा फासा
मम तुजवरती गुंतुनि बसली आशा.

मम मन झालें दुःखें हें बेजार
योजी तें हा सट्ट्याचा बाजार !

परि तुज हें मी कथणें नाहीं बरवें
राजसबाळा ! सध्यां तूं खेळावें !

---

# बळवंत गणेश खापर्डे

[ जन्म सन १८९० ]

कविभूषण ब. ग. खापर्डे यांचें 'काव्यकांतार' प्रसिद्ध असून 'गाणें आतां कशाचें' हें स्फुट काव्य व 'माझ्या सर्वस्वाचीं गद्य गाणीं' हें गद्यकाव्यही प्रसिद्ध आहे. अस्तोदय, नवा बंगला, सत्याग्रही, रंगपंचमी वगैरे नाटकें यांनीं लिहिलीं आहेत. हे 'उदय' या साप्ताहिकाचे संपादक आहेत.

## स्वराज्य—श्रीरंग

लाल गुलाली उटी लाविली पूर्वेनें अंगा
उठा उठा हो, प्रभात झाली स्वराज्य—श्रीरंगा !

दिशा फांकल्या, निशा संपली, गगनांगणिं लाली
असे पसरली, मांगल्याची वेळा ही आली

अशि ही समार्जनें कळे ना नभीं कुणीं केलीं
मज वनमाली हांक मारितो भासत ह्या कालीं

गमे हरीचा हर्ष उसळतां गगना ये लाली
वाणि खुंटली, हृदयें भरलीं, प्रेमें पाझरलीं,

काय, कळे ना, जगता होई; हृदयें बावरलीं
कांहीं तरि ही मंगलवेला जगा गमे आली

मनें जागलीं, निजुनी उठलीं, हृदयेंही जागलीं
नीजहि नयनां सोडुनि गेली प्राचीही उजळली

वनें जागलीं, गावुं लागलीं; सुमनेंही उमललीं
झोंप टाकुनी उठा उठा हो स्वराज्य—वनमाली !

जगताचा व्यवहार थांबला तुझ्याविणें देवा !
अध्यात्माचा कुणी जगाला बोध, सांग, द्यावा !

तूं नसतां परि आर्यभूमिचें कोणी ऐकेना
तूं न जगला म्हणुनि जगाला शांती लाभेना
स्वराज्य-देवा ! म्हणुनि तरी हो, उठा उठा आतां
मोहाची ही निद्रा संपली, उठा क्षणीं आतां
झोंप पुरे जाहली न देवा ! अजुनि काय तुजला ?
कधींपासुनी निजुनि राहिला ! उठशिल कैं आतां ?
लक्ष्मि त्रासली तूं नच दिसतां, सोडुनि ती गेली !
कोणि न वाली, दशा पोरकी अम्हां असे आली
उठा दयाळा ! कलह मातला; समय कठिण आला
झोंप टाकुनी उठा कृपाळा ! स्वराज्य–गोपाळा !

## रायगडावर वीज चमकली

कांहीं तरि हें सार्थ भासतें, विचार पडला चित्तासी
रायगडावरि वीज आज कां घडीघडी चमके ऐसी ?
घनांधकारें जगत् व्यापिलें, गगन घेरिलें मेघांनीं
रात्र जाहली, कोणि न वाली, दिनमणि गेला टाकोनी
असें वाटुनी नीच पशूंनीं कुही मांडिली ह्या रानीं
फिरें अरण्यीं खिन्न मनानें रायगडापायीं बसुनी–
करी विचारा तिथें एकला दीनपणें मी बैसोनी
रायगडावरि वीज चमकली पाहियली मीं ती नयनीं !
रायगडा रे ! काय जाहलें ? मेघ असे हे जमले कां ?
रायगडावरि घडी घडीनें वीज आज ही चमके कां ?
रायगडावरि वीज चमकली इतिहासीं मीं वाचियलें
रायगडावरि वीज चमकली म्हणुनि दिवस हे तरि दिसले !



डॉ० पु. बा. जोशी, Ph. D.



कविभूषण खापर्डे



प्रो० नारायण केशव वेहेरे.



रा० रामकृष्ण नारायण फडणीस.

रायगडावरि वीज चमकली म्हणुनी शेंडी जगिं उरली
रायगडावरि वीज चमकली म्हणुनी कुंकुम स्त्रीभालीं!
रायगडावरि वीज चमकली–स्वराज्य डोळां पाहियलें!
रायगडावरि वीज चमकली म्हणुनि महाराष्ट्रहि उरलें!
रायगडावरि वीज चमकली–मातृभूमि म्हणुनी जगली!
हिंदभूमि जगिं जगण्याकारण वीजचि रायगडीं झाली!

तदा चमकली, लुप्त जाहली, अम्हां टाकिलें ह्या तिमिरीं
काय आठवुनि पुन्हां अशी ही आज चमकते गडावरी?
बाई विद्युल्लते! आज तूं कशासि श्रम हे करितेस!
कोण तुझी ही तडफ, दीप्ति वा पाहुनि त्यांचे करि चीज?
अकाल सारे श्रम हे तव गे! आज कोण तुज बघणार?
बघुनि तुझ्या त्या दिव्य दीप्तिला हृदयीं स्फूर्ती धरणार?
कोण पाहुनी तुज हर्षांनी दंड ठोकुनी उठणार?
सर्वस्वाची होळी करुनी आत्मयज्ञही करणार?
जरी खरें हें तरी परंतू वीज ही अशी चमके कां?
व्यर्थ आपुलें असें चमकणें हेंही इजला न कळे का?

रायगडाच्या वरि जी चमके वीज न वेडी ती इतुकी
काय भवानी स्वर्गामधुनी आज चमकते शिवबाची?

कष्ट सोशिले, प्राण वेचिले, स्वराज्य येथें स्थापियलें
कुलांगार ह्या पुढल्या पिढिही सर्वहि श्रम ते लोपविले!

म्हणुनी रडतां गळुनी पडतां तेजस्वी त्या पुरुषाचा
तेजस्वी हा अश्रुबिंदुही चमकत खालीं पडतो का?

रायगडा! पाउलें जयाचीं पवित्र तूं हृदयीं धरिलीं
अश्रुबिंदु हे स्वर्गामधुनी त्याचे पडती तव भालीं!

हाय हरीरे ! काय दशा ही ! काय अशी ही गति झाली !
रायगडाला कोणि नाहिं का—कोणि नाहिं का अजि वाली ?
रायगडा रे !—रडूं नको रे ! शिवराया रे रडूं नको !
आम्ही आहों तोंवरि तरि रे आम्हां देखत रडूं नको !
जोंवरि आहे 'महाराष्ट्र' हें नांव जगावर,—रडूं नको
महाराष्ट्र मेलें नच तोंवर स्वराज्य—आशा सोडूं नको !
कीं वीजेला कांहिं अम्हांशीं आज बोलणें आहे का ?
वाणी नुमटे म्हणूनि अशी ही आज तुटकशी चमके का ?
हा शिवरायें रायगडावरि निरोप आम्हां धाडियला ?
स्वराज्यबोधी शब्द ओजधी चमकत तुटका हा ये का ?
धडपड बघतां ह्या वीजेची मनासि गमतें ही झटते—!
मनांतील कांहीं तरि वदण्या, परी न साधे तिजला तें
गे गे विद्युल्लते ! आज तूं ह्या तिमिरामधिं चमकोनी
कांहीं सार्थपणें दाविसि का रायगडातें उजळोनी !
दर्शन घडलें आज तुझें हें शकुन हाच मी मानियला
जाउनि सांगिन तुझें वृत्त हें 'महाराष्ट्र' ह्या देशाला
स्वराज्य—आशा मला जन्मली तुझ्या दर्शनें हृदयाला
पुसेन जाउनि काय वाटतें शिवबांच्याही मुलखाला
हृदय बोललें हृदयापाशीं, भाषा नाहीं वदण्याला
कांहीं तरी मी जाउनि सांगिन भाव मनाचा जो झाला
महाराष्ट्र देशा ! तुज आणुनि निरोप मीं हा पोंचविला !
काम जाहलें, अतां थांबतों काय करिसि तें बघण्याला.

---

# श्रीनिवास रामचंद्र बोबडे

[जन्म सन १८९०]

## अहं

'मी सुज्ञ, मी श्रेष्ठ, मी ज्ञानसंपन्न, मी भाग्यवान्
मीच लक्ष्मीपति
मी मान्य, मी धन्य, मी शक्तिसंपन्न, मी साजिरा
गोजिरा मी अति

विश्वामधें शोध पाहा करोनी न येईल माझी
कुणाला तुला
झाला नसे आज, नाहीं, न होणार कोणी
प्रतिस्पर्धि केव्हां मला

हे चन्द्रसूर्यादि, हे तारकासंघ, निस्तेज
माझ्या प्रभावापुढें
काळासही धाक, माझ्या महत्त्वापुढें
मेरुमंदार फिका पडे

मी शूर, मी वीर, मी धीर माझाच गाजे
दिगंतीं यशोदुंदुभी
माझ्यापुढें विश्व हें तुच्छ सारें न वाऱ्यास
भीतीहि राहे उभी

धिक् मानवा ! व्यर्थ ताठा तुझा हा तुझी सर्व
ही व्यर्थ वाचालता

नीच स्थिति सर्व विश्वामधें तूज रे क्षुद्र
कीटाहुनी सर्वथा
'मी मी' तरीही तुझें ध्यान चालेच कां अंध
होतोस जाणोनियां
कां सर्वही ज्ञान, कां सर्वही बुद्धि वायांच
व्हावी त्यजोनी नया.

## ज्योति

गेली ज्योति विझोनियां तरि उरे दिव्य प्रभेची स्मृति
फुंकोनी घृत ओतुनीच करितां येते पुन्हां जागृत
अंतर्दृष्टिस गोचर स्मृतिगत ज्योती तिथें नांदत
झालें स्थंडिल थंडगार जरिही ती वेदशाळा रिती.

जेथें आज भयाण शांत दिसतें तेथें कधीं एकदां
चाले संतत वेदघोष जमुनी भूदेव भूभास्कर
तेथें आज उभें स्मशान जरिही कोल्हेकुई भेसुर
सांगोपांगहि मूर्तिमंत बसले ते वेद तेथें सदा.

दिव्य ज्योति विकासिनीच हृदया टाकून गेली तरी
तेव्हांचेंच अजून छत्रपतिचें आहे महाराष्ट्र हें
तेजोभास्कर वीरवृन्द जमुनी गाईल उच्चस्वरीं
ते स्वातंत्र्य—पवित्रमंत्र तरि ती पेटेल ज्योति स्वयें.

गेली ज्योति विझोनियां तरि पुन्हां येईल ती आंतुनी
मंत्रांचा सगळा प्रभाव परि हा! नाहींत होते कुणी.

श्रीनिवास रामचंद्र बोबडे

## स्वतःप्रामाण्य

सागर पोहत बाहुबळानें,
नांव तयास मिळो न मिळो रे,
स्वतांच तेजोनिधि जो तरणि
तद्गृहिं दीप जळो न जळो रे,

जो करि कर्म अहेतु निरंतर
देव तयास वळो न वळो रे,
ओळख झाली ज्यास स्वतांची
वेद तयास कळो न कळो रे.

---

# नारायण केशव बेहेरे

[ जन्म सन १८९० ]

प्रोफेसर नारायण केशव बेहरे, एम्.ए., बी. एससी., एल.टी., प्रिन्सिपॉल नॉर्मल स्कूल, वर्धा, यांनीं कर्मवीर, स्मरणी, कवि व कवितादेवी हीं खंडकाव्यें प्रसिद्ध केलीं असून, बोथटबाण हा विनोदी लेखसंग्रह, हिंदू कोण ? वगैरे कादंबऱ्याही मुद्रित केल्या आहेत. यांचीं राधागीत, दुःखकहाणी, मी, हीं खंडकाव्यें अमुद्रित आहेत. हे नागपूर युनिव्हर्सिटीचे फेलो आहेत. हे काव्यकौमुदीचे एक संपादक आहेत.

## विषय जुनाच--पण--काळ नवा

रमणीः--" युद्धा जातो प्राणविसावा, राहवा दोन गोष्टी सांगुन
पसरा पदर मजसाठीं सख्यांनो! घ्या येवढें त्याला मागुन."

वल्लभः--आम्हां प्रलयंगता तुझी ग सुध नाहीं कामाची
आलीं धन्याचीं पत्रें आम्हांला रणास जाण्याचीं"---होनाजी बाळ.

रमणीः--" ही काय गडे! मनीं कल्पना आली, चाकरी नकोशी झाली!

हा द्रव्याचा पाउस गृहिं जणुं पडतो--पगार किती छनछन सडतो !
ही साहेबी ऐट शोभते भारी, झोकांत चालतां स्वारी!
कां त्यजिली गुलजार गुलाबी पगडी---
सवत हो पांढरी खादी! मग बुद्धी कैशी चळली ?
संसार--सुखाची होळी करण्याची इच्छा झाली!
छे! नको गडे! अभद्र असलें चित्र, झांकोत याहुनी नेत्र!
ह्या व्याख्यानें देशभक्तिचीं गोड लोकांचे पुरवा कोड!
तो ऐकोनी ओघ गोड शब्दांचा, पाऊस पुढे अश्रूंचा!

मग गाई मुका देशभक्तिचीं गाणीं, गिरि पंगु जाय लंघोनी !

ते होती छबडे वीर
कौतुकें व्हालंटीर !
देशाला उद्धरणार !

मग मद्य, चहा पळेल देशांतून आपलें नांव घेऊन !

हा भरलेला गोड चहाचा पेला सुखवितो रोज रसनेला
ही रुळणारी वक्षीं मोहन–माळ विचारतें–कैसें जाल !
रुम्झुम् वाळ्यांचा बाळ घेतसे छंद, नाचतो गात गोविंद !

संसार–सुखें भोगावीं
वेळांत वेळ काढावी
देशास सुखें अर्पावी

त्या सेवेचें कौतुक करण्या आजी, राणी ही अपली राजी ! ”

“ जनसेवेची काय कल्पना केली ! ही सुळावरची पोळी
या संसारीं रात्रंदिन रंगून घेऊं का सतीचें वाण ?
कां मनुजाला सुखांत लाभे रमुन हें नागफणीचें रत्न ?

संन्यास खरोखर ध्यावा !
अखिलही स्वार्थ जाळावा !
संसार देश मानावा !

मग मिळे जगीं देशभक्त सन्मान, तें धारातीर्थी शयन ! ”

## हा का महार दूर ?

सोळ्या विटाळ झाला, हा का महार दूर ?

ब्राह्मण्य भ्रष्ट झालें
सेवेंत आज नटलें

राखा पवित्र त्याला—हा का महार दूर ?

वेदांत ऐकनाऱ्या
वादांत पंडिताच्या
असती ऋचाहि वाचा—हा का महार दूर ?

शेंडीस कांपुनीया
दाढी दिखावि मीया
ह्या मौलवीस या, या—हा का महार दूर ?

मंदीर धन्य झालें
साहेब आंत आले
यांना सलाम ठोका—हा का महार दूर ?

परकीय हस्त—स्पर्शें
मालिन्य पार नाशे
छाया विटाळ करिते—हा का महार दूर ?

परकीय सर्व वंद्य
अस्पृश्य हिंदि निंद्य
हा मंत्र घोकुनीया—हा का महार दूर ?

हिंदी असेल त्यातें
अस्पृश्य विश्व गणतें
हें चित्र रोज दिसतां—हा का महार दूर ?

परखंड तुच्छ मानी
हा हिंद देश मानी
खातां अनंत लाथा—हा का महार दूर ?

शाळा, विहीर, देव
ही सार्वजनीक ठेव
विसरून ऐन वेळीं—हा का महार दूर ?

आशा करी महात्मा
खादींत गुंग आत्मा
झाला, म्हणून टाळा—हा का महार दूर ?

## शाहीर

शाहीर धीर तोच । सामान्य (?) वीर वंदी

श्रीरामचंद्रचरणीं
वाल्मीक नम्र गानीं
हनुमान दास पूजी । शाहीर वंद्य तोच

श्रीकृष्णदेव गानीं
रमलीहि व्यासवाणी
विदुरास आज मानी । शाहीर मान्य तोच.

रघुवंश श्रेष्ठतेस
वर्णील कालिदास
शिवराज—वंश वंदी । शाहीर वीर तोच.

गंगा—हिमालया ती
ठरली पवित्र जगतीं
मूळामुठेंत नाही । शाहीर धन्य तोच.

दिल्लीस बादशाही
नटते नवीन देहीं
जो नागपूर वर्णी । शाहीर गोड तोच.

विद्वान संस्कृत वर्णी
गुंगे तिच्याच ध्यानीं
भाषा मराठि गाई । शाहीर थोर तोच

ते वेद, शास्त्र–ग्रंथ
सन्मान्य पंडितांत
गीतारहस्य वाची । शाहीर सत्य तोच.

वर्णाश्रमास पूजी
जरि हिंददेश गाजी
समतेंत सौख्य सेवी । शाहीर संत तोच.

पृथुराज वीर्य–गीतें
गावोत मुक्त–कंठें
गांधीस आज वंदी । शाहीर एक तोच.

## परिवर्तन

भरे आकाश मेघांनीं दिसे अंधार सर्वत्र–
परी बिजली झळाळे जी तिचे गातोच हें गीत
लकेरी गोड हास्याची मनाच्या दुःखजालांत
सुजलधारा जणूं वाटे उन्हाच्या तीव्र तापांत

गुलामी लाभली भालीं जिवाचा होतसे खेळ .
भवानी ही शिवाजीची असे काळास जी काळ.
जिच्या तेजें क्षणीं गेलें तुटोनी म्लेंच्छ–जंजाळ,
तिच्यासाठीं स्फुरे गाणें–मला भासेच वेल्हाळ.

विलायेती पसारा हा पुरा ग्रासे महाराष्ट्रा
असे खादी महात्म्याची जियेनें रोखल्या वांटा.
धवल लेणें यशोमार्गी पताका वाटली पांथा
तिच्यासाठीं असे गाणें–जणूं माझीच ती कांता.

सुखाचा वास ही नाहीं निराशा दाटली भारी
गुलाबाच्या सुगंधें गुंगल्या आतां दिशा चारी,

गुलाबी गालिं ये लाली तिची गोडी असे न्यारी
सुगंधें, दर्शनें नटतां लपे संन्यास संसारी.

गुलाबा पाहतां वेगें फुलाचा घेतला वास
पळाला शोक आनंदें सुखाचा घेतला ध्यास.
जलीं जो मत्स्य क्रिडे तो कसा विसरेल जाण्यास ?
हसूं द्या लोक ते सारे क्षिती त्याचीहि कोणास ?

## माझाच हिंद देश

माझाच हिंद देश । नाहीं दुज्या कुणाचा
हिंदी असेल त्याचा । हा देव पूजण्याचा ॥

सेवेस देह लागो
हृदयांत धर्म जागो
घेईन एक ध्यास । माझाच हिंद देश.

जीवें फकीर व्हावें
देशास उद्धरावें
मानीन हाच मोक्ष । माझाच हिंद देश.

स्वातंत्र्य लाभ व्हावा
सोन्यांत तो नहावा
जय जय करीन घोष । माझाच हिंद देश.

# आनंद कृष्णाजी टेकाडे

[ जन्म सन १८८८ ]

रा० टेकाडे यांचें आनंदगीत प्रसिद्ध असून 'मथुरा' व 'मधुमीलन' हीं संगीत नाटकें प्रकाशित आहेत.

## स्वैरविचार

हे असती स्वैर विचार
कांहीं यांत असे का सार

सृष्टि कोठली । कुणी निर्मिली
स्थिति ही कैशी तिज आली
भूहि विशाली । कशि अवतरली
कोण खरा जगिं इज वाली ?

लव न आसरा । दिसत अंबरा
कोंवि फिरे नभ-पट सारा
रवि शशि तारा । करिति विहारा
कुणि न तयां का वदणारा ?

पवन वाहतो । कां नच दिसतो
अविरत अनुभव निज देतो
मेघ गर्जतो । सलिल वर्षतो
चपलेला कां लपवीतो ?

कोठुनि येते । परतुनि जाते
रजनी कवण्या सदनातें
प्रेम कसें तें । जन्म पावतें
सांगा कुणि या नियमातें ?

## आनंद कृष्णाजी टेकाडे

# उषा

नेत्र उघडुनी । बघसि कुणा काय जनीं
प्रेमें विहग । गाती सुभग—
स्तोत्र तुझें गायनीं

चोंहिकडे रम्यपणा । बघुनि तोषवीसि मना
पक्षी, मधुप । विश्वीं उडुप
रुचिर सृष्टि मानिनी.

वेणींतिल उडुपुष्पें । कोमेजलिं हीं शापें
दृष्टी करुण । न्हाणी भुवन
गमत तुझी अश्रुंनीं.

शशि कन्दुक कीं तिमिरीं । मौजेनें खेळत करिं
गेला उडुनि । दूरी म्हणुनि
बघसि तया निरखुनी

मालेचें तइं मोतीं । क्रीडण्यांत विस्कळती
हस्तें तरल । ते गे सकल
काय वेंचिसी मणी ?

स्वागतास तव कमलिनि । प्रेमभरें करिति हंसुनि
प्रेमालिंगन । मोदें देउन
शांतविसी तन्मनीं.

मन्दहास्य मुखिं विलसित । वत्सलता नयनिं दिसत
भालीं अलक । शोभे कनक—
कांति दिव्यरूपिणी.

निद्राकुल जगतातें । चैतन्या द्यायातें
माते दर्शन । देशी धांवुन
काय उषे ! हर्षुनी

## माझी कविता

मलाच माझी रुचे खरी कविता । मनोहर

गर्दभ–रव नच न जनांतरि
खंत तया नच तदीय लवभरि
स्व–कंठ वाटे गोड किती तरि
स्व–गीत आलापितो मुदें चित्ता । रसविण्या

स्वरूप सुन्दर किति मोराचें
कुरूप तितुके चरण तयाचे
तयास प्रिय ते परि बहु साचे
तसेंचि वर्तन करी मुदें चित्ता । रिझविण्या

कज्जलासही लाजविणारा
काक–वर्ण तो जगिं दिसणारा
करिति कटु वचें जन धिक्कारा
स्व–रूप मिरवी जगांत तो चित्ता । सुखविण्या

गंधहीन सुम कोरांटीचें
म्हणुनी रसिकां मुळिंही न रुचे
आवडतें किति परि तें तरुचें
धरोनि वक्षीं प्रमोदवी चित्ता । सुखें त्या.

गंधहीन वा वर्णविहीन
कुरूप भेसुर अथवा दीन
कुणी आदरो अशि मत्कृति न
असो कशी ती प्रमोद दे चित्ता । माझिया.

---

# माधव

[ जन्म सन १८९१ ]

रा० रा० माधव केशव काटदरे यांनीं 'ध्रुवावरील फुलें' व 'फेकलेलीं फुलें' हीं काव्य-पुस्तकें प्रसिद्ध केलीं असून हे नवयुगाचे कवि होते.

## शाहु महाराजांचें दक्षिणेंत आगमन

महाराष्ट्रा ! तुझे सकल पुरले जाण नवस,
महाराष्ट्रा ! आतां तव न उरले दैन्यदिवस;
महाराष्ट्रा ! आली अविरत तपस्या तव फळा,
महाराष्ट्रा ! होती खचित तव पुण्याइ सबळा !

सुधावर्षावाला करित रजनीनाथ गगन—
क्रमी, येई हर्षा उधळित सदा देव अरुण !
जरी तारा दिव्यें अमित करिती अर्पण जगा,
महाराष्ट्रा ! केलें लवहि तव त्यांनीं न हित गा !

नद्यांनो ! सिंधूंनो ! करुनि जयघोषाप्रति महा,
महाराष्ट्रस्तोत्रें गुणगुणत रात्रंदिन रहा !
असे आलें आतां नवयुग, नुरे काळ पहिला !
करा तत्संदेशा सुकविजन ! जाहीर सकलां !

स्वराष्ट्रस्वातंत्र्यास्तव समर आतां न पुढतीं,
महाराष्ट्रीयांना रिपु न उरला एक जगतीं !
पुन्हा सह्याद्रीचीं निखिलगगनाधारशिखरें
महाराष्ट्रीयांच्या कधिंहि नच न्हातील रुधिरें !

जयें धर्मासाठीं गणुनि तृणवत् शीर्षकमला,
बलि स्वप्राणांचा यवनपति–कोपाग्निस दिला!
अहो! राष्ट्रासाठीं तृणसम गणी जो स्वतनुला,
तया श्रीशंभूचा तनय निजदेशा परतला!

स्मृती होतां ज्याची स्फुरण रणभीरूंतहि भरे,
स्फुरे चैतन्यानें वपु, अधर वेगें थरथरे!
सजीवां निर्जीवां करि सहज जो कार्यनिरत,
पहा! हा आला त्या शिवनृपतिचा पौत्र परत!

उषांनो! संध्यांनो! जलदततिची झालर करा!
प्रभा आदित्यांनो! जगतिं अपुली मंगल भरा!
प्रसन्नत्वा विश्वीं पसरित दिशांनो! निशिदिनीं
शुचित्वा दिव्यत्वा वितरुनि करा स्वर्ग अवनी!

महाराष्ट्रीयांनो! प्रमुदित मनें उत्सव करा!
चला! व्हा सामोरे! सुटुनि तुमचा ये नृप घरा!
गुलाल प्रेमाचा प्रभुवरि कुणी द्या उधळुनी!
कुणी ओवाळा त्या नयनजलसन्मौक्तिकमणि!

पयोदेवी नृत्या करिति वनदेवींसह जिथें
जिथें आनंदाचें चिरसमय साम्राज्य झुलतें,
जयामाजी ऐशीं सुखकर सरित्तीर पुलिनें,
पहा त्वद्देशा, त्या कर नमन राया! नत मनें.

जयांच्या रक्ताच्या क्षितितल नद्यांनीं भिजविलें
जलींही राष्ट्राच्या उजळ इतिहासास लिहिलें;
महाराष्ट्रेशा! ते बघ भरुनि डोळे निज–जन,
भुकेले त्यांचेही तव मुख पहायास नयन!

तयां भूषा ! तूंचि प्रिय गुरु, सखा, नायक खरा,
असे राज्याची या तुजवरिच आतां गुरु धुरा !

वसो कर्तव्याची सतत तव जाणीव हृदयीं,
असो श्रीरामाच्यासमचि अनुरक्ती तव नयीं !

पुरा श्रीहर्षांचा करुनि रणरंगीं परिभव
जयांनीं लीलेनें बहु मिळविलें वैभव नव,

ध्वजा ज्यांच्या नेलें मिरवित जगीं यादव नृपीं,
महाराष्ट्रीयां ते विगत दिन दावीं पुनरपि !

*  *  *  *

गिरीच्या गर्भीचे विरघळुनियां हीरक–मणि,
तयांचे स्वच्छंदें विहरति इथें निर्झर वनीं;

लताकुंजीं येथें करि मधुरगाना मधुकरी,
स्वराज्याचें ऐशा चिर नरवरा ! पालन करीं !

# केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर

[ जन्म सन १८९१ ]

रा॰ टेंभुर्णीकर यांचीं 'बकुळीचीं फुलें' प्रसिद्ध आहेत. हे धर्मजागृतीचे काव्यसंपादक आहेत.

## स्वातंत्र्यदेवीस

स्वातंत्र्यदेवी महन्मंगले गे ! पराधीनताध्वांतसंकर्षिणी !
सत्विसुखश्रेयसंवर्धिनी ! विश्वदृग्मोहिनी गे ! मनोनंदिनी !

माते ! तुझा वास कोठें ? दिसे शून्य कां गे ! महाराष्ट्रसिंहासन ?
पादारविंदा कुणाच्या नमूं मी ? कुणाचें करूं मी यशोगायन ? ॥

सिंहासनीं या तुझ्या कोण बैसे हिंडिंबा विरूपाकृती संप्रती ?
प्रेमें कुणी शृंखला कांचनाच्या पदीं घालुनी ईजला पूजिती, !

माथ्यावरी मौक्तिकाचा हिऱ्याचा इचा टोप मोठा मनोमोहन
पूजोत कोणी इच्या वैभवाला ! न या शाहिराचें परी वंदन !

देवी ! जरीचा तुझा कोठ झेंडा ? कुठें पाउलें गे तुझीं मंगल ?
दाखीव तीं, चित्त लांचावलें हें तुझ्या दर्शना, जाहलें व्याकुल !

माते ! महाराष्ट्रमाताभवानी निराशातमीं आंसवें ढाळितें
झाला रवी हा उदासीन, मातें धरा चेतनाहीन ही भासते !

ऐश्वर्य गेलें लया, छत्र गेलें, नसे राहिलें स्वर्णसिंहासन !
माते दयाळे तरी येइ वेगें, वनांतील वाहीन मी भूषण !

ये, ये मनोमंदिरीं बैस माझ्या तुला अश्रुची माळ घालीन मी
शाहीर हा वंदितो प्रार्थितो गे ! नको ठेवूं आतां निराशातमीं !

## सावधान

स्वातंत्र्यप्रिय धीर वीर समरीं शार्दूलसा जो लढे,
ज्येयें दुर्गम कीर्तिदुर्ग भगवा नेऊन झेंडा चढे,
नक्षत्रांगणि सूर्य जेंवि चमके तेंवी विराजे जनीं
जो होमून सुखें, स्वभूस बसवी स्वातंत्र्यसिंहासनीं;

ज्याचें स्फूर्तिद शुद्ध सुंदर असे चारित्र्य दिव्योज्ज्वल
ज्याच्या कीर्तिकथा सहर्ष बखरी गाती सदा मंगल
प्राची यद्यशकुंकुवास अजुनी लावीतडे आवडी
देशोद्धारक धन्य एक जगतीं ऐसा मराठा गडी!

हा! तत्संगरसिंहवंशज परी स्कंधीं मुर्दे वाहती
दास्याचे जडपाश संप्रति, परी धिग् धिग् तयांची कृती!
पूर्वीचा इतिहास वाचुनि जरी आनंद तो होतसे
खालीं मान करावयास अपुली हा काल लावीतसे!

हा भावी इतिहास हाय! अपणा घालील हो बांगडी
व्हा, व्हा सावध! दिव्य नांव अपुलें राखा, “मराठे गडी.”

---

# सौ० फुलमाळीण

[ जन्म सन १८९३ ]

सौ० सरस्वतीबाई कावनईकर, पास्ड मिडवाइफ अँड नर्स. यांच्या कवनगुच्छांत कविता प्रसिद्ध झाल्या असून पुष्कळ स्फुट कविता अप्रकाशित आहेत.

## बाल शशीस

काव्य कवनही जादू भासली
चंद्रकोर देखताच रात्र हासली
जहर चालला कोर वाढली
क्षणभरांत गगन भरून जित दाविली

बाळ हासतें तेज गाळितें
नभगंगा वहात कशी मार्ग झाकिते
कमल तुजपुढें नेत्र मुरडिते
भृंग गायकास आत्म–हृदयिं दडविते

नीलशा नभीं वदन झळकलें
बाळरूप आठवितां–हृदय कोंदलें
ध्वनित जाहले बोल बोबडे
सांग तुला घेउ कशी उचलुनी कडे !

भूमी पालखी सजविले कुणी
आत्मरूप सदय सख्या निजविलें झणी.
झोंपही तुला लागली कशी
तुजविण या शून्य जगीं होत मी पिशी.

हाक मारितां–हृदय धडधडे
आस मला सतत नेत मृगजलाकडे.

पाळणा तुझा बांधिला कुठे
अखिल ध्येय संपतेंच वाटतें तिथे.

हरित मालीका सोडिल्या कशा
रत्नखचित कोंदणांत जोडिल्या जशा.
पसरिले मधे गर्द शालिचे
नागमोड भरित गच्च किरण गालिचे.

स्वरुप सावळें जावळामुळें
न मला दिसत मुळीं नयन आंधळे
गज तुज वरी सजविला जरी
राह्य भास झोंप तुझी दिव्य अंतरीं.

मधुर माधुरी कोकिला करी
अधरबिंब हंसत तिमिर येइ लौकरी.
नेत्र उघडूनी किलकिले जरा
पाहि सदय शांत प्रभो दीन पामरा.

# वैभवांतली शूर बाला

देवाजीच्या कृपादृष्टिचा सडा जगावर पडला
पाताळाचा मार्ग झाकुनी तरंग वरती तरला
दृष्टी मधल्या या सृष्टीचा ठसा मनावर बसला
कडे पठारी गुहा मंदिरीं दीपक चमके कसला

कोण नांदते स्वैर सहचरी सह तेजाची मूर्ती
पंचगणाचे सेवक बनले थोरपणाची कीर्ती
झुळझुळ झोका मारुत देई पक्षी ओव्या गाती
वनस्पतींचा खडा पहारा घेर धरोनी भंवतीं

अगणित वनचर विशाल जलचर लोळत चरणावरती
स्वातंत्र्याच्या सुख हास्याची भालीं विलसे कांती
लोड तिवाशी पर्वत पडले भूमी शय्यागार
आकाशाची शाल झळकते नील मघांचा हार
गार पाचुचे अलंकार हे लेउन उरल्या राशी
तीच कुबेरा लाज आणिते ही धनदौलत खाशी
सौभाग्याचा सडा उधळुनी नित्य खुलविते रान
प्रभातकालीं वसुंधरा ती विसरुन जाई भान
सागर गंगा स्नान घालिते दवा धुक्याचें वस्त्र
सदय समाधी लाउन बसते उघडित नाहीं नेत्र
सत्गुणशाली दिव्य बालिका स्वातंत्र्याची राणी
पराधीनता चिरडुन केले पाया खालीं पाणी
पतिव्रतेचा अंत पहाया सविता तापा देतो
टिकमिक टिकल्या सरसर ओतुन अंबुद आच्छादीतो
मादक शशिकर जिज कपटानें रत्नें भूलवूं पाहतो
तोंच येऊनी काळोखीचा पडदा नयनीं पडतो
रिपुगण सारे चीत कराया सरसे कांस कसोनी
समर अंगणीं सज्ज जहाली अस्त्रा हस्ती धरुनी
रणभेरींचें वाद्य वाजतें नभीं दुंदुभी झडते
अष्टदिशांची ढाल फिरवुनी सृष्टी देवी लढते
अढळ ध्रुवाच्या समशेरीला कोणि टिकेना वीर
ब्रह्मयुगाचे धनु बांधुनी फेकी क्षणांचे तीर
विजयश्रीची प्रकाशमाला याच जगावर लोळे
पाणिदार या स्त्री जातीचें मोल मनावर खेळे

---

# वनमाली

[ जन्म सन १८९४ ]

प्रोफेसर वासुदेव गोविंद मायदेव, एम्. ए., भारत महिला विश्वविद्यालय, हिंगणें. यांनीं 'काव्यमकरंद', 'कवि तांबे यांच्या कविता' हीं पुस्तकें संपादिलीं आहेत.

## हंसरे मूल!

रम्य मृदुलशा वस्त्रांवरतीं
सुंदर बालक करिं चरणाप्रति
धरुनी हंसतें, विश्वापुढतीं । तेज जसें उदयीं

कमल उगवलें ! रत्न मिळालें !
तेज उगवलें ! पुण्यें दिसलें
भाग्य थोर हो म्हणुनि लाधलें । गोजिरवाणें हें.

भालीं रुळती कृष्ण कुंतल
शोभे बहु मृदु गालिं कज्जल
हांसें विलसे वदनीं विमल । जाशि प्रभा गगनीं

किसलयसम ते अधर शोभती
विकलपयाचे ओघ विलसती
फूत्कारोनी हंसे संप्रती । जेंवीं जलयंत्र

कोमल कमलें दोन विलसती
सान भृंग जणुं त्यावरि शोभति
नाचति खेळति गगनप्रांतीं । तारा नभिं जेंवीं

रक्त करांनीं धरुनी चरण
मुखांत नेई ओढुनि आपण
अमृत तया जें मिळतें तेथून । न कळे अज्ञजना.

## म्हणुनी का हंससी ?

[ मूल झोंपेंत हंसतांना पाहून ]

नभांत तारा फुगड्या धरिती
लपाछपीचा खेळ खेळती
चिमण्या तुज त्या वरती गमती । म्हणुनी का हंससी ?

बाल-कृष्ण-हरिणांचा मेळा
अंगणिं बागडतो जमलेला
चाटति स्वप्नीं होति गुदगुल्या । म्हणुनी का हंससी,

सुंदर वनदेवी कुरवाळुनि
फेकिती तुज का हातांमधुनि
हांसविती तव पापे घेउनि । म्हणुनी का हंससी ?

## बाळा अंगाई

बाळा अंगाई । अंगाई । निजरे झोंपीं जाई ॥
चिवचिव करणारी चिमणी ही घरटीं, निजुनी राही
वांसरू हम्मा । करुनी ही । दमलें, गप्प होई
चांदोबा वरतीं । करि घाई । ढगांत निजण्या जाई
चांद, वासरू । मम चिमणी । झोंपें कां नच अजुनी.

## माझें गाणें

माझें गाणें ऐकाल का ? । गाणें ऐकाल का ?
दुडदुड ऐशी चोंहिकडे मी नाचूं लागेन । अशी मी
म्हणूं नका ही वरची वीज नाचे येऊन । खालीं
गालीं माझ्या नीट पाहुनी हंसूं नका कोणी । बरें का

चंद्र पहा मी भूमीवरचा येथें नाचोनी । हांसतों
डोळे मिचकावोनी आतां हंसतें तुम्हां मी । आतां
म्हणूं नका परि पहा पहा रे तारा ही नामी । चमकते
पृथ्वीवरची एकिकडे ती संपत्ति मापा । सारी
थोर परंतू ठेवा माझा त्याहुनि हा पापा । माझा

## कमला

करीं परडी घेवोनि जात बाला
फुलें ताजीं वेंचून आणण्याला,
फुलांमध्यें तें फूल मिळुन गेलें
कृष्ण केशांनीं ओळखितां आलें
फुलांमध्यें ती फूल खुडित आहे
फुलांमध्यें ती बाळ हंसत आहे
फुलांमध्यें तें फूल फिरत आहे
उपवनाचा जणुं प्राण हलत आहे.

## आहें मी बाळ हो उगी !

भयें बागुलबोवाच्या अंधारीं कांपलों जधीं
धीराचा गमला शब्द, "आहें मी, बाळ हो उगी !"
भांडतां सांडतां सज्ज दापाया जन हे जधीं
धीराचा गमला शब्द, "आहें मी, बाळ हो उगी !"
कुतू, काऊ, मनू, माऊ, स्वप्नीं ये चावण्या जधीं
धीराचा गमला शब्द, "आहें मी, बाळ हो उगी !"
'तुला टाकोनि जाणार,' म्हणतां ये रडूं जधीं
धीराचा गमला शब्द, "आहें मी, बाळ हो उगी !"
काळ, शत्रू, भयें नाना जाचती मजला जधीं
आतां कोठून ये शब्द, "आहें मी, बाळ हो उगी !"

# सखाराम गोविंद विरकूड

[ जन्म सन १८९४ ]

रा० स. गो. विरकूड, बी. ए., यांचीं पावनखिंड, कर्मवीर तानाजी मालुसरे, शुक्लपक्षांतील अमावस्या, महाराष्ट्रशाहीर—गोविंदाग्रज हीं ऐतिहासिक कवनें व आर्तगीतें प्रसिद्ध आहेत. हे 'महाराष्ट्रसाहित्य' या मासिकाचे संपादक आहेत.

## सुप्रभात

मृत रजनि; येत हा जवळ
उषेच्या वेळ ! जागृती काळ.

अजि ऊठ गडे वेल्हाळा ! राजस बाळा !
भावना भावमय लीला—या जगताला
पाहुनी फुलूं दे त्याला—जन हृदयाला । जी

हा प्रभाततारा वरी । सुधेच्या करी । सेक जगभरी
चल त्यांत तुझी वैखरी—वर्षु दे सरी
उमटुं दे हृदय मंदिरीं—श्वास ईश्वरी
या वातावरणीं भरी—प्रेम निर्झरीं । जी

चंडोल गगन प्रांगणीं । हृदय साठणीं । प्रभूच्या चरणीं
ओतितो प्रेम पाठांनीं—प्रेमळ गाणीं
भेटवी धन्य हा धरणी—स्वर्गाचरणीं
आलाप गोड ते कानीं—नीट धरि ध्यानीं । जी

हा गुलाब गोंडस तसा । फुले राजसा ! प्रीतिचा ठसा
चल प्रातसमय सारसा—लुटाया असा
झणिं फेंक गुलाबी कटाक्ष—तव पाडसा !
घेईल गुलाबी वेशा—मग ही रसा । जी

# सखाराम गोविंद विरकूड

[ जन्म सन १८९४ ]

रा० स. गो. विरकूड, बी. ए., यांचीं पावनखिंड, कर्मवीर तानाजी मालुसरे, शुक्लपक्षांतील अमावस्या, महाराष्ट्रशाहीर—गोविंदाग्रज हीं ऐतिहासिक कवनें व आर्तगीतें प्रसिद्ध आहेत. हे 'महाराष्ट्रसाहित्य' या मासिकाचे संपादक आहेत.

## सुप्रभात

मृत रजनि; येत हा जवळ
उषेचा वेळ ! जागृती काळ.

अजि ऊठ गडे वेल्हाळा ! राजस बाळा !
भावना भावमय लीला—या जगताला
पाहुनी फुलूं दे त्याला—जन हृदयाला । जी

हा प्रभाततारा वरी । सुधेचा करी । सेक जगभरी
चल त्यांत तुझी वैखरी—वर्षु दे सरी
उमटुं दे हृदय मंदिरी—श्वास ईश्वरी
या वातावरणीं भरी—प्रेम निर्झरीं । जी

चंडोल गगन प्रांगणीं । हृदय साठणीं । प्रभूच्या चरणीं
ओतितो प्रेम पाठांनीं—प्रेमळ गाणीं
भेटवी धन्य हा धरणी—स्वर्गाचरणीं
आलाप गोड ते कानीं—नीट धरि ध्यानीं । जी

हा गुलाब गोंडस तसा । फुले राजसा ! प्रीतिचा ठसा
चल प्राससमय सारसा—लुटाया असा
झणिं फेंक गुलाबी कटाक्ष—तव पाडसा !
घेईल गुलाबी वेशा—मग ही रसा । जी



रा॰ नारायण गंगाधर लिमये, B.A.



कवि मंजुमाधव.



रा॰ स. गो. विरकुड. B. A.



कवि आनंद, B. A.

सोनेरी रविचे कर । करिति स्थिरचर । कर्मतत्पर
मोत्यांची झालर ल्याली—भू अलबेली
तृणदलें अश्रुनीं भिजलीं—मंगल कालीं
सुप्रभात उदया आलि—ऊठ वनमाळी ! जी

## गौळण

दधि गोरस बेचनवाली । राधिका खास खास अवतरली ॥

प्रणयाचे झाले खेळ । जिंकिला नंद नृपबाळ.
गृहकृत्यां नव्हता वेळ । ती हौस पुरविण्या आलि ॥ राधिका ॥

देवास सुधारस धार । दानवां सुरा मंदीर
दुग्धाचें सात्विक सार । पाजीत मानवा सुटली ॥ राधिका ॥

चिमकुलीच ही नव नार । करि बेचन दारोदार
तोरड्या पदीं झुमदार । वाजवीत गौळण बाळि ॥ राधिका ॥

'दूध घ्या दूध घ्या कोणी' शब्द हे सुमंजुळवाणी
कधिं अस्फुट निघतीं गाणीं । सहज वृत्ति रंगुनि गेलि ॥ राधिका ।

नाजूक कटीवरि ठेला । हात एक तो अलबेला
शिरिं दिला दुजा चरवीला । ती मूर्ति पूर्ण मनिं ठसली ॥ राधिका ॥

ठसठशीत गोंडस बांधा । गौरवर्ण वेशहि साधा
करणींची झालि न बाधा । सृष्टीच्या प्रेमामधलि ॥ राधिका ॥

रविताप होतसे फार । अति श्रांत जाहली नार
सावरीत मस्तकभार— । घामानें ही डबडबली ॥ राधिका ॥

आनंदपूर्ण परि वृत्ति । गृहकर्मी लव नच खंती
रतिबानें पोशित जगती । जगताची धात्री झाली ॥ राधिका ॥

सांवरीत चाले तोल । नेत्रांचे चंचल गोल
उडविती जनीं कल्लोळ । चेतना उडाली आली ॥ राधिका ॥

# विठ्ठल कृष्ण नेरुरकर

[ जन्म सन १८९४ ]

रा० वि. कृ. नेरुरकर, बी. ए., यांचीं 'राधा–कृष्ण–रहस्य' 'सिंहगड–दर्शन–काव्य' वगैरे खंडकाव्यें प्रकाशित आहेत. हे प्रमोद मासिकाचे संपादक असून 'दुधारी सुरी' ही यांची कादंबरी प्रसिद्ध आहे.

## काव्योद्भव

माळ हरित पीवळा पसरला गारच हिरवा मळा
तिळझाडांचा दळा बहरुनी दे बावनकशि कळा
हरिण-पुष्प-पाकळ्या हालती सोनेरी झिळमिळ्या
खुळखुळ निर्झर निळा वाहि, वर गाइ मधुर कोकिळा
आसनास ती शिळा काळि, वर गोल घुमट सांवळा
तरु–वेलींचा लळा
कवीला भला
समय लाभला—
या विभवा कवि भाळला आपणा मानी सुखि आगळा

उन पाउस संगतें अंबरी इंद्रचाप रंगतें
विविध रंगिरांगते मेघ ते बघुनी मन गुंगतें
पवनाच्या संगितें दंगुनी चित्तहि आनंदतें
स्वत्स्वरूप भंगतें अंतरीं विश्वरूप बिंबतें
डोळसता अंधते जिवाच्या बंध पडति बंधते
क्षणैक तनु सांडितें
स्वैर हिंडतें
सत्त्व धुंडितें
जिवींचें वारें आलिंगितें निसर्गी सोडुनियां भिन्न ते

## विठ्ठल कृष्ण नेरुरकर

दीर्घ वियोगावरी जिवींचा जिवलग येई घरीं
सोडुनि मथुरा पुरी गोकुळा भेटति जणुं श्रीहरी
चवदा वरुषांवरी जाहली भरतभेट कीं खरी
क्षणैक सारुनि दुरी उपाधी शारिरीक बहुपरी—
कविही तैशापरी निमीलित होइ निसर्गोदरीं,
भासत पाठीवरी
कुणी गोंजरी
स्ववत्सल करीं
तैं त्रिजगज्जननी धरी उरीं, कथुं कशि नवलाची परी!

त्या क्षणिंच्या त्या सुखा वर्णितां बसेन होउनि मुका
बोल मानवी फुका अनुभवा स्वतांच त्या कौतुका
विश्वगोल ठाउका हो, जशी ध्येयमूर्ति भाविका
हो मानस—पीठिका दिव्यशा स्फूर्तींची भूमिका
स्वर्गीयचि ऊर्मिका उमटवी दिव्य वैखरी मुखा
न परि एकसारिखा
समय सारिखा
राहि पारखा—
सुखास हो कवि निका जशी का मातेविण दारिका!

---

# अरविंद

## भास्कर नानाजी शिंदे

[ जन्म सन १८९५ ]

यांचें 'शिवबिल्वदल' काव्य प्रसिद्ध आहे. 'फाशाचा डाव' हें नाटक व ऐतिहासिक कविता अमुद्रित आहेत.

## महाराष्ट्रास अभिवादन

हिंदधराकर-भूतारविंदा !
स्वातंत्र्याच्या रस-निस्यंदा !
भरत-भारती-भव्य-निबंधा !
प्रणति तुज महाराष्ट्रजनपदा !

रघुनायकपदकंजलाञ्छिता !
परशुरामसहवासभूषिता !
पांडुभूपसुतहस्तलालिता !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा !

रणविभवश्रीहृदयस्पंदा !
वैराग्याच्या विजयानंदा !
नयनीतीच्या स्निग्ध मरंदा !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा !

चंदन-चंपक-गंध-वीजिता !
सह्य-विंध्य-मलयाद्रिवंदिता !
कृष्णा-तुंगा-तरंग-स्नाता !
प्रणति तुज महाराष्ट्रजनपदा !

संत-सुजन-सुम-हार-मंडिता !
कविवर-चारण-वृंदा-संस्तुता !
कृपाण-कार्मुक-किरीटवंता !
प्रणति तुज महाराष्ट्रजनपदा !

नव-निर्झरिणी-नृत्य-सस्मिता !
विहंगसंगीतानुरंजिता !
सस्यसंपदायुत धनवंता !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा !

वेदजीवना ! धर्मसंप्रदा !
श्रीमंता ! शिवविजयाम्भोदा !
'अरविंदा'च्या हृदयानंदा !
नमन तुज महाराष्ट्रजनपदा !!

# भवानी समशेर

दिव्य भवानी ! भव्य भवानी ! भवानि समशेरी !
रिपुरक्ताचे घेउनि घुटके श्रमलिस कां भारी ?

रक्त न अटलें रिपुचें, फिटलें कर्ज न देशाचें
ना धर्माचें, ना देवांचें, ना मृत वीरांचें !

खोल तुझी ती पुन्हां एकदां छोटीशी छतिया
बोल एकदां निज—मातेच्या विभवाची बतिया!

जगदंबेची भली लाडकी तशीच शिवबांची
तुझ्यावरी गे भिस्त राहिली भारत—जीवाची!

तोरण पहिलें तोरणगडिचें राष्ट्र—स्थापनेचें—
स्वातंत्र्याचें—धर्म यशाचें कोणाच्या करिचें ?

तूंच रुजविलें, तूंच रक्षिलें, बीज स्वराज्याचें
तूंच झाड गे वाढविलें ना स्वरक्तजलिं त्याचें ?

लाजलीस कां अशी अकालीं झालें तुज काय?
लाजतांच तूं झाड जळालें स्थिती हीन होय!

रिपु डळमळला हलतां तुझिया नेत्राचें पातें
स्थिरविशि त्याशीं आज अशी कां मिटून निश्चळ तें ?

प्राणावरती बाण रोखिला पुत्रांनीं प्रसुच्या
लाज वाटली तुज ती, तेणें नाड्या गारठल्या ?

राष्ट्ररक्षिणी, यशोदायिनी देविभवानी तूं;
तुझ्यावरी गे महाराष्ट्राच्या आशेचा हेतू!

ती असुची तूं देशहिताची मूर्ति स्वराज्याची
कुठें जाउनी कुठल्या स्थानीं राहिलीस साची?

विजयश्रीनें तुला वाहिली रिपुच्या रुंडांची—
लालभडक ती माळ कुठें गे लाल गुलाबाची?

माळ कुठें ती?—काळ कोपला!—पारतंत्र्य भाळीं!
होळी झाली स्वातंत्र्याची!—फितुरी दे टाळी!!

लोपतां तुझें गे पाणी
वीरश्री हो दिनवाणी
देशाची बहु धुळधाणी
वैभव तें झालें कानीं;—

येइं भवानी! देवि·भवानी! स्वदेश हा तारी!
दिली रिपूनें तुझ्या सुतांच्या करांत चौपदरी!!

* * *

चरचर चिरुनी गोमाता निज—राष्ट्र भाग्य—स्वाणी
देश मढविला रिपुनें त्यांच्या रक्त—कातड्यांनीं !

हिंद रडविली !—रडतें अजुनी त्या इंग्रज्यांनीं
रडें मातलें लपतां गे तूं धर्मांची राणी !

जोड हरपतां तुझी भवानी निर्मळ अति गोड
तोड न उरली भगवा झेंडा म्हणुनि होइ रोड !

तळहातींचा फोड तसें त्या अजवरि वागविलें !
रिपुरक्ताचें दिव्य दुग्ध त्या पाजुनि वाढविलें

कठिण आजि कां केलिस माया मायभवानी गे !
दूध तोडिलें एकाएकीं कां त्याचें सांग !

बाळ गुणाचें सुभग यशाचें रोडवलें फार
गाल फिकटले ओंठहि सुकले हालेना शरिर !

रिपुरक्ताच्या नद्यांवरोनी झुळझुळता वारा
तरतरवी यत्तनु तो खेळवि फिरून चौफेरा !

रिपुमुंडाचे खेळ मांडुनी समरमंडपांत
दे बाळातें खेळायातें—हंसेल हर्षांत !

विकिली माया परवशतेला तूंहि भवानी ! कां ?
रक्तरसाचा स्वातंत्र्याचा पाठहि पुशिला कां ?
रिपुरक्तरंजिता वसना ! दागदागिना ! दिला तूं कवणा ?

तुज जागजागिं डागिलें
वसनाचे तुकडे केले
हाल हे तुझे कां झाले ?—

माय भवानी ! धन्य भवानी ! सांगच आम्हांतें !
अनन्यभावें स्तन्य प्राशिलें जाणूं दे त्यातें ! !

ये ये धांवुनि भव्य भवानी, सत्वर ये, ऊठ!
रिपुरुधिराच्या अमृतरसाचे कुंभ भरीं लूट !!

सातसमुद्रापलीकडे वा असलिस पाताळीं
विद्युद्रूपें कडकडुनी ये भारतांत खालीं !
घ्या गौरीशंकर तिजला ! उमा-वेल्हाळा! भवानीबाळा !!

वरचेवर झेलुनि तिजला,
दाखवा महाराष्ट्राला,
शिवनेरी–रायगडाला !—

अहा! परी एकाकि कशाचा प्रकाश झगझगला !—
मायभवानी देशोद्धारिणि ही तुळजा–बाळा !!

---

# काव्यविहारी

[ जन्म सन १८९५ ]

प्रोफेसर धोंडो वासुदेव गद्रे, बी. ए., एल्एल्. बी.. वुइलिंग्डन कॉलेज, सांगली, यांचें 'काव्यविहार' प्रकाशित आहे.

## सौंदर्य म्हणजे ?

अंगिकारुनी मादकता, नटवेगिरिचा नूर
दावित दावित देवोनी, हुरळवाजिला जोर
उच्छृंखल बेभानपणें, उगाच फडकायाचें
नाहीं हें उद्दिष्ट कधीं, जगांत सौंदर्याचें

* * *

कांचपात्र कांठून जशी, लाल वारुणी उसळे
जळजळत्या उद्दामपणें आंदोलत फेंसाळे
या योगें आव्हान करी, जगास घुटका घ्याया
सुंदरता वारुणी नव्हे, जग हैवान कराया

* * *

पावित्र्यानें नमवीतें, जें दुनियेला पायीं
जयाभोंवतीं मोहकता, अविरत गुंगत राही
फिकट ज्यापुढें तारांचें तेजस्वी ऐश्वर्य
मेल्याला जीवंत करी, तेंच खरें सौंदर्य.

## पूर्वस्मृति

होता मंगल काल एक फिरलों संगें तुला घेउनी,
उद्यानीं मनरंजनार्थ अथवा आम्राचिया काननीं;
केव्हां तोडुनि गोजिरीं वनफुलें प्रेमें तुला अर्पिलीं,
केव्हां नूतन आम्रमंजिरि तुझ्या वेणीवरी खोंविलीं

जादूचा कर लागतां बहरलीं गालीं गुलाबी फुलें,
आनंदें तव लोचनीं झरझरां अश्रू उभे राहिले,
हस्तीं घेउनियां मृदू कर तुझा माझ्या हृदाआंतलीं
प्रीतीचीं वचनें त्वदीय श्रवणीं सोत्कंठ म्यां ओतिलीं.

होतों सौख्यगिरीवरी तुजसवें दैवा न हें साहलें,
माझ्यापासुनि दूरदूर म्हणुनी त्यानें तुला ओढिलें;
वार्ता जेथुनि यावयास सखये ! लागे अती आवधी,
तेथें येउनि पाहणें तुज, मला ना शक्य जन्मामधीं.

तेथें तूं असशील मग्न सखये ! सौख्यांत रात्रंदिन,
येथें मी करितों अखंड हृदयीं प्रेमें तुझें चिंतन;
तूं नाहींस इथें म्हणूनि गमतें निःसार सारें मना,
नेतों काल कसा गडे ! तुजविणें, नाहीं तुला कल्पना.

उद्यानीं फिरतां प्रभातसमयीं केव्हांतरीं राजसे !
एकादी दंवबिंदुयुक्त कलिका दृष्टीपुढें येतसे;
मानेनें खुणवी हळूं मधुकरा लाजे बघे भूवरी,
सौख्याचा गतकाल आठवुनियां वृत्ती बने बावरी.

---

# मनोहर

[ जन्म सन १८९६ ]

गोपाळ गंगाधर पोतदार, बी. ए., एल्. टी. यांचीं छत्रपति, श्रीमहाराष्ट्र हीं खंडकाव्यें प्रसिद्ध असून मुशाफर, कबुलीजबाब हीं खंडकाव्यें प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. यांची समग्र कविता 'रानफुलें' या नांवानें प्रसिद्ध होणार आहे. यांचें 'प्रेमसेवा' हें नाटक लौकरच रंगभूमीवर येणार असून 'धर्मांतर' हें ऐतिहासिक नाटक ते लिहीत आहेत. काव्यकौमुदीचे हे संपादक आहेत.

## विनंति

( चौपाटीवर लोकमान्यांच्या समाधीचें दर्शन घेतांना कोणता देशभक्त अशी विनंति करीत नाहीं ? )

उठ, महाराष्ट्र–सम्राटा, उठ, टिळका वाग्भट धीटा,
ठाकला प्रसंगहि मोठा, उसळती भयंकर लाटा !
शौर्याचा सरला साठा ! ओसाड धनाच्या पेठा !
जुलुमाचा तापद ताठा, ढळवितो शांतिचा काटा !
उठ, दावि सुखाच्या वाटा ! बघ, आग लागली पोटा !
ऐक्याची फाटाफूट, मतभेद, आणिती वीट !
उठ, काढि शत्रूचा काटा, राष्ट्रैक्य करी रे, सुभटा !

## दुर्दैव

" दर्या तुफान अफाट, वरि नाचरी हि लाट !
पाऊस भरमसाट, पुरवीत वात पाठ !
काळोख हाय ! दाट, उमजे मुळीं न वाट !
चल, साजणी, घराला,"
कवळी गळ्यास बाला !

" पसरे हि काळरात ! दावीत वीज दांत !
अंधार अभाळ खात ! रडते अभागी प्रीत !
गेले थकून हात ! करि कमनशीब मात !
चल, साजणी, घराला,"
कवळी गळ्यास बाळा !

ओठास लावि ओठ, कवळी गळ्यास घट्ट !
डोळ्यांत पाहि नीट, आतां पुन्हां न भेट !
बांधी न लग्नगांठ ! जगतांत प्रीत धीट !
जाऊं, चला, घराला
बेभान मर्द झाला !

" दर्यांत या फिरावें, दुनियेस वीसरावें,
नयनीं स्वरूप भरावें ! मनिं प्रेमगीत गावें,
प्रिय प्रीतिच्याच नांवें, ऐसें मरूनि जावें !
जाऊं, चला, घराला
बेभान मर्द झाला !

गेली बुडून नाव, उरलें जगीं न नांव !
" दुर्दैव घालि घाव, मग होइ रंक राव !
जीवा कशास हांव ? जवळी न प्रेम गांव !"
दारूण प्रेमलीला,
रडवी मनोहराला !

## इशारा

हिरवळ सरली बाल्याची । हंसण्याची बागडण्याची,
तारुण्याच्या वनामधीं । जाण्याची आली संधी !
उत्कंठेनें हृदय भरे । मन बांधी सुख डोलारे !

कुणास ठावा, विधिचा कावा !
करूं नको गाजा वाजा । जपून जा गडे जपून जा !

सौंदर्याचें वेड जडे । पैशाचे जगिं पोवाडे !
कीर्तीविण कां कांहिं अडे ? । मानाचें तें बेंड बडें !
प्रेमाच्या या हृदयांनीं । परस्परांना करिं धरुनी
गिरि शिखरावरि, निर्झरतीरीं,
चल आपण गे करूं मौजा । जपून जा०

हात दिला परि दैवानें । खरें पडे पदरीं नाणें !
कल्पनेंतलें चित्रच तें । प्रत्यक्षामधिं जणुं वठतें !
मनोरथांची उंच उडी । आकांक्षेची पैलथडी !
माझी आली, हातीं आली,
ये, विरहाला देउं रजा । जपून जा०

लज्जादीपक मालवुनि ! गांठ भिडेची सोडोनी !
गोड शांतिचे बोल मुके । बोलूं अगणित, राहुं भुके !
हृदयाच्या वीणेवरती । चल, सौख्याच्या छेडुं गती !
आनंदाची, नाविन्याची,
करुं लीलाही तिन्हि सांजा । जपून जा०

ओसरला पहिला पूर । रूपाचा बदले नूर !
दृष्टीची बिजली थिजली । पोटाची चिंता जडली,
संसाराच्या फेऱ्यांत । कल्पनेंतल्या राज्यांत
सांपडलेला, बावरलेला
जीव रडे । कुठल्या मौजा । जपून जा०

संसाराचा हव्यास । वाढे चिंतेची रास,
वरच्या लत्तेला माथा । दिली तीच खालीं लत्ता,

एकाचे करुनी दोन । दोहोंचे शत संपूर्ण,
चंचल नारी, श्रीहि सुंदरी.
हसतां, वाढे जगि दर्जा । जपून जा०

मरणाच्या दारीं पडला । जीव मनीं बहु घाबरला !
भूतकालचीं भुतें जितीं । नाचतात नयनां पुढतीं
डोळ्याला पाणी आलें । पुसायास कोणी नुरलें !
हर ! हर ! गेलें, आयु संपलें !
नाहिं रिझविला प्रभुराजा । जपून जा०.

आयुष्याचा आरंभ । हृदयभावना स्वच्छंद
ऐश्वर्याच्या ऐनपणीं । भरतीचें चढतां पाणी
विसरुनि मंगल प्रभुचरणा । भुललों निर्जिव चित्रांना
आशा मेली ! हौस पळाली !
विस्मृतिचें विष मज पाजा । जपून जा०

जपून जा कोठें आतां ? । जाण्याची सरली वार्ता !
जातांना नाहीं दिसलें । मन मोहाला हें फसलें,
कल्पतरूचें सुम दिसलें । परि तें स्वकरें चुरगळिलें !
कामधेनुनें ! चालुनि येणें
परि तिजला वदणें जा, जा । जपून जा.

चिंतामणि हातीं आला ! हाय ! दूर तो भिरकाविला !
गंगा ये आळशावरती ! दुर्दैवें केली परती !
जन्माची झाली माती ! दगड निराशेचे हातीं !
पश्चात्तापी, असला पापी,
उद्धरशिल का प्रभुराजा ! जपून जा गडे जपून जा०

# माता कीं कांता

हास्य मुखाचें मुखीं विलसतां दृष्टी वळते सखीकडे !
डोळे भरुनी येतां दुःखें मन मातेस्तव हो वेडें !

संपत्तीच्या हंसऱ्या दिवशीं जीवाला सखिचा ध्यास !
आपत्तीच्या रडव्या रात्रीं मातेवर सगळी आस !

क्षणभंगुर स्वर्गांत नांदते राशी हृदयाची–कांता !
चिरंजीव जगतांत घालिते पांखर मायेची माता !

वसंतकालीं चटकचांदण्या हृदयीं धरिती अस्मान !
वर्षाकालीं राख फासुनी रडे सारखा बेभान !

हृदयदेविला तारुण्याची झाली रसवंती साद !
गदार्त वार्धक्याची भाषा आईचा घेई नाद !

तारुण्याचा वसंत भुलतो सुंदर ललना सृष्टीला !
शिशिर हळहळे वार्धक्याचा स्मरुनी प्रेमळ मातेला !

जुनी पुराणी विसरुनि माता, नवीन कांतेच्या मागें
यौवन धांवे; परी 'मनोहर' वंदी माता अनुरागें.

# आम्ही कोण

[अतिशयोक्तीची राख झाल्यावर कठोर सत्याचा अंगार या कवितेंत दिसणें अशक्य नाहीं !]

आम्ही कोण ? मनास प्रश्न पुसतां, अंगीं भरे कांपरें !
आम्ही वंशज दुर्बल, प्रबल त्या वीराग्रणींचे खरे !
भारातीर्थ करूनि पूत निजले ते मायदेशास्तव !
सेवाधर्म करूनि आम्हि जगतों या क्षुद्रपोटास्तव !

ते होते बहु दानशील, विजयी, उत्साहदाई, शुची,
आम्ही कंजुष, राव नित्य रडके, हा ! वाममार्गी रुची !
त्यांनीं ईशपदाम्बुजें कवळिलीं संसार मार्गी सुखें,
आम्हां मत्सर, काम, जाळिती सदा, आयुष्य गेलें फुकें !

देशोद्धार करावयास झटले ते शूर रात्रंदिन,
एकी साधुनि, बेकिनेंच अमुचें हो राष्ट्र निर्दालन,
अन्योन्यांवरि वाक्प्रहार करुनी, स्वीय प्रतिष्ठा सदा
वाटावी म्हणुनी सदैव झटतों आम्ही अहा संपदा !

धर्माची अवहेलना, विषय ज्या प्राणांहूनीही प्रिय
ऐसें हे कवि वावदूक§ वदती वाटेल तें निर्भय !

# वीरवंदन

हातीं सत्ता अमित, उसळे रक्त ताज्या दमाचें
सौंदर्यश्री वदनभुवनीं सोज्वळा नित्य नाचे !
खेळे गेहीं अमित सुखदा राज्यलक्ष्मी विशाल !
तारुण्याच्या सुखदसरितेमाजी खेळे नृपाळ !†

कल्याणाचा अमित खजिना बादशाही लुटोनी
रूपश्रीही धरुनि आणिली शूर त्या सैनिकांनीं
सौंदर्याशीं नजर भिडतां होय तारुण्य वेडें !
भूपालानें परि उकलिलें हें गुलाबीच कोडें !

धारातीर्थी पडुनि करिती वीर स्वर्लोकयात्रा
आनंदानें, मरण करिते मुक्त या जीवमात्रां !

§ या कठोर सत्याबद्दल वाग्भटांनीं क्षमा करावी. † शिवाजी.

स्वार्थत्यागी विभवसुमनें अर्पिती वीर कोणी
विश्वव्यापि प्रभुपदिं मुदें, कीर्ति गाईल गाणीं !

तारुण्याच्या भुवनिं परि जो संयमी, पूत, धीर,
त्या वीराच्या चरणिं, विषयत्रस्त हें ठेवि शीर !

---

# गुणवंत हनुमंत देशपांडे

[ जन्म सन १८९६ ]

## कांहीं कळेंना !

मेघ गर्जेना ! पाणी बरसेना ! रान कैसें हिरवें राही !
कांहीं कळेंना ! ॥

आकाशाच्या शेतामध्यें कुणी तरि पेरी मोत्यें
पीक चांदण्याचें येतें कैसें कळेंना !

आकाशाच्या उद्यानांत कुणी लावी दिव्य वेली
चंद्रसूर्य फुलें आलीं वेली दिसेना !

काय अभिनव झालें ! बाग नभीं जे फुलले
रातोरात सुकुनी गेले कैसे कळेंना !

तेजोनिधि भास्कर तो सोळा कळीं प्रकाशतो
काळोखानें काळा होतो कैसा कळेंना !

आकाशींच्या माळरानीं गर्जे बादल बरसे पाणी
तेजें भरे मंदाकिनी पाणी राहिना !

हासे दामिनि मेघ बघुनि ती हसतां माणिक मोतीं झडती
पाउस त्याला कोणी म्हणती कैसें कळेंना !

सृष्टि सुंदरिचें लेणें आकाशींचें चांदी सोनें
कोण घडवी हे दागिने ! कांहीं कळेंना !

भाव अंतरीं उठती शब्द वाचेंतुनी येती
भावशब्दांची संगती कैसी कळेंना !

गुणवंत हनुमंत देशपांडे

# विनवणी

सोड सख्या श्रीहरी ! । झडकरी
सोडुनिया निजनाथ पहा ही
सरलि दुरी शर्वरी । झडकरी ॥ सोड सख्या ॥ धृ०॥

जागि उषा सुंदरी । जाहली
रवि नयना उघडितां सृष्टिची
झोंप ओसरे पुरी । झडकरी ॥ सोड सख्या ॥

गलबल करिती किती । पाखरें
झोपाळू जगतास सुचविती
सोड शयन संप्रती । झडकरी ॥ सोड सख्या ॥

कमलिनी सह रंगुनी । यामिनी
बघ आनंदें भृंग उडाले
मृदुदल पाशांतुनी । झडकरी ॥ सोड सख्या ॥

असाचि जरि वाटतो । रहावा
गळ्याभंवतिचा पाश करांचा
सोड सोड सत्वरीं । झडकरी ॥ सोड सख्या ॥

विचार करि अंतरीं । लवभरी
मी अबला मज बाहुपाश तव
कसा सोडवे तरी ? । झडकरी ॥ सोड सख्या ॥

तुटली आलिंगनीं । अडकुनी
गळ्यांतली वनमाळ तुझ्या ती
घ्यावयास गुंफुनी । झडकरी ॥ सोड सख्या ॥

रात्रभरीं खेळुनी । तुजसवें
माझा जो श्रृंगार बिघडला
सुधराया तो तरी । झडकरी ॥ सोड सख्या ।

ऐक एवढी तरी । विनवणी
काय वडिल म्हणतील अंतरीं
लाज तयांची धरी । झडकरी ॥ सोड सख्या ॥

---

# कृ. प. तासकर

[ जन्म सन १८९६ ]

## चपला

तेजानें विखरीत खेळत तदा वेल्हाळ होती पुढें;
गीताचा उभवीनि स्वर्ग जगतीं हें वेड चित्ता जडे.
तेजाची चपलाच नाचत जणूं या मन्मनोमंदिरीं
वाटे धैर्यबळें रिघेन म्हणिं मी या गूढ व्यामोदरीं
तद्रीतें मुखरीत भाव मनिंचे संमेळती डोलती
मद्वृत्ती जणुं येत घेऊनि करीं प्रेमासि पंचारती.
प्रेमाचे परि खेळ खेळत दडे वेल्हाळ विश्वोदरीं
गीताची जहरी निशा पचवितां स्वेदांबु भालावरी.
तेजातें मनिं चेतवूनि चपला अंतर्हिता जाहली
त्यातें मी दिनरात जागवि उभा एकाकि माळावरी
प्रेमाची दुनियाहि वत्सलरसें जी त्वां मनीं पोशिली
तेजाची पहिली पुजा तिजसि ना म्यां पाहिजे बांधिली !

## किती आळवूं ?

किती आळवूं तुज आळवितां हृदय भागलें—किती आळवूं !
करुणगीत सतत गात दारिं तिष्ठलें—किती आळवूं !

आशेच्या मृदु किरणीं
दंग सौख्य रस सेवनिं
फुलांमध्यें । मुलांमध्यें
गानिं रमत । नाद लुटित

रुळत झुलत जननि अंकिं आयु उधळिलें—किती आळवूं !

जीवाची बाग फुलालि.
प्रीतिलता बहर ल्यालि.
मंद हंसत । मंद डुलत
चौफेरी । हास्य विखरि
कवनपुष्प—प्राणपुष्प खुडुनि वाहिलें—किती आळवूं

प्रीति परि तव न्यारी
दंश ते करी विखारि
हास्य नुरवि । अश्रु नुरवि
शांत—स्वन । मम जीवन
तव निष्ठुर पायदळीं पखरुनी दिलें—किति आळवूं

# केशवकुमार

[ जन्म सन १८९८ ]

रा० रा० प्रल्हाद केशव अत्रे, बी. ए. यांचें 'अकरावा अवतार' नांवाचें खंडकाव्य प्रसिद्ध आहे. कवनगुच्छ, महाराष्ट्र-शारदा, विविधकाव्यमाला वगैरे काव्यसंग्रहांतून यांची स्फुट कविता प्रसिद्ध झाली आहे. 'पिंपळपान' नांवाचें यांचें नाटक अपूर्ण आहे.

## फत्तर आणि फुलें

होता डोंगर पायथ्यास पडला धोंडा भला थोरला;
वर्षें कैकहि लोटलीं तरि न तो हाले मुळीं आपुला !
आनंदी फुलवेल एक जवळी होती सुखें राहत;
बाळें सांजसकाळ हांसत तिचीं तैशींच कोमेजत !

थट्टेखोर फुलें हंसूनि वदलीं धोंड्यास तीं एकदां
"धोंडा केवळ तूं ! अरे, न जगतीं कांहीं तुझा फायदा !"
संतापूनि तयांसि फत्तर म्हणे, "कां हीं वृथा बोलणीं !
सारी सुंदरता इथेंच तुमची जाईल रे वाळुनी !"

धोंड्याच्या परि काळजास भिडले ते शब्द जाऊनियां;
काळाठिक्कर यामुळें हळुहळू तो लागला व्हावया.
पुष्पांच्या कवळ्या मनांतहि सलें तें फत्तराचें वच
गेली तोंडकळा सुकून, पडलीं तीं पांढरीं फारच !

कोणी त्या स्थळिं शिल्पकार मग तो ये हिंडतां हिंडतां,
त्याच्या स्फूर्तिस फत्तरांत दिसली कांहीतरी दिव्यता;
त्याची दिव्यकलाकरांगुलि न जों त्या फत्तरा लागली,
श्री, सौंदर्य, मनोरमा प्रगटुनी साक्षात् उभी राहिली !

वेडापीर असाच गुंगत कुणी एकाकि ये त्या स्थळा,
ती मूर्ती बघतांच तो तर खुळा नाचावया लागला !
त्यानें तीं खुडुनी फुलें भरभरां पायीं तिच्या वाहिलीं,
तों, त्यांची फुलुनी कळी खदाखदां सारीं हंसूं लागलीं !

*　　*　　*

लावण्याकृति ती वनांत अजुनी आहे उभी हांसत,
पुष्पेंही बसलींत तीं बिलगुनी पायीं तिच्या खेळत !

# भावना आणि जीवन

तीर घुसुनि पंखांत, ऊर बंबाळ जाहला जरी,
जखमी जीवन तरी पांखरूं कंठी वाऱ्यावरी

गोता बसुनी तुटला दोरा, पलटी खाई तरी,
गिरक्या मारित पतंग हिंडे अधांतरीं भिरिभिरी !

पिचला पावा गळ्यांत, गेली ओघळुनी माधुरी,
दीड वितीचा देह लांकडी तरी जगे बेसुरी.

तुटले नाडेदोर—फाटलें शीड, सुकाणूं सुटे,
तुफान लाटांवरी नाचतें तारूं तरि एकटें

झडे पालवी, गळे फुलोरा, वठल्या फांद्या तरी,
वर्षोवर्षे खोड ताठचे ताठचें जागेवरी !

ओघ उन्हाळुनि झरा आटला, थेंब टिपुसना उरे,
तसेंच उघड्या माळावरतीं पात्र कोरडें फिरे.

पिढ्यापिढ्याच्या संसाराची राख जाहली जरी,
गृहलक्ष्मी तरिकाळ कंठिते पडक्या भिंतीवरी !

निष्ठुर बाला जीव तुडवुनी पायदळीं जाय ती—
पाकपाकळ्या तुट्टून पडल्या देंठांपुनि खालतीं !

वाऱ्यावरतीं उडून गेला सुगंध मैलागिरी,
पराग वाळुनि, जीवन झालें निर्माल्याचे परी !

तरी कशाला दुर्दैवा हें विनाभावना जिणें ?
धन्य खरोखर मरण—जरी तें अशा क्षणीं लाभणें !

# चिरविरह

स्वर्गाची हंसते जरी तुजवरी ही चंद्रिका सागरा,
उत्कंठा अनिवार दाटुनि उरीं होशी तरी घाबरा;
वर्षाया स्मितकौमुदी मजवरी चंद्रानना ती न रे,
चित्तीं व्याकुळ मी किती मग तिच्या होऊं वियोगें बरें ?

पानाआड दडे तुझी प्रियतमा ती चक्रवाका, जरा—
टाहो फोडुनि धायधाय रडती तूं तों वियोगा तुरा !
काळाची मुखवासुनी पसरली आम्हांमधें ही दरी,
अश्रूंच्या प्रलयांत कां न बुडवूं सर्वस्व मी हें तरी ?

ठेवी सूर्यप्रभा हताश जगता नक्षत्रमाला जरी,
कंठी एकच रात्र तें तिजविना जीवन्मृताचे परी !
प्रेमाचें स्मृतिचिन्ह—शेष अथवा, कांहीं न मागें उरे,
रात्रीमागुनि रात्रि या मग कशा कंठूं तरी मी बरें ?
कल्पान्तीं ग्रहगोल कल्पविरही सारे तरी भेटती,
कल्पान्तींहि दिसेल हाय ! फिरुनी लावण्यलक्ष्मी न ती !

# अपुरी माळ

काय वाटलें कुणांस ठावें, आलें कांहीं मनीं,
तशीच उठुनी लगबग गेलें जाइजुईच्या बनीं.

निथळत होता बार सुगंधी गर्द ताटव्यावरी,
सांडत होती दौलत खालीं चैत्राची हांसरी.

तेजाच्या ओंजळी ओतुनी पानापानावरी,
शिंपित होती सकाळ वरुनी शिडकावा केशरी.

हलक्या हातें वायू हलवी हळूहळू फुलवरा,
दंव मोत्यांचा सांडत होता खालिं रुपेरी चुरा.

चिमण्या चोंची उघडुनि, छाती डौलानें काढुनी,
रानपांखरें नाचत होतीं किलबिल पानांतुनी.

सौंदर्याचा उघडा खजिना पाहुनि भंवतीं असा,
क्षणभर गेली दिपुनि दरिद्री दृष्टीची लालसा.

सुटे चोरटा अंगिं शहारा, जवळीं जातां जरा,
सुगंधलक्ष्मी लुटावया परि जीव होय हावरा.

तशीच तोडुनि कशीतरी मग फुलें कांपऱ्या करीं,
ओंजळ भरली—आणि परतलें त्याच पावलीं घरीं.

माळ फुलांची तोंच वाटलें कीं गुंफावी तरी,
म्हणून बसलें पाठ उन्हाला देउनि ओटीवरी.

हाताची चालली झरझरा इकडे ही ओंवणी,
तोंच कल्पना गुंफूं लागे माला दुसरी मनीं.

उलगडुनी सर आठवणींचें सूत्र मोकळें करी,
आशेच्या कोंवळ्या कळ्या मग त्यांत सारखी भरी.

घटका सरली—तरी संपेना माळहि इकडे मनीं,
फुलें संपली तोंच हातचीं, जागी झाले क्षणीं.

भाव जागच्या जागीं थबकले, विचारही त्यासवें,
शब्द आंतल्या आंत विसरलें, कांहिं न मुळिं बोलवे.

सुरेल गुणगुण पळांत मनची वाऱ्यावर पांगली,
आठवलेली कडवीं अगदीं ओंठावर थांबलीं !

माळ मनांतिल मनांत विरली, धागा सगळा सुटे,
हातीं अपुरी माळ राहिली, फूल न उरलें कुठें !

पुन्हां आणखी फुलें तोडुनी आणुं तरी मी कशी,
क्षणांत जाइल माळ सुकुनिही हातावरि ना अशी !

अशी अपुरी माळा असली वाहुं कुणाला तरी ?
उदारतेनें प्रेम कुणाचें घेइल करुनी पुरी ?

लावण्याची काय अपूर्णच सदा कळाचातुरी,
सौंदर्याचा संसारच कां असे पांगळा तरी ?

मनीं मुखीं जें वसे, आणखी हातीं जें जें असें,
तें तें सगळें दुर्दैवा, कां ठेविसि अपुरें असें !

अपुऱ्या माळा—अपुरीं गाणीं—अपुऱ्या या कल्पना,
पायिं वाहतें तुझ्या जिवलगा, मानुनि घेशील ना ?

# कुमार

[ जन्म सन १८९८ ]

रा० रा० विष्णु सखाराम खांडेकर, 'आदर्श' या टोपण नांवानें हे विनोदी लेख लिहितात.

## जन्मभूमि

जन्मभूमिवरि करि कुरवंडी ।
प्राणांची निज, जग ब्रह्मांडीं ॥

दीडवितीचा चिमणा रोपा
स्वशिरीं साहुनि प्रखर आतपा
देत सांवली घे आलापा
सहज देह मातेस्तव दंडी.

ग्रीष्में गिरिभूमी रखरखली
निर्झर देऊनि आपुला बळी
पर्जन्याला आणी जवळी
देह, तिच्यास्तव फेंकी दगडीं.

जलदेवीच्या नाजुक बाळा
मालेचें यश पसरायाला
तृणवत् गणिती फत्तर काळा
तुटुनी फोडिति कोंदट भोंडी.

तुकडे करुनी निजदेहाचे
दिव्य वस्त्र समरांगणिं नाचे
लोट उसळती चैतन्याचे
जन्मभूमिच्या शत्रूंसि खंडी.

तृण जीवाचा धरी गालिचा
सुकल्या पुष्पीं भर वेलीचा
पूर्वेसाठीं अस्त रवीचा
तार जीव गायनिं निज तोडी.

## सांवली

वसंताच्या पाहुनी वैभवाला
ग्रीष्म ईर्ष्येनें गगनमार्गि आला
वनश्रीची नच मिळे कंठि माळा
म्हणुनि लागे मत्सरें जळायाला

भूमिमाता अस्पृश्य पदां झाली
दूर जाती जन, नदी सुकुनि गेली
उन्हां तान्हांतुनि धांवतात पांथ
स्पर्श छायेचा निज न करुनि घेत

धर्मकार्याचा शिरीं पुण्यभार
रास धान्याची दाखविते थोर
विप्र घेउनियां परतला गृहातें
पांच वर्षांचें बाळ सवें होतें

पाय पोळुनियां 'हाय हाय' चाले
मंत्र शिमग्याचे किती मुखीं आले
मेघरायें क्षणभरी दिली छाया
नमुनि त्याला लागला पुढें जाया

झांड कांटेरी सहज दिसे मार्गीं
सांवलीचा नच लेश दिसे अंगीं

तरी बाळासह विप्र उभा राहे
पावलाचा गारवा मनीं पाहे

'धन्य तरुची सांवली' वदत जाई
अंत्यजाचें तों बाळ पुढें येई
कृष्णपक्षांतिल रम्य चंद्रकोर—
चुकुनि मातेला भ्रमत असे पोर !

बाळ धांवे—गर्जना थोर होई
" दूर म्हाराच्या कारट्या दूर राही
जरी पडली सांवली तुझी देहीं
स्नान केल्याविण अन्न मुखीं नाहीं "

कडकडाटानें कळी जळुनि गेली
मूर्ति चिमणी गुरफटे अश्रुजालीं
काय पाषाणां होय बाष्पधारा
काय प्रेतांना प्राण देइ वारा ?

बाळ गेलें तें रडतरडत वाटे
विप्र विजयी पातला गृहीं थाटें
फूल पुष्पाचें दुःख जगीं जाणे
विप्रबाळाचें एक सदा गाणें

'मेघ देई सांवली घेतली ती
झाड देई सांवली घेतली ती'
राग कां ये मग बाळ—सांवलीचा.
नको त्याचा तर नको स्पर्श माझा

## भग्नहृदय

झोंपे सागरबाळ विश्वजननीवक्षीं निळें सांवळें !
नेत्रीं—स्वर्गच पूर्विचा—विहरतो नौकामिषें त्याचिया

हो प्रौढापरि क्षुब्ध भग्नहृदयीं दुर्दैव झंझानिलें
नौकेच्या हंसऱ्या क्षणांत ठिकऱ्या होती ! विधे निर्दया

कारंजासम चंद्रमा उधळितो ज्योत्स्ना–तुषारां नभीं
भासे सृष्टिसखी असे कृतयुगीं, आशा यशस्वी सदा
वर्षेची चपला करांगुलि दिसे ये मेघमालाऽऽपदा
नैराश्यें नभ व्यापिलें–न रमणी एक स्मशानीं उभी

प्रेमाचा पसरे प्रकाश हृदयीं अद्वैत दावावया
आलेला परि होम होउनि चिता; वैधव्य दे वोहलें
माधुर्यें अपुल्या सुवेस सजला जो लाज आणावया
त्या आम्रावरि चांदण्यांत चपला मायाविनी कोसळे

नौका ती, नभ तें निरभ्र, तरु तो, बाला नव्हे बाहुली
द्या द्या या हृदयास कान–रडती दैवें तिथें कोंडली

---

तरी बाळासह विप्र उभा राहे
पावलाचा गारवा मनीं पाहे

'धन्य तरुची सांवली' वदत जाई
अंत्यजाचें तों बाळ पुढें येई
कृष्णपक्षांतिल रम्य चंद्रकोर—
चुकुनि मातेला भ्रमत असे पोर !

बाळ धांवे—गर्जना थोर होई
“ दूर म्हाराच्या कारट्या दूर राहीं
जरी पडली सांवली तुझी देहीं
स्नान केल्याविण अन्न मुखीं नाहीं ”

कडकडाटानें कळी जळुनि गेली
मूर्ति चिमणी गुरफटे अश्रुजालीं
काय पाषाणां होय बाष्पधारा
काय प्रेतांना प्राण देइ वारा ?

बाळ गेलें तें रडतरडत वाटे
विप्र विजयी पातला गृहीं थाटें
फूल पुष्पाचें दुःख जगीं जाणे
विप्रबाळाचें एक सदा गाणें

'मेघ देई सांवली घेतली ती
झाड देई सांवली घेतली ती'
राग कां ये मग बाळ—सांवलीचा
नको त्याचा तर नको स्पर्श माझा

## भग्नहृदय

झोंपे सागरबाळ विश्वजननीवक्षीं निळें सांवळें !
नेत्रीं—स्वर्गंच पूर्विचा—विहरतो नौकामिषें त्याचिया

हो प्रौढापरि क्षुब्ध भग्नहृदयीं दुर्दैव झंझानिळें
नौकेच्या इंसऱ्या क्षणांत ठिकऱ्या होती ! विधे निर्दया

कारंजासम चंद्रमा उधळितो ज्योत्स्ना–तुषारां नभीं
भासे सृष्टिसखी असे कृतयुगीं, आशा यशस्वी सदा
वर्षेची चपला करांगुलि दिसे ये मेघमालाऽऽपदा
नैराश्यें नभ व्यापिलें–न रमणी एक स्मशानीं उभी

प्रेमाचा पसरे प्रकाश हृदयीं अद्वैत दावावया
बालेला परि होम होउनि चिता; वैधव्य दे बोहलें
माधुर्यें अपुल्या सुवेस सजला जो लाज आणावया
त्या आम्रावरि चांदण्यांत चपला मायाविनी कोसळे

नौका ती, नभ तें निरभ्र, तरु तो, बाला नव्हे बाहुली
द्या द्या या हृदयास कान–रडती देवें तिथें कोंडली

## काव्यशेखर

[ जन्म सन १८९८ ]

रा० रा० भास्कर काशीनाथ चंदूरकर यांचें 'पुष्पपराग' हें कवितेचें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे.

### हांस गडे !

चुंबुनि बघतां तुझ्याकडे
नयनीं संमति दृष्टि पडे !
गुलाब गालीं अहह! फुलले
वदनीं सुंदर स्मित खेळे
चित्त मोहुनी
जातें साजणि !
तुजला बघुनी
माझा मजला विसर पडे
हांस गडे ! तूं हांस गडे !
अशीच हांसत रहा गडे !

### सवाल !

" सुजला सुफला सुवर्णभूमि "
ज्या भूमीला म्हटलें आम्हीं
सोनें पिकलें तेथें सांप्रत—अन्न मिळेना खायाला !

गोड फळांनीं गजबजलेले
कल्पतरूंचे मळे लागले
भूमिभाग तो दिसतो नयनां—दारिद्र्यानें खरखरलेला !

झाडें भरडें अंगापुरतें
वस्त्र मिळावें म्हणुनी जेथें
दीन होउनी बांधव फिरती—पीळ पडतसे हृदयाला !

तेज दावुनी विजय मिळविला
तेथें आम्ही लुटतों पाला !
" काप जाउनी भोकें उरलीं "—विषाद वाटे चित्ताला !

जो तो चिंताव्यास्त जहाला
ठाव दिसेना आनंदाला
तेथें तुम्ही घेउनि बसलां—दिपवाळीचा सण कसला !

विचार थोडा करुनी पाहें
स्थिती अशी ही जेथें आहे
तेथें कांहीं करण्याजोगें—कार्य नसे का वद तुजला !

---

# सीताराम महादेव पत्की

[ जन्म सन १८९८ ]

## पहिला प्रणाम

पूर्वेचा पडदा पहा उघडला! साक्षात् उषा पातली !
त्यामागुनि तारका हळुहळू अस्ताचलीं चालली
गेलें दैन्य दिगंतरीं! मग वरी सृष्टी नवी चेतना
देवा ! मंगल ही प्रभात तुमची आनंदवी मन्मना

सृष्टीचे चिमणे कवी तव यशो-गीतें स्तवूं लागले
त्यांचा जाणसि अर्थ तूंच मजला तें भाग्य ना लाभलें
तैसा हा गिरिराज काय शिखरें मेघांत उंचावुनी
पाहे वाट तुझी दयाघन विभो! ध्यानस्थ जैसा मुनी

हा गर्जे इकडे प्रशांत जलधी! लाटा हंसूं लागल्या
मोत्यांच्या जणुं मांजिऱ्या तव पदीं अर्पावया धांवल्या !
वारे मंगल गीत गाउनि तुला वाहूनि मेघावलि
देवा! स्वागत यापरी करितसे ही पंचभूतावलि

तूंही होउनि तृप्त का उघडशी हा नेत्र पूर्वेकडे!
सृष्टीचें अवधान सर्व तिकडे माझेंहि तेथें जडे
देवा! घे तर हा प्रणाम पहिला तूं मानुनी साजिरा
मी होईन तदाच धन्य जगतीं हें राजराजेश्वरा !

## तो क्षण !

• माझ्या नीरस जीवनीं मज गमे जो सौख्यदायी क्षण
होतों वांच्छित ज्यास मी प्रतिदिनीं उत्कंठिताच्या परी

आशेनें मनिं रेखुनी सुबकशीं चित्रें सुखाचीं बरीं
त्यानें हाय ! मला पुरें उठविलें तेव्हांच लोकांतुन !

ज्ञानाची अनिवार हाव धरुनी मीं निर्मिलें मन्मन
जैसें सुंदरसें प्रशांत थडगें ओसाड माळावरी !
होती जागृत आस एक तसल्या रूक्ष स्मशानीं तरी
कीं तेथें उठवील येउनि क्षणीं उद्यानही तो क्षण !

आला तो क्षण ! तेधवां हृदय हें होतें रिकामें जरी
प्रेमाची सरिता तिथें प्रकटुनी आकंठ त्याला भरी !
ही सारी किमया क्षणांत घडली जीच्या प्रसादामुळें
देवी ती निघतां तिला अनुसरे मच्चित्त वेडें खुळें !

तेव्हांपासुनि शून्य सर्व जग हें झालें मला त्या क्षणीं
देवा ! दाखवि तो फिरून, अथवा देईं विरामा क्षणीं !

---

# रघुनाथ मोरेश्वर प्रधान

[ जन्म सन १८९८ ]

## अनुताप्याचे उद्गार

अंधाराच्या रजनी येती
गाढतमानें दिशा दडपती
प्रकाश या वस्तूची महती
कळे चित्ताला—त्यासाठीं जीव भुकेला.

काळोखांतुनि वाट काढली
पायाखालीं फुलें चुरडिलीं
प्रकाश पडतां वृत्ती रडली
काय उपयोग ?—विधिचा हा योगायोग !

काळोखीं घन युद्ध चाललें
मृदु-नभ-सुम-गण लोपुनि गेले
प्रकाश पडतां अश्रू गळले
काय उपयोग ? विधिचा हा योगायोग !

नकळत वाक्शर सुटुनी गेले
कोमल खग—शिशु मरुनी पडले
प्रकाश पडतां मन हळहळलें
काय उपयोग ?—विधिचा हा योगायोग !

घन विरले, नभ उपवन झालें
नील-लता-किसलय उद्‌भवलें
उज्ज्वल तारा-गुच्छहि फुलले
इंदु-कारंजें—मधु—सुधा—सिंचनीं रंजें

परि माझ्या अश्रूंची माला
हृद्सिंधूची वीची विमला
चुरलेल्या त्या पुष्पगणाला
जातसे वांया—नव जीवन यत्नें द्याया.

मग माझ्या मनिंच्या आकाशीं
पडल्या खिन्न मनोरथराशी
तारा दडल्या घोर निराशी
निराशा घोष—करितो मग चंद्रग्रास.

नैराश्याचे पडदे पडले
स्मशान त्यावरि चित्रित झालें
आशानाटक काय संपलें
मौन गानाचा—मी धरितों मार्ग सुखाचा.

## चित्रकारास

माझें चित्र कशास काढिशि वृथा माझें न होणार तें
त्या चित्रा न कुणी म्हणेल मम हो पाहील जो नंतर
माझें चित्र मनांतलें समजणें ब्रह्म्यासही शक्य ना
त्या चित्रा खुलवूनि दे मग सुखें टांगीन उच्चस्थळीं
माझा राग तशींच वृत्ति कठिणा पाहील जो अंतरीं
त्या केव्हां नच होइ बुद्धि असलें काढावया चित्र तें
माझ्या अंतरिं एक रम्य प्रतिमा मीं ठेविली राखुनी
प्राणाहूनि अमोल तीस गणितों मी नित्य जीतें स्मरे
त्या चित्रा मज देइ जो खुलवितो माझ्याहि चित्रास तो
ना तें चित्र मिळें म्हणून जगता, जीवास मी त्रासतों.

# नूतनदत्त

[ जन्म सन १८९८ ]

## पुनरुत्थापन

घटकेचा शिणगार सरे शिरपेंच खेंचिला कुणी जरी
शीर सलामत असे तरी.

नाव उरीं नाचतां क्षणभरी लाट मुरडुनी हटे जरी
जलवंती चिर शांत तरी.

हृदयिं कोरिली मूर्ति भंगतां छाती गिरिची धडाडते
घडिनें परि निधडी होते.

ग्रहगोलांच्या धकाधकीनें धरणी कंपित जरि झाली
सांवरिते समता काली.

पिसाट वारें वाहे तोंवर घुमते कण्हते वनराई
पंचमांत पिक मग गाई.

धूळ 'आज'ची झाडुनि सेवा पायधूळ भवितव्याची
ग्वाही घ्या ही सृष्टीची.

हाय ! जिवाचें लेणं माझें हिसडुनि उतरी दैव जरी
छिद्रें बुजविल कोण तरी !

चिरंमृतहि मन दहा दिशांना पांगतसे तुकडे पडुनी
जीवन्ती जुळवी कोणी !

# प्रार्थना

सारा संभ्रम हा, अधःपतन हें, कारुण्यगीती तशा
भालीं स्पष्टचि रेखिल्या–परि न ही स्वानंदपूर्णा नशा;
चिंतेच्या चरकांत जाय पिळुनी हृद्भावही गोडसा
राहे हा रसशून्य जीवनघडा–हा खेळ दैवा कसा!
विश्वेशा, तव वस्तुजात अवघें कार्य–प्रवाहीं रमे
जाई पोहत लीलया परि पुनः पूर्वस्थलीं विश्रमे
तैसें कौतुक–कार्य अल्प घडणें नाहींच का बालका
हे विश्रामवरा, मला नुघडिशी अंतीं परंधाम का?
एखाद्या हृदयांत रंगविन का चित्रें मनोवेधक?
एखाद्या शिणल्यासि शांतवुनि का होईन संजीवक?
एखादीच लकेर गोड मम का नादेल कालांतरीं?
एखादा पुरवूनि लाड मज घे ओढून वक्षांतरीं!

———

७

# आनंद

[ जन्म सन १८९८ ]

कवि विनायक लक्ष्मण बर्वे, बी. ए., एल्‌एल्. बी. यांच्या कविता कवनगुच्छांत प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचें 'गझल-गीत' हें खंडकाव्य अप्रकाशित आहे. 'दिलदौलत' हें नाटक रंगभूमीवर येणार आहे.

## आशा–गीत

[ सौंदर्यसेवकांना आशेइतकें सुंदर असें कांहींच दिसत नसतें. आयुष्याला सौंदर्याची जोड देणाऱ्या आशेची प्राणप्रतिष्ठा, भावनेपुरती तरी कांहींशी अशीच करावी लागेल ! ]

अभाळावर लिहिले
कांहीं बिन–शब्दाचे चाळे
सोनीयाची वाळु पसरितां तारांगण झालें !

चांदीनें भरलेला
सागर अष्टदिशांना सरला
संगीताचा अखंड ठेवा नव–खंडा झाला !

नभ आणि संगीत
याहीपासुन बनलीं मूर्त
पदोपदीं जी भूगोलाला गरगर भ्रमवीत

मोतीयाचें पाणी
देह निमिषोन्मेषीं न्हाणी
त्याच तुषारें नयन उजळिते रंकाची राणी !

पाचुमण्यांची झाडी
मधली रत्नरसाची माडी
न्याहाळिते तेथुनी नवोनव वतनाची वाडी.

अमरत्वाच्या वेली
वरतीं पुष्पांच्या लाखोली
चुरडुन घेण्या पखरण पडती पायाच्या खालीं !

किल्ले वाऱ्यावरी
अगणित बांधी हारोहारी
सातां स्वर्गांवर उंचावे नसलेली नगरी.

मिणमिण लुकलुकती
कोटी रविचंद्राच्या ज्योती
आभासाचा प्रकाश पुरवी अवध्यांना जगतीं.

ओंठाचा दरवाजा
कोंडी, देहत्वाचा राजा
अर्पि तयाला कल्पकतेच्या सुंदरशा साजा !

ओझरत्या किरणांनीं
आत्मा मार्गांवरतीं आणी
"आनंदा"ला पळांत लावी गायाला गाणीं !

## बुडबुडा

अपण उभयतां पाहत असतां वाळवंटिच्या थडीवरी
कलकल वीची घडीभरी
फेस फवारे रंग दाविती पिवळ्या किरणीं बहूपरी
नयनासम कीं तुझ्यातरी !

कशी कळावी जादु जलाची! अथांग·अघटित खरीखुरी
(हृदयासम तव) दिसे जरी!
चपल बुडबुडे शाश्वत गमती, क्षणिक तयांची गती परी
सौंदर्याचे हिरे जरी!

एक बुडबुडा तव शब्दानें दुभंग झाला जलावरी
भिउन जहालिस जरा दुरी
नव्हे बुडबुडा! ती तर माझी हृदयतार तडकली उरीं
काय तयाचें तुला परी!!

## सौंदर्य व हीनदृष्टि

सकाळच्या कोंवळी गुलाबी खेळे शीतळ हवा
सज्जावरतीं डुले प्रमोदें किनखापी पारवा;

मान मुरडुनी प्यार नाचले प्रीतीच्या सन्निध
गुलगुल् गाणीं उभय गाउनी रमती नानाविध

हळुच करावी खोंच मुखानें, हळूच पंखावरी
दिलादिलाची दंगल शमवी प्रेमाची चातुरी!

तिथेंच दुसऱ्या डहाळीवरतीं बैसुनिया अवकळा
पाहत होता तिरव्या नयनीं तिऱ्हाईत कावळा

प्रेम–समाधित भान हरपल्या युगुलाची मुग्धता
दुश्वासाच्या 'काव' रवानें भंगियली तानता!

लावण्याचा हेवा करणें—हेंच कांहिं ज्या दिसे
माणुसकीच्या मैदानामधिं कितिक कावळे असे!

पहावें राजसा रसिका सभोंवार जगाकडे
जिथें विश्रब्ध सौंदर्य, काकदृष्टि तिथें पडे!

---

# कुमारी सरलाबाला शाहीर

[ जन्म सन १९०५ ]

अप्रकाशित कविताः—'अंधेरी पौर्णिमा', 'राजस्थान-प्रेमगीतें', 'सूर्य-तोरण', 'दिलवासरी' वगैरे.

## पहिला प्याला कोणीं भरला !

[एके दिवशीं राधा आणि कृष्ण बोलत बसलीं असतांना, राधेला चिडविण्याच्या उद्देशानें कृष्ण म्हणाला, "तूं कांहीं माझ्यावर पहिल्यानें प्रेम केलें नाहींस. पहिल्यानें मींच तुझ्यावर प्रेम केलें." त्यावर राधिकेनें त्याला खालील उत्तर दिलें.]

"पहिला प्याला कोणीं भरला ?" वाद कशा गोविंद वरें ?
वादें वादें तत्त्व न लाभे, तत्त्वाभावीं प्रेम मरें
तूंही भरला, मींही भरला, चालु क्षणाचा प्रश्न सरे
तूट कशी ये ? अखंड वाहति प्रेम-सुधेचे हृदीं झरे
दिला दिलाचे प्याले भरले ! भिडव त्वरें निज ओंठाला !
प्रेम-मद्य झोंकुनी झिंगुं या ! "मी" "तूं" नुरवूं जगताला
सृष्टि विचारी काय माधवा ! हंसऱ्या पुष्पां पाहुनियां
"वायूनें वा सूर्यकरांनीं फुलली पुष्पांची दुनिया ?"
सुवर्ण-धागे भानुवराचे गुंफी पुष्पांच्या माला
वायु पसरवी मधु सुमनांच्या सुगंधरूपी हास्याला
प्रभा हांसतां, सृष्टि हांसते, वायु हांसतो सौख्यभरें
पुष्प हांसतां हृदय हांसतें, आशा—रागीं जीव मरें
जिवाजिवांची जुळणी झाली, मिळणी देहांचीहि तशी
प्रेमस्पर्शें देह गळाले, गांठ विदेही आत्म्यांशीं

भिन्न किरण हे नयना दिसती, विरती शेवटिं तेज-रसीं
प्रेमीं रमतां "मी तूं" नुरलों, वादच मिटला मूळांशीं
बेकीची बघ! एकी झाली; नजरबंदि ही प्रेमाची
प्रेमरसीं हें विश्व बुडालें! आशा पुरली जीवाची!

पहिला प्याला तूं भरला वा मीं भरला गोविंद अतां
वाद कशाला भलता सलता, प्रेम-मद्य चल झोंकुं अतां!

## शेवटची आशा

दे एक प्रेममय गिरकी ॥ मग जन्म-मृत्युची फिरकी ॥ चालुं दे ॥

हीं ताण जित्या जीवाची
थरकत्या गानिं आत्म्याची
विश्वाच्या सारंगीची
चल! झुकव एक तरि मुरकी ॥ मग जन्ममृत्युची फिरकी ॥ चालुं दे २।

युगयुगंतरीं जिव झुरतां
लक्षावधि योनी फिरतां
अवचित हें मीलन आतां
संशय कां?...हस्ता धरि कीं ॥ घेउं या विश्वभर गिरकी ॥ एकदां।

जीवाच्या सुमना भंवतीं
प्रेमाच्या लहरी फिरती
तेजाचे तुषार वरती
जिविं जीव सारखे शिरती ॥ मग देह भिन्न कां फिरती—॥ आपुले ॥

जीवाचा झिम्मा सरतां
फिरफिरुनि जीव गुदमरतां
क्षणभरी विसाव्याकरितां
द्वैताचें ऐक्यच होतें ॥ मग "मी" "तूं" कांहीं नुरतें ॥ भेटुं या ॥

क्षण एक हृदयिं मज जडवी
दृष्टीनें दृष्टी बुडवी
ओठांनीं ओठां दडवी
मग आस जिवींची पुरतां ॥ जन्म-मृत्यु कोणाकरितां ॥ राहिले ॥

## प्रेम—गान

बहर फुला, फुलावणी जाहली जगीं
तारकाहि मंद तेज उमलल्या नभीं

खुलावणी अशी कधींच नाहिं देखिली
भुलावणी जणूं निशाहि नयनिं फेंकिली

सौख्य जगीं ! तेंच नभीं !...नाचतें हृदीं !
अहा ! नाथ ! आज कसा तोषला विधी !

अजि मज दिसलां !
अपुरें हंसलां
वळुनी रुसलां !

तरिहि गालिं हास्य लास्य मधुरसें करी !

नेत्र तुझे सांगतात कितितरी गुजा
ही प्रेम-रजा तुजसि नाथ भासतें सजा

"फू गडी" अतां कितीक दिन अशी चला
हा व्यर्थ रोष प्रेम-गानिं अधिक जाहला

* * *

नाथ आले ! नाथ आले ! धन्य जाहलें
आनंद काय ? सौख्य काय ? भान हरपलें

जी ग्रंथि आज ब्रह्म-नादिं बद्ध जाहली
तेथेंच दुःख, सौख्य, हास्य बुद्धि निमाली

# भवानी श्री. पंडित

[ जन्म सन १९०६ ]

यांच्या कविता 'महाराष्ट्र-साहित्य','आनंद' वगैरे मासिकांत प्रसिद्ध होतात.

## येणार कोण तरि आज ?

[ विजयी पतीच्या आगमनाची उत्सुकतेनें वाट पहात असलेल्या वीरांगनेस तिची सोबतीण चिडवीत आहे.]

येई न आज कशि नीज ?
लखलखे नेत्रिंची वीज!
करितात ओंठ कुजबूज
सांगण्या कुणाला गूज ?
गालांत थरारे लाज !
येणार कोण तरि आज ?

कां फुले प्रमोदें ऊर ?
वरि थरारती हे चोर;
कोणती मना हुरहूर ?
हा चढे कुणास्तव साज ?
येणार कोण तरि आज ?

कुणिकडे लागती डोळे ?
कां जीभ बोल नच बोले ?
तिळभरी न पाउल हालें ?
कोणती असे अशि मौज ?
येणार कोण तरि आज ?

या अशा रातिंबेरातीं
झाली कशि बाई छाती ?
चढण्या या दरडीवरती !
सोडुनी मउमऊ शेज़
येणार कोण तरि आज ?

येतसे गडावर धाड
आलेच ! नजिक अडदांड
कोण त्यांत तरणाबांड ?
झळकतो शिरावर ताज.
येणार कोण तरि आज ?

कां वटारतां मज डोळे ?
मुरकतां वाजवुनि वाळे
कळले बरं सारे चाळे
इकडीलंच ना महाराज ?
येणार कोण तरि आज ?

## हिंद-वंदना

नमन साष्टांग जनि ! न्याय-निति-शालिनी,
ज्ञान-गौरव-खनी, धान्य-धन-पालिनी,
शारदारूपिणी, संपदाधारिणी,
शत्रुगणमर्दिनी, मित्रगणवर्धिनी,
दुःख-भय-शोषिणी, मोद सुख-पोषिणी
सुमति-यश-दायिनी, मंगला, विजयिनी.
खुलत 'हिमनग' मुकुटिं, चकमकत 'विंध्य' करिं,
'कच्छभुज' प्रतिचि तटिं, 'वंग' पूर्वेनिकटिं,

पुजत पद सुमनपुटिं 'कुमरिकन्या' नटी,
विनय-नत-शोभिनी-चरणिं 'लंका' गुणी.

रुळत उरिं चकचका सरित-जल-मालिका
चमकते लखलखा दिपवि देवादिकां,
कुंज विलसे निका गाति शुक, सारिका
अब्धि, नद, निर्झरणि आळविति रागिणी.

वीर 'पृथ्वी' परी कोण पृथ्वीवरी!
हात टेकीं अरी स्थित 'प्रतापी' परी!
शत्रुपाठीं जरी 'शिव' नददोद तरि!!
सिंह-पंजाब-मणितुल्य, जगिं कां कुणी?

तूंच गे! कर्मभू, तूंच गे! धर्मभू
तूंच गे! मानभू, तूंच गे! ज्ञानभू
तूंच सर्वस्व भू! तूंच प्रभुजन्म भू!
टाकुं तुज कारणीं प्राण कुर्वंडुनी.

# कविसंमेलन

## बालकवि

[ गो. ग. तळवलकर ]

### शनवारवाडा व नानावाडा

चाले ढांसळुनी सुभव्य तट हा अंतस्थ कीर्तीसह
आतां ती गतवैभवस्मृति मना होते किती दुःसह
साधूनी अवतारकार्य सगळे ते वीर निद्रावश
झाली दौलत हाय ! विन्मुख तसें, तें धैर्य, तें साहस
मार्गे आणि जरा वळून बघतां वाडा दुजा हा उभा
वेली सुंदर वाढल्या शिखर हें चालें पहाया नभा
विद्यादान करून बालहृदयें विस्तारवी शिक्षणें
सांगे एकच कीं, " गतप्रभयशा तुम्हींच संपादणें."
वाडा एक बघून वाटत असे " गेलें अतां वैभव
होवोनी परतंत्र भोगित अम्ही आहोंत दुःखें नव "
वाडा अन्य बघून वाटत असे " गेलें जरी वैभव
बाळें यांतिल थोर होऊन पुन्हां लाभेल सारें नव "

* * *

एका बाजुस पूर्ववैभव मना पाडी घरें आंतुनी
मागें तोंच भविष्यकाळ निववी पाजून संजीवनी

# वसंतविहार

[ शंकर दत्तात्रय जोशी ]

## वंदे मातरम्

भारताला पूर्ण प्यारा मंत्र वंदे मातरम्
विश्वसुंदर विश्वमोहक मंत्र वंदे मातरम्
दिलरुबा हा मंजुभाषी मंत्र वंदे मातरम्
बुद्धिदाता अंशुमाली मंत्र वंदे मातरम्
भोजनीं शयनीं वदा हा मंत्र वंदे मातरम्
हरघडी हरदम् जपा हा मंत्र वंदे मातरम्
कल्पतरु पुरवील मनिंची आस वंदे मातरम्
वीर्यशाली निर्झराचें गीत वंदे मातरम्
छेदूनी शिर दूर करितां मंत्र वंदे मातरम्
मृत्युच्या सदनांत शिरतां मंत्र वंदे मातरम्
बंदिशालावास घडतां मंत्र वंदे मातरम्
शृंखलाझंकार तो हो नाद वंदे मातरम्
तीर धनुचा अस्त्रमय हा मंत्र वंदे मातरम्
चेतनेची नांगि ही समशेर वंदे मातरम्
हिंदवासी घोष घुमवा पूर्ण वंदे मातरम्
हा " वसन्तविहार " मागत ईश्वराशीं इत्यलम्

## परके न कुणी

तारकांचिया पथांतुनी
नभोमंडळीं घनांतुनी
सुधास्यंदिनी ! मुदें फेंकिसी चमकत चमकत जिथें नजर
मी तिथें हजर.

गालिं गुलाबी हास्य दिसे
दंतचंद्रिका लावि पिसें
खुल्या दिलाच्या लतेसि आला नव्या नवतिचा अहा बहर
शृंगारशहर.

मंजुळ मुरली बोल तुझे
प्रेमबीज हृदयांत रुजे
गानदान दीनास देइ या जीवन माझें तूंच जनीं
मी तुझ्या गुणीं.

मना मोहिनी तूंच पुरी
तुझ्यांविणें या उरीं सुरी
सजेदार चालणें तुझें तें मजेदार या जिवा रुचें
अन्य ना सुचे.

बाळपणींचा तुझा गडी
भेटलीस तूं आज घडी
संग्रहिं माझ्या पुण्यजरासें प्रभाव त्याचा दिसे पुरा
ही दैवि तऱ्हा.

दिलें वचन अधरीं ठरलें
मारिसि मुरका काय गडे
देतीं मोत्यें साक्ष तयांची नयनांमधुनी दोन तशीं
हीं पहा, कशीं.

ऋणानुबंधें गांठ पडे
प्रेम सुदैवें तसें जडे
नच सम्राटा नच इंद्राला धनराशी देउनी मिळे
हें मना कळे.

चल गंगेच्या पैलथडी
पर्णकुटी अक्षय उघडी
दावि "वसन्तविहार" पदाला गाउनिया रसिकांस गुणी
परके न कुणी.

---

## बॅरिस्टर विनायकराव सावरकर

### सागरास

ने मजसी ने परत मातृभूमीला।
सागरा प्राण तळमळला ॥
भूमातेच्या चरणतलांतें धूतां
मीं नित्य पाहिला होता
मज वदलासी अन्य देशिं चल जाऊं
सृष्टिची विविधता पाहूं
तइं जननीहृद् विरहशंकितहि झालें
परि तुवां वचन तिस दिधलें
मार्गज्ञ स्वयें पृष्ठिं तुला वाहीन
त्वरित या परत आणीन
गंभीर त्वदाकृति बघुनी ॥ मी ॥
विश्वसलों या तव वचनीं ॥ मी ॥
तव अधिक शक्ति उद्धरणीं ॥ मी ।
येईन त्वरें कथुनि सोडिलें तिजला ।
सागरा प्राण० ॥

[ २ ]

शुक पंजरिं वा हरिण शिरावा पाशीं ।
ही फसगत झाली तैशी

भूविरह कसा सतत साहुं यापुढतीं
    दशदिशा तमोमय होती
गुणसुमनें हीं वेंचियलीं या भावें
    कीं तिनें सुगंधा घ्यावें
जरि उद्धरणीं व्यय न तिच्या हो साचा
    हा व्यर्थ भार विद्येचा
    ती आम्रवृक्षवत्सलता ॥ रे ॥
    नवकुसुमयुता त्या सुलता ॥ रे ॥
    तो बाल गुलाबही आतां ॥ रे ॥
फुलबाग मला हाय ! पारखा झाला
            सागरा० ॥

[ ३ ]

नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा
    मज भरतभूमिचा तारा
प्रासाद इथें रम्य परी मज भारी
    आइची झोंपडी प्यारी
तिजवीण नको राज्य मज प्रिय साचा
    वनवास तिच्या जरि वनिंचा
    भुलविलें व्यर्थ हें आतां ॥ रे ॥
    बहु जिवलग गमते चिंता ॥ रे ॥
    तुज सरित्पते, जी सरिता ॥ रे ॥
तद्विरहाची शपथ घालितों तुजला ।
            सागरा० ॥

[ ४ ]

या फेनमिषें हंससि निर्दया कैंचा
    कां वचन भंगिसी ऐसा

त्वत्स्वामित्वा संप्रति जी मिरवीते
भिउनि का आंग्लभूमाते
मन्मातेला अबल म्हणुनि फसवीशी
मज निवासनातें नेशी ॥
जरि आंग्लभूमिभयभीता ॥ रे ॥
अबला न माझि ही माता ॥ रे ॥
कथिल हें अगस्तिस आतां ॥ रे ॥
जो आचमनीं एकक्षणीं तुज प्याला
सागरा० ॥ ४ ॥

---

## गोविंद शाहीर

### [ गोविंद त्र्यंबक दरेकर ]

### प्रतापराव गुर्जराची मरणास प्रार्थना

वीरभूषणा विश्वपावना श्रीमन्मरणा दयाघना
मदिय प्रार्थना ऐक सज्जना अनंत नमनें त्वच्चरणां ॥

मनोव्यथेनें अपघातानें ओढुनि बळेंचि मत्प्राणां
कीं रोगांनीं तनू गांजुनी नको धाडुं मज यमभुवना.
जलांत मातें बुडवायाची असेल युष्मन्मनीषणा
तरी बुडविं बा ! राष्ट्ररिपूंची रक्ततरंगिणि तरतांना
राष्ट्ररिपूंच्या चैतन्याच्या चितेंत मातें दे दहना,
अग्नीमध्यें जाळावेंसें जरी वाटलें भवन्मना.
भगवन्–आज्ञा आहे तुज का ढकल गिरीहुन या दीना !
तरी ढकल बा ! स्वतंत्रतेचे संरक्षक गड घेतांना

मंचक माझा शरखड्गांचा समरस्फूर्ती ती ललना,
सुमंचकीं त्या त्या ललनांकीं मला शांति कर समर्पणा.
मला शांति कर समर्पणा पण तदा सुंदरा मोहघना,
श्रीभूचरणां मी करतांना प्राणप्रणती निवेदना.
स्वातंत्र्याची उषा रंगुं द्या रक्तपंकिं पंकजानना,
मग माझा तो अंत घडूं द्या करा प्रभू अशि नियंत्रणा.
स्वातंत्र्याचें युद्ध न लाभे दिव्यभाग्यबल निधीविना
धर्मयुद्धिं त्या मरुन होउं दे चिरंजीव मज चिरंतना
स्वातंत्र्याच्या गंधर्वांच्या कवीजनांच्या कळतांना
गाउनि स्फूर्ती देते जेथें वीरश्री श्रीवीरांना;
स्वातंत्र्याचा परमकाल तो परमेशाचा काल गणा
अशा पूत परमेश्वरकालीं सुजना, मरणा, कर करुणा.
मज तान्हाजीच्या दे निधना,
दे वीर बाजिच्या मज मरणा,
कर मुरारबाजीसम करुणा,
ऐसें प्रतापराव निरंतर म्हणे मृत्युला निरंजना
मदिय प्रार्थना ऐक सज्जना, अनंत नमनें त्वच्चरणां.

## कविहृदयाचें देऊळ

देवदेवा! मी–मी देउळ तुमचें–बांधिलें करुणाकाव्याचें
त्यावरी चित्रें–चित्रें दुःखांचीं–कोरिलीं रडल्या हृदयाचीं
त्यामधें विरह–विरहबुद्बुदांचें–लाविलें झुंबर अश्रूंचें
बांधिलें मग हे–हे सुखमखराचे–आरसे पूर्व पुण्यतेचे
नादती घंटा–घंटा नादाच्या–तुझ्या भजनाच्या छंदाच्या
चढविला कळस–कळस सुवर्णाचा–अलौकिक विषय विरागाचा

पाहिजे आतां—आतां ध्वज साचा—उभारा भक्तीभाराचा.
वदनीं फूत्कार—फूत्कारित सतत—कामनाफणा डोलवीत
देवळाआंत—आंत हृदयराजा—खेळतो मनोनाग माझा
धरुनी सद्रूप—रूप देवराज—बैस मग नागप्रभावळित.
नाहितर गात—गात हृषीकेशी—नाच या नागाच्या शीर्षी
नृत्यगीतानें—गीतानें थकवा—तुला येईल देवा, तेव्हां
शेषमंचकिं या—या केवळ योग—निद्रेंत शेषशायी.

---

# पुष्पविहार

[ मधुसूदन आबाजी निजसुरे ]

## श्रीशिवराय—गीत

धन्य शिवनृपा! धन्य नरविरा! महाराष्ट्रनायका। राजया स्वराज्यसुखदायका
यशोगीत तव गात आदरें जनता, जनपालका ॥
महाराष्ट्र—भू भोगी अतिशय पारतंत्र्य यातना। दुःख हें जाळी प्रत्यहिं मना
दास्यशृंखला जडली चरणीं जाची ती क्षणक्षणां
नाश कराया घोर, घातकी परवशतेची सुरी। लागली महाराष्ट्रकंधरीं
निराधार; निर्बला जनातें ठार करी तो, अरी
सत्ताधारी कठोरहृदयी नाहीं त्यांना दया। ये कशी? पाषाणातें दया
छळिती; पिळिती अधिकारमदें महाराष्ट्रवासियां
तयांची दाद झणीं लाविण्या। संकटां वेशीवर टांगण्या
शत्रुला मागें परताविण्या। काढण्या दास्याच्या तोडण्या
धांवलासि तूं आनंदानें महाराष्ट्रनायका! १
धर्मावरती पडला घाला नेती परके लया। शत्रु ते बुडवूं बघती तया
दिसे न कोणी संकटांतुनी त्यातें तारावया

गो-ब्राह्मण, गांजले अतीशय वाली त्यां नच कुणी। जाच अति होत सदा निशि-दिनीं
हानि चालली क्रूरपणानें मत्त अशा परजनीं
पारतंत्रता—परकी सत्ता—परदास्याची घडी। नागवी सर्वस्वा तांतडी
लावितसे ध्यावया जनातें अग्नीमाजी उडी
अशातें पायबंद घालण्या। सत्वरीं हद्दपार धाडण्या
समुळ हें देशदैन्य वारण्या। रिपूंतें पायदळीं तुडविण्या
सिंहगर्जना करित धांवसी! महाराष्ट्रनायका! २

मर्द मराठे; शूर मावळे; एक ठाइं जमविले। वाक्य त्या स्वतंत्रा बोधिलें
रणांगणि तयें देशहितास्तव निजदेहा अर्पिलें
मर्दुनि शत्रू; तुडवुन दास्य; स्वराज्य त्वां स्थापिलें। सत्वरीं स्वातंत्र्या मिळविलें
महाराष्ट्राचें विजयी भगवें निशाण तूं उभविलें
हिंदू—धर्मा—धेनू—विप्रां संकटांत तारिलें। राजया, प्रेमें उद्धारिलें
निर्दाळोनी अधमांतें; त्वां अभय तयां दीधलें
जयश्री माळ तुला घालते। दशदिशा ग्वाही तव गाजते
सत्य हें धर्मराज्य वाटतें। छत्रपति नांव सार्थ शोभतें
कीर्ति ऐशी दुमदुमे तुझी महाराष्ट्रनायका! ३

धन्य गुरू रामदास! धन्या माय जिजाऊ सती! जयाचे हिता सदा जागती
शूर—वीर गडि जिवा जपाया असति सदा संगतीं
आनंदानें; निर्भयतेनें; प्रजा सर्व डोलते। सुखानें शांतपणें नांदते
शिवराज्य खचित रामराज्य प्रति असें जना वाटतें
स्वराज्यविभवें स्वदेश सजला वर्णावा तो किती। लिहाया दिसती नाना रिती
स्वातंत्र्याच्या झडति नौबती सांगाया ती धृती
उभविसी धर्माचें मंदिर। स्थापिसी न्यायाचें आगर
राखिसी सौख्याचा सागर। तुज विशीं अतर्क्य लोकादर
स्वदेशभालीं स्वातंत्र्यतिलक लाविलासि नायका! ४

अल्पमती मी असमर्थ असें यशोगीतवर्णना । पुरवि जो स्वराज्य–सुख–कामना
अल्पगीतपरी अर्पण करितों स्नेहें बंधूजनां
वाक्सुमनांचा हार घालितों स्वदेश-उद्धारका । छत्रपति महाराष्ट्रपालका
पुष्पविहारी, प्रणाम करि तुज स्वराज्य–संस्थापका!!

---

# मंजुमाधव

[ माधव रंगनाथ काळे ]

## भगवा झेंडा

[ स्वातंत्र्याच्या काळीं रायगडावर फडकत असलेल्या भगव्या झेंड्यास पाहून कोणा शाहिरास हे विचार सुचले नसतील ? ]

मद्देशाच्या हृदयवेलिच्या फुलत्या डुलत्या गोड फुला !
स्वातंत्र्याचा विजयध्वज तूं सद्धर्मांची जोड तुला
कल्पनाहि मम वातावरणीं तुला पाहतां डोलतसे
त्या डोलानें मनोमनींची मुकी भावना बोलतसे
फडक असा तूं श्रीशिवबाच्या नसानसींच्या अभिमाना !
महाराष्ट्रजनहृत्कमलाच्या प्रियतम मित्रा ! रविकिरणा !
शिवहृदया ! कां हृदय तुझें हें रिपुभय स्मरुनी थरथरतें ?
–छे सूडाच्या विश्वासानें कोपयुक्त तें थडथडतें
कीं आकाशीं नौबद झडते ईशपदीं करि निवेदन
'जगतीं केलें शिवरायानें सद्धर्मांचें सुपालन,'
भाग्यभूषणा ! दोषदूषणा ! कुवासनेच्या झणिं मरणा !
गर्जनाच कां रणभीषण तूं 'हरहर' ऐशी मदहरणा !
नव्या युगाच्या इतिहासाची सुवर्णमंडित तूं रचना,
भाविकालचे शाहिर त्यांची देशभक्तियुत मधुरसना

आर्तजनांचा त्रस्तजनांचा टाहो फोडी हा जाच ?
रिपुरक्तानें रंगविलेल्या रणरमणीचा कीं नाच ?
स्वातंत्र्याच्या अरुणें चढली तुझ्या कपोलीं ही लाली
सौभाग्याचा राष्ट्र-तिलक तूं हिंदभूमिच्या शुभभालीं !
कल्पांताच्या कालीं जरि तुज दास्यीं खपणें मद्देशा !
भालीं रोई; त्या कालाची तव पुत्रांची मृत आशा
परक्याहस्तें ज्या अबलांचे मर्द पतीवर मृत झाले,
कुंकुमसागरिं काय तयांच्या अंग तुझें तूं रंगविलें ?
स्वातंत्र्याशीं मीलन झालें पुष्पवती बाला झाली
मांगल्याचें चुंबन होतां कलिका फुलली का गालीं ?
स्वातंत्र्याची पूर्ण चंद्रिका निजसदनीं फुलली म्हणुनी,
मृत आत्म्यांनीं स्वर्गपुरींतुनि गुलाल फेकियला भुवनीं !
व्यक्तिसुखाची ज्वाला भडके राष्ट्रास्तव त्याची होळी
उद्धरण्याला महाराष्ट्र हा स्वर्गंगा खालीं आली !
रामदास प्रभु अर्पितसे का उपदेशाची ही माला,
का त्यागाचा महामंत्र हा देशाला ईशें दिधला ?
भवितव्याच्या सागरिं नौका काय तयाचें तूं शीड ?
तरुण मनाच्या देशभक्तिचें फडफडतें कां हें वेड !
वेड असें का रिपुसूडाची तेढ अशी गगनांत उडे ?
स्वातंत्र्याचा बालक गड हा काय त्यावरील कुंचडें ?
परदास्याचें शिवरायानें गडाखालिं गाडलें मढें,
प्रेतावरचा श्रृंगारचि हा नीलाकाशीं काय उडे ?
कर्तव्याची देशभक्तिची केंद्रिभूत इच्छा झाली,
दास्यतमाशीं झगडायाला असली बिजली अवतरली ?
भानु उदेला तरुण जनांनो ! चंडोलांनो ! या गाया

यशोगीत तें, रक्तजलाचें अर्घ्य तयाला अर्पाया.
निजदेशाची इज्जत डोले अरिहृदयांतरिं समशेर
अतर्डी बांधुनि, देह अर्पुनी राखा तिजला, रणधीर !
बोला जयजयकार बंधुहो ! स्वातंत्र्याच्या झेंड्याचा
धर्मरक्षणा प्रभुजननाच्या श्रीगीतेच्या वचनाचा
नंदनंदना ! कंसकंदना ! एक याचना रिपुरुदना !
'रुचिर उत्तमा भाग्यपौर्णिमा अशीच फुलवो निजसदना'

* * *

ध्वजा ! तुझ्यास्तव कितीक पडले मायभूमिचे युवक रणीं
ध्वजा ! तुझ्यास्तव कितीक लढले मातृभूमिच्या उद्धरणीं
धन्य वीर ते, धन्य धीर ते, भूषविली त्यांनींच धरा
पदीं तयांच्या अर्पितसें मी अगणित नमनांचा मुजरा

---

## यादवसुत

[ राजेश्वर यादव मुळावेकर ]

## पुण्याचें पुरातन वैभव !

[ शनवारवाडा ]

पाहतां तटा ! तुज, मातें स्मृती पूर्व झाली
सहज वरी वळलेली ही दृष्टि खिळे खालीं
चमकले जियें तेजानें हिरे मोठमोठे
आज हाय ! दिसती तेथें हीन गारगोटे
दृष्टिआड दडले आतां पाहुं त्यांस कोठें ?
वाहतात दुःखाश्रूंचे ओघ या कपोलीं !

जिथें वागल्या विजयानें विक्रमी विभूती
शौर्यचिन्ह जरिपटका तो फडकलाच भूतीं
ध्वजविहीन मृण्मय ऐसे स्तंभ साक्ष देती
गमति जणूं ललना ज्यांच्या तिलक नसे भालीं !

स्तंभ हे न वंश वनींचे भासतात दोन
वायु येत भेटायातें त्यांकडे वळून
शब्द अल्पमात्र निघेना तन्मुखामधून
जणूं आज त्यांच्यावरती प्रेतकळा आली.

निजामास त्या बाजीनें दापिलें इथोनी
चालली इथें नानांची लेखणी शहाणी
राज्य इथें कळसा नेलें बालमाधवांनीं
हाय ! दुज्या बाजीनें परि काय दशा केली !

* * *

पुसट पुरातन वैभव हें दिसतसे अम्हांला
परी तेंहि जाऊं पाहे आजला लयाला
होतसे बगीचा येथें हवा खावयाला
फुलें हुंगुनीया व्हावें कसें शौर्यशाली ?

* * *

स्मरणाचिन्ह गतविभवाचें एवढें असूं दे
पाहुनी तयातें अमुचे बाहु फुरफुरूं दे
हात जोडितों तुज देवा ! भीक एवढी दे
दुजा तुझ्यावांचुनि आम्हां नसे कुणी वाली.

---

# केशव लक्ष्मण ओगले

## स्वराज्य अमुचा एकच कैवारी

स्वराज्य अमुचा व्यसनार्तांचा एकच कैवारी । खरोखर । एकच कैवारी ।
साधक इहपर लोकहिताचा अन्य न संसारीं ॥
ध्यास लागला नित्य तयाचा, न सुचे इतर कथा । खरोखर ।
न सुचे इतर कथा । दादाभाई महर्षिनें या दावियलें सुपथा ॥ स्वराज्य ॥
स्वराज्यसत्ता स्वभावसिद्धचि लोकीं मनुजांची । खरोखर । लोकीं मनुजांची ।
झांकुनिया परि तीतें, आम्हां मायाभ्रम जाची ॥ स्वराज्य ॥
धन्य धन्य ते मानव ज्यांहीं स्वराज्य ओळखिलें । खरोखर । स्वरूप ओळखिलें ।
सत्य हें स्वरूप ओळखिलें । परवशतेचें पटल तयाचें दूर सहज झालें ॥स्व०॥
बालपाल नरसिंहांच्या जे बोधा अनुसरती । निश्चयें । बोधा अनुसरती ।
पापकल्पना जळति तयांच्या सर्व भ्रम सरती ॥ स्वराज्य ॥
नव्हे स्वराज्या अपात्र कोणी, तें बहु गुणकारी । खरोखर । तें बहु गुणकारी ।
साधन राष्ट्रहिताचें त्याला सर्वचि अधिकारी ॥ स्वराज्य ॥

---

# रघुनाथ दत्तात्रेय सरंजामे

## झिम्मा

" झिम्मा खेळूं ये झिम्मा नाचूं ये–
आकाशींचे तारेसंगें–झिम्मा खेळूं ये
अंधारी ही रात्र काळी
कोणी पाहीना मुळिंहि
एकटीच अंतराळीं–झिम्मा खेळूं ये.
सप्तऋषींमधें सती
बैसलीसे अरुंधती
लाडक्या या आजीसंगें–झिम्मा खेळूं ये.

दुर्दैवाचे प्रेमी जीव
आकाशींचे तारे राव
त्यांच्यासंगें स्वैररंगीं–झिम्मा खेळूं ये.
चांदण्याच्या चंद्रज्योती
हिमगिरी चकाकती
हासऱ्या या ज्योतीसंगें–झिम्मा खेळूं ये.
चवथीची चंद्रकोर
हळू चाले सुकुमार
लाजऱ्या या पोरीसंगें–झिम्मा खेळूं ये.
काळ्या मेघामागें जाऊं
वीज नाचे पैंजण लावूं
नाचऱ्या या पोरीसंगें–झिम्मा खेळूं ये.
दक्षिणेचा झंजावात
रानफुलें उफाळत
झंजावातीं दोघें रंगूं–झिम्मा खेळूं ये.
पेटे वन चंदनाचें
झोत झाले गगनाचे
ऐशा दिव्य झोतासंगें–झिम्मा खेळूं ये.

× × ×

बोलावूं का साऱ्याजणी
यमुनेचें उडे पाणी
पाण्याच्या या मोत्यासंगें–झिम्मा खेळूं ये.
जाईजुई
आकाशीच्या पोरीबाळी
आणी तूं मी एकमेळीं–झिम्मा खेळूं ये.

× × ×

कांहीं केल्या कांहीं कोणी
येथें घरीं येत नाहीं
एकटी कां गात गाणीं—झिम्मा खेळूं ये.

× × ×

" असो आपुल्या अंगणीं
तुळशीच्या वृंदावनीं
तुझ्या माझ्या प्रीतीसंगें—झिम्मा खेळूं ये.

---

# जयकृष्ण केशव उपाध्ये

## गीतराघव

मुद्रिका बघुनि विस्मित झाली
प्रीतिनें उचलुनी कुरवाळी
चुंबुनी स्वहृदयीं कवटाळी
'ही इथें' म्हणतसे 'काशि आली ?'
प्रिय सखे ! मुद्रिके ! अवचित दिसलिस बाई !
आलीस कोठुनी कैशी वद या ठायीं ॥ ध्रु० ॥
अति घोर पसरला होता हा अंधार
नच दिसे कुठेंही कोणाचा आधार
सर्वत्र निराशा, आशा लपली पार
हें भ्रांत जाहलें हृदय सुचेना कांहीं.
नैराश्यतमीं या चंद्रिकाच झालीस
कीं मरणसमयिं गे ! सुधाच मुखिं पडलीस
कीं कल्पलता मज रंका सांपडलीस
तव दुर्लभ दर्शन सुखकर नयनां होई.

वद कसा कुठें गे ! प्राणसखा रघुवीर
तो करी स्मरण का माझें गुणगंभीर
मज कुशल तयाचें सांग, निघेना धीर
तूं बोल बोल गे ! मौन टाकुनी देई.

श्रीचरण पुनः ते नयनीं दिसतिल काय
तीं प्रेमळ वचनें श्रवणीं पडतिल काय
तो सुखद समागम मिळेल पुनरपि काय
हें सांग सांग तव चरणिं ठेवितें डोई.

त्या धन्य तरुलता राम दिसे ज्यां डोळां
किति वानुं तयांच्या भाग्याचा सोहोळा
सकलही तयांचीं पुण्यें झालीं गोळा
कीं समरूप त्या दिसतें ठायीं ठायीं.

आनंदगिरीच्या शिखरीं नांदत होतें
श्रीरामसमागम सुखवित होता मातें
परि प्रभंजन उठुनी पडलें येथें
हें दुःख टळाया उपाय वद मज कांहीं.

मी परम अभागिनि मुकलें राघवपाया
निष्ठुरा आजवरि जगलें विरह सहाया
निष्प्रेम हृदय हें तिळही त्यांत न माया
शतचूर्ण म्हणुनि तें होत अजूनिहि नाहीं.

तव दैवयोग किति थोर म्हणुनि वानावा
प्रभुविरह ज्या तुला क्षणभरही नच ठावा
पुण्यांश तुझा तो अभागिनिस मज द्यावा
तेणें तरि रघुपति ठेविल मज निज पायीं.

तो विशाल उदधी तरलीस कैशी माये !
हा दुःखार्णव मी तरेन त्याचि उपायें
मी तुझी जाहलें शिष्या पदरीं घे ये
श्रीरामप्राप्तिला तूंच मला गुरु होई.
प्रिय सखे० ॥

---

# दत्तात्रेय श्रीनिवास केळकर

## यामिनी.

निळ्या नगावर चढत सांवळी मधु मंगल यामिनी
वरचेवर सांवरीत पदरा लाजरीच कामिनी
चंद्रकोर चमकते विजेची नाजुक निटिलावर
नजर रेखिली तरल धुक्याच्या तारांतुन भूवर
सुमनगंधनिश्वास निरामय निर्भर नादावुन
दिशा सुंदरी विहार गुंफित गात मनांतिल मन
निळ्या वेणिला फुलें तारका एकतार गोंविल्या
नारिहृदयकोंवळीक कळण्या येति उड्या कोवळ्या
जगा दावुनी लीलालालित ललित लोल लाघव
निळावंतिच्या जळांत बघते रेखिव निज वैभव
तडागपुष्करतरंग हृदया प्रशांत हेलावत
प्रियकर कोमल विलास स्मृतियुत दृष्टि लाजलाजत
उठति सृष्टिच्या अवकाशामधिं सुरेल स्वनझंकृति
वायुविकंपित करकंकण मृदुरवांत लय पावती
ब्रह्मांडांतिल सौंदर्याला प्रीतीला पारखे
बघति असे घुबडांचे डोळे प्रीतिरूप सारखे
निद्रासिंजित पायिं लोळती पांचूचे पैंजण
विश्ववेदिकेवरति उभी ही मधुर ध्यान लावुन

## जा गडे !

होती वाचनिं मग्न मत्प्रियसखी बागेमधें एकदां
गेलों संनिध मंदमंद गतिनें साशंक झाली तदा
आश्चर्यें वरती बघे, पसरि मी बाहूस चेष्टामिषें
लज्जेनें ललना हळूच वदली ' हें काय बाई असें ! '

' कोणी पाहिल ! अर्थ यांत न मुळीं ! थट्टा पुरी ही गडे ! '
प्रेमोत्कर्षक चुंबितां म्हणतसे लज्जावती ' जा गडे ! '
हृत्कुंजावर माझिया चिमकुली आशालता बागडे
चुंबी मी तिजसी पुन्हा कितितरी ऐकावया–' जा गडे ! '

---

# गोविंद रामचंद्र हिंगणेकर

## बाण.

रे बाणा विखरीत अग्नि–कण हे जासी कितीसा वरी ?
फूत्कारा करिशी, जवें उधळसी, दारू असे तोंवरी !
जातां ती विलयासि दग्ध–वपु तूं खालीं करोनी मुख !
येसी जेंवि मदांध अंत-समयीं ते भूपती-सेवक !

## रसाळ आम्र !

आम्रा ! रसाळ इतुका मधुगंधयुक्त
झालासि केंवि सुभगाकृति तूं सुसेव्य !
कोणीं दिली तुजसि सुंदर हेमकांती ?
लाली तशी उमटली जणुं कुंकुमाची !

* * *

" पाटींत राहुनि शिरीं युवती-जनांच्या
मी चालतां अरुण दे मज रम्य शाली !

ऐकोनि मंजुळ पदें युवती–मुखींचीं
झालों रसाळ, रसिका ! नव गोडि आली ! ”

## ढाल.

ढाली ! स्वयें अमित सोसुनि मार आंगें
आम्हांसि रक्षिसि खरें ! तव कीर्ति मोठी !
झालीस मारक परी दुबळ्या पशूंतें
जे आश्रयें तव जगीं जगण्यासि आले !

---

# हरि महादेव समर्थ

## विजया दशमी

श्रीरामा पुरुषोत्तमा प्रियतमा सीतामनश्चंद्रमा
ताताज्ञा प्रतिपाळिली कठिणहि प्राणापरी उत्तमा
व्योमीं मित्र तशापरी विचरशी चंद्रासवें काननीं
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी.

मंदारापरि दुष्ट दैत्य पिळिले· विघ्नें ढगें फोडिलीं
धैर्यें वृत्ति उदार शांत धरिली मायामयी सोडिली
केलें कार्य समस्तही निशिदिनीं सत्संगती साधुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी.

भारे दुर्मतीचे तरोत म्हणुनी संसारमायाजलीं
कामक्रोधमदादि षण्मतिशिळा संकीर्ण संयोजिलीं
केली थाट अवीट त्याजकडुनी सेतू प्रभो ! बांधुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी

चाराया तृण कामरूप अधमा सद्वृत्तिसेनाग्रणी—
केला चिन्मय वायुपुत्र, नगरी लंका कुडी जारिणी—
त्यानें जाळियली, सखी मिळविली त्वां रावणा मारुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी.
जय्जय्कार नभोंगणीं सुरगणीं केला सुमां वर्षिलें
दुष्टोच्चाटण धर्मरक्षण जगत्कल्याणही साधिलें
आत्माराम सदार पुष्पकनभोयानीं प्रभो बैसुनी
सोन्याचा दिन आज तूं परतुनी देसी जनालागुनी.
देऊं केंवि सुवर्णहीन जन मी आतां तुम्हां राजया !
देती नित्य नवीं नवींहि सुकवी रत्नें करीं ज्यांचिया
देतों एक सुवर्णपत्र म्हणुनी रागें न हें आपटा
कांतेनेंहि दळें समर्थ पुजिलें भक्तिप्रिया चोखटा

## तें काय ?

श्रुत्यादिकीं वर्णुनि वर्णियेलें.—श्रेष्ठीं सदा जें प्रतिपादियेलें
भूदेवसंतीं बहु ऐकवीलें,—मुमुक्षुंनीं नित्यहि सांठवीलें
तत्त्वीं अतिश्रेष्ठ असेंचि ठेलें,—जें सेव्य लोकां अवघ्याहि वेळे,
निःशंक सर्वां आणि उद्धरीतें,—दास्यापदेतें सकला हरीतें
रामायणीं व्यक्त कवीश्वरानें—केलें असे सात्त्विक वाल्मिकानें,
जें भारतीं भागवतीं पुराणीं—संपादिती सादर शुद्धवाणी
जें साधिलें वानरसैनिकांनीं,—स्वीकारिलें जें नरपुंगवांनीं,
रानीं रणीं अक्षय गाजवीलें—प्रत्यक्ष सर्वांप्रति दाखवीलें
लोकीं, विलोकीं, अवघ्या प्रसंगीं—इष्टा अनिष्टाहि, प्रियांगसंगीं,
जें दाविलें उत्तम पांडवांनीं—सर्वार्थदायी रणतांडवांनीं
जें मावळ्यांनीं शिवरायकालीं—पृथ्वीवरी उंचहि शैलमालीं,
पुनःपुन्हाही बहु गाजवीलें—प्राणापरी संतत सांचवीलें

तें काय सांगा कवितेंत कोणी—या किंकराची पुरवा शिराणी,
मातें कळे तें कळवीन. वादा—सोडोन, वंदून समर्थ—पादा

---

# शरच्चंद्र

[ विष्णु दत्तात्रय जोशी ]

## रमणीयता

पुष्पांत रम्यता दिसते,
हातांत खुडोनी घ्यावें;
आनंद तदा तें देतें,
हें सूख मनाला व्हावें;
सूगंध तयाला नाहीं,
खिन्नत्व कशाला यावें ?
मधुगंध नसोनी कांहीं,
सौंदर्य कुठें तें जावें ?
रचना रंगित रमणीय,
पुष्पांत माधुरी वसते.
स्वरसंगम सुंदर साधे,
काव्यांत माधुरी वसते.

## परावलंबन

मुक्या मनाची मुरली वाजे वारा भरतां तोंडांनीं
चित्तहि रमतें तद्गानीं
मुरली गाते मंजुळ गीतें, अर्थ तिचा तिज समजेना
वाजविणारा डुलतो ना !

साळुंकीही मंजुळ बोले मंजुळ बोलां नित्य जरी,
शिकवीतां धणि अन्य परी
अर्थ तिचा तिज समजेना परि एकसारखी घे ताना
बोलविणारा डुलतो ना!
परावलंबन करुनी असलें करितों काव्यें नवीं नवीं,
हांसुन डोले रसिक कवी

## विराम

[ प्रगतीला शेवट कुठेंच नाहीं, मग विराम तरी कुठें असणार ? ]

सांग कुठें जाशी सख्यारे,
सांग कुठें जाशी ॥
पक्ष्या नभ हें मर्यादित नच,
वरवर तरि उडशी ॥ सख्यारे० ॥
थकल्या तरुणा, पृथ्वी अगणित,
वणवण किति फिरशी ॥ सख्यारे० ॥
अफाट सागर, नौकाधारा,
होडी वल्हविशी ॥ सख्यारे० ॥
वरवर जातां कोठें, जीवा,
विराम मग तुजशी ॥ सख्यारे० ॥

---

## बलवंत

[ बळवंत हणमंत पळशीकर ]

## काळाची करणी

चंद्राची चढती कला प्रतिदिनीं त्या दिव्य नीलांबरीं
तारांतें लपवी स्वतेजकिरणीं तैशी तुझी सुंदरी

मूर्ती मोहक मानिनी ! मनसिजें चित्रीं जणूं रेखिली
प्रेमें मीं नयनाश्रुमौक्तिकमिषें झांकोनिया टाकिली

चाफ्याचीं सुकुमार सुंदर फुलें वेंचोनिया आणिलीं
शृंगारोनि तुझ्या सुपक्ष युगुलां विश्वांतरीं फेंकिलीं
विश्वासें रचिलीं कपोलफलकीं पुष्पद्वयें लाजिरी
संध्या आणि उषा सकोप झुरल्या तेव्हां मनीं सुंदरी

उत्फुल्लाननकांति लाजवि तुझी तेव्हां शरत्पौर्णिमा
गालांची सुषमा बघोनि कमलें स्वीकारिती नीलिमा
वायू सोडुनि पुष्पभार सगळा निश्वास रेणूस ने
लेवोनी नयनद्युतीस नटलीं नक्षत्र तारांगणें !

वीणा छेडित बैसलों रिझविण्या जेव्हां तुला साजणी
मैना कोकिल कीर तीं मृगकुलें येवोनिया आंगणीं
होतीं निश्चल ठाकलीं सकल तीं सृष्टी तशी मोहिनी—
हा ! हा ! त्या स्मृतिनेंच आज हृदया केलें दुभंग क्षणीं !

केलें पूजन हें असें पदतलीं सांगा कुणी ताडन
मूर्ती भंगुनि मात्र हाय ! उरला पाषाण निश्चेतन !
काळाची करणी कठोर असली प्रत्यंतरा येतसे
झालें नैकविधें अनंत नटल्या विश्वांत या शून्यसें !

---

## सीताराम बाळकृष्ण जोशी

### निराशा

पर्णें शेवटचीं गळून पडलीं भूमीवरी व्याकुल
झालें वैभव सर्व नष्ट बघुनी हेमंत पर्याकुल
विश्वाच्यावरि ये नवी टवटवी वृक्षीं मृदू पालवी
आला माधव, गोड हास्य उधळी, चिंतेप्रती मालवी !

पुष्पें डोलति मौक्तिकाभ तितुकीं पानें न वेलींवर
तैसा वृक्षशिरीं सुरम्य खुलतो उद्गंधि हा मोहर
वायू वाहुनि गोड गान उमटे रानांत वंशांतुनी
कुंजीं तेंवि दरींत मत्त घुमतो हा पंचमाचा ध्वनी

हेमंतापुढतीं वसंत बघणें सौख्यामध्यें पोहणें
जातां तो परि 'हाय ! हाय !' वदुनी दुःखी जिणें कंठणें
सृष्टीचा क्रम हा असे, परि कधीं येईल मन्माधव ?
सौख्याचा हृदयांतरीं कधितरी होईल का उद्भव ?

हेमंता विसरोनि विश्व पुढच्या आशेमध्यें गुंगतें,
आशा मालवते ! तमोमय दिसे ! आतां बघूं मी कुठें !

---

# पुरुषोत्तम वामन गोवई सुभेदार

## फुलांचें मरण

कर्तव्याची धार लावुनी देवाजीची तरवार
मृत्यू हातीं फिरवित आला म्हणत कापणी करणार
आम्ही नेहमीं जुनीं कापतों कणसें पिकल्या दाढीचीं
आज तोडणें गोड फुलें परि सुंदर फुलत्या वाढीचीं
नको सदाचीं आज मला तीं पिकल्या दाढीचीं कणसें
जगांत जें जें सुंदर आहे तेंच आज मज हवें असें.
जरतारीची नवशेवंती भडक गोजिरा गुलाबही
निज रंगांचा गर्व तयांना म्हणुनि टाकिलें दोघांही
तऱ्हेतऱ्हेचीं बहु डौलांचीं फुलें पाहिलीं भूमितळीं
त्यांत चमेली पसंत केली एक सांवळी वनवेली
नव श्वास हा नव्या फुलांचा सुवास देई जरि मजला
घेउन जाइन परतुन देइन त्यांचा त्यांना तो सकला

क्षणांत बघतां फुलें नकळतां अश्रु वहरले तन्नयनीं
हळुच चुंबिलीं दळें दळें तीं गोजिरवाणीं गोड गुणी
असलीं नाजुक सुंदर सुमनें नंदनवनिंही काय कमी
तरिही तोडुनि नेतों इथलीं म्हणुनी म्हणतिल निर्दय मी
वेलीवरची कळी कळी ही अर्धी अर्धी फुललेली
काय मराया नच उमलाया या अवनीवर अवतरली
नका म्हणूं तें तुम्हां सांगतों मुळींच नाहीं निर्दय मी
देव सांगतो तेंच ऐकतों केवळ त्याचा मी हुकुमी
छान चिमुकलीं सुंदर सोज्ज्वळ पृथ्वीवरचीं आण फुलें
स्वर्गांवरच्या स्वामीजीनीं आज मला हे हुकुम दिले
देवहि होते रहात येथें लहान होते जेव्हां ते
पृथ्वीवरच्या पूर्वप्रीतिचें चिन्ह तयांना मोहवितें
याच कळ्यांची करिन पेरणी तेजोभूमींत वरील
त्यांतुन त्यांहुन सुंदर सुंदर नक्षत्रें अवतरतील
याच फुलांचे या रंगाचे तऱ्हेतऱ्हेचे पोषाख
इंद्रदिगंबर सुरवर करुनी मिरवितील आचंद्रार्क
उत्क्रांतीचें तत्त्व सारखें फिरतें माझ्या जगतांत
त्या तत्त्वाची मूर्ती माझी मलाच मृत्यू म्हणतात
जन्म ज्यां दिला तीं जायाचीं म्हणून माता गहिवरली
तें पाहोनी दुःखाश्रूंनीं दळें दळेंही दहिवरलीं
मिळतिल माझीं सुमनें मजला पुनरपि तेजोभूमींत
म्हणुनि लतेनें फुलें निरविलीं नीट मृत्युच्या हातांत
फुलें तोडिलीं, परडी भरली, हंसलीं रुसलीं कुणि रडलीं
अलगज धरुनी दूतमूर्ति ती परतुनि देवाघरिं फिरली
काय चमेली मेली म्हणतां चमक चांदणी ती बनली !
पुरती फुलली नभोमंडळीं पृथ्वीवर ती जरि नुरली

कुणि पाखंडी पुसतां येउन कुशल फुलांचें दुष्ट मनीं
तयां सांगतों स्वयेंचि वरती जाउन बघ जा तीं गगनीं.

---

# शंकर श्रीधर धनेश्वर

## सुबोध

'लीन असावें' मनुजें 'दीन नसावें' कधींहि जगतांत
'लीनत्व कीर्तिदायक' 'दीनपणा' तों गमावितो स्वत्व.
'अभिमान असावा' तो उन्नतिकर योग्य नेहमीं साचा
'गर्व नसावा' लवही, होतो तेणें, विनाश कायमचा!
शोभेस तो करावा 'विनोद' परि ती करूं नये 'थट्टा'
ती चांगली नसेरे! भल्या भल्या लाविला तिनें बट्टा!
'मर्यादशील वर्तन' शोभे मनुजास थोर भूषण तें
हो न 'भिडस्त' परि मुला! त्यानें नसतेंच विघ्न उद्भवतें.
'प्रेम' असावें हृदयीं, प्रेमानें नित्य लाभ होय मुला!
'ममता' नलगे वेडी, नाहीं ती इष्ट सांगतों तुजला.
'राग' असावा आंगीं परिमित, परि तो नको नको 'द्वेष'
द्वेषाग्नि नष्ट करितो पूर्व–प्रेमादि सर्व निःशेष!
कर 'काटकसर' समयीं उपयोगी तुज पडेल वेळेला,
परि 'कृपणत्व' नसावें ओळख यांतील योग्य मर्म मुला!
'औदार्य'भूषणानें इहपर, मनुजास सौख्य बहु होतें,
परि 'उधळ्या' नच होई, उधळपणें हीनता जगीं येते.
हो 'कर्मनिष्ठ' सात्विक, ईशावरि शुद्धभाव ठेवूनी,
चित्तांतला सकळ मल जातो कर्मेंच साफ तो धुवुनी.
परि सांगतों मुला तुज 'कर्मठ' होऊं नको कधीं फुकट,
कर्मठपणंच शिरतो चित्तीं ना योग्य तो असा हट्ट!

हो ' धर्मनिष्ठ ' पुत्रा ! धर्मचि तारक असे पहा अंतीं,
परि ' धर्मवेड ' नलगे इहपर त्यानें अपाय बहु होती.
हा बोध ठेव चित्तीं, वागें यासम तुला न मग भीति,
व्यवहारीं, परमार्थी, चिरसुख बाळा मिळेल त्या न मिति.

---

# जयवंत

[ एस्. सी. करी ]

## शिवकालीन मराठ्यास—

उलथुनि दे परसत्ता ती
शौर्य गाजुं दे भूवरती !

पळापळाला तव तेज
वाढूं दे सगळें आज
भाला बरची बंदूक
घे तव इतिहासा देख !
शत्रूवर ठेवुनि नजर
घे तुझीच ती समशेर
एकच घाली
म्हणजे सरली
चिंता सगळी
उलथुनि दे परसत्ता ती
शौर्य गाजुं दे भूवरती

घाव सोसले आजवरी
न सोसणें ते अतां तरी

टांचेखालीं शत्रूच्या,
भीरुपणाच्या, काळाच्या
राहुं नको पड बाहेर
शौर्य दाखवी तव थोर

नसांनसांतुन
वीर तनूंतुन
सदाच नूतन
प्रगट होउं दे तव स्फूर्ती
शौर्य गाजुं दे भूवरती

रणमर्दांचे पुत्र तुम्ही
परसत्ता ती अति जुलमी
सहन न झाली वीरांला
लढून गेले स्वर्गाला !
वीष जहर जें जुलुमाचें
बांधव तव प्याले साचे
वांचवि त्यांना
नको वल्गना
हींच प्रार्थना
ऐक ऐक बा ही विनती
शौर्य गाजुं दे भूवरती

मरणोन्मुख झाली माय
शेवटची घटका–हाय !
पुत्र तिच्या तूं शूर असा
रमलासी परदास्यि कसा ?

शोधावें तुज आईनें
अर्ध्यां मिटल्या नयनानें!
लाजिरवाणी
स्थिती अजूनी
कशी सोसुनी
राहसि? होसी मंदमती!
शौर्य गाजुं दे भूवरती!

---

## जननीजनकज

[ पुरुषोत्तम पांडुरंग गोखले ]

### घड्याळ

खरोखरी तू भाग्यवंत किति जगीं घड्याळा गड्या!
प्रवेशसि कुठें न तूं निधड्या?
घरीं, कचेरिंत भिंतीवरती बसुनी उच्चासनीं
फिरविसी सूत्रें तेथिल झणीं
जेठा मारुनि मेजावरती खुर्चीवरच्या जना
इशारत देशी तू क्षणक्षणां
निजलेल्याच्या उशास बसुनी उठविसि त्याला झणीं
लढाया आयुष्याच्या रणीं
विशांत कसलें? उबेंत बससी उरीं जनांच्या सुखें
दर्दीचा बंधु बघत सारखें
पोंचा आला द्रव्यघनाला पोंचीची जागा
घड्याळा भरुनि काढिसी गा!

आंग्लयुवतिच्या वक्षावरती लोळासि चापुन गड्या !
दबविण्या साहसि तिचिया उड्या;

पति कवळाया अधीर झाल्या कामिनिच्या मृदु करां
रिझविसी बोलुनि गुलगुल खरा.

तूं गळ्यांत नसतां गळ्यांतला ताइत
परि गडबड करतां गळ्यांत येसी खट
तुजकडे न बघतां पडशिल होउनि मृत

जोडयापरि तुज भड बनवावें–आजारसि तूं नित
बोधामृत परि गोड पाजिसी हजाररूपी नट
दोन परस्पर–भिन्न प्रकृति एकच ठायीं जरी
वाजती बारा त्यांचे तरी.

भिन्नप्रकृति करुनि राहिल्या जरी काटकोणा,
उघड हें मिळे काट कोणा.

मोठा मासा छोट्या गिळतो जगिंचा हा नेम
इथें तरि चुकणारा कुठुन ?

छोट्या नांवें चालुनि जगतीं असे खरा मोठा
तोच हो सकलांचा नेता.

वडें नांव परि क्षुद्र जातिचे जगतीं असती जे
शवें तीं त्यजलेलीं तेजें

अस्सल मोठे साठ पाउलें जातां चालोनी
पांच हे खोटे लाजोनी

सर्व तऱ्हेनें सान असति ते सान वर्तुळांत
कृतीचा डोंगर उचलीत.

त्या जोरावरती मोठ्या येई दम
—परि नको मना तूं भकूंच येथें दम
जरि घडथाळ असले धडोहि दे घालुन
अज्ञातानें घालुनि दिधलीं चक्रें तीं चुकविणें
नाहीं जगीं या मुळींच सहसा शक्यच हें होणें.

---

# पांडुरंग गोपाळ लोहोकरे

## पथ दुस्तर संपवि वेगें !

ये चालुनि चालुनि शीण हो हैराण जणुं जातो माझा प्राण
ही लांबण सरते केव्हां ? केव्हां जीवा लाभेल विसावा देवा ?
लागली सारखी आस साहिन त्रास मज विश्रांतीचा ध्यास
दुर्लंघनीय नग पुढती
आशेची झाली माती
भीतीचीं भूतें गमतीं
हे सहचर माझे जाण केव्हां कोण स्वार्थास्तव घेतिल प्राण !
मार्गांतिल सुंदर सृष्टी नच अदृष्टीं मम जीव सदाचा कष्टी
त्या मानस हारी राई चुकुनी येई नशिबाला डोंगर खाई
संपेल कधींचा त्रास
हा तसाच कटु सहवास
जीवा न सुखाचा लेश
हा मार्ग नको मज आतां परि संपवितां कोणी नच त्राता !
प्रभु दीनाचा तो नाथ बघतो अंत वाटे न तया कां खंत ?
विश्वाचा राजस राजा धनि तो माझा कुणि जा हो त्या सांगा जा

मी आजवरी बेमान
तव पायां झालों पूर्ण
परि तुजला माझी आण
तव चरणीं हरि मी मागें-पाहिन मागें पथ दुस्तर संपवि वेगें !

---

# मकरंद

[ विश्वनाथ लक्ष्मण आगाशे ]

## जड जीवाचें जगणें

चराचराचा ध्यास लागला जीवाचे होती खेळ
रोज नव्या खेळांत रंगण्या जीव पळे रानोमाळ
अस्मानाच्या लुकलुकतीचा ध्यास जरी जीवा लागे
नैराश्याचे काळे फत्तर प्रेमाला करिती जागे !
हृदयाच्या बागेंत नाचती प्रेमाशा सुंदर नाच
नाच नाचतां पीळ पाडिती जगतावर या जगताना
दुनियेची वाटिका बहरली रंगी रणीं जीवांनीं
बेरंगी प्रेमाची तेथें कशी टिकावी जडवाणी ?
ओसाडाच्या एकांताचा आश्रय केवळ मिळणार
तोंच घेउनी लाथ जगावर मारण्यास कां जाणार ?
जड जीवाचें जगणें मुष्किल या जगतावर झालेलें
मरणाचें सुख कसें मिळावें ? दैवच जेथें फिरलेलें ?

## पूर्णविराम

रूपाला बघुनी तुझ्या रुचिरशा, आश्चर्य वाटे मनीं
बाले ! घे गाहिऱ्या स्थितींत अपुलें ऐश्वर्य हें भोगुनी

प्रेमाचा अविकार घोट जगतीं वाटावयाला गडे !
बाल्याचे रमणीय खेळ अजुनी तूं खेळ जें बागडे.
वायूच्या लहरी सदा शिरिं तुझ्या खेळांत केंसांसवें
हास्याचे मधुनाद रक्त-अधरा चुंबीत प्रेमासवें
गालाचें गुळमोहरें फुलवुनी गालीं रवी हांसला
त्याच्या आधिंच कोण हा भ्रमरही येवोनिया बैसला !
सौंदर्यप्रतिमा जिवंत असली या मर्त्यलोकावरी
नेत्राची नवती क्षुधा शमविते या बाळल्या अंतरीं
विश्वाचा नव चित्रकार असल्या रेखाटुनी मूर्तिला
ठेवी " पूर्णविराम " गालिं करण्या सौंदर्य–कीं–पूर्तिला !
आहे जोंवरि या जगांत जगणें देवा असें पाहुंदे !
कीं या नश्वर जीविता कधितरी आराम हा लाभुं दे ! !

---

## मोहन

[ विठ्ठल केशव कोंडेजकर ]

### लावणी

खेळ खेळतां सख्या सुंदरा डाव तुझा हुकला,
म्हणुनीच खेळ कां थकला ?
अर्धामुर्धा खेळ टाकुनी कोणिकडे झुकलां ?
ही लबाडि कोठें शिकलां ?
हार गुंफितां एकाएकीं तुटुनि कसा पडला ?
दुर्दैवा कोठें अडला ?
हंसरा मुखडा तुझा पाहुनी जिव माझा हंसला,
परि अतां पुरा तो फसला.

तव प्रेमानें आजवरी मम देह किरे नटला,
भाग्याचा तारा तुटला.
तुझ्या संगतीं जीवाचाही पांग सख्या फिटला
परि धीरच आतां सुटला.
पहिल्या दिशिंचा गोड वायदा आजच कां सरला ?
ओंठावर कां रे जिरला ?
फिर विश्वाचा तुफान दरिया आज सख्या भरला
सौख्याचा सौदा हरला.
आळवितां तुज परोपरीनें जीव सख्या हटला
अश्रूंचा तटही फुटला.
किति रडूं तरी गतदिवस मनीं आणुनी
किति करूं जिवलगा तुझी अतां विनवणी,
मी बापुडवाणी झालें तुजवांचुनी
प्रेमापायीं वेडी झालें जीव आज मेला
जग उदास झालें त्याला.

## मेघांची फजिती

चटक चांदण्या बघुनि धांवले काळे काळे मेघ
पळून गेल्या सगळ्या; त्यांना लागुं न देतां थांग
चुकुन राहिली परंतु तेथें एकच अल्लड पोर
हंसुनी डोळे मारुनि करिते मेघांना बेजार
तरणीताठी पोर एकली पाहुनि पाणी सुटलें
मेघांच्या तोंडाला; सगळे तिच्याभोंवतीं जमले
हांसत हांसत तोंच पळाली तीही अल्लड पोर
हातावरती तुरी देउनी रडूं लागले चोर

रडुनी रडुनी हलका झाला त्या मेघांचा जीव
वाऱ्यानें उडविलें तयांना दूर साधुनी डाव
परतुनि आल्या लगेच सगळ्या त्या गगनींच्या नारी
हांसत हांसत पुन्हां बैसल्या आपआपल्या दारीं.

---

## दत्तात्रय बापुराव पद्माकर

### तन्मय–राधा

तव चरणसरोजीं भ्रमरी मी अतिलीन
तारि गा ! सदय माधवा ! ! करी भयहीन
मी तीच तुझ्या आवडिची आहें राधा–
लाडकी सतत वागवी तिला सुख–कंदा !
जी तुवां बहुतापरी वर्णिली, ठेली
ती तीच चिमुकली कृष्णा ! पाहुनि धाली
पावतां तुझ्या चरणाला–मी मुदें,
याचितें दीन दासीला–सुगति दे,
मी कथितें मद्दुःखाला–अभय दे,
“ त्वत्कृपें लाधली काया तुज अर्पीन ”
म्हणतां जन हंसती ‘भली भली गे !’ म्हणुन
कुणि म्हणती मजला–“ संग न धरिं तूं त्याचा
सुरुचिर तव काया शिणविल काळा वनिंचा
तव हरिणापरि जी सुंदर नयनें; त्यांची–
गति होइल कान्ह्यापरी वांकडी साची
तव अधरबिंब ते कपोल जैसीं सुमनें
फिर फिरुनी मागें सुकतिल उष्णें पवनें

मुरलीच्या मंजुळ नादें–मोहुनी,
वेड्यापरि तुजला राधे ! फिरवुनी,
सुखलेश लवहि तुज ना दे–त्याहुनी
तूं ऐक आमुच्या वृद्धांचें हित–वचन
फिर मार्गे जाऊं नको फिरविं तव वदन"
हें मूढ वचन ऐकतां कींव ये त्यांची
कां दृष्टि जाहली अंध वृद्ध कुजनांची
जो सखा जिवाचा त्रिभुवनपतिही तैसा
मी त्यजिन धरुनि लोकापवाद मनिं कैसा ?
परि नवल गमे माधवा ! तुझ्या चरणाला—
पावतां निंदिती काय म्हणावें याला ?
कुणि निंदा लावा दोषा–मज नसे
ती लज्जा चाडहि आतां–नुरलिसे
श्रीकृष्ण कृष्ण मनिं ध्यानीं–वसतसे
'हें खरें काय राधिके !' म्हणुनि हरि बोले
'तुज वेड लागलें, तसेंचि मजला झालें'

---

# वनराज

[सदाशिव कृष्ण उपाध्ये]

## कवितेस

कोठें तूं असशी — प्रिये गे ! भेट न कां देशी
शोधुं कुठें तुजला — जींव हा शोधुनि किति दमला
'तुझ्या प्रीति करितां' — सुखें मी त्यजीन ही जनता
'तुझ्या प्रीति करितां' — सुखें या सोडिन गे जगता

'तुझ्या प्रीति करितां' सुखानें टाकिन मम कांता
'तुझ्या प्रीति करितां' शेवटीं पदिं ठेविन माथा
'तुझ्या प्रीति करितां' प्रिये गे ! करूं काय आतां ?
दर्शन दुर्लभ जें सखे ! तें झडकरि दे मातें

जरी न तू येशी वाहुं मी पुष्पें कोणाशीं ?
जरी न तू येशी काळ हा कंठूं कवणाशीं
तूं जर येशील जगत् जड कधिंहि न वाटेल
दिसेल मग मजला धरेवरि स्वर्गचि अवतरला !
करिसी जरि प्रीती सखे गे ! धन्याचि मी जगतीं
कधिंहि न कोणाला भाग्य तें लाभेलचि मजला
म्हणुनी विनवीतों प्रेमले ! प्रेमें आदरितों
ये ! ये ! हृदय फुले ! करूं जग क्रीडांगण अपुलें
या वन–वल्लींचा नाच मी करविन प्रेमाचा
अति कोमलतेचा हरिति जीं गर्वाचि मदनाचा
त्या मृदु सुमनांचा पथचि गे करीन प्रीतीचा
प्रीतीचें गाणें गावया लाविन हौसेनें
खगगण हे गाती तान जणुं गंधर्वांचि घेती
पाही गीताला तालही धरि सरिता–बाला
पिंगा तालाचा त्यावरी चाले वायूचा
झणीं धांव घेई सखे गे! पवन निघुनि जाई
वाऱ्यावरि बसुनी जाउं ये दिव्य अशा गगनीं
तुझिया प्रेमानें शोधिन लपलीं जीं भुवनें
गाणीं गाऊन सकल या जगा जागवीन
जगता हलवून सुखानें त्यांतचि डोलेन
जिवंत जगवीन आणखी मेले उठवीन

| | |
|---|---|
| नलगे पाण्याचा | प्रळय मी करीन प्रेमाचा |
| जगता बुडवीन | यमाला मागें फिरवीन |
| गाइन तें गाणें | येइल काळासचि मरणें |
| सुर, नर भुलवीन | सारखीं गाणीं गाऊन |
| गाणीं गाऊन | अखिल ब्रह्मांड डोलवीन |
| शेषा डुलवीन | हरीची मुरलि वाजवून |
| निद्रा टाकून | बावरा बघेल भगवान |
| तारा जमवीन | भोंवतीं तुझ्या खेळवीन |
| सारें सोडून | असा मी तुला आळवीन |
| उदास 'वन–राजा !' | तुजविना; प्राणचि तूं माझा |
| येऊं दे कींव | हे सखे ! दासा वांचीव. |

---

# वनराज--मित्र

[ कृष्णाजी लक्ष्मण सुमंत ]

## मनोहारिणी

मूर्ती मोहक गोजिरी रति दुजी ऐशी मनोहारिका
हृत्प्रांतीं निवसे विचार नुरवी जी भ्रांतवी मस्तका
ती मूर्ती बघण्या उतावीळ अती होवोनिया अंतरीं
आलों सर्वहि कामधाम त्यजुनी गेहाप्रती सत्वरी;
येतां द्वारिं दिसे सुरम्य रमणी जी मूर्त पावित्र्यता
स्वर्गीतील विलासिनी थिरमती पाहून यद्दिव्यता
लावण्यें विनयें अलंकृत असे जी सद्गुणांची खनी
ती माझी सुम-कोमला सहृदया राणी मनोहारिणी;
गेले तारवटोनि मन्नयन तें सौंदर्य पाहोनिया
झाली गुंग मती भ्रमिष्ट बनलों शुद्धीहि गेली लया

गात्रें सर्वहि तीं शिथील बनलीं चैतन्य गेलें लया
मेळी उद्भवुनी विचार–लहरी हृत्सागरीं जी लया—

ती ही कीं, मज राहुं द्या सततची ऐसा जगन्मोहना
कल्पांतींहि नका स्थिती दुरवुं जी आधार मज्जीवना

## कवि विरागी

### गूढाशय

फिरुनि विजनीं अज्ञातीं मीं फुलें बहु वेंचिलीं,
सर विरचुनी त्यांचा द्याया तुला, घरिं आणिलीं;
अकुशल परी गुंफाया मी तया, मज हें पुरें–
कळुनि पसरे लज्जा आस्यीं, बने मन बावरें !
म्हणुनि विखरीं मी हीं पुष्पें पदीं तव मोकळीं;
प्रियतम गणीं त्यांतें, आशा नसे मज आगळी.
करिं धरुनिया वीणा, अंकीं मुदें तिज बैसवी;
धुन मधु पडो संगीताची तुझ्या श्रवणीं नवी–
मज बहुत ही आशा, तारा झटें जुळवावया;
स्वर नच जमे ! नैराश्यें ये हंसें उसळूनिया !
कलरव विरे वीणेमाजी, सु–गान हृदन्तरीं !
अभिमत कळो अव्यक्तीं जें निगूढ, तुला परी.
सुरपति धनुर्वर्णां आणीं श्रमें धरुनी करीं
प्रतिकृति तुझी रेखोनीया नभःपटिं मी बरीं,
करिन विविधीं वर्णीं, वाटे, सुरंजित साजिरी
उठति न मुळीं रेषाही त्या अनन्तपटीं परी !
चषक शिणुनी रंगाचे मीं दिले पटिं सांडुनी
'घनतमिं भरे ही बेरंगी नभीं !' धरिं तूं मनीं !

मम उदधिच्या लाटा पायीं तुझ्या वघ खेळती.
गहन उदरीं रत्नें याच्या किती शुचि लोळती!
सकल तुज तीं ओपाया मी प्रयत्न जरी करीं,
उघळत पहा येती वेगें तुषारच हे वरी!
उदधि म्हणुनी फेंसाळोनी पिशापरि नाचतो!
प्रकट न जरी होई शब्दें मदाशय, जाण तो.

---

# विपिनाविहारी

[ लक्ष्मण गणेश सुळे ]

## हांसरी बालिका !

[ एका २।३ वर्षांच्या बालिकेस हंसतांना पाहून सुचलेले विचार ]

रुचिर बालिके! मोद–दायके! नयन–सुभग–तनु सुमंगले!
तव मधुहास्यासुधा–वृष्टीनें हृष्ट मला केलें
विश्वाच्या मांगल्याचें प्रतिबिंब उमटलें सुकोमले!
मूर्तब्रह्मचि नर्तन करि तव हास्यीं वा बाले!
निर्मल–वदना आशा देवी सजली जणु बाल्यीं तुझिया
सात्त्विक आनंदाचा ठेवा विलसत कीं मुखिं या
सौख्याचे वा परार्ध झाले सम्मीलित त्वन्मुखांतरीं
प्रीतीचे जणुं तुषार बाले! लोचन झळकति बहुतपरी!
मधुहास्याची मधुलास्याची झंकृति तव मम हृदंतरीं
हर्षोर्मींचे प्रेमोर्मीचे उठाव उठवी विविधपरी
गोंडस बाले! विराजते जणुं बांसरि बोबडि मुखावरी
अमृत–गर्व–हर मधुरवचावलि रागदारि ही छेडि वरी!
सरस वाक्सुधा–निष्यंदी कविची वा कोकीळेची
वाणी प्रिय नच तुझ्या सुमंजुल वचांहुनी साची!

आनंदाचीं सुमनें उधळिसि श्रांत मनावरि मधुहास्यें
'सु'मन बालिके ! मृदुतनु-लतिके ! नूतन चंद्रास्यें !
शांत करिसि तूं श्रांत मन्मना मधुबाले ! सद्‌गुणनिकरें
हांस गडे तर हांसुनि हांसवि विश्वहि एकसरें !
'करो ईश तुज दीर्घायु' असा आशी प्रेमभरें-
अर्पुनि, करितों 'विपिन-विहारी' कवना स्फूर्तिभरें !

---

## माधवसुत

[ कै० दामोदर माधव कुलकर्णी ]

### प्रीतिदेवता

नूपुरसिंजन दुःखविभंजन श्रवणिं सुखद आलें-
जातां मार्गीं, त्याच दिशेला नयनहि हे खिळले !
मुग्धा सरला बाला दिसली सस्मित-मुख-कमल,
पावित्र्याची माधुर्याची मूर्ती ती विमल !
पद्मभवाच्या चातुर्याची, परम रसिकतेची-
साक्ष पटे बघतांच मनाला मूर्ती बालेची !
जिकडे जिकडे चंचल नयना स-लील ती फिरवी,
तिकडे तिकडे आनंदाची वृष्टि विपुल करवी !
सरळ नासिका, गाल गुलाबी, अधरबिम्ब शोभे,
भ्रुकुटि वक्र त्या मन्मथ धनुसम, दृष्टि न कां लोभे !
भृंगश्यामल कुंतलभारहि पृष्ठीं तो लोळे,
मृणालनालापरि भुजलतिका, मंद मंद चाले !
मंजुलहास्य साजिरें मुखावरि, करिं लीला-सुमन,
भाव न कसला पूर्ण विलसला, पवित्रता-स्थान !

महाभाग तो कोण असावा सहवासा पात्र ?
झालें कैसें भूमितलीं या सुभग असें गात्र ?
नव्हे मानुषी रूप, खरोखर उचित सुरांमाजी,
मुग्धच होतें मन, वाणी ही अडत असे आजी !
पवित्र वातावरणामाजी विहार करणारी–
हिमकरतनुला सोडुनि केव्हां कुठें न ठरणारी,–
शरच्चंद्रिका धवल यशाची, निर्मळ भावाची—
मूर्त रूप घे लीलेस्तव ही सु-खानि प्रेमाची !
मधुर दृष्टिचा तिच्या विषय जो भाग्यानें झाला,
असो पातकी, असो घातकी, पावन तो झाला !

---

# वासुदेवशास्त्री बागेवाडीकर

## करुणापंचक

विश्वेशा रघुनायका भवजळीं संत्रस्त झालों अती,
सौख्याचा नच लेशही निशिदिनीं, त्यालागिं धांवूं किती,
नाहीं ज्ञान, विरक्ति, भक्त परि मी ते आस लागे मना,
तारीं या शरणागता झडकरी ये जानकीजीवना.

सांडोनी जनिं मानपान उदरासाठीं श्ववृत्ती बरी
मानी मी, अनुताप दग्ध मन हें होतें सदा श्रीहरी,
देईं वा मजला सुबुद्धि, कुमती ते लोपवी मीपणा,
तारीं या शरणागता झडकरी ये जानकीजीवना.

नेणें मी जनिं वर्तणें सुखघना कारुण्यसिंधो विभो,
घेईं कष्ट यदर्थ ते स्वजनही सोडोनि जाती प्रभो.
देईं भेट मना अशान्त पुरवी भक्ताचिया कामना
तारीं या शरणागता झडकरी ये जानकीजीवना.

यावज्जीव जगत्पते रति सदा त्वत्पाद-पद्मीं जडो
देहीं दार्ढ्य बडो श्रुतीं मम पडो त्वन्नामसेवा घडो.
वाचें गाउं गुणा न विस्मृति मना हो ही असें याचना
तारी या शरणागता झडकरी ये जानकीजीवना.

अज्ञानें चुकतों परी करासि तूं माझें सुसंरक्षण
चित्तीं ते न वसे प्रभो अदयता वा दीनबंधो क्षण
ऐशा जो करुणाघना न भजतो धिक् धिक् तया जीविता
तारी या शरणागता झडकरी ये जानकीजीवना

---

# कवि विनय

## श्रीसमर्थांची शिकवण

श्रीरामाचा होता प्रेमांकित एकनिष्ठ भक्तसखा
त्या श्रीसद्गुरुदासा, अर्पियला सुमनहार हा देखा
झाला जेव्हां देशीं लोप पहा फार आर्यधर्मांचा
"स्थापुनि भगवा झेंडा" बोधामृत पाजवी जगा साचा
रघुराज दूत जैसा, तैसा लोकीं पराक्रमी थोर
आजन्म 'ब्रह्मचारी' दीनोद्धारक दयानिधी फार
शिवरायाच्या हस्तें देशामार्जी 'स्वराज्य' स्थापियलें
लोकां सुख बहु होई देशोद्धारक व्रतासि चालविलें
'छत्रपतीस' समर्थें, राष्ट्राचा 'राष्ट्रधर्म' शिकवीला
'गोब्राह्मण' प्रतिपाळा, जगतीं वाढीव आर्यधर्माला
ईश्वरभक्ती, पहिली दुसरें दे स्थान 'राजकार्याला'
एणेंपरि धर्माचा राज्याचाही प्रसार जगिं केला
यवनें हिंदूलोकां गांजियलें वा तशीच गोमाता
आर्यावर्ता तेव्हां तो त्यांचा जाहला असे त्राता

श्रीगुरुला शिवबानें अर्पियलें राज्य आपुलें पाहीं
तो धर्मनिष्ठ ज्ञाता, अभिलाष तया मनामध्यें नाहीं
एके काळीं झाला होता हो गर्व फार शिवबाला
गुरुनें चमत्कृतीनें, शिष्याचा सर्व गर्व घालविला
झांपड नयनावरची, होती ती दूर सारुनी आमुची
शिकवण, दे धर्माची, नीतीची, आणि देशभक्तीची
सद्गुरुदासकृपेनें सत्वर आर्यां स्वराज्य, लाभावें
गुरुचरणीं लीन असे 'विनय' शिरीं वरदहस्त ठेवावे

---

## कवि सुहृद

[ केशव नारायण वैद्य ]

### विधवाविलाप

दृष्टिआड जा तुम्ही, विनवी मी फिरफिरुनी
मागत मी हेंच तुम्हां–सांगुं कसें समजावुनी!
मी विधवा ब्राह्मण, तुम्ही तरुण उम्या भरज्वानी !
दर्शन तुमचें न घडो शब्द न येवो कानीं ! !

वैधव्यें जधिं वरिलें,
नातेंगोतें गेलें,
प्रेम तेविं मम मेलें
काय लाभ हो रडुनी.

दृष्टिआड जा तुम्ही विनवी मी फिरफिरुनी!

भ्रमण भुतापरि करणें
गृहकार्यीं मन रमणें
ये परि क्लेशा हरणें

नशिबीं ठेलें–लिहुनी
दृष्टिआड जा तुम्ही विनवी मी फिरफिरुनी !
कौमार्यी दिन कैसे
गेले बहु हंसुनि हंसे
हें झालें आज असें !
वाटे जावें मरुनी
दृष्टिआड जा तुम्ही विनवी मी फिरफिरुनी !
प्रेम–बद्ध त्या काळीं
होतों, घडि ती गेली
कल्पनाच वा मेली
लाभ काय मनिं ठेवुनि,
दृष्टिआड जा तुम्ही विनवी मी फिरफिरुनी
कष्टवितां निज प्राणा
कां माझ्या गतप्राणा !
घेउनि जा नजराणा
देतें झणिं मी काढुनि
दृष्टिआड जा तुम्ही विनवी मी फिरफिरुनी !
काय दिलें विधवेनें ?
काय घेतलें तरुणें ?
नेत्रींचें निज नाणें
अश्रु–बिंदु दे रडुनी
गेली विधवा सदनीं, तरुण उभा खिन्न मनीं !
हा देवा ! हा देवा !
जन्म कशाला द्यावा
प्रेमाचा प्याला न्यावा

ओंठावरचा काढुनि
शापुनि दुनियेला तो गेला वेगें निघुनी

---

## एल्. बी. वैद्य

### वसंतागम

शिशिर होत शांत, उभा दारिं हा वसंत
मोदभरें डुलती ते भूवरिचे संत ॥ ध्रु० ॥
उधळी हा भू–मरंद, लुटती तो भ्रमवृंद
द्विजवर आनंदिं धुंद, गाति पंचमांत
पल्लवयुत तरु खुलता, कलिका कोठें खिलती
लतिका कोठें डुलती, पवन संगमांत
सुमन सुभग सुजन शिरीं, मधु सुवास पुष्पांतरिं
वसंतमोद सुजन उरीं, सुमन संगतींत
दंव–तुषार; जलतुषार ओढा उसळूनी फार
पसरे भूवरि अपार त्यांच्या संगांत
हिम हुडहुडि ती गेली, हेमंतीं जी रमली
नवनवलाई आली, नटुनि या जगांत
मोदभरें चोहिंकडे, गोखड्यांत, खुलति कडे
कोणां नच येथ रडें, विकसतां वसंत
सृष्टीची खास गुढी, उभवी हा देव गडी
काठीवर जनहि गुढी, निज उभारित
येतां भूवरि वसंत, दिक्कालीं मोद भरत
आपणही मजलसींत, जाऊं गात गात

---

# बोधेश्वर

[ पंडित शंकर कुलकर्णी, बी. ए., एल्‌एल्. बी.]

## भाऊबंदकी

हो तरीच म्हटलें असें कसें हें घडे
आपसांत जन हे कां भांडति बापुडे
हा बंधु बंधुच्या छातीवरती चढे
असे घडे या अज्ञ जनांना घालुनि देती बडे
करावें काय यास मग गडे ॥ ध्रु० ॥

हे कौरव पांडव वाली सुग्रीव कीं
राज्यार्थ भांडले लिहिलें व्यासादिकीं
वर्णिलें क्षत्रियीं कलह किती आणिकीं
असे घडे... ... ...

हीं पंचभुतें जीं प्रकृतिचीं कारटीं
घालिती धुमाकुळ विश्वीं ठोकी पिटी
वाटतें भीति ती क्रीडा बघतां दिठी
असे घडे... ... ...

हा भूमि आक्रमावयास सागर खपे
ती परतवी तरी फिरुनि यावया टपे
अपयशी कुमति मग घाण तिजवरी वपे
असे घडे... ... ...

पाऊस अग्नि विज वारे तरि हे किती
या सृष्टिदेविची सुंदरता हिरविती
आकाशसमाधिस्थितिप्रती भंगिती
असे घडे... ... ...

हा निसर्ग अपुलीं पोरें पोशी कसा
एकास मारुनी दुसरें जगवी पिसा
या गिरविति जरि तरि दोष न ये माणसा
असे घडे... ... ...
नव्हे छे चुकलों परि मी गडे

हा भाउबंदिचा झगडा उगवे सदा
हेवा कां स्वपरद्वेष मूळ घे यदा
परि विश्वामाजी असें घडेना कदा
नियम बद्धती कर्तव्योद्भव प्रेमाची भांडणीं
अगाधचि देवाची मांडणी

हा भाउबंदिचा झगडा तोंवरि टिके
जोंवरी धुळीतें पक्ष एक ना झुके
ही सत्यनाश-बुद्धी नच विश्वीं दिसे
क्षणिक परस्पर-सुख-परिणामी विश्वांतिल भांडणीं
अगाधचि देवाची मांडणी

ते मूर्ख जगाचें तत्त्व न समजे तया
स्वार्थार्थ उठति दुर्मति जे भांडावया
नेतील न अंतीं अन्य कुमतिवीण या
पहि-हितार्थ भांडा उच्च ध्येयासाठीं तंडा सुखें
विनवि कवि बोधेश्वर सारखें

---

# गणेश प्रभू

[ गणेश कृष्ण प्रधान ]

## नकली पसारा

[ अपुऱ्या गोष्टी पुऱ्या करण्यांत जीव जसा रंगतो तसा तो पूर्णत्वाला पोहोंचलेल्या चिजा पाहतांना रंगत नाहीं. 'पुरे' झाल्यानंतर 'पुढें' काय ? हा प्रश्न तरी अपुरा राहणारच. पूर्णता हा विश्वाचा बुद्धिगम्य लय आहे.]

अरधेंच चक्र जीवाचें ! अपुरेंचि सर्व राह्याचें
पूर्णता कशी ती यावी, आद्यंत नसे ज्या कांहीं
साध्यांत नव्हे ती मौज, साधनांत जी भरलेली;
रंगास गोडि भंगानें,
जगण्यांत मौज मरणानें,
सौख्यास मान दुःखानें,
बहु सख्य भिन्नभिन्नांचें ! जगिं विरोध भरला साचें !

पूर्ण गोल अवकाशाचा; अर्ध गोल आकाशाचा
अवकाश चहुंकडे भरला, आकाश अर्ध आम्हांला
पूर्णता दिसावी ध्येयीं; ना प्रत्यक्षीं त्याची ग्वाही.
खेळ हा असा सृष्टीचा;
सारखाच चालायाचा !
कां विषाद मानायाचा !
अज्ञान ज्ञात वस्तूंचें सौंदर्य यांत मायेचें !

जगताचे कडवे राजे, दिनभर नभपथिं विराजे
उगवत्या बाळ काळाचा, कवडसा बदलुनी त्याचा
जसजसा कीर्ति मध्याला, चढला तैं अप्रिय झाला

तारुण्यमाद ओसरला
उतरत्या वृद्धकाळाला
तेजोहिन पुरता बनला
संपलें राज्य कष्टांचें ! येइल का आनंदाचें ?

सवित्याला लागे श्वास, ना पुरतें आलें मरण
एकेक पायरी चढतो, नभ सिंहासनिंची कोण ?
हा इतका मोहक कोण आकाशीं तळपे तरुण ?
कां हसतो वायू आंतां ?
मुरडती लता त्या बघतां !
टवटवी तापल्या जगता !
सौंदर्य सर्व जगताचें—परि हाय ! हेंहि जायाचें !

---

## रामकृष्ण नारायण फडणीस

## असहकारितेचा दसरा

हृदयमंदिरीं घटस्थापना स्वराज्यदेवीची करुनी
असहकार हा पाठ सप्तशिति करुं या मूर्ती धरुनि मनीं
राष्ट्रियप्रशिक्षण स्वदेशि चळवळ बहिष्कार परदेशिवरीं
देशभक्तिची वाट आंखिली साधुवरें ती धरूं बरी
पवित्रहृदयें स्वार्थत्यागतप आचरुं यातें उज्ज्वलसें
कालिकाळाला सारिल मागें तेज मुखींचें सत्यच हें
स्वाभिमान उद्योगप्रियता, धैर्य शौर्यधी श्रीसुमनें
वासिक चारू सद्गुण सारे करुं एकत्रित संघगुणें
सुपुष्पमाला नव आभरणें वाहूं मोदें भगवतिला
नटवूं सजवूं देवी अपुली, लावुनिया स्वातंत्र्यटिळा

दडपशाहिची सीमा झाली, उल्लंघूं शुभ मुहूर्ति या
स्वराज्यदेवी-पूजन मोदें करूं सर्व अजि मिळूनिया
सुवर्ण-भूमी नांव सार्थ किति स्वाराज्यीं मग दावुं जगीं
सोनें देऊं, सोनें घेऊं, येतां ऐशीं प्रेम सुगी

---

# देवीदास लक्ष्मण महाजन

## सृष्टिकाव्य

वंदू तुला सत्कवींच्या कवीला, कराया मनःकामना–पूर्तिला
पाहे तुझ्या सृष्टिकाव्यास जेव्हां, स्फुरे कल्पना तैं कविस्फूर्तिला
'काव्योदधीतें तुझ्या प्राशितों मी' अगस्ति प्रतिज्ञा करी कोणता ?
'वाचीन संपूर्ण काव्यास ऐशा' कशी कल्पना मी करूं नेणता ?

ऐसें अनाद्यंत जें काव्य तें त्वां, महाकाल-वृत्तांमधें गोविलें
बुद्धिप्रधानास त्या योजनेनें, अनंता ! स्वसामर्थ्य हें दाविलें
'अज्ञेय' जें भासतें तत्त्ववेत्त्यां, दिसे गूढशा गुंजनाचें बल
ज्ञाता म्हणे, 'ज्ञेय मानीं तया मी,' जरी बुद्धिसामर्थ्य तें दुर्बल

त्वां योजिलें 'कल्प' 'विश्रांति' घ्याया, तसे 'पाद' त्यांच्यांत मन्वंतरें
दीक्षा 'यतीची' दिली मृत्युलागीं, तसे 'अब्द' ही ऱ्हस्वदीर्घाक्षरें
नाना चमत्कार सृष्टींत जे जे, तुझे ते अलंकार काव्यांतले
दुःखासुखा मूळ जे का विकारां, रसांचेंच सामर्थ्य हें त्यांतलें

काव्यासवें पूर्ण तादात्म्य पावे, तयां नाठवे काव्यकर्ताकवी
आर्षीच तो काव्यरूपें नटोनी, रसांची रसज्ञास दावी चवी
तैशी तुझ्या सृष्टिकाव्यांत आम्हां, जरी होइना ईश्वरा ! त्वत्स्मृती
मानून घे काव्यरूपें कवीशा ! असे चालली ती तुझीच स्तुती

---

# भानुदास

[ कृष्णाजी विनायक पोटे ]

## आळसाचा उद्योग

आळस मोठा, उद्योगी दिसतो बेटा !
कोणी मोठा धनिक असेना
याचा आश्रय केल्या जाणा,
त्याला हा सोडुनि जातांना
करिल करंटा, उद्योगी०

श्रीमंतांची दशा अशीही,
गरिबांची मग वार्ता नाहीं,
लाविल त्यांच्या तो लवलाहीं
बारा वाटा, उद्योगी०

तरुणपणीं व्यायाम कराया
केला आळस जात न वायां
काया लावी रोड दिसाया
हरी बळ-सांठा, उद्योगी०

रोगबीज जरि देहीं दिसलें
काढुनि आलस्यें न टाकिलें
मृत्यु-संकटा तयें धाडिलें
हा बहु तोटा, उद्योगी०

आळस ज्या देहांमधिं शिरतो
काम तयांना करुनि न देतो
स्वयें परी उद्योगीं रमतो
मनिं उफराटा, उद्योगी०

आळसास आळस नच ठावा
निजोद्यमीं त्या क्षण न विसावा
निजभजकांचा नाश करावा
हाच सपाटा, उद्योगी०

उद्योगाला जगिं यश मिळतें
कधिं मिळतें कधिं अपयश येतें
आलस्याच्या या कार्यातें
अपयश नाहीं, तो सदासर्वदा विजयी

---

## कृष्णानुज

### [ विनायक पोटे ]

### शशि का शिशु?

ऋतू हेमंताचे दिवस असुनी सुंदर खरे
अहा ! रम्योद्यानीं मधुरतर आमोद पसरे
नभामध्यें कोठें लवहि न दिसे अभ्र—पटल
गिरीमागोनी ये दडत शशि पूर्णांग धवल

गमे झेलायाला महिवरुनि कंदूक गगनीं
कुणी हा फेंकीला, अहह ! नच आला परतुनी
रुप्याचा गोळा वा वरुनि कुणिं फेंकून दिधला ?
असा कैसा मध्यें महिवरि न येतां थबकला ?

कुणी मोदें किंवा वरिवरि नभोदीप चढवी
जगाच्या द्वारीं वा धवलतर गोला लटकवी

उभी प्राची देवी नटुनि धरि हें दर्पण करीं
मही देखे कोणी करिं धरुनि ही दुर्बिण बरी !

असावा किंवा हा गगनजलधीचा बुडबुडा
क्षणध्वंसी कैसा अजुनि नभिं राहे परि खडा ?
मुलाच्या मातेनें सहज निजबाळा भिवविलें
भिवोनी अंधारा पळत शिशु हें काय सुटलें ?

दमोनी विश्रांतीस्तव निमिष झार्डीत दडलें
कळे जेव्हां गेलें भिउनि तम, गालांत हंसलें !
पुरें चित्ता आतां बहु बहकणें, हां समजलें !
कुण्या बाळाचें हें स्मितमधुरसें आस्य खुललें !

---

## एन्. व्ही. फडके

### आशा !

सकल वदति 'या विश्वावरति सत्ता परमेश्वरी'
कवीला मान्य नसे हें परी
आशेचें साम्राज्य अखिल या नांदे जगतावरी
स्वामिनी तीच जगाची खरी
दुर्दैवी गतवैभव अथवा हतबल ऐशा नरा
आशा हाच जगीं आसरा
क्षुब्ध सागरीं बुडत्या जीवा तृण जरि दिसलें तरी
जिवाची पुनरपि आशा धरी
मृत्यूचें भय जीवा, जोंवरि आशा अभ्यंतरीं
निराशा मरणातें आदरी

अखिल जगीं प्रत्येक कार्य जें घडे भलें वा बुरें
आशा कारण त्याचें खरें
खडकामधुनी पर्वतांतुनी सोसे कष्टा नदी
सागर–संगम–आशा हृदीं
पश्चिमदिग्वधु चुंबाया रवि आशा धरुनी मनीं
लोटतो अंधारीं मेदिनी

---

## शेषराव गणेश पांडे

### फुलांची वरात

उपवनिं धांदल ही कसली ? । शोभा द्विगुणित कां आली !
कां दंवबिंदू चोहींकडे । सडा घालण्या खपति गडे !
मारुतलहरी सुंदरशी । विंझणवारा करपाशीं
मुदें हलविते । सुखें रिझविते
उपवनिच्या वनदेवाला । प्रीतीचा नव अलबेला
वरात सुमनांची आज । तर का देहावर साज ?
गुढ्या तोरणें सुमलतिके । म्हणुनी का करिसी कुतुकें !
फुलरंगी दिल् दरियांत । प्रेमाच्या लहरी उठत !
प्रेमपताका– । घेउनि हातां—
मधुकर पंचमिं घे गिरके । अस्मानीं काळे भुरके—
कोण मुशाफिर गुलजार ? । अंगीं चकमक ती और !
तृणांकुरांचा रंगि बहू । गालीचा हा मऊ मऊ !
नीलपुष्प निळसर लाज । चढला अस्मानीसाज !
सुंदर चाफा– । बांधुनि साफा—
पिवळा पिवळा शिरावरी । चोहिंकडे परिमल वितरी

शुभ्र मोगरा फुलफुलला । क्षीरसागरीं जणुं न्हाला !
जाइ जुई मोती भालीं । हंसती गालींच्या गालीं !
रुसणें फुगणें कां बाई--! । संतापें लाली देहीं
रक्तकण्हेरी-- । भ्रुकुटि वरिवरी
ताणताणुनी बघसि कुणा ? । कोठें तव राजस राणा ?

रंगरंगली केतकिची । मृदुतर तनुलतिका साची
रोमोरोमीं बकुल हंसे । बुल्बुल् करितो जनां पिसें ।
चटक चमेली रसरसली । अंगीं ज्वानी मुसमुसली
सफेत केवळ-- । साधें पातळ---
नेसुनि, कंचुकि वरि ल्याली । प्रेमाची गुजरी भरली !

गुलाब नवरंगीं नटला । उपवर वधुला वर सजला
शिरिं शिरताज नवी नवती । रेखा कुणि मळवट माथीं
तीट इवलिशी द्या गालीं । प्रीत मनींच्या आंदोलीं !
प्रेमळरंगा-- । शिरिं बाशिंगा---
बेशक बांधा मृदुल करीं । खुलली शोभा कांटेरी

शाल वरी घाला कोणी । गा प्रेमाचीं मधु गाणीं
भरवा प्रेमें ह्यास गडे ! । कां बघतां इकडे तिकडे ?
भर्जरीचा पोषाख करा । कटीं मेखला, फुलगजरा---
डोईवरतीं-- । लेवुनि प्रीती---
उधळा वातावरणांत । गुलाल उडला गगनांत !

नटुनी थटुनी वरमाय । ही लतिका आली काय ?
फुलें विकसलीं हंसति तरू ! । ठाणबंद अबलख वारू--
आणवा; उशिर नको बाई ! । लगिनघडी करवा घाई

मंडपद्वारीं-। झडती भेरी.
मंगल वाद्यें खणखणतीं
प्रेम खेळतें मंदगती !

---

# सदाशिव विष्णु कुलकर्णी कल्लोळकर

## माझी आवडती गुलाबकलिका

झाला घोर अनर्थ ताळहि तया नाहीं मुळीं राहिला,
काळानें छळ क्रुद्ध होउनि जरी माझा पुरा मांडिला;
शोकाग्नी ऱ्हर्दि पेटुनी करितसे संतप्त काया जरी,
माझी आवडती गुलाबकलिका सोडी न चित्ता तरी.

आशेचे रचिले सुरम्य मजले, चित्तांत मीं केवढे
ते निःशेष अहा ! खचून पडले, दुर्दैव येतां पुढें;
भासे सर्व मही भयाण मजला शून्यापरी ही जरी,
माझी आवडती गुलाबकलिका सोडी न चित्ता तरी.

गेली आटुनि पूर्ण मोदसरिता अंधार बोकाळला
झालें सर्व निराशपूर्ण जग हें कोठें न थारा मला;
ऐशा या विषमस्थितींत जरि मी भोगीतसें यातना
माझी आवडती गुलाबकलिका सोडी न माझ्या मना.

संसारीं नच सार; दुःखचि पुनः वांट्यास येई जरी,
शांतीचा लवलेशही न उरला माझ्या मनोभ्यंतरीं
सोडोनी भवबंध, टाकुनि जगा; सेवी जरी मी वना
माझी आवडती गुलाबकलिका सोडी न माझ्या मना.

बाल्यीं जें ठसलें, मनांत मुरलें सर्वस्व जें वाटलें
कैसें जाइल वेड तें मम मना ! जाया न तें लागलें
आहे जोंवरि जीव या कुडिमध्यें सोडी न बा ! तें तुला
माझी आवडती गुलाबकलिका राहील माझी मला.

---

# संन्यासतीर्थ

## विपर्यास

शास्त्रार्थादी सतत झडले ज्या स्थळीं पंडितांचे !
विद्या जिव्हेवर बसुनिया ज्या स्थळीं नाच नाचे
तर्कज्ञानी विपुल जमले दूर देशांवरोनी
केली दाटी अगणित जिथें थोर नैय्यायिकांनीं

जेथें विद्वन्मणि जमुनिया वाद केले प्रचंड
शास्त्री नाना प्रकट करिती स्वप्रतापास चंड
नाना विद्या शिकत असती शास्त्रवेदांत-सार
जेथें शाळा उघडुनि दिल्या पंडितांनीं हुशार

विद्यादानीं बहुत झटती लोक जेथें शहाणे
जेथें लाखों तरुण शिकती वेदशास्त्रें पुराणें
एकामेकां हटवुनि जिथें वेदमंत्रांस गाती
तत्त्वज्ञानी विबुध जनता ज्या स्थळीं फार होती

जेथें शौर्य प्रकट करण्या थोर योद्धे तयार
जेथें मोठे कुशल करिती राजकार्यीं विचार
रक्षायाला सतत झटले धर्म-देशास जेथें
स्वारीमध्यें समर्थि हुरडा खाउनी तृप्त होतें

तेथें ढेरें उदर भरुनी खावया सिद्ध झाले
लाडू पोळ्या गरम जिलबी खाउनी फस्त केलें

तेथें रंगीं सतत झडलीं भोजनें मेजवान्या
पोरी तेथें खिदळति नव्या नर्तकींच्या जवान्या

तेथें घोड्यां नसुनि अवघा भार तक्के वहाती
मेंदूलागीं नसुनि सगळा त्रास पोटें सहाती

तेथें देहा श्रम नसुनिया फार तोंडास होते
तेथें सोद्यां भय नसुनिया सज्जनांलाच होतें

तेथें अंगीं नय बसुनियां मीपणा मात्र होता
तेथें नीती लव नसुनिया भाव चित्तांत कोता

तेथें रात्रंदिवस उघड्या नर्तकी नाचताती
शृंगाराच्या अचकट तिथें लावण्या स्वैर गाती

घेती सोंगें डफ झडुनिया रोज होती तमाशे
गोळा झाले हलकट तिथें लोक निर्लज्ज ऐसे

वाटेलागीं सकल सुकृता लाविलें लावण्यांनीं
होळीचा त्या पथ धरियला शुद्ध दीपोत्सवांनीं

---

## वासुदेव नारायण फडणीस

### कुणास्तव ?

सुधाकरास्तव झुरे कमलिनी
विमल जलाच्या सरोवरीं
प्रणय–संगमीं उधळित ज्योत्स्ना
हिमकर अमृतवृष्टि करी
स्वातीबिन्दूस्तव हा प्रणयी चातक
विरहें नित्य झुरे
कवि कवितेच्या लागुनि नादीं
उल्लंघीतो गिरिशिखरें

सरित्पतीतें आलिंगाया झर झर
रिघती या सरिता
प्रेमजलाचें सिंचन करुनी तोंहि
शांतवी मम चित्ता
चंदनविटपा देउनि विळखा
भुजंग येथें कां बसला
भ्रमरमनीं ही प्रीत कोठली पाहुनि
फुलल्या पुष्पाला
प्रशांत सुविमल उषा हांसरी
सस्मित रविमुख अवलोकी
आणि कोकिला विश्व कुणास्तव
गाणें हें मोहुनि टाकी
प्रीतीस्तव हे हार घातले रजनी
कंठीं मोत्यांचे
शरच्चंद्रिका बघुनि कुणास्तव
चकोर हर्षें हा नाचे
दृश्यपटावर नवरंगाचीं चित्रें
सृष्टि रेखितसे
कवि रसिकास्तव भावतरंगा
गाणीं अपुल्या दावितसे
सौंदर्याचीं फेंकित किरणें फूल
चिमुकलें इवलालें
राजस गोंडस दावुनि चिमणें
वदन कुणास्तव हें हंसलें

वृक्षाधारावांचुनि कोमल
वेल तगावी कशी बरें ?
कुणी कुणास्तव जगीं जगावें
तत्त्व मानसा ! हेंच खरें
मी न कुणास्तव कुणी न माझ्या—
साठीं प्रेमें तळमळती
राहुं कुणास्तव पाषाणापरि
सौंदर्यें भरल्या जगतीं

---

## गोप

[ गोपाळ रामचंद्र आफळे ]

### तारा

चंदेरी दरियांत नाचति उडू, तारा नभीं बागडे
हर्षाच्या लहरी मनीं उसळती, धावे जवें जान्हवी
मोदें उंच उडोनिया नभ-जळीं-शोभा निराळी नवी
डुंबोनी कुतुकें, जळांत लपती, ये एक, धांवे दडे
एका मागुनि एक स्वैर हंसुनी, वेगें कशा धांवती !
धांवोनी दमती, तनू थरथरे, दिङ्मंडळीं लोपती !
घेते एक उडी 'सळाळ सलिलीं', दूज्या जलीं पोहती;
क्रीडादायक हर्ष, तोषुनि दिला, कुंठीत होते मती
दाई चंद्र बने, मुदें हंसुनिया अंकीं बसे रोहिणी
झाकी नेत्र करें, वदे कटु स्वनें 'सुट्यो' गडी मंगळ !
शुक्रादी गुरु चांदण्या, इतरही काढोनि वेगें पळ !—
जाती, झांकित चंद्रमा, जलद ये, भीती सख्या साजणी
बाला घाबरली, भयार्त घसरे, कांपोनि खालीं पडे
अंकीं घे अवनी, शिरास खुपसे, प्रेमें कुशीं ती दडे.

# विद्याधरानुज

## चपला !

द्युलोककन्या तडित्सुंदरी कां दिसते ? बावळी
करित रुदन नभोमंडळीं !
प्रियकर भास्कर तिचा हरपला ! होइ घाबरी अती !
चंचला म्हणुनि तिला बोलती !
दिवसभरी जरि भास्कर तिजला नभांत शोधीतसे !
विरहें व्याकुळ परि होतसे !
कृष्णवर्ण त्या कुटिल पयोदें तिजला भ्रष्टावया !
हरुनिया नेलें सोडुनि नया !
अदृष्ट तिचें परि जाणे भवितव्यता
तो काळ हास्य करि दावुनिया विकटता !
वरियली सुरांहीं स्वर्गामधिं मुग्धता !
क्रोधानें मग पतिव्रता ती चपला चवताळली !
भीतिनें भू कापों लागली
वदली, "अधमा ! परस्त्रियेचा अभिलाषचि वांच्छिसी
मूढा ! पापराशि जोडिसी
अबला मज मानिसी तरी मत्पतिसेवेचें फल !
सत्य रे करिल तुला निर्बल !"
मूढ मेघ कामांध होउनी भीषण हास्या करी !
नसे लज्जा तद्हृदयांतरीं !
कर तिचा धराया खळ लागे जधवां !
ती बिजली चमकन् चमके नभिं तेधवां
कडकडुनि चावली धिक्कारुनिया तया !

" धरणीमाते ! दुभंग होउनि तव उदरीं ठाव दे !
मजला ! " चपला ऐसें वदे !
गेली उदरीं भूमातेच्या चपला ती ज्या क्षणीं !
दगडा पाझर फुटले झणीं !
अनुतापें मग कुटिल पयोदहि अश्रु गाळुं लागला !
उमाळा देवांनाहि आला !
क्रूर काळही कळवळुनीया हृदयीं तेव्हां अती !
वदला, " धन्य धन्य ही सती !"
त्या भारतरमणी व्रत तेव्हांपासुनी !
मज वाटे शिकल्या चपलेच्यापासुनी !
तो मूढ कामही म्लानवदन होउनी !
क्षमा कराया सन्मति द्याया चपलेला प्रार्थितो !
पहा तो विपिनामधिं हिंडतो !

---

## आनंदीकांत

### [ सिताराम लक्ष्मण तांबे बी. ए. ]

### पिंगा

स्फूर्तीची प्याला भांग — कवि त्याचा नलगे थांग
अथांग जीवन सरसरलें — मस्तक अवघें भिरभिरलें
हृदयाला चढली भरती — विकार खळखळ बहु करिती
लखलखाट मस्तकिं झाला — कवी दिवाणा मग बनला
देहाचें सुटलें भान — नाचुं लागलें प्रतिभान
कोठुनसें आलें वारें — एकरूप झालें सारें

# कविसंमेलन

स्तंभित बाह्येंद्रियवृत्ती पाजळल्या अंतर्ज्योती
वर्ण्यविषय नटला सारें बाह्याची मिटलीं द्वारें
चित्ताच्या डोळ्यापुढती विषयविविधरूपें सरती
विषयाशीं समरस झाला पृथग्भाव सगळा गळला
त्रिपुटी तेव्हां एकवटे अद्वैताची साक्ष पटे
देवभक्तभेटी घडतां कांतयुवतिगांठी पडतां
मातेला बालक दिसतां वत्स धेनुला हंबरतां
ऐक्याचा जो रस उसळे तो अनुभविण्या कविस मिळे
विषयाचें हुडकी मूळ सूक्ष्माचें भेदी स्थूळ
स्थूळांतिल घे सूक्ष्म घडा दडला अर्थ करी उघडा
समीपतेला धिक्कारी दूरदूरचें जवळ करी
खालच्यांस आणी वरती वरती तैशीं आवरती
"इकडे तिकडे चोहिंकडे" वातावरणीं क्रांति घडे
मुखें बरळला कवी किती काव्याची बनली मूर्ति
घोटावरती घे घोट थरारती कविचे ओंठ
माज पूर्ण भरला अंगीं नाचे डोळे रसरंगीं
दिक्कत कसली वाटेना अंतरिंचा रस आटेना
द्वैताची दुक्कल सुटली त्यापुरती कटकट मिटली
किती कवे तूं नशिबाचा लाभ घडे तुज पानाचा
पानें होई बेहोष तूं आम्हां देई तोष
होई रे अट्टल झिंगा घालो तव कविता पिंगा
देहाचा सुटला तोल तर कविता सांभाळील

## आनंदतीर्थ

[सदाशिव विश्वनाथ बर्वे, बी ए.]

### भेद मावळला

भेद मावळला आत्मा हा ईशाचि झाला
भेद निमाला देह हरपला
आत्मा धाला ईश जाहला
व्यापुनि टाकी सर्व जगाला
मीपणा थटला परि आत्मानंदें नटला
आतां भेदा कोठें जासी
वसती आतां कोठें करिसी
कोठें आतां आश्रय घेसी
अवकाशाला अवकाशचि नाहीं उरला
मावळलें जग आशा हटली
फिटली शंका ग्रंथी तुटली
मोहननिद्रा माया मिटली
तोडुनी पाशा भेटला जीव हा ईशा.

---

## वनवसंत

[पी. व्ही. रहाळकर]

### मुरली

ऐकावयास मुरली
ही राधिका भुकेली
यमुना–तिरीं बसूनी
मुरलीस वाजवूनी
डुलवावि सर्व अवनी
ही गोड दिव्य करणी !

वेणू–निनाद लहरी
यमुना–जलांत पसरी !
विश्वीं नितांत शांति
ये एकतानता ती !
जवळीं तुझ्या बसूनी
ऐकेन गोड गाणीं.
मुरली–निनाद श्रवणा
आतूर बालकृष्णा !
शांतींत रम्य ऐशा
हें विश्व गुंग ईशा !
ठेवूनि शीर स्कंधीं
पडतांच येत धुंदी !
ही एकतानतेची
परमावधीच साची;
तंद्रींत दिव्य ऐशा
करि अंत रे परेशा !

---

## गणेशनंदन

[ दत्तात्रय गणेश टिकले ]

### अंधानुकृति

पतंग विहरे गगनांत
जलधर बोले तयाप्रत
काय पतंगा नभोदरीं
फिरसि आज तूं भिरीभिरी

गिरके घेसी
मंजुळ गासी
सूत्रनिहत तूं असशि परी
स्वातंत्र्यांताचि मजा खरी

टाक तोडुनी सूत्रातें
चल मिळवी स्वातंत्र्यातें
अनुपम सुख तुज मिळेल रे
विहर विहर मग नभ सारें

अहा हुरळला
बंध तोडला
स्वतंत्रता नच मिळे परी
मुकली गत सौख्या स्वारी

"विचार तिळही ज्या नाहीं
धिक् जीवित त्याचें पाहीं"
बोल बोलती संत असे
प्रत्ययास ये आज तसें

अविचाराची
शिक्षा साची
मिळे पतंगा तेच क्षणीं
अंधानुकृती बरि न जनीं.

---

## लालजी पेंडसे

### रानफुलें

वार्गी रानीं फुलें मुलें तीं
आनंदाचे खेळ खेळती
हरिणाबाला क्रीडासक्ती
कोण तया खेळवितो ?

नादब्रह्म लुब्धा सृष्टी
पीक मधु आलाप काढिती
मयूर नाचति नादासक्तीं
कोण तया नाचवितो ?

उषा विभूषा रक्तासुंदरी
अंधाराचे पडदे दूरी
सारुनि; नूतन जीवनपूरी
कोण उषेचा कल्पक तो ?

पक्षी किलकिल गाणीं गाती
मित्रागमना उत्सुकताती
अरुण सारथी मधुप्रभातीं
कोण तयाचा प्रेरक तो ?

बागीं रानीं फुलें बहरलीं
हसलीं फुललीं मोहें भरलीं
वसुंधरा नवजीवन ल्याली
कोण फुलांना फुलवीतो ?

सवत्स धेनू गेल्या रानीं
ओला चारा चरती कुरणीं
झाल्या तन्मय मुरली श्रवणीं
कोण मुरलि तैं वाजवितो ?

उद्यानीं त्या सुंदर युवती
लतामंडपीं विहार करिती
बावरल्या ! परनरा देखिती
कोण भयाचा प्रेरक तो ?

संसारसागरीं मनुज प्रवासी
प्रयत्नवादें नौका वल्हवी
दैव खडक तैं नौका फुटली
कोण तयाचा तारक तो ?

हरिणाक्षी नवजोबन सुंदर
सचिंत बसली वियोग दुस्तर
एकाकी पातलाच प्रियकर !
कोण तिच्या आनंदा पुरतो ?

सृष्टीचा हा अजब पसारा
मधुर ललित वा रूक्षचि सारा
कुणा रम्य वा भयाण कोणा
कोण तयाचा शास्ता तो ?

दैववशा ! मानवा ! समर्था
करी आपुल्या जीवन सार्था
नसे वाव तव व्यक्ति—स्वार्था
हरि ह्या लीला नटवीतो ?

---

## वामनसुत

### [ नारायण वामन पंडित ]

### मराठ्यांच्या रणदेवतेची संक्रांत !

रायगडाची रणजगदंबा देवी कां निजली
संक्रांतीच्या कातरकाळीं झोंपीं कां गेली
स्वातंत्र्याची क्रांती झाली ! परवशता आली
तारुण्याची तारा तुटली ! परदास्यीं रमली

दुष्मानाच्या छायेमाजी अस्मानी शील
टिकेल कां तव मोतीयांचे कांतिव मंदील
रूमशामचे शामीयाने ! दिल्लीची गादी
स्वप्नामध्यें ईर्षा जळली दास्याच्या नादीं
तुझी छावणी सह्याद्रीची किल्ल्यांची माला
कलिकालानें चोरुनि नेली म्हणुनी कां रुसलां ?
पहा ! देश हा, मराठमोळा स्वस्थ कसा बसला
सह्याद्रीच्या सिंहाला अजि कोल्हा कुणिं केला
जरी शत्रुनें अबला नेली; मुकाबल्यासाठीं
तरी जाइना छत्रपतीचा छावा जगजेठी
गुलामगिरिचा गालीचा बघ पसरुनि प्राणांला
हृदयाचे तव मिलिंद लपले कातर कालाला
अंशुमालिनें क्रांती केली पश्चिमदिक्प्रान्तीं
सुमुहूर्ती या क्रांति होउं दे देवी तव चित्तीं
सह्याद्रीच्या सिंहावरुनी देवि ! आज ऊठ
क्रांतीची रणिं जादू करणें मारूनिया मूठ
पानपतीच्या रणांगणावरि तुटलेला हार
संहारानें शत्रूच्या रणिं गुंफी चौफेर
तारुण्याच्या मोला घेउनि विजयेची माला
शिरकमलांनीं गुंफायाला कातर कालाला
प्रल्हादानें क्रांती केली कातर कालांत
म्हणुनि शारदे रणांगणावरि होऊं दे मात
प्रणाम माझा रणांगणाला स्वातंत्र्याच्या देवीला
देह पडूं दे तुझ्याच काजा गुलामगिरिच्या दहनाला
चिता पेटुं दे; देह पडूं दे; रक्त सांडुं दे अरीवरी
यदूकुलाची कुलस्वामिनी आहे अमुची कैवारी

---

# सौ. उमाबाई सहस्रबुद्धे

## दमयंतीची भेट

नृपतनया ती उद्यानीं । खेळतसे सखया मिळुनी
पावे त्या स्थलिं येवोनी । उतरे खग वृक्षावरुनी
पक्षपातें । भूस हाणी । रमणि पाहीं निरखुनी
चकित होई । विहग पाहीं । देखिला ना । कधिं जनीं
जाइल उडुनि । तो नभ-गमनीं—

धरण्या रमणी जात क्षणीं

हंसगती आधिंच रमणी । पुनरपि हो हंसागमनीं
नाद नोहे । वलयपैंजण । मंद चाले चारु ती—
'गवसलाचि खग तुला तो । वदुनि सखया हांसती—
खग उडविला । कुतुहलिं बाला

पाहि तयाला शशिवदनीं

'दमयन्तीसान्निध घरे- । -प्रती खगा ये ये उतरें !'
राजबाळी । त्वरित उठली । तों धराया हांसुनी;
वदालि परती । 'या न पुढती' । सखिजनातें । भीमकी;
विनोद करितां । खग उडवीता

कां खिन्नविता । मजसि मनीं

एकलीच गेली लाजुनी । ये लाली मुखिं कोपानीं;
समिप येई । दूर जाई । युवति नेली दूर ती;
एकली ती । बघुनि युवती—। हंस बोले तिजप्रती—
'तूं भूगामी । मी नभगामी

ये केंवी मी । तव पाणी ?

करिं येइन परि मम सुटका । करिशिल भीमकबाले कां ?

स्त्रीस्वभावें । काय ध्यावें । सत्य तूझें जल्पणें !
बाळबुद्धि । उलट खाई । भीमनृपकुळभूषणे !"
" कांचनतनुचा । तूं कवणाचा
तुज कशि वाचा । सांग क्षणीं ? "
भाग्योदय उद्यानाचा । पाहूं दे तव पितयाचा "
' बघुनि सोडिन, सत्य वाचा, परि न ये तुज भरंवसा
जाइ अथवा राहि,- सांगे हेतु आगमनिं कायसा ?
विधिकन्यांनीं । तुजवरि बसुनी
गमना गगनीं केलें निशिदिनिं
नाम तुझें कांचनदेही । परिमलकीर्ती तव किति ही ! '
नळयशा मी, गगनविहारी, बघुनि घालों ऐक गे
गुंगलों मी । नळगुणांनीं । दूत मी प्रिय । राहि गे "
नळकथेनें । गुंगे स्वमनें । बहु मोदानें । उमा मनीं.

---

# वामन नारायण देशपांडे

## मदन, मदनविद्ध आणि मदनमंजरी

खेळे मन्मथमंजरी दिनभरीं जी माझिया अंतरीं
स्वप्नींही मधु यामिनीं प्रगटुनी लीला मनोज्ञा करी
तीतें मी वदलों, " सखे ! हृदय हें पायीं तुझ्या अर्पिलें ! "
" त्याची पायघडी करीन, " म्हणुनी ती त्यावरी उत्तरे !
या शब्दें हृदिं शोक तीव्र जडला कैसा निराशाभयें—
तुझा त्यामधिं नित्य वास मदना ! तूं जाणसी तें स्वयें;
आतां तूंचि करी 'अशोक' सदयें कैसें तरी त्याजला
केला जो रतिनें विलाप दहनीं बा ! आण त्याची तुला !

त्वासी दिव्य अशोकवृक्षमयता येणेंपरी लाभतां
होवो स्त्रीपदघात त्यावरि किती झाला जरी तत्त्वतां
तेणें तो बहरेल,—तींच विशिखीं गुंफोनि सारीं फुलें
विंधोनी मग कोमला, करि तिला संतप्त कामानलें !
माझिया हृदया आधीं जियेनें अवमानिलें
वाहील याचितां आतां मानिनी मज आपुलें !

---

## 'कवि–तनय'

[ कल्लोळकर ]

### स्व-देशासाठीं

मला ज्या देशानें जनन दिधलें स्वीय उदरीं
लहानाचा मोठा निरलसपणें जी मज करी
पुढेंही प्रेमानें करिल मम संगोपन सदा
अशा भू–मातेच्या स्तवुनि करितों वंदन पदा

कुठेंही मी गेलों–कितिहि निज सौख्यांत रमलों
सदा प्रीतीच्या मी सदनिं वसलों–भान हरलों
सुचेना कांहींही–स्वसुखाचि सदा–अन्य न मनीं !
'स्व–देशाचा देवा ! विसर न पडो' ही विनवणी

पुरा मोठा झालों–जन बहुतसे मानिति मला
मुलें बाळें, विद्या, धन कमति कांहीं न मजला
स्थिती ऐशी लाभे जरिहि परमेशा मज कदा
विनंती 'भू–माता–विसर न पडो' ही तव पदां

स्व–देशाचा व्हावा लवकरच उद्धार म्हणुनी
न कां कोणी इच्छी ?–अखिल जन वांच्छा करित ती

कितीसे त्यासाठीं अहह ! पण यत्नास वरिती
घडो सेवा भूची मजकडुनि देवा ! बहुगुणी
स्व-देशासाठीं मी करिन मजला शक्य तितुकें
सहाय्या घेवोनी निखिल जनता-यत्न कुतुकें
म्हणो कोणी कांहीं—स्वजन अथवा लोक दुसरे
स्व-देशाच्यासाठीं खचित मम हें जीवित बरें
स्व-देशासाठीं मी करिन—मज जें कार्य—सतत
स्व-देशासाठीं मी त्यजिन निज सौख्यें अविरत
स्व-देशासाठीं मी कितिहि झटलों कष्ट न मला
स्व-देशासाठीं मी झिजविन सदा देह अपुला.

---

## गणेश

### [ गणेश हरी पाटील ]

### वत्सलता

त्या बाळानें फुलें तोडिलीं भरभर फुलवेलीचीं
हवेंत दिधलीं उधळुन, केली दशादशा हो त्यांची
'दे भाऊ दे त्यांतिल कांहीं ' बोलत आली ताई
चोळामोळा केला, परि तिज दिलें एकही नाहीं
नवल खरोखर; त्या वेलीला रागहि नाहीं आला
कारण वारा सुटला आणिक सडा फुलांचा झाला.
त्या तरुणानें फुलें लतेचीं खुडिलीं सुंदर ताजीं
विसरुन गेला भान, तयांच्या मधुर सुगंधामाजीं
तोंच जाहली स्मृति प्रियेची, फुलें वेंचिलीं कांहीं
गजऱ्यासाठीं त्यांतिल निवडुनि कांहीं घेउन जाई

सुमनमिषानें तोंच ढाळिले आनंदाश्रु लतेनें
'फुलेल तुमची वंशलताही,' या मंगल भावानें

त्या वृद्धानें जपून खुडिलीं फुलें लतेचीं चार
हात न वाहे अधिक खुडाया, कंपित झाला फार

वत्सल वेली, कोमल बाळें चोंहिंकडे तो पाही
भावभक्तिनें देवपदांवर तोंच फुलें मग वाही

हर्षभरानें उधळित सुमनें त्यास लता वर देई
'फुलबाळांसम प्रभुच्या सन्निध तूंहि निरामय राही'

नवल खरोखर ! नवल खरोखर ! ! वत्सलता ही मूर्त
स्त्रीजातीला सार्थ शोभवी वत्सलतेची कीर्त.

---

# आत्माराम रावजी देशपांडे

## अंगाई

आकाशीच्या अंतराळीं
तारकांना तज चढे
तुझी माझी प्रीति जडे

परसांतल्या फुलांचा
वास कोनाकोनीं खुले
तुझा माझा श्वास मिळे !

काजव्यांच्या प्रकाशांत
तरुलता एक होत
तुझे माझे गळां हात

## कविसंमेलन

दूर निळ्या शेवटांत
व्योमधरेचें मीलन
तुझें माझें आलिंगन !

वारा पानांच्या दाटींत
किती कोंडलासा वाटे
तुझा माझा कंठ दाटे

आनंदाचें दहींवर
रात्र खालीं फार ढाळे
अश्रुपूर्ण तुझे डोळे !

रातकिडे गीत गाती
अंगाई फुलांना लागे
आतां, तूं मी नको जागे

REFBK-0002585

REFBK-0002585

२५५



## 'कौमुदी-मंडळा'ची काव्यसेवा

### १ नारायण नरसिंह फडणीस

उत्कृष्ट अर्वाचीन कवितांचें मासिक

काव्यरत्नावली—वार्षिक वर्गणी रु. १—८ (जळगांव)

### २ केशव महादेव सोनाळकर ( जळगांव )

कमलपराग (कवितासंग्रह) रु. १॥, प्रेमयोग ( नाटक ), अमृततुषार ( तत्त्वज्ञान ) रु. २.

### ३ अनंततनय ( पुणें )

हृदयतरंग—भाग १, २ किंमत अनुक्रमें १०, ८४, पुण्याची पर्वती ८४, शारदादूतिका ८३, जावळीचा पोवाडा ८३, काका मला शिकवा ८८, तिलकविजय माधव काव्य ( अप्रसिद्ध ).

### ४ नारायण केशव बेहेरे ( जबलपूर )

स्मरणी ८४, कर्मवीर ८४, बोथट बाण ( विनोदी लेख ) ८८, हिंदु कोण ? (कादंबरी), राधागीत, मी ( अप्रसिद्ध ).

### ५ नाथ निफाडकर ( धुळें )

सोनपत-पानपत ८४, सतीचा शाप ! ८४, तारागड ८४, वेणुनाद ८४, मधुमालती ८८, आर्यतेज ( कादंबरी ), देवांची दंडेली, पोलक्यांतील घोळका ( गोष्टी ), काव्य-मंदिरा ( अप्रसिद्ध ).

### ६ मनोहर ( सातारा )

छत्रपति ८३, महराष्ट्र, मुशाफर, धवलगिरी ८३, वीर-वंदन ( मुनीतसंग्रह ), रानफुलें ( समग्र कवितासंग्रह अप्रसिद्ध )